
दीपावली २०२१/ मेहता मराठी


# ग्रंथजगत

पृष्ठे : १६० । किंमत : ₹ १००



नवं कोरं

एकाच वेळी तीन स्पर्धा परीक्षा पार करणाऱ्या झुंजार अधिकाऱ्याचे प्रेरणादायी आणि न्यूनगंडाचा खात्मा करणारे आत्मकथन...





# कर हर मैदान फ़तेह

## विश्वास नांगरे पाटील

पृष्ठसंख्या : २४४ । किंमत : ₹२९९

Book Available

जेव्हा रस्ता **बिकट** होती,
तेव्हा योद्धा **चिवट** होती...



# मेहता मराठी ग्रंथजगत

दिपावली २०२१

वर्ष एकविसावे

किंमत ₹ १००

संपादक
**सुनील मेहता**

संस्थापक संपादक
**शंकर सारडा**

संपादन साहाय्य
**योजना यादव**
**पूजा भडांगे**

मुखपृष्ठ
**सतीश भावसार**

मांडणी
**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर, पुणे - ४११०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२

या अंकाच्या लेखांतील मते त्या त्या लेखकाची असून संपादक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.



# अंतरंग

**संपादकीय** /६

**लेख**

**वेश्यांच्या जिवावर उठलेला कोविडकाळ...**
समीर गायकवाड / ११

**मसणजोग्यांची कैफियत**
संकलन : पूजा भडांगे / १५

**विरामाआधीचा प्रवास**
डॉ. उमा वि. कुलकर्णी / २१

**डॉक्टरांच्या नजरेतून कोरोना**
डॉ. पूजा सविता वसंत सरगर / ३३

**अनिश्चिततेच्या आवर्तातून...**
सिद्धी नितीन महाजन / ३७

**कोरोना आणि अवकाश विज्ञान**
रुचिरा सावंत / ४१

**सीमेआत...घुसमटतोय श्वास**
विजय प्रभाकर / ४७

**संघर्षाची पासष्टी**
सुनील गावडे / ५१

**कैफियत संभाजीराजांची !**
सदानंद कदम / ५७

**कथा**

**सरकारचं काही चुकतंय का?**
प्रा. पुरुषोत्तम रामकृष्ण रामदासी / ६९

**भस्मासूर**
शशिकांत काळे / ७३

**कमलची जिद्द !**
एकनाथ आव्हाड / ७७

**ज्यू बांधवांची सुटका**
मूळ लेखक : गिडिअन राफ
इंग्रजीमधून मराठीमध्ये स्वैर अनुवाद :
मीना जगदीश साठे / ८१

**हलाला...**
स्नेहा नंदकिशोर ढोले / ८७

**कवी आणि कविता**
संदेश कुडतरकर / ९१

**पाण्याखालची माती ममतेहून जादा मुलायम**
नितीन थोरात / ९३

**जयंत जाधवची सीक्रेट लाइफ ?**
सुमेध इंगळे / ९७

**पुस्तकाच्या पानांतून...**

**कर हर मैदान फ़तेह**
विश्वास नांगरे पाटील / ११३

**फॅक्टरी गर्ल्स**
लेस्ली टी छांग / ११९

**मी भारतीय**
के.के. मुहम्मद / १२५

**विटामिन ज़िन्दगी**
ललित कुमार / १२९

**खाकी फाइल्स**
नीरज कुमार / १३३

**कशीर**
सहना विजयकुमार / १४१

**कास्ट मॅटर्स**
सूरज येंगडे / १४९

**दिनविशेष** / १५५

**कविता**

**प्रवीण अक्कानवरूच्या तीन कविता -**
**भीती** / ६३
**दोन रेग्युलर...दोन इनकॉग्निटो** / ६४
**सोशल मीडिया आणि 'मी'** / ६५
**वैराग्य** - अक्षय शिंपी,
**झाडांची किमोथेरपी** - कमलेश महाले / १०३
**बाई...** - सौरभ हिवराळे / १०४
**देव्हारा** - रोहिणी कदम / १०६
**व्हायरल** - सागर चव्हाण,
**ओरखडा** - विशाखा विश्वनाथ / १०७
**एकशे पंचवीस रुपयांची दिवाळी -**
प्रवीण खांबल / १०८

## संपादकीय

# संघर्षातून स्थैर्याकडे...

आपल्या जगण्याचा महत्त्वाचा हिस्सा असलेला संघर्ष. ज्याच्यामुळे जगण्यात धुंदी, मजा, कैफ सगळं सगळं आहे. अगदी जन्मल्यापासून मरेपर्यंत वेगवेगळ्या हक्कांचे झेंडे घेऊन चाललेला हा झगडा आपल्या अनुभवांचं गाठोडं इतकं समृद्ध करतोय की, आयुष्यभर चाललेली ही धडपड शेवटी कुठंतरी पूर्णत्वाला जात असल्याची भावना आपल्या मनात उमटत जाते. अगदी रोजच्याच जगण्याकडं एक नजर टाकली तरी लक्षात येईल की, प्रत्येकजण हा फक्त जगण्यासाठी धडपडतोय. किंबहुना, ही धडपड हेच त्याचं जीवन आहे. मुंगीने साखरेचा दाणा शोधून साठवणं असो किंवा हिंस्र प्राण्यानं पोटाच्या भुकेसाठी सावज शोधणं, माणसानं रोजीरोटीसाठी नोकरी धरणं असो किंवा एखाद्या वंचित समुदायानं आपल्या हक्कांसाठी न्याय मागणं. सगळ्याच गोष्टीत संघर्ष भरलाय; किंवा असं म्हणूयात की, मनुष्य जिथं जाईल तिथे संघर्ष उभा करतो. घरात-दारात, चौकात, रस्त्यावर, कामावर, झालंच तर सीमेवर आणि सीमेपार पसरलेला हा संघर्ष आता व्यक्तिगत राहिला नाही. गेली काही वर्षं तर नैसर्गिक उद्रेकामुळं माणसाच्या वाट्याला एक वेगळंच दुखणं आलंय, त्यातच भर म्हणून कोरोनाची भयानक एन्ट्री म्हणजे दुष्काळात तेरावा महिनाच!

या वर्षी दिवाळी अंक बांधताना याच संघर्षाभोवती विचारचक्र फिरू लागलं. त्या वेळी सहज एक विचार मनात डोकावून गेला की, आपल्या जगण्यात हा संघर्ष का आहे? का आपण हा संघर्ष गृहीतच धरलाय? किंवा मग हा झगडा, हा लढा आपल्या इतका अंगवळणी पडलाय की आपल्याला असा प्रश्न पडतच नाही? खरंतर यामुळंच तर जगण्याला आकार येतोय. साधं, सरळसोट, एकसुरी आयुष्य म्हणजे अगदीच निरस, अळणी आणि सुस्त काळ. आता हा संघर्ष केवळ माणूस आणि भोवतालची परिस्थिती इतकाच राहिला नसून माणसाच्या आत, त्याच्या मनातदेखील वेगळंच द्वंद्व सुरू आहे आणि आता तर कोरोनाकाळाने जगण्याचा नवा वस्तुपाठच आपल्या पुढ्यात मांडून ठेवलाय. एकाच वेळी माणूस माणसाच्या जवळ येतोय तर त्याच वेळी लोक आपल्या जिवलगांना कायमचं दुरावतायत. जीव वाचवण्यासाठीची ही केविलवाणी धडपड करणारा प्रत्येकजण कंबर कसून संकटांना तोंड देतोय. जवळपास सगळीच क्षेत्रं या कोविड महामारीत पिचली गेली आहेत. यातूनही सावरताना अनेक समाजांची, माणसांची, क्षेत्रांची जी ससेहोलपट झाली ती अत्यंत दयनीय आहे. अशाच संघर्षांनी भारलेल्या भवतालाचा एक भाग असताना, आपापल्या अस्तित्वासाठी लढा देणाऱ्या, प्रेरणादायी गोष्टींचा, कथांचा, लेखांचा आणि कवितांचा आढावा घेऊन यंदाचा दिवाळी अंक नव्या आशेनं आणि उमेदीनं आपल्या हाती सोपवत आहोत.

सामान्य माणसाच्या डोक्यावर जसं हे अनिश्चिततेचं आभाळ कोसळलं, तसाच या टाळेबंदीचा परिणाम समाजाच्या आणि तमाम जनतेच्या खिजगणतीतही नसलेल्या उपेक्षित घटकांवरही झाला. देहविक्री करून जगणाऱ्या स्त्रियांची कैफियत समीर गायकवाड यांनी अतिशय करुण शब्दांत मांडलीय. उपासमारीची वेळ आल्यानं दारोदारी भीक मागून जगणारी सांगलीची दिशा, आत्यंतिक मारहाणीमुळे हाल होऊन मेलेली विशाखापट्टणममधली दिव्या आणि गंगेच्या काठावर मरून पाण्यावर तरंगत आलेली उत्तर प्रदेशची जमुनाबाई या तिघींच्या कथा वाचताना हृदय पिळवटून निघतं. अशातच अजून एक उपेक्षित घटक या महामारीत भरडला गेला, तो म्हणजे स्मशानभूमीत काम करणारा समाज. हॉस्पिटलमधून निघणारे मृतदेहांचे ढीग आणि त्यावर वेळेत अंत्यसंस्कार करताना मसणजोग्यांना आलेले अनुभव, त्यांची त्या काळातली मानसिक उलघाल आणि थेट मृत्यूशी सामना करताना जिवाची लावलेली बाजी, या अनुभवांचं संकलन आणि लेखन पूजा भडांगे यांनी केलंय. 'विरामाआधीचा प्रवास' या लेखात उमा कुलकर्णी यांनी आपले पती आणि प्रसिद्ध लेखक विरूपाक्ष कुलकर्णी यांच्या निधनानंतर आयुष्यात निर्माण झालेली न भरून निघणारी पोकळी फार हळवेपणाने मांडलीय. आयुष्याच्या उत्तरार्धात आपला सहचर गमावणं हे किती क्लेशकारक आणि त्यातून सावरणं तर किती संघर्षमय असतं, हे या लेखातून वाचायला मिळतं. 'डॉक्टरांच्या नजरेतून कोरोना' या लेखात पुण्याच्या डॉ. पूजा सरगर यांनी कोविड काळात एक डॉक्टर म्हणून काम करताना आलेले अनुभव मांडले आहेत. डॉक्टरसुद्धा माणूसच असल्याने रुग्णांवर

उपचार करताना स्वतःचं मानसिक संतुलन सांभाळत काम करणं किती अवघड आहे याचे अनेक किस्से सांगताना भविष्यात अशा संकटांना तोंड देताना आपली वैद्यकीय यंत्रणा सुधारण्यासाठी आपण काय करू शकतो, याबद्दलही त्यांनी या लेखात लिहिलंय. जसा वैद्यकीय क्षेत्राला याचा मोठा फटका बसला, तसाच परिणाम पर्यावरणावरही झालेला आपण अनुभवला. टाळेबंदीमुळे माणसाचा पर्यावरणातला हस्तक्षेप कमी झाला असला तरीही दुसरीकडे मात्र वाढत्या PPE kit, use and throw mask चा आणि single use plasticचा वाढता वापर आणि त्यांचे न होणारे विघटन व परिणाम यावर सिद्धी महाजन यांनी 'अनिश्चिततेच्या आवर्तातून' या लेखात अभ्यासपूर्ण मत मांडलंय.

ज्याअर्थी पृथ्वीवर कोरोनानं थैमान माजवून सर्वांना घरात बंदिस्त केलं त्याअर्थी त्याचे इतर ग्रहांवर किंवा अवकाशात काही परिणाम झाले असतील का, असा विचार करत असताना अवकाश विज्ञान लेखक आणि संवादक असलेल्या रुचिरा सावंत यांचा लेख उपयोगी ठरतो. केवळ आपलंच दैनंदिन जीवन नाही तर अनेक महत्त्वाच्या अवकाश मोहिमा या काळात ठप्प झाल्या होत्या, तर काही ठिकाणी याच काळात महत्त्वाचं संशोधनही झालं. याविषयी अतिशय रंजक आणि अभ्यासपूर्ण लेखन आपल्याला 'कोरोना आणि अवकाश विज्ञान' या लेखात वाचायला मिळणार आहे. एकीकडे कोरोनाशी सामना तर दुसरीकडे जवळपास शंभर टक्के लसीकरण पूर्ण झाल्याच्या आनंदात असणाऱ्या इस्राईलला पॅलेस्टाइन किंवा पर्यायाने हमास सोबतचा करावा लागलेला संघर्ष. हा संघर्ष शांत होतोय न होतोय तोवर अफगाणिस्तानात तालिबान्यांनी अवैध सत्ता मिळवून जनतेची केलेली पिळवणूक. हा मानवी संघर्ष मांडताना विजय प्रभाकर यांनी तालिबानी दहशतवाद, त्याचा इतिहास आणि भविष्यात त्याचे जगावर होणारे दूरगामी परिणाम यावर लेखन केलंय. एखाद्या प्रदीर्घ लढ्यानंतर माणसं थकतात, त्यांच्यात नैराश्य निर्माण होतं आणि तो लढा आपोआप शांत होतो; पण याला अपवाद म्हणून गेली पासष्ट वर्षं बेळगाव आणि सीमाप्रश्नाचा विषय पुन्हा ऐरणीवर येतो. याविषयी सुनील गावडे आपल्या लेखातून तिथल्या लढ्याची पार्श्वभूमी तर सांगतातच, सोबत पहिला लढा, साराबंदी आंदोलन, महाजन आयोग, शिवसेनेची भूमिका, कन्नडसक्ती आणि महाराष्ट्राकडून असलेल्या अपेक्षा याविषयी फार आशेने लिहितात. सदानंद कदम यांनी 'कैफियत संभाजीराजांची...' या लेखातून शंभूराजांच्या मनातील द्वंद्व फार नेमकेपणाने मांडले आहे.

या वेळच्या दिवाळी अंकात अनेक नव्या कवींनी आपला कविता विभाग समृद्ध केलाय. प्रवीण अक्कानवरू, अक्षय शिंपी, कमलेश महाले, सौरभ हिवराळे, सागर चव्हाण, विशाखा विश्वनाथ, रोहिणी कदम आणि प्रवीण खांबल यांच्या कवितांनी तरुणाईचा आवाज तर मांडलाच; शिवाय त्याच्या नव्या जगण्यातला संघर्ष आणि अस्वस्थता फार चपखलपणे शब्दबद्ध केलीय.

कथा विभागातल्या 'सरकारचं काही चुकतंय का?' या कथेत प्रा. पुरुषोत्तम रामदासी यांनी एका पक्षाच्या नेत्यासोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्याचं जगणं आणि त्याच्या कुटुंबाची होणारी कुतरओढ दाखवली आहे. सरकार, राजकारण, गरिबी आणि कुटुंब यात पिचून गेलेला एक सामान्य प्रामाणिक कार्यकर्ता या कथेतून एक नवा दृष्टिकोन देऊन जातो. शशिकांत काळे यांची 'भस्मासूर' आणि एकनाथ आव्हाड यांची 'कमलची जिद्द !' या कथा संघर्षाची वेगळी रूपं दाखवतात. 'ज्यू बांधवांची सुटका' ही अनुवादित कथा आहे. मीना साठे यांनी 'ऑपरेशन ब्रदर्स' या इंग्रजी कथेचा स्वैर अनुवाद केला असून, स्नेहा ढोले यांनी 'हलाला...' या कथेतून एखाद्या समाजात स्त्रियांसाठी असलेल्या कायद्यामुळे तिच्या स्वातंत्र्यावर, जगण्यावर किती निर्बंध येतात यावर भाष्य केलंय. संदेश कुडतरकर यांची 'कवी आणि कविता' ही रूपकात्मक कथा, नितीन थोरात यांची 'पाण्याखालची माती, ममतेहून जादा मुलायम' ही ग्रामीण कथा, तर सुमेध इंगळे यांची 'जयंत जाधवची सिक्रेट सीक्रेट लाईफ ?' या कथा वाचकांसाठी मेजवानी ठरणार आहेत.

'कर हर मैदान फ़तेह' या बहुचर्चित आत्मकथनातून विश्वास नांगरे पाटील यांचा प्रवास जनसामान्यांपर्यंत पोचला. याच पुस्तकातील त्यांच्या 'लगीनघाई' या प्रकरणातील रंजक किस्से या अंकात असून, के. के. मुहम्मद यांच्या 'मी भारतीय' या आत्मकथनातून चंबळच्या खोऱ्यातील डाकूंचा सामना करत त्यांनी केलेला वटेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार हा प्रसंग वाचायला मिळणार आहे. लेस्ली टी. छांग यांच्या 'फॅक्टरी गर्ल्स' या अनुभवकथनातील 'फॅक्टरी गर्ल्स' या प्रकरणातील रंजक उतारा वाचायला मिळणार आहे. यासोबत ललित कुमार यांच्या जगावेगळ्या जीवनप्रवासाची कथा सांगणाऱ्या 'विटामिन ज़िन्दगी' या पुस्तकातील 'वेगळा' पासून विशेषपर्यंत'चा प्रवास आपल्याला वाचायला मिळणार आहे. आगामी प्रकाशित होणाऱ्या नीरज कुमार लिखित आणि रोहन टिल्लू अनुवादित 'खाकी फाइल्स', मूळ कन्नड लेखिका सहना विजयकुमार लिखित आणि उमा कुलकर्णी अनुवादित 'कशीर', तसेच सूरज येंगडे लिखित 'कास्ट मॅटर्स' या पुस्तकांमधील काही महत्त्वाच्या प्रकरणांनी या अंकाची शोभा वाढवली आहे.

या दिवाळी अंकाच्या निमित्ताने संघर्षाने भारलेल्या आपल्या भवतालाचा, परिस्थितीला तोंड देत धडपडणाऱ्या कित्येक घटकांचा, त्यांच्या लढ्याचा, शब्दांचं बंड करून बदल घडवू पाहणाऱ्या लेखणीचा आम्हाला मागोवा घेता आला, यातच या दिवाळी अंकाची पूर्तता आहे.

तुझा प्रकाश, प्रकाशा...! जन्मभर मिळो
... आणि साऱ्या मनातला विवेक उजळो...

आशा आहे की हा संघर्ष प्रत्येकाच्या जगण्यास नवी उमेद, धैर्य देवो आणि विवेकाचा दीप तेवत राहो!

ही दीपावली आणि नूतन वर्ष आपणा सर्वांना सुखसमृद्धीचे जावो, ही कामना !

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## 'मेहता मराठी ग्रंथजगत' दिवाळी अंकास मिळालेले पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषद अ.स. गोखले स्मृत्यर्थ **'रत्नाकर पुरस्कार' २००९**

मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांच्या वतीने **'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २००९**

**'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २०११**

रोटरी क्लब ऑफ पुणे, पर्वती आणि लोकमान्यनगर तर्फे

**'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०१०**

**'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०११**

नंदा फाउंडेशनचा राज्यस्तरीय **'नविवा दर्जेदार दिवाळी अंक पुरस्कार २०१०'**

दिनमार्क पब्लिकेशन तर्फे **'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार २०१७'**

दिनमार्क पब्लिकेशन तर्फे **'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार २०१८'**


**३ वर्षांची वर्गणी ₹४५०**   **५ वर्षांची वर्गणी ₹६००**

**३ वर्षांची वर्गणी ₹३००**   'मेहता मराठी ग्रंथजगत' डिजिटल अंक   **५ वर्षांची वर्गणी ₹४००**


| | Account no. | IFSC/RTGS code | SWIFT code |
|---|---|---|---|
| INDIAN BANK | 409764350 | IDIB000S001 | IDIBINBBGYM |

G Pay +91 94223 23039

तीन वर्षांना २५% | आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत | पाच वर्षांना ३०%



Available on
**play.google.com / store / books**
**www.amazon.in**



## संघर्ष

अर्थात सम+घर्ष

सर्व ताकदीनिशी दिलेला लढा...

कधी अस्तित्वासाठी... कधी विचारांसाठी... कधी यशासाठी...

कधी संस्कृतीसाठी...कधी भाषेसाठी... तर कधी जिवंत राहण्यासाठी...


कुठल्याच जीवाला संघर्ष चुकलेला नाही; पण या संघर्षातूनच गोष्टी जन्म घेतात.

प्रेरणा जन्म घेतात. संघर्षातून जगणं आकार घेतं.

अशाच संघर्षाच्या या कथा.

समोर येते ते ते घेण्याची क्षमता आपण मिळवली,
तर जे समोर येते ते आपले होऊन जाईल.

**– रवींद्रनाथ टागोर**



तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी ।।

**- संत गाडगेबाबा**



पुस्तके आपल्याला बसल्याजागी जगाची सफर घडवतात,
पुस्तकांची हीच तर खरी किमया आहे.

**- झुंपा लाहिरी**





# वेश्यांच्या जिवावर उठलेला कोविडकाळ...

**समीर गायकवाड**







लॉकडाउनमुळे कित्येक वर्गघटकांची ससेहोलपट झाल्याचे आपण सगळेच पाहत आहोत. हरेक वर्गास झालेला त्रास भिन्न होता, तसेच नुकसानही वेगवेगळ्या पातळ्यांवरचे होते. शेतकरी, श्रमिक, कष्टकरी, कामगार, नोकरदार, व्यापारी, भटके, बेघर, बेरोजगार, गृहिणी, विद्यार्थी, तरुण, वृद्ध, बालके आणि महिला अशा कित्येक वर्गांत ही विभागणी केली तरी यातली खरी दाहकता समोर येत नाही; कारण समाजातील अनेक घटक असे आहेत, की ज्यांच्यापर्यंत आपण पूर्णतः पोहोचू शकत नाही. 'अशा दुर्लक्षित, वंचित, शोषित घटकांचे या लॉकडाउनने जगणे मुश्कील केले' अशी एका वाक्यात बोळवण करता येणार नाही. अशा घटकांपैकीच एक म्हणजे वेश्या... ज्यांना आधुनिक भाषेत सेक्सवर्कर्स म्हटलं जातं. वेश्यांच्या आयुष्यात आधीच समस्यांचा डोंगर असताना त्यांनी लॉकडाउनला कसं तोंड दिलं याची झाडाझडती घेताना अक्षरशः कोसळून जायला होतं; मात्र तरीही हा गोषवारा सर्वंकष न वाटता प्रातिनिधिकच ठरतो; कारण आपल्या देशात किती अधिकृत वेश्या आहेत आणि त्यांची प्रांतनिहाय आणि वय, उत्पन्न इत्यादी वर्गाधारित आकडेवारीदेखील उपलब्ध नाही. सबब, या सर्व बायकापांशी पोहोचण्याची साधी यंत्रणा आपल्याकडे नाही. यामुळे लॉकडाउनच्या सकल परिणामाचे आणि या आपत्तीशी वेश्यांनी केलेल्या संघर्षाचे नेमके परिपूर्ण चित्र समोर येतच नाही. त्या दिशेने केलेला हा छोटासा प्रयत्न.

दिशा. वय ४१. राहणार उत्तमनगर रेड लाइट एरिया. सांगली-मिरज रोड. दिशाला या धंद्यात येऊन तेवीस वर्षं झालेली. आजवर तिने अनेक यातना सहन केल्या, अनेक समस्यांना खंबीरपणे तोंड दिलं, कैक तऱ्हेच्या लोकांना हाताळलं, कधी उपाशी राहून तर कधी ओल्या पार्टीची चंगळ करून तिने दिवस घालवलेले; मात्र कोरोनाच्या युद्धाला कसं सामोरं जायचं हे तिला उमगलंच नाही. मागच्या लॉकडाउनमध्ये तिने सरकारी मदतीवर आणि एनजीओंच्या आधारावर दिवस काढलेले. कित्येक दिवस एक वेळचं जेवण करून पोट भरलं; मात्र कुंटणखान्याची किराया पाती देण्याची वेळ आली तेव्हा तिने अक्षरशः भीकदेखील मागितली; मात्र कुणाला तिची दया आली नाही. दागिने गहाण टाकून झाले होते. उसनवारी झाली होती, डोक्यावर उधारी आणि कर्जाचा बोजा वाढला होता. यातूनही आपण बाहेर पडू शकू, याची तिला खात्री होती; मात्र पालिकेने जेव्हा एरियाच सील केले आणि लोकांच्या मनात भीती दाटू लागली तशी तिची अडचण असह्य होऊ लागली. अखेर तिने हार मानली आणि ती दल्ल्याच्या निर्जन वस्तीवर जाऊन राहिली. दिशाला तिच्या मामीने विकलेले. घरचे एकेक करून मरण पावल्यानंतर मामाने काही वर्षं तिचा सांभाळ केलेला. नंतर बाहेरख्याली मामीला दिशाच्या रूपात लॉटरी दिसू लागली. तिने मित्राकरवी तिला इथे पाठवलेलं. मामाला खोटं सांगितलं, पोरगी वाईट वळणाची आहे, बदफैल आहे. घरात राहिली तर घर नासवेल. देखण्या बायकोपुढे दिशाच्या मामाचं काहीच चाललं नाही. काही दल्ले तिच्या परिचयातले होते; मात्र उस्मान तिच्या विश्वासातला होता. त्याने मागच्या वर्षी तिला तारलं. लॉकडाउन खुलल्यावर दिशा पुन्हा लाइनमध्ये आली. गाडी थोडीशी रुळावर येते आहे असं वाटत असतानाच पुन्हा दुसरी लाट आली. या खेपेस दिशा उन्मळून पडली; कारण कोविडने पुरती विल्हेवाट लावली आणि नियतीने तिला आसमान दाखवलं. उस्मान तिला आपल्या गावी घेऊन गेला. शेतातल्या निर्जन वस्तीवर तिची सोय केली. हे दिवस सरायची प्रतीक्षा दिशाच्या डोळ्यांत असायची; पण असं घडलं नाही. काही दिवसांनी कोविडच्या संक्रमणाने उस्मान मरण पावला. दिशाला तिथून परागंदा व्हावं लागलं. कशीबशी सोय करून ती मुंबईला परतली. ग्रान्ट रोडला काही दिवस अक्षरशः भीक मागून तिने दिवस काढले. आपण जगलो याचं तिला आता समाधान नाही; कारण हे जगणं म्हणजे केवळ श्वासाचं चलन आहे. त्यात आपलं मन गुंतलेलं नाही, याची तिला खात्री आहे.

अशीच एक दास्तान दिव्याची आहे. दिव्या चेकुदुराई. वय बावीस वर्षं. जून २०२०मध्ये आंध्रप्रदेशमधील विशाखापट्टणममध्ये तिची हत्या झाली. जगभरातील लॉकडाउनमधला सर्वांत हृदयद्रावक मर्डर, असं तिच्या मृत्यूचं वर्णन करता येईल. एखाद्याचं नशीब किती फाटकं असू शकतं, नियती किती हात धुऊन पाठीशी लागते याचं अत्यंत दुःखद, दुर्दैवी उदाहरण म्हणून दिव्याकडे पाहता येईल. दिव्याचे वडील तिच्या बालपणीच निवर्तले होते. तिच्या आजोबांचा संशयास्पद मृत्यू झाला होता. दिव्या अठरा वर्षांची असताना तिची आई, मोठा भाऊ आणि आजी रहस्यमयरीत्या गायब झाले. विझाग पोलिसांनी मिसिंगच्या केसेस नोंदवून २०१५मध्ये फाइल बंद केल्या. एकाच घरातली तीन माणसं गायब होतात याचा कुणाला काही संशय येत नाही आणि कुणाला त्याची खंत वाटत नाही, हे आपल्या मुर्दाड समाजाचं प्रतिबिंब आहे, जे आपल्या परिचयाचं आहे.

दिव्या एकटी पडल्यावर तिची मावशी कांतामणी हिने तिचा ताबा घेतला. कांताच्या मनात आधीपासूनच काळंबेरं होतं. तिचं वैयक्तिक चालचलनही वाईट होतं. जन्मल्यापासून हालअपेष्टा सोसणाऱ्या आणि अन्नाच्या घासासाठी मोहताज झालेल्या दिव्याला मावशीचा आधार वाटला; मात्र तो फोल ठरला. कांताला एक अय्याश यार होता, कृष्णा त्याचं नाव. आंध्रमधील फ्लेशट्रेडमध्ये याच्या ओळखी होत्या. त्यानं कांताला भयंकर सल्ला दिला. अवघ्या काही शेकड्यांच्या बदल्यात दिव्याला वसंताच्या हवाली करण्यात आलं. गौतला वसंता ही अत्यंत दुष्ट आणि नीच स्त्री होती. सभ्य समजल्या जाणाऱ्या लोकवस्तीत तिचा धंदा चाले. तिने दिव्याला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली आणि वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडलं. दिव्याचा पहिला कस्टमर बहात्तर वर्षांचा होता, ज्यानं वसंताला मालामाल केलं. दिव्या दिसायला देखणी होती आणि तारुण्याच्या खुणा तिच्या देहावर ठळकपणे उमटल्या होत्या. त्यामुळे अल्पावधीत वसंताकडे आंबटशौकीनांची रीघ लागली. दिव्याचं जबरी शोषण होऊ लागलं. वसंतासाठी दिव्या टांकसाळ ठरली असूनही ती आपल्या परस्पर काही पैसे लपवून ठेवत असावी, या संशयाने वसंताला पछाडलं. या छद्मापायी त्यांच्यात वाद होऊ लागले. लॉकडाउन सुरू झाला आणि दिव्यासह सर्वांची उपासमार सुरू झाली. अधूनमधून येणाऱ्या एखाददुसऱ्या व्यक्तीच्या मेहरबानीवर सगळं विसंबून राहू लागलं. आमदनी घटली. उलट्या काळजाच्या वसंताला वाटू लागलं, की दिव्या आपल्याला फसवतेय, ती सगळे पैसे हवाली करत नाहीये. आर्थिक तंगीने बेजार झालेल्या वसंताने दिव्याला धडा शिकवायचं ठरवलं.

वसंताची बहीण मंजू, आई धनलक्ष्मी, विवाहित बहीण गीता, मेहुणा

संजय आणि मावशी वेण्णा यांच्या साहाय्याने वसंताने ३० मे रोजीच्या सकाळच्या सुमारास दिव्याचे हात-पाय करकचून बांधले. नंतर तिला विवस्त्र केलं गेलं. तब्बल सहा दिवस तिला सिगारेटचे चटके दिले जात होते. मन मानेल त्या जागी तिला ठोकून काढलं जात होतं. ३० मे ते ४ जून या सहा दिवसांत दिव्याला पाण्याचा एक थेंब देण्यात आला नाही. या काळात विशाखापट्टणममधील सरासरी तापमान छत्तीस डिग्री सेल्सिअस होतं आणि ह्युमिडिटी एक्स्ट्रीम हाय लेव्हल्सवर होती. यावरून कल्पना येईल की पाण्याच्या एका थेंबासाठी ती किती तरसली असावी. तिने पाणी मागितलं की, तिच्या मस्तकावरचे तिचे कुरळे केस उपटले जात. अखेरच्या दिवशी तिच्या डोक्यावर केसच उरले नव्हते. इतकंच नव्हे तर तिच्या भुवयादेखील कापण्यात आल्या होत्या. नाक-कान-डोळ्यांवरदेखील जखमा झाल्या होत्या. तिची स्तनाग्रे कापून टाकण्यात आली होती. अन्नपाण्यावाचून झालेली उपासमार आणि आत्यंतिक मारहाणीमुळे सातव्या दिवशी तिचा मृत्यू झाला. तिचा मृत्यू नैसर्गिक दाखवून अंत्ययात्रेत फुलांच्या चादरीत तिच्या जखमा लपवण्याचा प्रयत्न झाला; मात्र वसंताचं हे कुकृत्य समोर आलंच.

अन्य राज्यांच्या मानाने आंध्रमध्ये ब्रोथेल्स कमी आहेत; मात्र खेड्यातून अडल्यानडल्या मुली आणून शहरातल्या पांढरपेशी भागात त्यांच्याकडून धंदा करवून घेण्याचं प्रमाण सर्वाधिक आहे. प्रकाशम आणि कुर्नूल भागात दलाली करणाऱ्या एका व्यक्तीस दिव्यावरील अत्याचाराची कुठूनतरी भनक लागली. तो दिव्याच्या अंत्ययात्रेत सामील झाला, थेट स्मशानात पोहोचला, तिथं त्याने पोलिसांना याची कल्पना दिली. पोलिसांनी पुढील कारवाई जलद केली. दिव्याचं शवविच्छेदन झाल्यावर तिच्यावर झालेले अनन्वित अत्याचार समोर आले आणि विझाग शहारून गेलं. काही काळासाठी का होईना, पण दिव्याचा नामधारी नवरा असलेला विराबाबू आणि कृष्णा त्याच दिवशी फरार झाले. या अधम कृत्यात त्यांचादेखील हात होता. दिव्याच्या दर्दनाक हत्येमुळे लोक पोलिसांना शिव्यांची लाखोली वाहू लागले. मग २०१५च्या दिव्याच्या आई, भाऊ आणि आजीच्या गायब होण्याच्या केसेसदेखील नव्याने ओपन केल्या गेल्या.

दिव्याची जिथे हत्या केली गेली ती इमारत विशाखापट्टणममधील अक्कायापालेममधील परिसरात आहे. हा भाग म्हणजे पुण्याच्या कोथरूडसारखा आहे. वेगाने विकसित झालेला आणि वर्दळीचा पांढरपेशी भाग आहे हा. इथे एका कोवळ्या मुलीकडून जबरदस्तीने तब्बल सहा वर्षं धंदा करून घेतला जातो आणि सहा दिवस तिचा अन्नपाण्यावाचूनचा आक्रोश कुणाच्याही कानी जात नाही हे अत्यंत दुःखद आणि धक्कादायक आहे. दिव्याच्या हत्येनंतर सुरुवातीला मीडियाने चांगलं कव्हरेज दिलं, लोकांनीही आवाज उठवला; मात्र काही दिवसांनी सगळं विस्मरणात गेलं; मात्र काही वेगळ्याच लोकांनी मामला लावून धरला. दिव्याच्या केसचं सेटिंग केलं जाऊ नये, म्हणून जे लोक प्रयत्न करत होते तेच लोक कधीकाळी खेड्यातल्या पोरीबाळी धंद्याला लावत होते हे विशेष आहे. दिव्याच्या केसमधील इन्फॉर्मरवर दोनदा हल्ल्याचा प्रयत्न झालाय. 'राम तेरी गंगा मैली' मधील मणीलालसारखी त्याची अवस्था झालीय. त्याला बळ लाभो, इतकंच आपण म्हणू शकतो.

याहून काळजाचा थरकाप उडवणाऱ्या घटना उत्तरप्रदेशात घडल्या. गंगेकाठच्या काही गावांनी प्रवाहात शेकड्याने प्रेतं तरंगताना पाहिली. गंगेत वाहणाऱ्या कलेवरांच्या तरंगत्या तराफ्यापैकी एक प्रेत जमुनाबाईचं असावं. जमुनेला सालेमपूर बिठूरच्या गंगेकाठी पुरलेलं. जमुना राहायची बहरौलाच्या गावाबाहेरील वस्तीमध्ये. निरंजन ठाकूरच्या थोरल्या वंशावळीने यंदाच्या फेब्रुवारीमध्ये तिला बासुकावरून इकडे आणलेलं. नाचगाण्यासाठी. प्रत्यक्षात नाचगाणं व्हायच्या ऐवजी तिच्या देहाचा बाजार झाला. जमुनाने बहीण संध्या हिच्याकडे या बाबतीत कैफियत मांडली, तिने जमुनेचं दुखणं मथुराबाईच्या कानी घातलं; मात्र मथुराबाई यावर काही करू शकली नाही. काही दिवसांनी जमुनेला बासुकामध्ये परत आणता येईल, असा खोटा धीर दिला. काही आठवडे गेले, एप्रिल महिना उजाडला. उत्तर भारतात कोविड इन्फेक्शन वाढत गेलं. त्यातच कधीतरी जमुनेला बाधा झाली. तिच्या देखभालीसाठी कुणी आलं नाही. जमुनेकडे जायला निघालेल्या अपंग असलेल्या संध्याचा २२ एप्रिल रोजी अपघात झाला आणि जमुनाच्या उरल्यासुरल्या आशा संपुष्टात आल्या. दरम्यानच्या काळात जमुनेने गंगेत जीव देण्यासाठी एक-दोन प्रयत्न करून पाहिले. तिच्यामुळे गंगामैया मैली होईल, या भावनेतून तिला कोठीच्या दारापाशीच अडवलं गेलं. वेश्येने गंगेत जीव देणं हे त्यांच्यासाठी पाप होतं; मात्र गंगेसम पावन असणाऱ्या तिच्या देहाची राजरोस विटंबना करणं हा त्यांचा छंद होता. असं असूनही जमुनाने जिद्दीने त्या लोकांना चकवा देत अखेरचा प्रयत्न करून पाहिला; मात्र वेशीपाशी तिला टोकण्यात आलं. इथपर्यंतची माहिती तिने मथुराकडे हस्ते परहस्ते कळवली. नंतर तिच्याकडील पैसे संपले, आजाराच्या जोडीने उपासमार सुरू झाली. त्यातच तिला कधीतरी कोविडची बाधा झाली आणि मृत्यू झाला. तिच्या मृत्यूची बातमी मथुरेला खूप उशिरा कळली. या बातमीने संध्या पुरती कोलमडून गेली; कारण जमुनेच्या नाचगाण्यावर तिचं पोट भरे. आता तिला केवळ मथुरेचा आसरा बाकी होता आणि तिचादेखील संध्यावर जीव होता. नंतरच्या काळात अख्ख्या यूपीमध्ये काय झालं ते दुनियेने बघितलं.

गाठीला पैसाअडका नसणाऱ्या आणि रडण्यासाठी मागं माणसं नसणाऱ्या जमुनेला गंगेच्या किनाऱ्यावर पुरण्यात आलं. तिच्या थकल्याभागल्या जीवावर नवी चुनरी पांघरली होती की नाही हे कळायला मार्ग नाही. बासुकामधील बायकांच्या मृत्यूची नोंद सहसा होत नाही; मात्र सरकारी करामतीने गाझीपूरच्या डेथ-रेकॉर्डमध्ये जमुनेचं नाव येण्याची पुरेपूर दक्षता घेतली. पूर्वांचल न्यूजसारख्या दैनिकातून दोन इंचाचा कॉलम बहाल झालेला. मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात पाऊस झाला आणि गंगेकाठी पुरलेली प्रेतं नदीच्या पात्रात वाहून गेली. जमुनेला गंगेत जीव देता आला नाही; मात्र नियतीने ओरबाडलेलं, तिचं विदीर्ण झालेलं कलेवर गंगेत वाहून गेलं. मला खात्री आहे, तिचं कलेवर नदीपात्रातून वाहताना गंगेला गहिवरून आलं असेल; कारण कैकांनी ओरबाडलेला आणि शोषणाने श्रमलेल्या लेकीचा देह तिच्या कुशीत विसावला होता. माणसांची घाण जिच्या धमन्यांत नित्य नेमाने प्रसवली जाते तिचे पात्र मैले कसे नाही, हा प्रश्न जमुनेने गंगेला विचारला की नाही हे ठाऊक नाही. पाऊस सरल्यावर, आकाश निरभ्र झाल्यावर गंगेच्या पात्रात त्यांचं

प्रतिबिंब नक्कीच पडलं असणार. एखाद दुसऱ्या मेघाच्या अभ्रांचा आकार तेव्हा कैलासाच्या गिरिशिखरासारखा भासलेला. त्यातून डोकावणाऱ्या भोलेनाथाच्या डोळ्यांत जमुनेच्या कलेवराची छबी झिरपत गेलेली. त्यातून अश्रू पाझरले की नाही हे कसं उमगणार? संध्या आता मथुरेपाशी बासुकाला परतलीय. रात्री झोपताना तिच्या उशीखाली जमुनेचे घुंगरू असतात, ज्याचा मंद झंकार तिला आणि गंगेलाच ऐकू येतो. ती घाबरत नाही, आता या आठवणी हाच तिच्या जगण्याचा आधार आहेत.

थोड्याफार फरकाने देशभरात वेश्यांच्या असीम संघर्षाच्या कहाण्या बाहेर येत राहिल्या; मात्र त्यांची दखल कुणीच घेतली नाही. जो घटक समाजाच्या आणि तमाम जनतेच्या खिजगणतीतच नाही त्याची दखल तरी कशी घेतली जाईल? अशी अपेक्षा ठेवणंदेखील भोळसर मूर्खता आहे. तरीदेखील काही मदतीचे हात पुढे येत राहिले, सरकारदरबारी काही निर्णय घेतले गेले, न्यायालयांच्या दरबारातून काही आदेशही निघाले. यांचा थोडा फायदा झाला आणि बराचसा तोटाही झाला. लॉकडाउनमुळे आयुष्य उद्ध्वस्त झालेल्या या सेक्स वर्कर्सचं जगणं कठीण होऊन बसलं; कारण बहुत करून त्यांना कोणत्याही सरकारी योजनांचा लाभ मिळत नाही. त्यांच्यापैकी बहुतेकजणी स्थलांतरित आहेत. स्वत:ची ओळख पटवून देण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे दस्तावेजही नाहीत. एक वेळ अशी आली, की अन्नावाचून त्यांच्यावर मरण ओढवतं की काय अशी परिस्थती झाली. काही स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन त्यांना शिधा पुरवण्याचं काम केलं. महाराष्ट्र सरकारने एक पत्र प्रसिद्ध करून सेक्स वर्कर्सना मदत करण्याचं आवाहन प्रशासनाला करण्यात आलं होतं. असंच आवाहन नंतर अनेक राज्यांनी आपल्या इलाख्यात केल्याचं दिसून आलं. या काळात महिला आणि बालकल्याण विभागाचे प्रभारी आयुक्त हृषिकेश यशोध यांनी कोविड काळात वेश्यांना विविध सेवा उपलब्ध करण्याबाबत लिहिलेलं पत्र विशेष दस्तावेज समजला जावा असं होतं; कारण सेक्स वर्कर्सच्या संदर्भात त्यांनी वापरलेली भाषा अभूतपूर्व करुणेची आणि सौहार्दाची होती. यातून एनजीओंसह वेश्यांनाही एक सकारात्मक संदेश गेला. या पत्राने वेश्यांना सन्मानही लाभला; कारण 'देहविक्रय' हा सरकारी शब्द पहिल्यांदाच वगळला गेला होता.

वेश्यांना कुणी कोरोना योद्धा समजत नसेल तर ती एक गफलतच आहे. सरकारी योजनांचा कोणताही मोठा आधार नसताना त्यांनी एचआयव्ही एड्सविरुद्धचा लढा एकहाती जिंकून दाखवला होता. सुरुवातीला अनेकींचे बळी गेले; मात्र नंतर वेश्यांनीच याला बळ दिलं होतं. कोविडचा पाडाव करताना वेश्यांना जेव्हा व्यवसायाची पुनःअनुमती देण्यात आली तेंव्हा त्यांनी कोविड नियम, निकषांचं काटेकोर पालन करण्याचा प्रयत्न केला. आपल्यासोबतच आपल्या ग्राहकांची काळजी घेतली. वेश्यांना सामाजिक दर्जा नाही, त्यांना सुरक्षा नाही, व्यवसायात असंख्य अडचणी आहेत. स्वतंत्र व्यवसाय करणारी एकल स्त्री आणि वेश्यालयात सामूहिक स्वरूपात व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया यांच्याबाबत नियमभेद आहे जो आम जनतेस ठाऊक नाही. त्यांना मूलभूत अधिकार नाहीत. समाज त्यांच्याकडे तिरस्काराने पाहतो, त्यांची नालस्ती करतो. त्यांच्या लढ्यात त्यांचं अस्तित्व कायदेशीर नसणं हाच मोठा अडथळा आहे. कोविडकाळात त्यांच्या मदतीची बाबही साधी, सोपी नव्हती, यासाठी न्यायालयांना हस्तक्षेप करावा लागला. आदेश द्यावे लागले. कर्नाटक उच्च न्यायालयाने ३० मार्चपासून सलग सुनावणी घेऊन दिलेला आदेश पथदर्शी ठरला. सर्वोच्च न्यायालयातील 'स्वराज अभियान' या खटल्यात असं म्हटलं होतं की, दुष्काळाच्या वेळी रेशन मिळवण्यासाठी केवळ एखादं ओळखपत्र दाखवणं पुरेसं होतं. कर्नाटक उच्च न्यायालयाने हाच युक्तिवाद सध्याच्या परिस्थितीसाठी लागू केला. रेशनकार्ड नसलेल्यांना अन्न व रेशन पुरवठा केला जाईल हे सुनिश्चित करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर असंच प्रकरण आलं तेव्हा त्यांनीदेखील यथोचित निर्णय दिला.

मात्र, ही मदत प्रत्यक्षात हाती पडेपर्यंत बराचसा कालावधी लोटला. तोवर अनेकींनी आपली हक्काची जागा सोडली आणि काहीजणी आपल्या घरी निघून गेल्या, तर काहीजणी जिथे सोय आणि सुरक्षितता वाटली तिथे गेल्या; मात्र बऱ्याचशा विस्थापित होऊन परागंदा झाल्या, हेही एक सत्यच आहे. रोजीरोटीसाठी त्यांना इतर पर्याय शोधताना कमालीची अवहेलना स्वीकारावी लागली, पदोपदी तिरस्काराची थुंकी झेलावी लागली. इतकं करूनही काहींच्या हाती काहीच आलं नाही. काही एनजीओंनी केलेल्या सर्वेक्षणातून खूपच धक्कादायक माहिती समोर आली. नव्वद टक्क्यांहून अधिक वेश्या आपलं घरदार सोडून जगण्याच्या शोधात निघून गेल्या. पंच्याऐंशी टक्क्यांहून अधिक वेश्या कर्जबाजारी झाल्या. नोटाबंदीनंतर अनेक वेश्यांना लोकांनी चलनातून बाद केलेल्या नोटा दिल्या होत्या. त्यांना त्या बदलून घेता आल्या नाहीत; कारण बँकांत त्यांची खाती नव्हती. कोविडमुळे या वेश्या समाजाच्या चलनातून बाद व्हायच्याच राहिल्या. काहींनी मात्र अत्यंत जिगरबाज पद्धतीने किल्ला लढवला. यात प्रामुख्याने कोलकाता, दिल्ली, पुणे आणि मुंबईच्या वेश्यांचा समावेश होता. यातही एक वाईट गोष्ट उघडकीस आली, ती म्हणजे काही एनजीओंनी सरकारने वेश्यांना दिलेली मदत खोट्या वेश्यांची नावे, बनावट खाती दाखवून हडप केली. अगदी आपल्या पुण्यातदेखील हा प्रकार उघडकीस आला. वेश्यांच्या देहावर स्वार होणारे निदान त्यांना पैसे तरी देतात; मात्र इथे व्यवस्थेने त्यांना आयुष्यभरासाठी लुबाडलं आणि त्यांच्या हक्काचे घासही हिरावून नेले. याची दाद कोण कुणाकडे मागणार? निदान समाजाने तरी त्यांच्याबद्दल थोडीशी आस्था, थोडासा सन्मान दिला तरी त्या नव्याने उभ्या राहू शकतात; कारण त्यांच्यातली जिद्द फिनिक्सहून कमी नाही. आपण थोडंसं बळ देऊया, केवळ आधाराचा हात तरी देऊयात. मग त्या पाऊल पुढे टाकतील आणि आपल्या भल्याबुऱ्या वाटेने मार्गस्थ होतील. हा लॉकडाउन आणि कोविडकाळ त्यांच्या जिवावर उठला असला तरी त्या डगमगलेल्या नाहीत, त्यांना बळाची गरज आहे. निदान ते तरी आपण दिलंच पाहिजे.

★

**sameerbapu@gmail.com**

# मसणजोग्यांची कैफियत

संकलन : पूजा भडांगे



मनुष्यजन्माचं अंतिम सत्य म्हणजे मृत्यू. एकदा का कुडीतून प्राण निघाला की मनुष्यात्मा अंतर्धान पावतो ही आपली धार्मिक समजूत; पण मृत्यूनंतरचा अंत्यसंस्कार आणि अस्थिविसर्जन हादेखील तितकाच महत्त्वाचा विधी. माणसाच्या मृत्यूनंतर त्या कलेवरावर अंत्यसंस्कार करणारा, स्मशानातच राहून त्या प्रेतांचा सांभाळ करणारा, सर्व विधी आणि सोपस्कार नेमाने करणारा असा एक समाज आहे, ज्याची दोन वेळची रोजीरोटी ही कुणाच्या जगण्यावर नाही तर कुणाच्यातरी मरणावर अवलंबून आहे. जन्म-मृत्यूच्या न चुकणाऱ्या फेऱ्याला ऐहिकातून मुक्ती मिळवून देण्याचं काम करणारे मसणजोगी आज उपेक्षितांचे हाल सोसताहेत. कोरोना काळात वाढलेल्या मृतांची संख्या जरी स्मशानभूमीतल्या लोकांना काम मिळवून देणारी ठरली असली तरीही, सतत शववाहिकेतून येणारी मढी, नातेवाइकांचा आक्रोश, संसर्गाचा धोका आणि मृत्यूशी न संपणारा सामना या सगळ्यातून स्वतःला सावरत मृतदेहावर अंत्यसंस्कार करणं ही मोठी जोखीम उचलणारा मसणजोगी मानसिक तणावातही तितकाच पिचलेला होता. लॉकडाउनचा परिणाम जसा सगळी क्षेत्रं आणि समाजावर झाला तसाच काहीसा संघर्ष या मसणजोग्यांचासुद्धा आहे.

यवतमाळ जिल्ह्यातल्या महागावच्या वेशीवर राहणारे कचरू उप्पेवाड हेसुद्धा या कोविड महामारीत पिचले गेलेले असेच एक मसणजोगी. एका हातात माणसाची कवटी, दुसऱ्या हातात घंटा, गळ्यात रंगीबेरंगी कंकाल आणि माळा, त्यावर शंख, देवीदेवतांचे छाप, अंगात लालभडक डगला, डोक्यावर फेटा आणि काखेत झोळी अडकवून गावागावात हिंडणारे कचरू गेली कित्येक वर्षं गावच्या वेशीवरच राहतात. मृतांसाठी सरण रचणं, मृत व्यक्तीची राख उचलणं, अंत्यसंस्कार उरकून बाहेर जाणाऱ्या व्यक्तीसमोर शंख आणि टनमन वाजवणं, अंत्यविधीसाठी आलेल्या लोकांकडे दान मागणं, अशी कामं करून गुजराण करणाऱ्या या मसणजोग्याला कुणी भिक्षासुद्धा देत नसल्यानं कोविड काळात अनेक अडचणींचा सामना करावा लागला. आयुष्यभर हेच काम करून आपल्या कुटुंबीयांचं पोट भरणाऱ्या कचरू यांचा मुलगा संजयही आता परंपरागत हेच काम करतोय. कचरूंना चार मुलं, पत्नी, आई आणि अर्धांगवायूच्या झटक्यानं आजारी पडलेले वडील असं मोठं कुटुंब आहे. कचरू पुढे सांगतात की, पूर्वी गावागावात भिक्षा मागताना लोक धान्य, काही पैसे आणि खायला भाकर द्यायचे; आता तर लॉकडाउनपासून कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी बोटांवर मोजावे असे मोजकेच लोक अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीत येतात आणि कोरोनाचा संसर्ग वाढतो म्हणून गावात कुणी भिक्षाही मागू देत नाहीत, त्यामुळं काय खावं आणि कसं जगावं असा सवाल पडतो. अंत्यविधीसाठी आलेले लोक पूर्वी कपड्यावर दोन-पाच रुपये टाकायचे. आता मात्र सोडवण देणाऱ्यांची संख्यासुद्धा कमी झालीय. भिक्षा मागण्यासाठी दारोदारी होणारी भटकंतीसुद्धा थांबली. स्मशानभूमीत राहून मृत व्यक्तीच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून भगवान शंकराकडे प्रार्थना करणारा हा मसणजोगी स्वतः मात्र सतत भटकंती करत राहिल्यानं निरक्षर राहिला. आपला विशिष्ट पोशाख परिधान करून अंत्यसंस्कारावेळी उपस्थित असणारा हा जोगी त्याच वेशात गावोगावी भटकून भिक्षा मागतो. तसे पाहता सामाजिकरीत्या हा समाज अजूनही उपेक्षितच म्हणावा लागेल. गावात कुणाच्या मृत्यूची बातमी कळताच कामाला लागणारा जोगी स्मशानात घंटानाद करत बसायचा. आता मात्र कोरोना संसर्ग आणि लॉकडाउनमुळे सगळंच थांबलं.

लहान वयातच मुलामुलींची लग्न लावून गावोगावी बिऱ्हाड घेऊन हिंडणारे या समाजातले लोक मिळेल त्या गावाच्या वेशीत पाल बांधून वस्ती करतात; पण गेल्या काही महिन्यांपासून होणारी आबाळ पाहता आपल्यासारखीच आपल्या मुलांची गत होऊ नये म्हणून त्यांना शिकवून मोठं करायचं स्वप्न आहे, असं कचरू फार तळमळीने सांगतात. चारही मुलं शाळकरी आणि आम्ही काम नसल्याने घरीच बसून असतो, असं सांगताना 'कधी कधी तर घरात साखर-चहापत्तीसुद्धा नसते, मग आम्ही नाइलाजाने लोकांकडे मागतो.' असं खेदाने सांगतात. मूळ तेलगु भाषा बोलणाऱ्या उप्पेवाड यांना ना कुणाचा आधार, ना शासनाची कोणतीच मदत. जर सरकारने आमच्या समाजाकडे लक्ष दिलं तर कदाचित आमच्या मुलाबाळांचं भविष्य उजेडात येईल, असंही ते फार अपेक्षेने बोलून दाखवतात.

पुण्यातल्या येरवड्याजवळ अमरधाम स्मशानभूमीत कोविड मृतदेह दहन करणारे श्रीकांत स्वामी यांचे अनुभव याहून वेगळे नाहीत. स्मशानात येणाऱ्या मृतांच्या नातेवाइकांविषयी त्यांना विचारता ते सांगतात की, ज्या आई-वडिलांनी लहानाचं मोठं केलं त्यांच्या अस्थी घ्यायला मुलं येत नाहीत याची खंत वाटते. अशा शेकडो अस्थी पुण्यातील अनेक स्मशानभूमींत अजून  तशाच आहेत. यातील बहुतांशी अस्थी या कोरोनाने मरण पावलेल्या रुग्णांच्या आहेत. संसर्गाच्या भीतीने नातेवाईक अस्थी घ्यायला येत नाहीत. त्यामुळे पुण्यातील येरवडा, कैलास, धनकवडी इथल्या स्मशानभूमीत शेकडो अस्थी नातेवाइकांच्या प्रतीक्षेत आहेत. गेल्या १२ वर्षांपासून अमरधाम स्मशानभूमीत काम करणारे श्रीकांत स्वामी पुढे सांगतात, ''गेल्या वर्षभरापासून शेकडो अस्थी इथं पडून आहेत. कोरोनामुळे नातेवाइकांमध्ये इतकी भीती आहे की अनेक नातेवाईक या अस्थी घ्यायलाही येत नाहीत. काहीजण तर आम्ही क्वारंटाईन असल्याने नंतर घेऊन जातो, असं सांगतात. सध्या येरवडा स्मशानभूमीत आठशेच्या आसपास अस्थी पडून आहेत. नातेवाईक येत नसल्याने येत्या पित्रपाठाला विधी करून अस्थी पाण्यात सोडण्याचा विचार करत आहोत.'' स्वामी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यापूर्वी देखील अनेक अस्थींचं असं विसर्जन केलंय. काही नातेवाईक 'आम्हाला येणं शक्य नाही. तुम्हीच त्या अस्थींची विल्हेवाट लावा,' असं सांगतात. त्यामुळे मग स्वामी आणि त्यांचे सहकारी त्या अस्थींना हळद-कुकू वाहून त्यांचं मुळा-मुठा नदीत विसर्जन करतात.

''ज्याला कोणी नाही त्याला आपण आहोत, असं समजून आम्हीच त्यांच्या अस्थींचं विसर्जन करतो,'' असंही ते पुढे सांगतात. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत रुग्णसंख्या जशी वाढत गेली तशीच मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्यादेखील वाढत गेली. दिवसाला ५०हून अधिक मृतदेहांचं दहन इथं करावं लागत होतं. त्यामुळे विद्युत दाहिनीवर ताण येऊन ती नादुरुस्त होण्याच्या घटनादेखील अनेकदा घडल्या.

श्रीकांत स्वामी यांच्याप्रमाणेच ललित जाधव देखील गेली दहा वर्षं नायडू रुग्णालयाजवळील कैलास स्मशानभूमीत काम करतात. कैलास



स्मशानभूमीतदेखील येरवड्यासारखीच परिस्थिती आहे. गेल्या तीन ते चार महिन्यांपासून इथंही ६० ते ७० अस्थी पडून आहेत. ललित जाधव सांगतात की, अनेक नातेवाईक घाबरून अस्थी घेण्यासाठी येत नाहीत. खरंतर घाबरण्याचं काही कारण नाही; कारण उच्च तापमानाला या मृतदेहाचं दहन झालेलं असतं, त्यामुळे कोरोनाच्या प्रसाराचा धोका नसतो.'' कोरोनाच्या लाटेत वाढलेल्या मृतदेहांच्या संख्येबाबत बोलताना जाधव म्हणाले, ''कोरोनाच्या काळात ताण खूप वाढलाय. कोरोनाच्या पूर्वी महिन्याला ६० ते ७० मृतदेहांचं दहन होत होतं, तर सध्या ही संख्या दिवसाला ३० ते ४० इतकीय. मृतदेहांच्या जवळ जाऊन काम करावं लागत असल्याने आपल्यालासुद्धा कोरोनाची लागण होईल अशी भीती त्यांना सुरुवातीला वाटत होती; परंतु ते करत असलेल्या कामाचं लोकांनी कौतुक केल्यामुळे त्यांची भीती कमी झाली. तसंच, आपण देखील समाजासाठी काहीतरी करतोय याचा त्यांना अभिमान वाटतो. श्रीकांत यांच्याप्रमाणे ललित यांनी देखील आत्तापर्यंत शेकडो लोकांच्या अस्थी विसर्जित केल्या आहेत. नातेवाईक न आल्यामुळे त्यांनाच हे काम करावं लागतं. कैलास स्मशानभूमीजवळील संगम घाटावर जाऊन ते या अस्थींचं विसर्जन करतात. अस्थी विसर्जित केल्यावर त्या व्यक्तीला पूर्णपणे मोक्ष मिळतो, त्यामुळे तो विधी करणं आम्हाला महत्त्वाचं वाटतं, असं ललित सांगतात.

देशाच्या आर्थिक राजधानीत कोविड-१९ची गंभीर परिस्थिती मुंबईतल्या शिवाजीपार्क स्मशानभूमीत काम करणाऱ्या मोहन खोराटे यांच्या शब्दांतून व्यक्त होते. 'कोविडमुळे मृत्यू झालेल्या रुग्णाच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करताना काही सूचनांचं काटेकोरपणे पालन करावं लागतं,' असं मोहन खोराटे सांगतात. नातेवाइकांना स्मशानात अंत्यविधी करण्याची परवानगी नाही. फक्त पाच व्यक्तींनाच स्मशानात घेतलं जातं. नातेवाईक खूप दुःखात असतात. कोणाची आई, वडील, भाऊ यांचा मृत्यू झालेला असतो. नातेवाईक 'एकदा चेहरा दाखवा' अशी विनंती करतात; पण आम्ही बॅगमध्ये बंद केलेला मृतदेह उघडू शकत नाही. मग आम्ही त्यांच्याशी चर्चा करतो. त्यांना शांत करण्याचा प्रयत्न करतो. मृतदेहाची बॅग का उघडणार नाही, हे समजावून सांगितल्यानंतर नातेवाईक शांत होतात. आमचं ऐकतात. कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतो, अशा परिस्थितीत त्यांची मानसिकता समजून घेण्याची गरज असते. आपल्या जिवलग व्यक्तीचा चेहराही त्यांना पाहता येत नाही; पण नातेवाइकांच्या आणि आमच्या सुरक्षेसाठी आम्हाला काळजी घ्यावीच लागते, असं मोहन म्हणतात.

इथेच उमेश मेरू माळी सफाईचं काम करतात. आपला अनुभव सांगताना उमेश म्हणतात, ''चार-पाच दिवसांपूर्वी एका पोलीस अधिकाऱ्याच्या आईचा मृतदेह आणण्यात आला होता. तो पोलीस अधिकारी खूप रडत होता. त्याला आईचं शेवटचं दर्शन घ्यायचं होतं. आईचा चेहरा पाहायचा होता. त्याने आम्हाला खूप विनवणी केली; पण आमचा नाईलाज होता. आम्ही त्यांना समजावून सांगितलं. मृतदेहाची बॅग उघडू शकत नाही. त्यांनाही पटलं.'' पुढे उमेश म्हणतात की, गेल्या काही दिवसांत मला एक गोष्ट खटकली. मध्यमवर्गीय नातेवाईक मृतदेहासोबत स्मशानात येतायत; पण उच्चभ्रू लोक येत नाहीत. बहुधा हे माझं निरीक्षण असेल; पण मला ही गोष्ट प्रकर्षाने जाणवली आहे.

याच ठिकाणी काम करणारे फर्नेस ऑपरेटर अरुण साळवे सांगतात की, काही नातेवाईक तिरस्काराच्या भावनेने येतात. म्हणतात, 'आम्हाला नाही पाहायचं. सर्वकाही तुम्हीच करा.' दुरूनही मृतदेहाचं दर्शन घेत नाहीत. तर काही वेळा नातेवाईक येतच नाहीत. अरुण यांची पत्नी त्या वेळी गर्भवती होती. घरी लहान मुलं; 'मग घरी गेल्यानंतर काय काळजी घेता?' यावर ते सांगतात, ''स्मशानात काम करताना भीती वाटत नाही; कारण सर्व खबरदारी घेतली जाते; मात्र घरी गेल्यानंतर जरा जरी खोकला आला तरी घरचे घाबरतात. कधी कधी घरच्यांच्या काळजीमुळे घरात मास्क घालूनच राहावं लागतं. त्यांची काळजी घेणं सर्वांत जास्त महत्त्वाचं आहे.''



पडायला येतात, तेव्हा कसंतरीच वाटतं. त्यांना थांबवून मी हे माझं सेवेचं काम असल्याचं सांगते, असं त्या म्हणतात. त्यांच्या या सेवेची दखल सर्वच प्रसारमाध्यमांनी घेतली असून, राज्य शासनाच्या हिरकणी पुरस्कारासह त्यांना अटलसेवा गौरव पुरस्कार, सावित्रीबाई सन्मान आदी अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे.

काळ सोकावला की भल्याभल्यांची पळता भुई थोडी होते, याचे अनेक अनुभव आपण गेल्या दीड वर्षापासून घेतोय. या महामारीचा जनसामान्यांवर जसा परिणाम झाला, तसाच अनेक भटक्या जमाती, उपेक्षित समाजांवरदेखील झालाच. मृत्यूचं शाश्वत सत्य स्वीकारून जगभरात वेगवेगळ्या नावाने काम करणाऱ्या या मसणजोगींची कैफियत सरकारदरबारी पोहचून त्यांची योग्य सेवा मिळत राहावी, इतकीचं अपेक्षा. शेवटी खोट्या जगण्याचा फेरा ज्या मृत्यूच्या मिठीत जाऊन विसावतो तो प्रवास सोपा करणाऱ्या या मसणजोगी आणि स्मशानभूमीत काम करणाऱ्या सगळ्या कार्यकर्त्यांना सलाम! शेवटी मृत्यूविषयी प्रसिद्ध उर्दू शायर अम्न लख़नवी यांनी लिहिलेला एक शेर आठवतोय,

ज़िंदगी इक सवाल है जिसका जवाब मौत है
मौत भी इक सवाल है जिसका जवाब कुछ नहीं

(सहभाग - कचरू उप्पेवाड, श्रीकांत स्वामी, ललित जाधव, मोहन खोराटे, मेरू माळी, अरुण साळवे, उदय जाधव, सुनीता)

★

**poojabhadange91@gmail.com**

उदय जाधव म्हणतात, ''मी जे काम करतो आहे, ही लोकसेवाच आहे या भावनेने मी करतो. या महामारीचा सर्वांना एकजुटीने सामना करायचा आहे. पालिका अधिकारी, कर्मचारी प्रत्येकावर एक जबाबदारी आहे. लोकांच्या मृतदेहाची योग्य विल्हेवाट लावणं ही जबाबदारी माझ्यावर आहे. मला ती योग्य पद्धतीने पूर्ण करावीच लागेल. सेवा म्हणून मी हे काम करतो.''

ज्याप्रमाणे वर्षानुवर्षे स्मशानभूमीत राहून पुरुष ही अंत्यविधीची कामं पार पाडत आहेत, ते चित्र आता बदलताना दिसतंय. अंतिम प्रवास सुकर करणारी 'सुनीता' ही पंचवटीतील अमरधाममध्ये जन्मलेली. आई-वडील याच स्मशानभूमीत लाकडे आणि गोवऱ्या पुरविण्याचं आणि सरण रचण्याचं काम पिढ्यान्‌पिढ्या करत आहेत. लग्नानंतर त्र्यंबकेश्वरला गेलेल्या सुनीताताई पुन्हा पंचवटी अमरधामला परतल्या. स्मशानभूमीतच अंत्यसंस्कारासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या विक्रीचं छोटंसं दुकान थाटलं. स्मशानातील वातावरणाशी त्या समरस झाल्या. जवळच्या नातलगांनाही मृतदेहाची भीती वाटत असताना महिला असूनही त्यांना कधी भीती वाटली नाही. त्यांच्या मते माणसं जिवंतपणी त्रास देतात, मृत्यूनंतर नाही. मृतदेहाच्या सेवेतच खरं पुण्य गवसतं, असं त्यांचं म्हणणं आहे.

स्मशानभूमीत येणारे मृतदेह वेगवेगळ्या अवस्थेतील असतात. काही दुर्धर रोगाने, काही अपघाताने, काही जळून, काही पाण्यात बुडून, काही वृद्धापकाळाने, काही आत्महत्या करून मृत झालेले, अशा कोणत्याही अवस्थेतील मृतदेह येत असतात. जळून-बुडून मृत्यू झालेल्यांच्या पार्थिवाजवळ नातेवाईकही थांबत नाहीत. नाकाला रुमाल बांधून चार हात दूर राहतात. अशा अवस्थेत सुनीताताई या हातात काही न घालता मृतदेहाची सेवा करतात. स्मशानभूमीत कॅन्सरसारख्या आजाराचे आणि जळालेल्या अवस्थेतील रुग्ण आल्यानंतर त्यांची सेवा करणं अवघड काम असतं. जळालेल्या मृतदेहाला त्वचाच शिल्लक नसते. कधी कधी गालच गेलेले असतात. अशा वेळी मालिश करता येत नाही. पाण्यात बुडून सडलेल्या मृतदेहाचे तर अवयवच निघून हातात येण्याचे प्रसंगही घडल्याचं त्या सांगतात. कधी कधी एकाच दिवशी दहापेक्षा जास्त मृतदेह स्मशानभूमीत येतात, अशा वेळी न थकता सर्व मृतदेहांची सेवा मी करते. माझी ही सेवा बघून माझ्यापेक्षा वयाने मोठे असलेले लोक जेव्हा पाया



सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ, कोल्हापूर - ४१६०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८.०० (शनिवार बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

Mehta eBooks

**1500+ Marathi Titles available as e-Book**

on

amazon

GET IT ON Google Play

Get it on Apple Books

eBook

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
यूजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर -
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

eBooks साठी खालील लिंक्सचा वापर करा

**play.google.com/store/books**

**www.amazon.in**

**https://books.apple.com**

Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com

T BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

# टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व **५० रु.** भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किंमतीत मिळतात.
पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.
**ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.**
या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील.

## टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!


₹ १०० भरून उपलब्ध असलेल्या पुस्तकांपैकी कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त.


## टी बुक क्लब ३० मधून प्रकाशित झालेली पुस्तके


| | | | |
|---|---|---|---|
| **अ ट्विस्ट इन द टेल** | जेफ्री आर्चर | अनु. लीना सोहोनी | ३०० |
| **व्हेअर ईगल्स डेअर** | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. माधव कर्वे | ३५० |
| **ओरिजिन** | डॅन ब्राऊन | अनु. मोहन गोखले | ७२० |

## टी बुक क्लब ३० मधून प्रकाशित होणारी पुस्तके

| | | |
|---|---|---|
| **द मिसिंग** | ख्रिस मुनी | अनु. नारायण पै |
| **द स्टोनहेंज लेगसी** | सॅम ख्रिस्टर | अनु. अशोक पाथरकर |
| **मायटिअर दॅन द स्वोर्ड** | जेफ्री आर्चर | अनु. लीना सोहोनी |









**सभासद फी ₹ ५०/-** सभासद व्हा व **५०%** सवलत मिळवा!

अधिक माहितीसाठी संपर्क : (०२०) २४४७६९२४/२४४६०३१३/२९५२४०४८ 9420594665 G Pay +91 94223 23039

# विरामाआधीचा प्रवास

डॉ. उमा वि. कुलकर्णी



गेल्या वर्षीचा डिसेंबर महिना असेल. कोरोनाचा प्रभाव कमी होत चाललाय असं दृष्य भोवताली दिसत होतं. कोरोनाच्या सुरुवातीच्या काळात ऑनलाइन कार्यक्रम घ्यायला मन तयार नसायचं; पण हळूहळू त्यासाठी मानसिक तयारी होत चालली होती. त्यामुळे जानेवारीमध्ये महाराष्ट्र सरकारचे दोन कार्यक्रम स्वीकारले होते. विश्व साहित्य संमेलनासाठीही दोन व्याख्यानं दिली. हळूहळू कोरोनाची भीती चेपत चालली होती.

त्यातच बदलापूरच्या ग्रंथसखा श्री. श्यामसुंदर जोशी यांचा फोन आला. महाराष्ट्र सरकारचाच मराठी दिनानिमित्त कार्यक्रम ठरत होता. आनंदाची गोष्ट अशी, की स्वत: श्यामराव आम्हा दोघांची त्या निमित्तानं मुलाखत घेणार होते. सगळ्यात महत्त्वाची आणि उत्साहवर्धक गोष्ट म्हणजे हा कार्यक्रम ऑफलाइन, म्हणजे मुंबईच्या पु.ल. देशपांडे हॉलमध्ये होणार होता. कार्यक्रमासाठी प्रत्यक्ष मोजकीच माणसं हजर राहणार होती. सगळी काळजी घेतली जाणार होती. त्याप्रमाणे कार्यक्रम झाला. आम्ही दोघंही टॅक्सीनं मुंबईला जाऊन आलो. मुलाखतीचा समारोप यांनी अनुवादित करून गायलेल्या कन्नड पसायदानानं झाला. नंतर सिद्धिविनायकाच्या देवळात प्रसादाचं जेवण झालं.

एकूणच, कोरोनाचं सावट मनाला भिवविनासं झालं होतं. किंवा, कोरोनाबरोबर राहायला आपण सरावलो आहोत, अशी भावना सर्वत्र पसरली होती.

अशा वेळी प्लेजर ट्रॅव्हलर्सच्या ऑफिसमधून मेसेज आला. स्वत: सुजाता जोशी एक छोटा ग्रूप घेऊन काश्मीरची टुलिप्स-ट्रीप ठरवत होत्या. कोरोनाच्या अगदी सुरुवातीला, म्हणजे २०च्या फेब्रुवारी महिन्यात याच ग्रूपबरोबर आम्ही कंबोडिया-व्हिएतनामला जाऊन आलो होतो. आमचा अनुभव चांगला होता.

काश्मीरला जायला आम्ही दोघंही उत्सुक होतो. आधीही प्रवास होत असले तरी आम्ही ९०च्या सुमारास भरपूर प्रवास करायला सुरुवात केली. त्या वेळी आणि नंतरही तिथलं वातावरण अस्थिरच होतं. त्यामुळे जायचा विचारही केला नव्हता.

शिवाय नुकताच सहना विजयकुमार या कन्नड लेखिकेच्या 'कशीर' या नावाच्या काश्मीरवरच्या कादंबरीचा अनुवाद मी हातावेगळा केला होता. या कादंबरीचा विषय अगदीच अलीकडचा, म्हणजे 'तीनशे सत्तर कलम आणि काश्मीरची आजची परिस्थिती' असा होता. त्याआधी 'राजतरंगिणी'चा अनुवादही वाचनात आला होता. कंबोडियामध्ये 'आपलं' देऊळ आणि संस्कृतीच्या खाणाखुणा पाहतानाही मनात आलं होतं, आपण यानंतर आपल्याच देशाचा भाग असलेल्या काश्मीरलाही जाऊन यायला पाहिजे. तरुणपणी काश्मीरमध्ये चित्रित झालेले कितीतरी सिनेमे हौसेनं पाहिले असले तरी या कादंबरीत येणारी तिथल्या काही भूप्रदेशाची वस्तुनिष्ठ वर्णने नजरेसमोर येत नव्हती. त्यामुळे हा प्रवास ठरवताना अतिशय उत्साह होता.

पण, प्रत्यक्ष जायचा दिवस जवळ येऊ लागला तसं पुण्यातलं वातावरण बदलू लागलं होतं. महाराष्ट्रातल्या कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्याच्या बातम्या कानांवर येऊ लागल्या होत्या. त्यामुळे नेहमी प्रवासाच्या आधी घ्यायची सगळ्यांची मीटिंग घेतली जायची, ती रहित केली होती. प्रत्येकानं आपापल्या शंका व्हॉट्स ॲप ग्रूपवर विचारायच्या असं ठरलं.

इकडे 'कशीर' पुरं झालं होतं. छपाईचं काम सुरू होतं. तिथेही मी निरोप ठेवला, 'प्रत्यक्ष काश्मीरला जाऊन आल्यावर काही सुधारणा करायच्या असतील तर करून देईन.'

पुणे-दिल्ली आणि पुढे दिल्ली-श्रीनगर असा प्रवास ठरला होता. दोघांचीही एकेकदा लस घेऊन झाली होती. प्रवासातून आल्यानंतर दुसरा डोस घ्यायचा होता. प्रवासाला जाण्याआधी बाहत्तर तास आरटीपीसीआर टेस्ट करून घेणं आवश्यक होतं. दोघांची टेस्ट झाली. रिपोर्ट यायच्या आधी दोघांनी एक पक्कं ठरवलं होतं. कुणा एकाची टेस्ट जरी पॉझिटिव्ह आली तरी प्रवास कॅन्सल करायचा. प्रवास करण्यात कितपत रिस्क आहे, याचीही चौकशी केली. तेव्हा समजलं, पुण्यात आणि महाराष्ट्रातच केसेस वाढताहेत, हे खरं असलं तरी काश्मीरमध्ये केसेस अगदी नगण्य आहेत. म्हणजे पुण्यापेक्षा तिकडे रिस्क कमीच आहे. प्रवासात काळजी घ्यावी लागेल, तेवढंच.

एअरपोर्टवर गेलो. तिकडे हातांबरोबरच बॅगांना सॅनिटायझरनं सचैल स्नान घालण्यात आलं. सगळ्यांच्या तिकडेच ओळखी झाल्या. प्रवासाला सुरुवात झाली. दिल्लीला विमान बदललं. दिल्लीत फारशी गर्दी नव्हती. श्रीनगरला विमानातून उतरलो. तो मिलिट्रीच्या ताब्यातला विमानतळ असल्याचं उतरताच लक्षात येत होतं. तिथे सगळ्यांची पुन्हा रॅपिड टेस्ट करण्यात आली. नंतरच गावात सोडण्यात आलं. हॉटेलमध्ये जाऊन पाहिलं तर 'आरोग्यसेतू'नं दोन हजार किलोमीटरच्या परिसरात तीन केसेस दाखवल्या. पुण्यात पाचशे मीटरच्या परिसरात त्या वेळी २५-३० केसेस दाखवल्या जात होत्या आणि त्या वाढत होत्या. वर्षभरानंतरचा हा अनुभव आम्हाला आनंदविभोर की काय म्हणतात तसं करून गेला. डोक्यातला कोरोना हा विषयच मागं पडला.

ठरल्याप्रमाणे साइटसीईंग सुरू झालं. मुबलक फोटो काढणं आणि संध्याकाळी व्हॉट्स ॲप आणि फेसबुकवर टाकणं सुरू झालं. त्यामुळे आमच्या सगळ्या मित्र आणि स्नेही परिवारात उत्साहाची लहर फिरत होती. काही जणांनी तर आपणही असा प्रवास करायला उत्सुक असल्याचं कळवलं.

तिथे फिरायला आमची गाडी स्वतंत्र असल्यामुळे आणखी कुणाचा संसर्ग व्हायचा प्रश्न नव्हता. शिवाय, मास्कची इतकी सवय झाली होती की फोटो काढताना आठवणीनं मास्क काढावा लागायचा. तरीही बरेच फोटो मास्कसहितच आले. इतरही ठिकाणी कुठेच गर्दी नव्हती. हॉटेलमध्येही नव्हती. तुरळक प्रवासी होते, तेही प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे समूह करूनच होते. गुलमर्गला रोपवेची तिकिटं काढायच्या ठिकाणी बरीच गर्दी होती. ती वगळता कुठेही भीती वाटावी अशी गर्दी नव्हती. त्या गर्दीतही आम्ही मास्क काढलाच नाही, हातांना सॅनिटायझर लावत राहिलो.

प्रवासाच्या अखेरच्या दिवशी टुलीप गार्डनला गेलो. तिथं गर्दी असली तरी सगळी विखुरलेली होती. त्यामुळे मुबलक फोटो काढून आणि भरपूर नेत्रसुख घेऊन शंकराचार्य टेकडीवर गेलो. संपूर्ण ग्रूपमधले आम्ही दोघं, आणखी दोघं असे चौघंच चढून आलो. तिथंही नेहमीप्रमाणे हे सगळ्यात पुढे होते. 'कशीर' कादंबरीत मला याच्याच संदर्भात अडचण

येत होती, त्यामुळे मी कादंबरीतल्या पात्रांच्या हालचालीनुसार ती टेकडी पाहून घेतली. चार चिनारचा तिरंगा झेंडा बघून ऊर भरून येत होता. रस्ताभर तिरंग्याची रांग दिसत होती. यांच्या डोळ्यांतून पाणी आलं होतं. ते म्हणाले, ''वा! आपल्या आयुष्यात हे दृश्य बघायला मिळेल असं वाटलं नव्हतं!'' (हेच उद्गार अयोध्या जन्मभूमीची भूमिपूजा बघताना त्यांच्या तोंडी आलं होतं.) आधी काश्मीर बघून आलेल्या मैत्रिणी या खेपेच्या काश्मीरमधल्या बदललेल्य रूपाविषयी सांगत होत्या. दललेकमध्ये ऐकू येणाऱ्या शंकराचार्य स्तोत्राचे स्वर कानांवर पडताच स्वत: रोमांचित होत होत्या. आम्हालाही मागची परिस्थिती कशी होती त्याविषयी सांगत होत्या. खरंतर माझ्या मनात जवळपास कुठेतरी असलेल्या अभिनवगुप्ताच्या गुहेला जाऊन यायचं होतं; पण ते वेळेत बसणार नव्हतं.

त्या रात्री हाउसबोटवर आल्या आल्या मी दमून झोपी गेले होते. हे मात्र त्या सगळ्या ग्रूपबरोबर गप्पा मारत बसले होते. गाणी-गझला म्हणून झाल्या. नंतर यांनी त्या सगळ्यांना सांगितलं, ''तुम्ही इथे आहात तर इथली मजा घ्यायला पाहिजे. काश्मीरला असताना इतर कुठल्यातरी प्रवासाच्या आठवणी काढत राहिलात तर इथला आनंद गमावून बसाल!...'' त्यांचे हे विचार मला माहीत होतेच.

एकूण, भूलोकीचा स्वर्ग बघून आम्ही तृप्त झालो होतो. मनातून कोरोना तर हद्दपारच झाला होता. बऱ्यापैकी खरेदीही केली होती.

याच आनंदात परतीचा प्रवास सुरू झाला. सकाळी भक्कम नाश्ता करून आम्ही ठरलेल्या वेळी विमानतळावर पोचलो. दिल्लीला पोचल्यावर तिथे काहीतरी खाऊन घ्यायचं, असं ठरलं होतं.

काही कारणामुळे मुळात श्रीनगरहून विमान बऱ्याच उशिरा निघालं. दिल्लीमध्ये पुढच्या विमानाची वेळ झाली होती. त्यामुळे काही खायला मिळालं नाही. तसेच घाईघाईनं पुण्याच्या विमानात येऊन बसलो. जागेवर बसल्यावर पोटात कोकलणाऱ्या कावळ्यांनी जाणीव करून दिली. आमच्या प्रत्येकाकडे काही काही खाणं शिल्लक होतं. विमानात दिलेलं चेहऱ्यावरचं शिल्ड काढून आम्ही खायला सुरुवात केली. पाणी मागून घेऊन प्यायलो. पोटोबा शांत झाला.

सामानासह बाहेर येऊन टॅक्सी केली. आम्ही दोघं आणि आमच्याच भागात राहणारी एक सहप्रवासी त्या टॅक्सीत बसून घरी आलो. मी सॅक आणि पर्सबरोबर जिन्यानं वर आले. हे दोन्ही बॅगांसह लिफ्टनं वर आले. घरी आल्यावर समजलं, कोरोना रुग्णांची संख्या बरीच वाढल्यामुळे बऱ्याच बाबतीत 'बंद' सुरू होतं. माझ्या कामवालीनं कळवलं, बसेस बंद असल्यामुळे ती येऊ शकणार नाही. त्यामुळे कंबर कसून कामाला लागणं आवश्यक होतं. तशी घर आवरायला मी लागलेही.



काश्मीरमधील हॉटेलमध्ये उमा आणि विरूपाक्ष कुलकर्णी

आल्या आल्या मी प्रकाशन संस्थेत फोन करून 'कशीर'ची प्रुफं पाठवायला सांगितली. सोबत एक संपादनाचंही काम पाठवणार होते, तेही पाठवायला सांगितलं. एक दिवस सगळे मळके कपडे काढून मशिनला टाकले. दोघांनी मिळून केलेली सगळी खरेदी बाहेर काढून पाहिली. कुणाला काय द्यायचं ते ठरवलं. नेहमीप्रमाणे सगळी कामं करत राहिलो.

दोन दिवसांनंतर सहज व्हॉट्स ॲपवर नजर टाकली. काश्मीर प्रवासाच्या ग्रूपवर कुणीतरी आपण पॉझिटिव्ह असल्याचं कळवलं होतं. पाठोपाठ आणखी एकीनंही कळवलं. आम्ही मनोमन सावध झालो. नंतर एखादा दिवस गेला असेल, यांना ताप आला. सुरुवातीला तो दमणुकीचाच असेल असं वाटलं; पण सहप्रवाशांचे रिपोर्ट ऐकल्यामुळे टेस्ट करून घेणं ओघानं आलंच. अर्थात, त्याआधीच आवश्यक ती ट्रीटमेन्ट सुरू झाली.

यांना ताप असला तरी सर्दी-खोकला नव्हता. वास, चव, भूक



**काश्मीर सहलीतील एका निवांत क्षणी विरूपाक्ष आणि उमा कुलकर्णी**

तेवढ्यापुरती त्या खोलीत जात होते. मास्क लावून. नंतरही अनेकदा काहीतरी गप्पा मारत तिथंच बसत होते. डॉक्टरांच्या सूचनेप्रमाणे एक चार्ट करून दिवसातून अनेकदा ताप, ऑक्सिजन लेव्हल बघून टिपून ठेवू लागले. आधी ताप १००पर्यंतच होता. नंतर दीडपर्यंत चढला; पण बाकी सगळं ठीक होतं. खोकला नव्हता, कफ नव्हता, सर्दी नव्हती. फारसा अशक्तपणाही नव्हता. रेडिओ ऐकणं, डायरी लिहिणं वगैरे दिनक्रम सुरूच होता. नंतर ताप उतरून पुन्हा ९९.५वरही आला.

१४ तारखेला ऑक्सिजन लेव्हल कमी होत असल्याचं लक्षात आलं. हे मी गावातल्या माझ्या भावाला, राजेंद्रला सांगितलं. त्याला मी आधीपासूनच कल्पना दिली होती. डॉक्टरांनाही सांगतच होते. लेव्हल ९०पर्यंत आल्यावर परिस्थिती गंभीर वाटू लागली. काहीशी धाप लागत होती. बाहेरच्या परिस्थितीची कल्पना असल्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे घरात ऑक्सिजन सिलेंडर आणून ठेवला. बातमी कळवताच राजू आणि त्याचा जावई नितांत जोशी आले. घरात ऑक्सिजन देण्याचा प्रयोग फारसा यशस्वी होईना. नितांतनं हॉस्पिटलला न्यायचा निर्णय घेतला. ॲम्ब्युलन्स बोलावली. हे स्वत:च्या पायांनी चालत तिच्यात जाऊन बसले. ही माझी शेवटची भेट.

१४च्या रात्री किंवा १५च्या पहाटे, रात्री १२ वाजता खोली मिळाली. त्या आधी घरात काही खाल्लेलं नाही हे लक्षात येऊन नितांतनं त्यांना दोसा खाऊ घातला. रूममध्ये गेल्यावर माझ्याशी ते बोलले. सगळी व्यावस्था होऊन ऑक्सिजन द्यायला सुरुवात केल्याचं सांगितलं.

नॉर्मल. चेकिंगसाठी गर्दी इतकी होती की कुणी घरी येऊन तपासणं शक्य नव्हतं. आम्ही यायच्या दोन दिवस आधी अपार्टमेन्टमध्येही एकजण पॉझिटिव्ह निघाले होते. तसंच, आणखी एकजण सर्दीनं बेजार होत्या. आम्ही दोघं आणि त्या असे तिघंही टेस्ट करून आलो. दुसऱ्या दिवशी रिपोर्ट येणार होता. यांचा ताप कायम होता. फार नव्हता. ९९-९९.५ एवढाच होता.

पण, पुण्यातली परिस्थिती पराकोटीची बदलत चालली होती. आयत्या वेळी हॉस्पिटल्समध्ये बेड मिळणं कठीण होत चाललं होतं. वेळेवर ऑक्सिजन न मिळाल्याच्याही घटना बातम्यांमध्ये झळकत होत्या. परिस्थिती पाहून आमच्या फॅमिली डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यानुसार ‘दीनानाथ’ला जाऊन आलो. हे रॅपिड टेस्टमध्ये पॉझिटिव्ह होते; पण चेस्ट एक्स-रे, ऑक्सिजन लेव्हल चांगले. तापही कमी. त्यामुळे घरी कोरोन्टाइन सांगितलं गेलं.

दुसऱ्या दिवशी आम्हा तिघांचेही रिपोर्ट आले. फक्त मी निगेटिव्ह होते. यांना होम आयसोलेशन सांगितल्याप्रमाणे त्यांची वेगळ्या खोलीत व्यवस्था केली. जेवण, चहापाणी, खाणं, सूप, औषधं सगळं तिथेच. मी

१५ तारखेला मी मेसेज पाठवून संपर्क साधायचा प्रयत्न केला; पण त्यांनी मेसेज बघितला नसावा. सकाळी डॉक्टरही माझ्याशी बोलले. एक-दोन दिवस काळजी घ्यावी लागेल, असं म्हणाले. याचा अर्थ त्यांना काही दिवस तिथं राहावं लागणार, असा विचार करून त्यांचं डायरीसह इतर काही सामान काढून ठेवलं आणि राजूबरोबर पाठवून दिलं.

त्या दिवशी मी घरी एकटीच होते. या आधीही काही प्रसंगी त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावं लागलेलं असताना मी घरात एकटीच असायची. तेव्हा मनात समजूत असायची, आता ते योग्य हातात आहेत, लवकरच बरं वाटेल आणि ते घरी येतील; पण स्वत: डॉक्टरांनी काळजी घ्यायला पाहिजे असं सांगितल्यामुळे काळजी वाटू लागली. संध्याकाळपर्यंत त्या काळजीनं भीतीचं रूप घेतलं होतं. अशा प्रसंगी मला बोलून आधार देणाऱ्या डॉ. अलका बापट आणि रजू म्हणजे डॉ. अपर्णा श्रोत्री यांच्या फोनचाही उपयोग झाला नाही. न राहवून रात्री साडेअकरा-बारा वाजता बापट डॉक्टर-मित्र जोडप्याशी संपर्क साधला. तेव्हा डॉ. विलास बापटांनीही धैर्याच्या चार गोष्टी सांगितल्या. तेही समजावत

म्हणाले, 'दादा मनानं खूप स्ट्रॉंग आहेत. कितीतरी मोठ्या आजारातून ते माघारी आलेले आहेत. यातूनही बरे होऊन येतील. मुख्य म्हणजे उपचार सुरू आहेत.' हे ऐकून काहीसं समाधान झालं. तरीही काहीतरी बरोबर चाललेलं नाही, असंच वाटत राहिलं.

सकाळी राजूचा फोन आला, यांना आयसीयूमध्ये हलवताहेत. मी लगेच अंघोळीला गेले. काही निरोप आला तर हॉस्पिटलमध्ये जायच्या तयारीसाठी; पण लगेच फोन वाजला. अंघोळ करून बाहेर येऊन फोन घेतला.

तेवढ्या अवधीत सगळं संपलं होतं. एवढ्यात? मला अर्थच समजला नाही. तो धक्का इतका जोराचा होता की मी बधिर झाले होते.

पुढच्या सगळ्या गोष्टी घडत गेल्या. कशा घडल्या-काय क्रमानं घडल्या ते मला समजलं नाही. लगोलग डॉ. बापट पती-पत्नी घरी आले. राजेंद्रची मुलगी मधू आली आणि मला घेऊन हॉस्पिटलला गेली. सुश्रुतच्या मदतीनं सगळे सोपस्कार शक्य तितक्या लवकर संपले. तिथे मदतीला राजूचा शिष्य-मित्रपरिवार होता. एका हाताच्या बोटांनी मोजता येतील इतके मोजकेच नातेवाईक होते. मला आणि राजूला अखेरचं दर्शन मिळालं. नेहमीची डोक्यावरून पांघरूण घेऊन फक्त नाक उघडं ठेवून, छातीवर हाताची घडी घालून उताणं झोपायची पद्धत. तसेच झोपले होते. काहीही फरक नव्हता.

नंतर काय काय घडलं त्याचा तपशील मला आठवत नाही. मला आमचे मित्र आणि फॅमिली डॉक्टर बापटांच्या घरी सोडण्यात आलं. पुढचे चार दिवस तिथे. एक भान आलं, मी यांच्या होम-आयसोलेशनच्या काळात त्यांच्याबरोबर राहिल्यामुळे मलाही कोरोंटाइन राहायचंय. बापटांच्या घरी माझ्यासाठी स्वतंत्र खोली तयार ठेवण्यात आली. अलकानं आणि विलास बापटांनी मोठा धोका पत्करून सगळं निभावलं. मलाही लगेच औषधं सुरू केली. सकाळ-संध्याकाळ ताप-ऑक्सिजनवर लक्ष ठेवणं सुरू झालं. तसं मी टिपून ठेवत होते. स्वत: अलका मला नाश्ता-जेवण द्यायला खोलीत येऊन जात होती. डॉ. बापट अधूनमधून येऊन चौकशी करून जात होते. पेपरमध्ये येणाऱ्या यांच्याविषयीच्या बातम्या आणून दाखवत होते. त्यांच्या मदतनीस लक्ष्मीबाई बाकी काळजी घेत होत्या.

त्याच दिवशी टीव्हीवर, फेसबुक-व्हॉट्स ॲपवर बातमी फिरू लागली. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांमध्ये आली. पुढच्या दोन-तीन दिवसांत दत्ता देसाईसारख्यांनी लिहिलेले लेख प्रसिद्ध झाले. परिणामी, त्या चार दिवसांत अगणित फोन येऊ लागले. फेसबुक-व्हॉट्स ॲपवर अनेकजण व्यक्त होत होते.

या वेळी माझ्या स्वभावाचा एक विचित्र भाग मला सामोरा आला. यांचा स्वभाव मी पुरेपूर एक्कावन्न वर्षं ओळखत होते. त्यांना कधीच कुठल्याही प्रकारच्या प्रसिद्धीचं आकर्षण वाटलं नव्हतं. किंबहुना, ते या बाबतीत मलाही जाग्यावर ठेवायचं काम करत होते. हे सगळं माहीत असूनही मला 'महाराष्ट्र यांची योग्य ती दखल घेतोय..' असं वाटून कुठेतरी समाधान वाटत होतं आणि त्याच वेळी आपण असा कसा विचार करू शकतो, असं वाटून स्वत:ची घृणा वाटत होती. आपण विकृत आहोत की काय असं वाटून स्वत:चा तिरस्कार वाटत होता. तेव्हा मला समाधान वाटत होतं, त्या मागे, त्यांच्या कामाची दखल घेतली गेली नाही, अशी माझी मीच करून घेतलेली भावना कदाचित कारणीभूत असली तरी, तेव्हा डॉ. बापटांनी आणून दिलेले लेख मी वाचू शकले नाही.

तिथल्या चार दिवसांत हातात काही काम असेल तर बरं, असा विचार करून मी घरातून 'कशीर'ची प्रुफं मागवून ठेवली. रात्री गोळी घेऊनही झोप येईना तेव्हा ती बघू लागले. त्यातल्या मजकुराचा त्रास व्हायचा. विशेषत:, तिथे १९९०मध्ये झालेल्या हिंसाचाराची आणि अत्याचाराची पानं वाचताना मनातल्या वेदना तीव्र व्हायच्या. काश्मीरच्या आठवणी जाग्या व्हायच्या आणि असह्य वाटून पुन्हा बाजूला सारायचं. आपण काश्मीरला जायला नको होतं की काय, असं वाटायचं. काही तास गेले की पुन्हा वाचायला घ्यायचं.

मध्ये एकच दिवस गेला असेल, सुमित्रा भावे गेल्याचं समजलं. आम्ही काश्मीरला जायच्या आधी सा.सकाळचे माजी संपादक सदा डुम्बरे गेल्याचा धक्का बसला होताच. या दोनही व्यक्ती आमच्या अगदी जवळच्या. अनेक परिचितांचे फोन येत होते, जपानहून मुक्ता यार्दी आणि केनियातून कल्पना कुमार फोन करून बोलत होत्या. हवालदिल झाले की मीही त्यांना फोन करत होते. त्यातूनही हे उल्लेख होत राहायचे. त्यांच्या जवळपासच्या माणसांच्या मृत्यूच्या घटना कानांवर येत होत्या.

या दिवसांत रीमा अमरापूरकर, आमचे जवळचे मित्र अनिल अवचट आणि इतर अनेकजण भेटायला यायची इच्छा व्यक्त करत होते; पण कोरोनाचा धोका धडधडीत दिसत असल्यामुळे डॉक्टरांनी सगळ्यांची समजूत काढत परवानगी नाकारली.

चार दिवस झाले. माझी प्रकृती ठीकच होती. त्यामुळे डॉक्टरांनी माझी टेस्ट करून मला दुसरा डोस द्यायचा असं ठरवलं. त्यानंतर मी घरी परतू शकले असते. सोबतीला राजू-त्याची बायको मंजू येऊ शकले असते किंवा मी त्यांच्याकडे जाऊ शकले असते.

पण, माझा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला. म्हणजे मला घरी कोरोंटाइन होणं भाग होतं. डॉक्टरांनी सगळी औषधं आणून दिली आणि मी घरी आले.

घरात पाऊल टाकताना मला जिवावर आलं होतं; पण ते अपरिहार्य होतं.

आल्या आल्या माझी पोळीवाली मदतनीस महानंदानं जेवण-न्याहरीचा ताबा घेतला. ती रोज ठरलेल्या वेळी दाराशी नाश्ता आणि जेवण आणून ठेवून जायची. शेजारच्या डॉक्टर अंबिके कुटुंबानं एक ब्लडटेस्ट करून घ्यायला सांगितली. मी पॉझिटिव्ह असले तरी, तो रिपोर्ट बघून काही काळजी करण्यासारखं नसल्याचं सांगितलं. येवले कुटुंबही फोनवरून आस्थेनं चौकशी करत होतं. मला हवं-नको ते विचारत होतं. वहिनी रात्री कलिंगड किंवा टरबुजाच्या फोडी नेटकेपणानं कापून दाराशी आणून द्यायच्या. महानंदाचा मुलगा हवी असलेली औषधं आणून देत होता. ब्रह्मभट बाई घरात एकट्याच राहत होत्या. त्याही पॉझिटिव्ह असल्यामुळे त्यांनाच कुणाचीतरी मदत लागणार होती; पण बाई इतक्या धीराची की तिनं एकटीनं सगळं निभावलं.

पहिल्या दिवशी रात्री घरात एकटी झोपायचा विचार मनाला घाबरं करत होता. घरात एकटीनं खाणं-जेवणं नको होत होतं. माझ्याच पावलांचा आवाज येत होता. खाताना आपलाच अन्न चावल्याचा आवाज



**सहलीदरम्यान आनंद लुटताना श्री. व सौ. कुलकर्णी**

येत होता. सगळंच नको वाटत होतं.

दिवसभर फोन येतच होते. परगावचे भाऊ-भावजया, सुचित आणि शरद तरडे आणि इतर स्नेही फोनद्वारे माझ्यासोबत राहायला धडपडत होते. एकीकडे बाहेरच्या जगाशी तेवढाच संपर्क असल्यामुळे सोबत माणसं असल्याचा भ्रामक का होईना, दिलासा होता; पण सगळ्या फोनवर तेच ते बोलून एक प्रकारचा उद्वेग यायचा. त्यामुळे चार-पाच दिवसांत परिस्थिती अशी झाली, की फोन वाजला की छातीत धडधडायचं आणि नाही वाजला तर सोबत कुणीच नाही असं वाटून रडू यायचं. त्यात एक दिवस, म्हणजे रात्री नऊच्या सुमारास राजूनं एका व्हिडिओ कॉलमध्ये घेतलं. मंजू-राजू आणि त्याच्या मुली शाल्मली, मधू, सगळे दिसले. शाल्मली भर कोरोनात अमेरिकेत पहिल्यांदा गेली असल्यामुळे अशा प्रकारे ते सगळे एकमेकांच्या सान्निध्यात होते. मलाही माणसं दिसली आणि जिवात जीव आला.

घरी आल्या आल्या दुसऱ्या दिवशी नाडकर्णींचा फोन. त्यांनी सांगितलं, ''परिस्थिती अवघड असली तरी एक करू शकाल. शक्य तितक्या लवकर तुमचं पूर्वीचं रूटीन सुरू करा. अगदी छोट्या छोट्या गोष्टी. पेपर वाचणं, टीव्ही लावणं, रेडिओ ऐकत असाल तर तो लावणं, घरातली बारीकसारीक कामं करणं, काहीतरी वाचणं...वगैरे...'' प्रयत्न केला; पण मला ते जमत नव्हतं.

शेवटी मला संपादनासाठी आलेल्या कादंबरीची आठवण झाली. काही वेळ ते वाचू लागले. पुन्हा 'कशीर'च्या वेळचाच अनुभव येऊ लागला. त्यातला अगदी किरकोळ दु:खद प्रसंग मला अधिकच व्याकूळ करायचा; पण त्यात एक अतिशय बारीक फरक होता. तेवढे क्षण का होईना, मी वास्तवापासून दूर असायची. कादंबरीतल्या दु:खाशी समरस व्हायची. त्याचा त्रास व्हायला लागला की बंद करायची. पुन्हा वास्तव भंडावून सोडायचं.

एक दिवस माझी मुंबईची मुलीच्या वयाची मैत्रीण, 'मी अल्बर्ट एलीस'ची लेखिका अंजली जोशी हिच्याशी बोलताना म्हटलं, ''मला घरात राहणं नको वाटतंय. या घरात राहायची भीती वाटते.'' तिनं काळजीनं विचारलं, ''का भीती वाटते? काही होईल असं वाटतं काय? तुमची तब्येत बरी आहे ना?'' तिनं हे विचारलं; कारण एकदा संध्याकाळी तिच्याशी बोलताना माझी साखर कमी होऊन त्रास झाला होता.

मी 'हो' म्हटलं. पुढे म्हटलं, ''एकटं राहायची भीती वाटते...'' तिनं आठवण करून दिली, ''तुम्ही आठवून पाहा. चोविस तास कुणीच एकमेकांसोबत नसतं.'' म्हटलं, ''खरंय. आम्हीही चहा-नाश्ता-जेवण अशा वेळी एकत्र असायचो. बाकीच्या वेळी आपापल्या कामातच असायचो. तरीही आता भीती वाटते.'' तिनं विचारलं, ''नेमकी कसली भीती वाटते?''

मी म्हटलं, ''मला प्रत्येक गोष्ट त्यांच्याशी शेअर करायची सवय होती. कुणाचा फोन आला, काही घडलं तरी त्यांना सांगितल्याशिवाय तो अनुभव पुरा व्हायचा नाही. आता मला माझं जगणंच अर्धवट झाल्यासारखं वाटतंय...'' असंच काही काही बराच वेळ बोलत राहिले.

तिनं माझं सगळं नीट ऐकून घेतलं. विचारलं, ''असं कसं? काही गोष्टी आपण मैत्रिणींबरोबर शेअर करतो. तुम्ही एक लक्षात घ्या, तुमचं जसं सहजीवन होतं तसं बहुतेकांचं नसतं. तरी त्यांना ते अपूर्ण अनुभव घेतात असं वाटत नाही. तुमचा स्त्रोत एकच होता; पण सगळ्यांचं तसं नसतं. आमचंच बघा. माझ्या आवडीचे विषय वेगळे आहेत आणि माझ्या नवऱ्याचे आवडीचे विषय वेगळे आहेत. तरी आमचं सहजीवन चांगलंच आहे. परिपूर्ण आहे. ते काही तुम्ही म्हणता तसं अपूर्ण नाही. तुम्हीही आठवून पाहा. तुम्ही सगळं एकमेकांना सांगत असला तरी दादा त्यांच्या शास्त्रीय संगीताच्या बाबतीत वेगळ्या प्रकारे रमत असतील. त्या विषयावर बोलायचं ती माणसं वेगळी असतील, त्यातला अनुभव पूर्ण करण्यासाठी ते रेडिओ ऐकत असतील, टीव्हीवरचे त्या प्रकारचे कार्यक्रम बघत असतील.''

मला हे पटलं. राजू बासरीवादक. त्याच्याशी ते शास्त्रीय संगीताविषयी बोलायचे. काही प्रमाणात अवचट-बापटांशी बोलायचे. रेडिओ तर त्यांच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग होता. डी.डी.भारती आणि यूट्यूबवरचं शास्त्रीय संगीत ते आवर्जून ऐकायचे.

ती पुढं म्हणाली, ''आणि तसंच तुमचंही असेल; कारण तुम्ही जितक्या साहित्यात गढलेल्या होत्या, तेवढं त्यांचं नव्हतं.'' हेही खरं होतं. तेच एकदा म्हणाले होते, ''माझेही पंचवीस-तीस अनुवाद झालेत; पण मी तुझ्यासारखं 'संवादु अनुवादू' लिहू शकणार नाही.'' आणखीही आठवलं, चित्रकलेच्या बाबतीतली त्यांची मतं वेगळी होती. त्या बाबतीत वादही होत. मग माझ्या त्या बाबतीतल्या अनुभवांना पूर्णत्व तरडे दांपत्यासारख्या समविचारी मंडळींशी बोलून येत होतं. मुख्य म्हणजे तेव्हा मला कधीही आता जाणवत होती तशी एकटेपणाची भावना जाणवत नव्हती. तशी यांच्याकडूनही तक्रार नव्हती.

काही अंशी तिचं पटून मी निरुत्तर झाले. तरीही मनाची तडफड थांबत नव्हती. पुढे तीच समजावत म्हणाली, ''उमाताई! तुम्ही फार लवकर नॉर्मल व्हायचा प्रयत्न करताहात. अहो, दादा गेले याचा आम्हालाही फार मोठा धक्का बसलाय. आपल्याला सगळ्यांनाच यातून बाहेर पडायला थोडा वेळ देणं आवश्यक आहे.'' तिनं पाठोपाठ सांगितलं, ''पण मनात येणारे प्रश्न तसेच ठेवून बसू नका. तसं केल्यानं ते चिघळत जातील. तुम्हाला ज्यांच्याशी बोलून कम्फर्टेबल वाटत असेल, त्यांच्याशी बोलत राहा. मुख्य म्हणजे कुणाचीही मदत नाकारू नका. तुमच्या लक्षात येईल, की तुमच्या अवतीभोवती खूपजणं आहेत मदत करायला. कदाचित तुम्हाला मदत करताना तुमचीही त्यांना मदत होऊ शकेल!''

पुढेही मी तिच्याशी वेळोवेळी बोलत राहिले. मनात उद्भवणाऱ्या प्रश्नांना शब्दरूप देत राहिले. अगदी मध्यरात्री काही भावना किंवा विचार त्रास देऊ लागले की तिला व्हॉट्स ॲपवर मेसेज टाकून ठेवायची. ती तिच्या सवडीनं शक्य तितक्या लवकर माझ्याशी संपर्क साधायची. एकदा प्रश्न मांडला की मनात थोडी शांतता पसरायची. उत्तर मिळायचं. त्या वेळेपर्यंत मनातला प्रश्नही आणखी नेमकेपणानं साकार व्हायचा. त्यामुळे फोनवर बोलताना नेमकी चर्चा व्हायची. विषय भरकटायचा नाही. बऱ्याच वेळा गप्पांमधून माझी मलाच उकल व्हायची. नाही झाली तरी ती होतीच मदतीला.

अंजलीशी बोलता बोलता एकदा त्या आधी कधीही न जाणवलेली एक गोष्ट फार तीव्रपणे जाणवली. मी कार्यक्रमाच्या निमित्तानं एक-दोन दिवसांसाठी घराबाहेर राहायची. एका सिनेमाच्या कामासाठी तर सलग महिनाभर घराबाहेर राहिले होते. तो संपूर्ण कालखंड हे घरात एकटेच राहायचे. मी फोन केला तरच त्यांच्याशी संपर्क व्हायचा. ते म्हणायचे, ''तू कामासाठी गेलेली आहेस. तुला वेळ मिळेल तेव्हा तू फोन करतेसच. मग मी करून तुझ्या कामात कशाला अडथळा आणायचा?'' एवढ्या दिवसांत त्यांनी एकदाही ''मला कंटाळा आलाय.... तू ये...'' असं म्हटलं नाही; मात्र एरवी कधी कधी कुणाच्या घटस्फोटासारख्या घटना कानांवर आल्या की म्हणायचे, ''एकटं जगणं अशक्य नसतं; पण कुणाचीतरी सोबत असली की तेच जगणं हलकं होतं.''

कोरोना नसतानाही बोलताना एक विचार ते नेहमी म्हणायचे, ''आपण वयाच्या अशा टप्प्यावर आहोत की काही गोष्टींचा आपण विचार करून स्वत:ला त्यासाठी तयार ठेवायला पाहिजे. दोघांपैकी कुणीतरी एकजण आधी जाणार आणि दुसऱ्याला मागं राहावं लागेल. त्यासाठीही आपण तयार असलं पाहिजे... काहीतरी प्लॅनिंग असलं पाहिजे.'' यावर मी वाद घालायची, ''असं कसं शक्य आहे? दोघंही समोरासमोर असताना एकजण नसल्याची कशी तयारी करायची?'' त्यावर हे म्हणायचे, ''तयारी नसेल तर जे अनुभवावं लागेल त्यातून सुटका नाही!''

हे वैचारिक पातळीवर कितीही खरं असलं तरी माझ्यावर तो प्रसंग अचानक येऊन आदळला.

त्यावरही हे म्हणायचे, ''अचानक लाट अंगावर आली तर कोसळायला तर होणारच; पण कधीतरी विचार करून ठेवलेला असेल तर त्यातून सावरायला मदत होईल, इतकंच माझं म्हणणं.''

हे एकटे राहताना छान, व्यवस्थित राहायचे. मी मात्र त्याकडे मजेत बघायची. फोनवर तिकडं काय चाललंय ते सांगायची. इकडे कुणी विचारलं तरी ते कसे स्वावलंबी आहेत, हे मोठ्या अभिमानानं सांगायची. कधी कधी ते सांगायचे, ''आज गंमत झाली. चुकून मी दोन कप चहा केला!''

ती 'गंमत' म्हणजे काय हे मला आता कळायला लागलं होतं; कारण माझ्याही हातून तेच घडत होतं आणि मी त्याच्याकडे 'गंमत'च काय, सहज म्हणूनही पाहू शकत नव्हते. मला लाटेतून सावरायला स्वत:शीच बराच लढा द्यावा लागणार होता.

कुणाशी स्पष्ट बोलले नाही तरी मनात आधीपासूनच एक विचार सतत टोकरत होता. आपण काश्मीरला जायचा निर्णय घेतला, तेच चुकलं की काय? फोन करणारे सगळेच तो तपशील विचारत होते. हे पॉझिटिव्ह निघाल्यावर मीही हेच बोलले होते. तेव्हा यांनी सांगितलं होतं, ''जायचा निर्णय दोघांचाही होता. माझ्याऐवजी तू पॉझिटिव्ह निघायची शक्यताही तेवढीच होती. तुला तर ब्लडप्रेशर-डायबेटीस आहे. त्यामुळे या प्रकारे विचार करायची तुझी पद्धतच चुकीची आहे. मागं कधीच पाहायचं नसतं. यातून पुढे काय करायचं हे बघू या. आणि दुसरं म्हणजे आपल्या बिल्डिंगमधल्या शेजाऱ्यांना पुण्यात राहूनच बाधा झालीय ना!''

घरी आल्यावर माझं लक्ष गेलं, काश्मीरहून आल्या आल्या यांनी माझ्यासाठी त्यांच्या खास पद्धतीचा पोह्याचा कुरकुरीत चिवडा करून ठेवला होता; कारण मलाच दुपारी काहीतरी खायला लागायचं. त्यांना कधीच लागायचं नाही. मला भडभडून आलं. याचं काय करू, असं झालं. अंजलीशी बोलल्यावर तोही तिढा सुटला. पुढचे सगळे दिवस मला त्या चिवड्यानं सोबत केली. मी तो पुरवून पुरवून खाल्ला.

एक दिवस मात्र हे कोरोन्टाइन प्रकरण माझ्याही हाताबाहेर गेलं. मी हताश होऊन शेजारच्या डॉक्टर अंबिकेंची बेल दाबली आणि त्यांना म्हटलं, ''दहा मिनिटांसाठी का होईना, तुम्ही माझ्या घरी येऊन बसा.'' त्या लगेच आल्या. त्यांनी सांगितलं, ''तुम्ही हवं तर आमच्या घरी या. आमची काही हरकत नाही.'' मला त्यातली रिस्क ठाऊक असल्यामुळे मी स्वत:ला आवर घातला. काही वेळात एक व्हिडिओ कॉल आला. तो आमच्या लहानशा मैत्रिणीचा, जाई देवळालीकरचा होता. तिनं एक गाणं म्हणून दाखवलं, थोड्या गप्पा मारल्या. ती बंगळूरूहून पुण्यात आली

होती. तिच्या घरीही बरेचजण पॉझिटिव्ह निघाले होते. ती स्वत:ही पॉझिटिव्ह होती.

तिला समोर 'पाहताच' मला एकदम आधार वाटला. वस्तुत:, मला व्हिडिओ कॉल आवडायचा नाही. आपण इतरांच्या प्रायव्हसीवर आक्रमण करतो असं वाटायचं; पण आता त्याचाच आधार वाटला होता. हा बुडत्याला मिळणारा काडीचा आधारच होता. त्यानंतर सकाळ-संध्याकाळी फोन करणाऱ्या माझ्या भावंडांना मी व्हिडिओ कॉल करायला सांगितलं. हे दोन-तीन दिवस चाललं. मग माझं मन थोडं भानावर आलं आणि पूर्ववत साधे कॉल सुरू झाले.

नंतर एक दिवस संध्याकाळी जाई प्रत्यक्षच घरी आली. ती हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असलेल्या आपल्या आई, मावशी आणि आजीला भेटायला आणि डबा द्यायला बाहेर पडली होती. आल्या आल्या तिनं तानपुऱ्याचं सॉफ्टवेअर लावलं आणि संपूर्ण घरात ते सूर घुमले. हे गेल्यानंतर प्रथमच घरात तानपुऱ्याचे सूर घुमत होते. त्यांची दररोज तानपुरा लावून सकाळी सकाळी गाणं म्हणायची सवय. तिनं तानपुऱ्याच्या सुरावर गाणं म्हटलं. एकाएकी माझा बांध फुटला. तिनं मिठी मारली. मी थोडी घाबरले तेव्हा म्हणाली, ''काळजी नको. मीही पॉझिटिव्हच आहे!''

नंतरही ती संध्याकाळच्या वेळी जमेल तेव्हा येत राहिली. ती असताना मी जेवण उरकून घेऊ लागले. दहा-पंधरा मिनिटं थांबून ती परत जाई.

याच दिवसांत मनाला आणखी एक काळजी भेडसावू लागली. अवघड प्रसंगी माझ्या प्रत्यक्ष मदतीला धावलेले डॉ. बापट-अलका, राजू, मधू, नितांत, सचिन हे नातेवाईक, त्यांच्या घरातले, राजूचे मित्र श्रीकांत भावे, आशुतोष नांदेडकर हे सगळे आणि त्यांच्या घरचे कुणी पॉझिटिव्ह नसतील ना? अशा कठीण प्रसंगी मदतीला धावून आलेले सगळे सुखरूप असतील ना? त्यांना किंवा त्यांच्या घरात कुणालाही कोरोना होणार नाही ना! दहा दिवसांनंतर एकेकाचे रिपोर्ट येऊ लागले. सगळे निगेटिव्ह होते. त्यामुळे माझा जीव भांड्यात पडला. डॉ. विलास बापट आणि डॉ. अलकाचे रिपोर्टही निगेटिव्ह होते; पण त्यांना ताप-सर्दी होती. त्यामुळे माझ्याप्रमाणे त्यांनीही सतरा दिवस कोरोन्टाईन पाळलं.

मधल्या काळात अवचट फारच हवालदिल झाले होते. त्यांच्या अगदी जवळची तीन माणसं गेली होती. हे, सुमित्रा भावे आणि सदा डुम्बरे. जाईच्या घरातले आणि इतर बरेचजण गंभीर आजारी होते. संपूर्ण कोरोना काळात त्यांनी दर रविवारी आम्हाला घरपोच भाजी आणून दिली होती. त्या शिवायही आठवड्यातून दोन-तीन वेळा घरी यायची त्यांची पद्धत. त्यांची घरी भेटायला यायची खूप इच्छा होती; पण पुन्हा डॉ.बापट, आनंद नाडकर्णी, मुक्ता पुणतांबेकर या सगळ्यांनी त्यांना कसंबसं आवरलं. मलाही कुणी भेटायची इच्छा व्यक्त केली की बरं वाटायचं; पण येणार म्हटलं की भीती वाटायची.

चौदा दिवस झाले. मला कधी एकदा राजूच्या घरी, माणसांत जाईन असं झालं होतं. ते नवरा-बायकोही वाट बघत होते. माझ्याशी नियमित संपर्कात असणाऱ्या राजूनं, डॉ. अपर्णा श्रोत्री या बहिणीनं कळवळून सांगितलं, ''इतके दिवस तू अत्यंत कठीण परिस्थितीत कळ काढली आहेस. आणखी फक्त तीन दिवस थांब. मंजूपण फार मोठ्या जिवावरच्या दुखण्यातून उठली आहे. थोडक्यात, घाई करू नकोस. सतरा दिवस झाल्यावर जा.'' तेही खरं होतं. काही वर्षांपूर्वी मंजूचं ब्रेस्ट कॅन्सरचं ऑपरेशन झालं होतं. ती आता उत्तम असली तरी राजूच्या सल्ल्यात तथ्य होतं. अवघड असलं तरी मी ते ऐकलं.

निघताना मी महानंदाला या सर्व दिवसांमध्ये तिनं दिलेल्या नाश्ता आणि जेवणाचे पैसे विचारले. तेव्हा डोळ्यातलं पाणी पुसत ती म्हणाली, 'वैनी, मी काही तुम्हाला हा आजार झालाय म्हणून ते दिलं नाही...एवढ्या मोठ्या दु:खात असताना जेवणखाण सुचत नाही. मीही त्या अनुभवातून गेलेय. म्हणून डबा दिलाय मी...'' सुमारे तीन वर्षांपूर्वी तिचाही नवरा वारला होता.

अशा प्रकारे ते सतरा दिवस संपताच मी घरातून पळ काढत राजूच्या घरी गेले. त्या दोघांनीही एखाद्या हळव्या मुलाची हुळहुळती जखम हळुवार हातानं हाताळावी, तसं मला सांभाळलं. ते सगळे दिवस मी माझ्या दुखऱ्या मनाला गोंजारण्यात घालवले. एकीकडे मी माणसांत आल्याचा दिलासा जाणवत असला तरी दुसरीकडे एक भली मोठी पोकळी जाणवत होती.

एखादा दिवस गेला. त्या दिवशी जेवण झाल्यावर मंजूनं पत्ते बाहेर काढले. गेले चाळीस वर्षांपेक्षा जास्त काळ आम्हा दोघांची पत्ते खेळायची सवय. अगदी प्रवासातही पत्ते जवळ असतच. आता पत्ते समोर बघून मनात कळ उठणं स्वाभाविक होतं. ''नक्को..'' वाटलं; पण मला नाडकर्णींनी सांगितलेलं रूटीनविषयीच आठवलं. मनाचे लाड न करता मी खेळायला उठले. खेळता खेळता त्या संदर्भातल्या कितीतरी आठवणी उगाळल्या जाऊ लागल्या. त्या प्रकारात त्या विषयीची भीतीही आपोआप केव्हा बाजूला सरली ते मलाही समजलं नाही.

तसंच संध्याकाळच्या फिरण्याचंही झालं. लग्न झाल्यापासून संध्याकाळी फिरायला बाहेर पडायची आमची दोघांची सवय. मंजूनं संध्याकाळी त्यांच्या इमारतीच्या टेरेसवर फिरायला नेलं, तेव्हा फिरायच्या आठवणींना उधाण यायचं. मी त्यावर खूप बोलायची. मंजू सगळं ऐकत राहायची. मग संध्याकाळ झाली की मीच आधी पायात चप्पल घालून बाहेर पडायला तयार व्हायची.

मध्ये एकदा राजूच्या मुलीनं, मधूनं आपल्या सहा वर्षांच्या ईशाला दोन-तीन दिवसांसाठी आणून सोडलं. स्वत:कडे लक्ष वेधून घेण्याच्या बालसुलभ स्वभावाप्रमाणे तिनं घराचा ताबाच घेतला. तिच्या गप्पा-बडबड-खेळ-चित्र काढणं-ओरिगामी करून देणं या तिच्या मागण्या पुऱ्या करता करता आपलंच दु:ख 'गोंजारणं' थोडं बाजूला सरलं.

मी राजूकडे असताना प्रकाशकांचा फोन आला, ''उमाताई, आपण अनुवादाची कामं सुरू ठेवणार आहोत. तुम्ही काम करत राहायचं आहे.'' इकडे मंजू समजावत होती, ''सुषमाताई, काही काळजी करू नका, मी वाचून दाखवत राहीन.'' ती कन्नड विषयातली ग्रॅज्युएट आहे. राजू सांगत होता, ''शाल्मली अमेरिकेला गेल्यापासून तीही एकटी झाली आहे. तिलाही विरंगुळा होईल. तू काळजी करू नकोस.'' मुंबईच्या उमा रामराव या भैरप्पांच्या अभ्यासक. त्या सांगत होत्या, ''तुम्हाला कुठल्याही प्रकारची कन्नड साहित्याच्या संदर्भात मदत लागणार असेल तर सांगा. मी तुमच्या घरी येऊन राहून मदत करेन.''

कितीतरी आधीपासून भैरप्पांच्या 'गृहभंग' या कादंबरीच्या अनुवादाचं काम चाललं होतं. काश्मीरला जाण्यापूर्वी यांनी त्यांच्या

हातातली सगळी अनुवादाची कामं संपवली होती. तिथून आल्यावर या कादंबरीतली पुढची दोन प्रकरणं रेकॉर्ड करून ठेवली होती. कोरोन्टाईन असताना एकदा मी ते ऐकून लिहायचा प्रयत्न केला; पण मला ते अशक्य झालं होतं. त्या रिकाम्या घरात त्यांचा घुमणारा आवाज! तो ऐकून लिहिणं! अशक्य होतं ते! त्यामुळे आपलं अनुवादाचं काम यानंतर बंद होणार अशीच माझी खात्री होती.

पण, एक दिवस मंजूनं एक परिच्छेद वाचून दाखवला आणि मी तो लिहू शकले. त्यानंतर व्हॉइस रेकॉर्डरवर मंजूनं सगळी कादंबरी वाचून पुरी केली आणि मी शक्य होईल तेव्हा अनुवादाचं काम सुरू केलं.

भैरप्पांचे अधूनमधून फोन येतच होते. तेही सांगत होते, ''निवडक का होईना काम करत राहा...तेच तुमचं बळ आहे. सृजनशील साहित्यात दु:खाचा निचरा करायचं सामर्थ्य असतं हा माझा अनुभव आहे. तुम्हालाही तो अनुभव येईल.''

पण, 'गृहभंग'चा अनुवाद करताना मला अतिशय मानसिक क्लेश होत होते; कारण या कादंबरीत सतत येणाऱ्या प्लेगचं वर्णन येतं. भोवतालीही कोरोनाचं वातावरण होतंच. कादंबरीत एका दिवशी त्या घरातला वयात येणारा मुलगा आणि तरुण मुलगी काही तासांच्या अंतरानं प्लेगला बळी पडतात. भैरप्पांच्या आयुष्यात घडलेला तो प्रसंग. ते सगळं वाचताना मंजूनंही रडत रडत रेकॉर्ड केलं होतं आणि लिहिताना माझीही तशीच अवस्था होती.

दु:खाचा निचरा होण्याऐवजी माझी मन:स्थिती आणखी विचित्र झाली होती.

या वेळी मला आणखी एका भावनेनं त्रास दिला. भैरप्पांच्या कादंबऱ्यांमध्ये मृत्यूनंतरच्या दिवसकर्माची वर्णने वरचेवर येतात. त्या संदर्भात त्या मंत्रांचे अर्थही येतात. प्रत्यक्ष माझे या बाबतीतले विचार काहीही असले तरी त्या प्रसंगाचं कादंबरीतलं स्थान लक्षात घेऊन मीही त्यांचा अनुवाद करत असते.

पण, आता परिस्थिती वेगळी होती. यांच्या बाबतीत तसं काही कर्मकांड करण्यासारखी परिस्थितीही नव्हती आणि त्या संदर्भातले यांचे विचार माहीत होते. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांनी केसही काढले नव्हते आणि कुठल्याही विधींमध्ये भागही घेतला नव्हता. हे ठाऊक असल्यामुळे यांच्या निधनानंतर दिवसकार्य करायचा विचारही मनात आला नव्हता. त्या संदर्भात मला जे काही वाटलं तेवढं केल्यामुळे इतके दिवस मला तो प्रश्न कधी सतावत नव्हता.

आता 'गृहभंग'मधली ती वर्णनं लिहिताना मला वाटू लागलं, मी काही चुकीचं तर केलं नाही ना? कदाचित ते सगळे दिवसकर्म केले असते तर मला थोडा दिलासा मिळाला असता काय? धार्मिक विधी करायचं टाळून मी माझी जबाबदारी तर टाळली नाही ना? मी कृतघ्न तर होत नाही ना? मी व्याकूळ होऊन एक दिवस भैरप्पांना फोन केला.


माझं सगळं ऐकून घेतल्यावर ते म्हणाले, ''त्या सगळ्या पारंपरिक विधींमुळे त्या आत्म्याचं काय होतं, हे माहीत नाही; तसं कुणी माघारी येऊन सांगितलेलंही नाही; पण ते सगळे विधी मागं राहिलेल्यांसाठी असतात. नजरेसमोर अग्नी दिला असला तरी आपलं माणूस कायमचं गेलंय, यावर आपला विश्वास बसत नाही. तेव्हा माणसं पुन्हा पुन्हा विविध प्रकारे ती वस्तुस्थिती पटवून देतात. आणि माझ्या कादंबऱ्यांचा काळ आणि वातावरण तुम्ही पाहिलंत तर ती त्यांची मानसिक गरज होती, हे तुमच्या लक्षात येईल. तुमच्या बाबतीत त्या मार्गाची गरज नाही. कुलकर्णी तर तशा विचारांचे नव्हते. तुम्ही मॅच्युअर आहात. तुम्हाला अशा काही प्रकारानं समाधान मिळवायची गरज नाही. त्यांनीच तुम्हाला पुढे कसं जगायचंय याचा मार्ग दाखवून ठेवला आहे.''

पेन्शन आणि  बँकेच्या इतर कामांची निकड भासू लागली. त्यामुळे मॉडेल कॉलनीत परतणं भाग होतं. आम्ही तिघंही मॉडेल कॉलनीत पार्थ हेरिटेजला आलो. मनात असो वा नसो, या घरात स्थिरावणं हीही माझी एक महत्त्वाची निकड आहे, हेही मला समजत होतं.

स्वेच्छानिवृत्तीनंतर सकाळचा नाश्ता बनवायची जबाबदारी यांनी आपल्याकडे घेतल्यामुळे मला आयत्या नाश्त्याची सवय झाली होती. त्या सतरा दिवसांत महानंदानं आणि त्यानंतरच्या दिवसांत मंजूनंही आयता नाश्ता खायची सवय ठेवली होती.

आता माझ्या घरी राजू-मंजू आल्यामुळे मी नाश्ता बनवायला लागले. स्वयंपाक करायला लागले. जशी बाकी सगळी व्यवहाराची कामं निपटली जाऊ लागली तसं माझं घरातलं काही प्रमाणात रुळणंही सुरू झालं.

तरीही एका रात्री आपण कृतघ्न आहोत, त्या व्यक्तीची आठवण विसरू पाहत आहोत, हा विचार प्रबल झाला. पहाटे जाग आल्यावर मी



**श्रीनगरमधील हाउसबोटवर विरूपाक्ष कुलकर्णी**

उठले. घरात अनिल अवचट आणि नीलेश काळेनी काढलेले अनेक सुंदर सुंदर फोटो होते. त्यातले दोन काढले आणि भिंतीवर लावले. तेव्हा कुठं ती भावना कमी झाली.

याच काळात बाहेरच्या जगात आणखी उलथापालथ चालली होती. घराघरात केसेस निघत होत्या. बेळगावातही प्रकोप वाढला होता. मंजूच्या माहेरी आई-भाऊ आणि बेळगावची भावजय डॉ. वर्षाच्या माहेरी आई-वडील-भाऊ-काका-काकू हे सगळे पॉझिटिव्ह निघाले होते. संजूच्या मुलीच्या सासूबाई गंभीर होत्या. त्यामुळे मला आधार देणाऱ्या भावजयांचे फोन झाले की याच विषयांवर बोलणं होई. घरात मी आणि मंजूही याच विषयावर बोलत राहत होतो. बेळगावला जायचा विचार परदेशी जायच्या विचारासारखाच परस्वाधीन होऊन गेला होता.

इकडे जाईच्या घरी तिची मुलं-सासूबाई आणि ती बाहेर पडले; पण तिची आई-मावशी आणि शंभरीची आजी पॉझिटिव्ह झाल्या होत्या. या तिघींना हॉस्पिटलमध्ये ठेवलं होतं. त्यांची प्रकृती गंभीर होती. त्यातल्या मावशी बचावल्या, आजी बचावल्या; पण वृद्धापकाळानं मरण पावल्या आणि तिघींत लहान आई सुमारे महिनाभर हॉस्पिटलमध्ये झगडत अखेर मरण पावल्या.

त्या वेळी कुणाचाही फोन झाला तरी विषय एकच होता. कोरोना. त्यामुळे कुणीच कुणाचं समाधान करायची परिस्थिती राहिली नव्हती. इतरही ओळखीच्या मंडळींच्या मृत्यूच्या बातम्या येत राहिल्या. या आजारानं केवळ माझ्याच आयुष्यावर घाला घातला नव्हता, सगळ्या जगाला व्यापून टाकता टाकता माझ्या जवळपासच्या मंडळींनाही दु:खात टाकून गेला होता. काहीजणांनी आजारावर मातही केली; पण खूप पैसा गेला. जीवनभराची कमाई गेली. काहीजणांच्या बाबतीत जीवही गेला आणि पैसाही गेला होता. अनेक लेकरांनी आई-बाप गमावले. हाताशी आलेली तरणीताठी मुलं गमावली. आमच्या जवळच्या नात्यातल्या एका मुलाला तर हॉस्पिटलमध्ये होत असलेल्या शोषणामुळे आपल्या आईचा व्हेन्टिलेटर काढून टाकायचा निर्णय कठोरपणे, पण अश्रू ढाळत घ्यावा लागला.

सुरुवातीच्या काळात मला जे फोन आले, त्यात दु:ख हलकं करताना काहीजणांनी म्हटलं होतं, 'त्यांचे हाल झाले नाहीत, अंथरुणात खितपत पडावं लागलं नाही, परावलंबी व्हावं लागलं नाही, तसं झालं असतं तर त्यांना फार त्रास झाला असता. तुम्हाला ५१ वर्षांचं चांगलं सहजीवन मिळालं....तुला यातच समाधान मानायला पाहिजे... कुणीतरी पुढं जाणार, कुणीतरी मागं राहणार हे तर होणारच ना...' एक मैत्रीण तर म्हणाली होती, 'उमाताई! तुम्ही दादांना काय सुरेख सेंडऑफ दिलात हो! अगदी काश्मीर!! यानंतर तुमच्या मनात त्यांच्या ज्या आठवणी राहतील त्या काश्मीरमधल्या! ते अमुक-तमुक गेल्या दीड वर्षात घराच्या बाहेरही पडले नव्हते... तरी दहा दिवस आयसीयूमध्ये राहून काल गेले!' वगैरे वगैरे.

त्या सगळ्याला आता नव्यानं अर्थ मिळत होता. वेगळ्याच वास्तवाच्या पार्श्वभूमीवर. एखाद्या बेसावध क्षणी हे पटायलाही सुरुवात होत होती; पण हे सारं बौद्धिक पातळीवर. पुन्हा जाणवत होतं, त्याच एकावन्न वर्षांचा आठवणींचा अस्ताव्यस्त पसरलेला डोंगर सोबत असताना त्याला कसं नाकारायचं?

पण, अंजलीचंच खरं होतं. हळूहळू त्या पसरलेल्या अस्ताव्यस्त डोंगराला काहीतरी शिस्त लागू पाहत होती. कधी कधी 'जन पळभर म्हणतील हाय हाय...' यातलं कठोर वास्तवही विदारकपणे सामोरं येत होतं. त्यातून मानवी जीवनाचं खडतर सत्य अधिकच स्पष्टपणे उमगत होतं.

ही घटना घडल्यापासून मी धोसरा घेतला होता, बेळगावला जाऊन यायचं. हे विविध कारणानं पुढे पुढे जात राहिलं. या संपूर्ण काळात मला फोनवर धैर्य देणाऱ्या भाऊ-भावजयींना भेटायची आस होती. मी जाईन तेव्हा बंगळूरूचा भाऊही भेटायला येणार होता; पण देशांतर्गत फिरणंही इतकं सोपं राहिलं नव्हतं. प्रांताप्रांतांमधले निर्बंध वेगवेगळे होते. त्यासाठी मला दुसरा डोस घेणं आवश्यक होतं. पहिला डोस द्यायची सगळी व्यवस्था मुक्ता पुणतांबेकरनं केली होती. मी, हे आणि अनिल अवचटांनी लस घेऊन फेसबुक-व्हॉट्स ॲपवर फोटोही टाकले होते. अवचटांची लस घेऊन झाल्यामुळे आता मी लस घेणारी एकटीच राहिले होते. मुक्तानं पुन्हा सगळी व्यवस्था केली.

त्या रात्री गोळी घेऊनही बारीकशी कणकण आली असावी. माझ्या हाताला माझाच स्पर्श झाला आणि मला यांचा घरातला तो ताप आलेला असतानाचा तो शेवटचा स्पर्श आठवला. आणि मनात आलं, यांचा हॉस्पिटलमधला तो दीड दिवस कसा गेला असेल? त्यांचा तो अखेरचा क्षण कसा असेल? आम्ही घाईघाईनं त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करून 'त्यांना उत्तम ट्रिटमेन्ट मिळाली..' असं मनाचं समाधान करून घेत असलो तरी त्यांची काय इच्छा होती? माझ्या स्वार्थापोटी मी म्हणत राहिले, त्यांना बीपी नव्हतं, शुगर नव्हती... त्यांच्या घरात दीर्घायुष्याची परंपरा होती. त्यांच्या सख्ख्या आजोबांनी शंभरी गाठली होती. चुलत आजोबा अठ्ठ्याण्णव वर्षांचे होऊन गेले...दोघेही अखेरपर्यंत हिंडून फिरून होते...जर या कोरोनानं गाठलं नसतं तर आम्ही दोघं आणखी पाच-दहा वर्षं आरामात फिरत राहिलो असतो...वगैरे; पण त्यांच्या मनाचं काय? त्यांनाही माझ्यासारखंच वाटत होतं काय? या प्रश्नांची उत्तरं कधीच मिळणार नाहीत...

बेळगावमध्ये तिथल्या दोन भावांच्या कुटुंबांबरोबर राहत असताना इतके दिवस फोनवरून बोलणारे आप्त जवळ आहेत, ही भावना जाणवत होती. ते सगळेच माझ्या हळव्या मनाची काळजी घेत होते. बंगळूरूचा भाऊ-भावजयही येऊन भेटून गेले. यांची भावंडंही येऊन भेटून गेली. नंदूनं त्याही परिस्थितीत पावसाळी हवेत मला कारमधून फिरवून आणलं. वर्षा दररोज काहीतरी वेगवेगळं करून खाऊ घालत होती.

पण, आठ-पंधरा दिवस गेल्यावर मला माझ्या घराचीही तीव्रपणे आठवण येऊ लागली. माझं घर मला बोलवू लागलं. इतके महिने मी घराबाहेर आहे, घराची काय अवस्था झाली असेल, असं वाटून घराची काळजीही वाटू लागली.

मी घरी राहायला आल्यावर सुचित-शरद तरडे यांच्यासारखे अगदी जवळचे स्नेही भेटायला येऊ लागले. या आधी फोनवर भरपूर बोलणी झाली असली तरी प्रत्यक्ष भेटीनं माझं मन काहीसं समाधानी होत होतं. त्याच वेळी या घरात मला एकटीला पाहताना त्यांची नजर हे नेहमी बसायचे त्या जागेकडे वळत होती. तेव्हा मला जाणवलं, केवळ मीच आयुष्याचा ठेवा गमावलेला नाहीये. या सगळ्यांच्याही खूप जवळचं

कुणीतरी गेलंय...त्यांच्याही आयुष्यातलं कुणीतरी गेलंय आणि तेही माझ्यासारखेच त्यांच्याशिवाय जगायची सवय करू पाहताहेत.

आता बोलताना यांच्या खूप आठवणी निघत होत्या. त्या ऐकताना मन पुन्हा पुन्हा भरून येत होतं. मनातल्या आठवणींना उधाण येत होतं; पण त्या थांबवाव्यात असंही वाटत नव्हतं. कदाचित कोरोंटाइनचा कालखंड असा विचित्र गेला नसता तर हे मला आधीच उमगलं असतं.

आता आमच्या या घरात राहताना मला त्यांच्या बारीक बारीक आठवणी येत राहतात. त्या आधी कधीही तीव्रपणे न जाणवलेला त्यांच्या डोळ्यांचा निळसर रंग, डोळ्यांत ड्रॉप्स टाकताना लोभसपणे जाणवणारा उजव्या डोळ्याखालचा लाल तीळ, त्यांचा गोरा-गुलाबी वर्ण, ते आश्वासक हसू, रात्री ते उठले किंवा पुन्हा झोपले की झोपेत जाणवणारी अंथरुणाची कळत-नकळत हालचाल, चहाच्या वेळी कपात चमचा ढवळताना पडल्या पडल्या कानांवर येणारा अतिमधुर भासणारा आवाज. नाश्त्याच्या वेळी घरभर दरवळणारा फोडणीचा मंद गंध, चहा प्यायल्यानंतर घरभर घुमणारा तानपुऱ्याचा आवाज आणि पाठोपाठ ऐकू येणारे सूर, खूपच मनासारखा आवाज लागला की अत्यंत तृप्त मनानं उमटणारा '..वा! बंडोपंत..' असा स्वत:विषयीच काढलेला समाधानाचा उद्‌गार, कन्नड अनुवाद सुरू असताना काहीतरी अडलं की येणारी '...एनं...' म्हणजे 'काय गं..' ही हाक. कुणीतरी घरात असताना येणारी '..उमा..' ही हाक...सकाळी अंघोळ झाल्यानंतर आणि संध्याकाळी बाहेरून आल्यावर त्यांनी लावलेल्या उत्तम दर्जाच्या उदबत्तीचा दरवळ... ते करत असलेल्या बारीक बारीक सूचना...देत असलेले छोटे छोटे सल्ले...

मुख्य म्हणजे या साऱ्या आठवणींमध्ये त्यांच्या आजारपणातल्या एकाही आठवणीला थारा नाही... सगळ्या आठवणी त्यांच्या आसपासच्या अस्तित्वाच्याच किंवा सगळ्या सुखद प्रवासातल्या. केवळ आठ दिवस आधी घडलेल्या भूनंदनवन काश्मीरच्या प्रवासाच्या...

एका हळव्या क्षणी मी हे सारं माझ्या एका जवळच्या नातेवाईक-तरुणीला बोलून दाखवलं. नवऱ्याचा कॅन्सरसारखा आजार झेलून नंतर नवराही गमावलेल्या त्या तरुण मुलीच्या डोळ्यांत हेवा होता. ती उद्‌गारली, ''काकू, किती नशिबवान आहात तुम्ही! मला मात्र आठवणी आहेत त्या सगळ्या त्याच्या अखेरच्या आजारातल्या. तेच रूप मला आठवत राहतं... त्यातून बाहेर पडून वेगळं आयुष्य जगायला सुरुवात केल्यावरही ती दृश्यं मला आठवत राहतात.''

सुख-दु:खाचं एक वेगळंच परिमाण माझ्यासमोर आलं. पाठोपाठ या परिमाणानं शांतवणाऱ्या माझ्या मनाविषयीचा गिल्टही. माझा हा मानसिक संघर्ष संपायला किती काळ घेणार आहे? की कधीच संपणार नाही?


★

virupaxuma@gmail.com

**काश्मीर सहलीतील अखेरच्या दिवशी ट्यूलिप गार्डनमधील छायाचित्र**




# वाचकांचं उदंड प्रेम लाभलेली...मैलाचा दगड ठरलेली पुस्तकं...




स्वामी




श्रीमान योगी




पावनखिंड




ययाति




अमृतवेल





कर हर मैदान फ़तेह





आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी




झोंबी





वपुर्झा





संभाजी




रुचिरा भाग-१





नॉट विदाऊट माय डॉटर




गाभुळलेल्या चंद्रबनात





टर्निंग पॉइंट्स




द मॅजिक ऑफ थिंकींग बिग





प्लेइंग इट माय वे





मी मलाला



आवरण




छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ





द लास्ट गर्ल





लज्जा



फोर सीझन्स




बाजिंद



अदम्य जिद्द

# डॉक्टरांच्या नजरेतून कोरोना

डॉ. पूजा सविता वसंत सरगर



कोविड, कोरोना, रेमडेसिवीर हे शब्द आता सगळ्यांच्याच तोंडात बसले आहेत. दिवसातून एकदा का होईना यांचा उल्लेख होतोच. गेल्या वर्षी माझी इंटर्नशिप संपली अन् कोविड सुरू झाला. सुरुवातीला सगळेच जाम घाबरले होते; कारण कुणालाच कसलीच कल्पना येत नव्हती. मलादेखील सुरुवातीला कोविड ड्यूटीसाठी घरातून प्रचंड विरोध झाला होता; कारण भीतीच तेवढी होती. सुरुवातीचा काही काळ घरीच थांबले; पण मन स्वस्थ बसत नव्हते. सतत वाटायचं आपण डॉक्टर आहोत. या महामारीच्या (pandemic) काळात समाजाला आपली गरज आहे. आपण आपलं कर्तव्य बजावलं पाहिजे. एक डॉक्टर म्हणून या काळात आपलं योगदान दिलं पाहिजे. शेवटी घरच्यांबरोबर शांततेत बोलून BVG तर्फे सुरू केलेल्या बालेवाडी कोविड केअर सेन्टरमध्ये काम करण्यास सुरुवात केली.

मला आजही आठवत आहे माझा सेन्टरमधील पहिला दिवस. तिथलं वातावरण, पेशंटला येणारा भयानक खोकला, होणार त्रास, सर्व बघून माझं मन अगदी सुन्न झालं होतं. कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत ड्यूटी बजावताना अनेक अनुभव हाती आले, जे माझ्यासाठी अविस्मरणीय तर होतेच; पण एक डॉक्टर म्हणून विचार करायला लावणारेही होते.

या सगळ्या काळात सर्वांत जास्त महत्त्वाचं काम होतं ते म्हणजे पेशंटला धीर देणं. व्यक्ती तितक्या प्रकृती. त्यामुळे कुठल्याही पेशंटला समजावून सांगताना, उपचार करताना जीव अक्षरशः मेटाकुटीला यायचा. त्यात PPE KIT घालून काम करणं म्हणजे एक प्रकारचं महादिव्यच होतं. शेवटच्या पेशंटच्या बेडजवळ पोहचेपर्यंत PPE KITवर पूर्णपणे वाफ जमा व्हायची. समोरचं सगळं अंधूक दिसायचं. काय करावं, ही परिस्थिती कशी हाताळावी, हे काही कळत नव्हतं; पण मनात एकच गोष्ट असायची, की आपल्याला हार मानून चालणार नाही; कारण हे पेशंट आज आपल्या विश्वासावर घरापासून दूर इथे सेन्टरला आले आहेत. आपली त्यांना गरज आहे. त्या सगळ्या निगेटिव्ह वातावरणात पण पॉझिटिव्ह राहून काम करायला लागणं हीच मोठी शर्थ होती.

पहिल्या लाटेच्यावेळी देखील अनेक चांगले-वाईट अनुभव आले; पण एक डॉक्टर म्हणून सगळ्यात जास्त परवड झाली ती दुसऱ्या लाटेच्यावेळी. आमच्या आकलनापलीकडे अनेक गोष्टी घडत होत्या. इंजेक्शन, रेमडेसवीर, ऑक्सिजन बेड, प्लाझ्मा यासाठी एवढे प्रचंड फोन यायचे की विचारायला नको. आम्हाला जेवढे शक्य होते तितके प्रयत्न आम्ही करायचो; पण डॉक्टर असलो तरी आम्हीदेखील माणूसच! आम्हालाही काही मर्यादा होत्या. आमचेदेखील हात दगडाखाली होते. काही केसेसमध्ये तर काहीच मदत करता यायची नाही. हतबल व्हायचो. खूप त्रास व्हायचा; पण अशातही लढत राहण्याशिवाय कुठलाच पर्याय शिल्लक राहिला नव्हता.

औषधांसाठी नातेवाइकांची होणारी धावपळ, बेडसाठी होणारी वणवण बघून वाईट वाटायचं. सगळ्याच Unpredictable गोष्टी घडत होत्या. अनेक पेशंट हां हां म्हणता आम्ही गमावले होते. सतत तिथेच काम करत असल्यामुळे पेशंटबरोबर एक हृद्य नातं निर्माण होत होतं; पण त्यांच्या अचानक जाण्याने जी पोकळी निर्माण व्हायची ती न सांगता येण्यासारखीच. दुसऱ्या लाटेवेळी तर अशा किती पोकळ्या निर्माण झाल्या याची गणती करायलाही वेळ नव्हता. कोणाची आई तर कोणाचे वडील, भाऊ, बहीण, मुलगा, पती, पत्नी इत्यादी असे कोणी ना कोणी कोरोनाचे शिकार झाले होते. डिस्चार्जवेळी नातेवाईक आम्हाला सांगायचे की, यांचा मुलगा किंवा आई किंवा पती एक्सपायर झाले आहेत. यांना सांगितलं नाही अजून. घरी गेल्यावर कस सांगायचं त्यांना? मानसिक धक्का बसून अजून वेगळा त्रास व्हायला नको, म्हणून काही औषधं द्याल का, अशी विनंती नातेवाईक करायचे. काही वृद्ध पेशंट किंवा लहान मुलं जी होती, त्यांचं संपूर्ण कुटुंबच या कोरोनाने खाऊन टाकलं होतं. 'त्यांचं पुढे काय होणार?' या विचाराने अंगावर अनेकदा काटा यायचा. आपल्या सर्वांत जवळच्या व्यक्तीचा शेवटचा चेहराही बघायला न मिळणे यापेक्षा दु:खद काहीच असू शकत नाही.

या दुसऱ्या लाटेत वैद्यकीय सुविधांचा एवढा तुटवडा होता, की अक्षरशः दोन पेशंटमध्ये कोणाला जिवंत ठेवायचं, अशी वेळ यायची. खरंच, अशी वेळ कधीच कोणावर येऊ नये. प्रत्येकाच्या ड्यूटीमध्ये रोज किमान दोन-तीन मृत्यू व्हायचे. रोजचा होणारा तो मृत्यूचा खेळ बघून रूमवर आल्यावर अक्षरशः हातपाय थरथर कापायचे. झोप लागायची नाही. मन बैचेन होऊन जायचं.

अनेकदा तर असा अनुभव आला की, एखादं संपूर्ण कुटुंब हे वेगवेगळ्या सेन्टरमध्ये भरती होत होतं. त्यामुळं कुणाला कुणाचाच ताळमेळ नसायचा. ६०पेक्षा जास्त वय असलेले काही वृद्ध असायचे, ज्यांना त्यांचा पत्ता किंवा बाकी माहिती सांगता यायची नाही. या अशा संकटाच्या काळातपण मेलेल्याच्या टाळूवरचे लोणी खाणारी जमात होतीच. मोठ्या मोठ्या सेन्टरमध्ये पेशंटचे सामान चोरीला गेलेले बघायला मिळाले आहे. वृद्ध लोकांचे हाल व्हायचे; कारण त्यांच्या सामानासोबत असलेली महत्त्वाची कागदपत्रं, जसं की, आधारकार्ड, Pancard, मोबाइल आणि पैसे चोरीला गेलेले असायचे.

रुग्णाचे नातेवाईक किंवा घरच्यांशी संपर्क झाल्यावर त्यांच्यापेक्षा आम्हालाच जास्त आनंद व्हायचा. ही अशी घटना किंवा पेशंटने उपचाराला दिलेला चांगला प्रतिसाद किंवा त्यांची होणारी रिकव्हरी बघून आम्हा डॉक्टरांना, बाकी इतर स्टाफला कुठेतरी पुन्हा उमेद मिळायची. नाहीतर रोज होणारा मृत्यूचा खेळ बघून आम्हीसुद्धा खचून जात होतो. कुठेतरी निराशेच्या गर्तेत अडकून जायचो. हे सर्व एकदम भयावह वातावरण होतं.

शारीरिक स्वास्थ्याबरोबर मानसिक स्वास्थ्यदेखील किती महत्त्वाचं आहे हे या कोरोना काळात अनुभवलं. अर्ध्यापेक्षा जास्त रुग्ण हे भीतीनेच गेले. जे मनाने मजबूत राहिले ते टिकून राहिले. आयुष्य हे अतिशय अनिश्चित असतं हे माहीत होतं; पण कोरोना सेन्टरमध्ये काम करत असताना पदोपदी त्याची प्रचिती येत होती. आजचा दिवस आहे तर उद्या नाही, अशी अवस्था होती तेव्हा. भविष्याची तरतूद करण्यात गैर काहीच नाही; पण त्या नादात वर्तमान जगायचं सोडता कामा नये, हे नीट कळत होतं.

या कोरोनाने तर आपल्या आरोग्य व्यवस्थेचे अक्षरशः धिंडवडे

काढले आहेत. कोरोनाने सगळ्या जगाला दाखवून दिलंय की, आपण कोणत्या गोष्टींवर गांभिर्याने काम करणं गरजेचं आहे. देव, धर्म, मंदिर या गोष्टींच्या विरोधात मी नाही. तो ज्याचा त्याचा वैयक्तिक श्रद्धेचा भाग आहे; पण लोक धार्मिक मोर्चे, आरक्षण मोर्चे काढतात, त्याबरोबर आपल्याला उत्तम आरोग्य सुविधा मिळायला हवी म्हणून मोर्चे काढताना कुणीच दिसत नाही. त्या वेळी मात्र सगळे मूग गिळून गप्प बसतात. पुतळा, स्मारके यांवर खर्च करण्यापेक्षा आरोग्य, शिक्षण यावर खर्च करणं जास्त रास्त असून, ती आपली या घडीला प्राथमिक गरज आहे, हे लक्षात घेण्याची वेळ आली आहे.

अजून एक गोष्ट आवर्जून मांडावीशी वाटते, ती म्हणजे, डॉक्टर हा माणूस आहे, देव नाही. त्यालादेखील मर्यादा आहेत. आमच्या परीने आम्ही सगळे प्रयत्न करतोच; पण काही गोष्टी या आमच्या हातात नसतात. मग त्यावर डॉक्टरांना मारहाण हा उपाय असू शकत नाही. रेमडेसीव्हर, ऑक्सिजन बेड यांच्या तुटवड्याला डॉक्टर आणि दवाखाना जबाबदार नाहीये, तर त्यासाठी सरकार, आमदार, खासदार हे सगळे लोक जबाबदार आहेत. त्यांना जाब विचारला गेला पाहिजे. आपल्या पेशंटला सुविधा मिळत नाही म्हणून डॉक्टरांच्या अंगावर धावून जाण्याने आणि तुमच्या एका चुकीच्या कृतीने त्या डॉक्टरची आयुष्यभराची मेहनत पाण्यात जाते. त्या धक्क्यातून सावरणे त्यांनादेखील कठीण आहे.

मंदिरांमध्ये देणगी देण्याऐवजी एखाद्या हॉस्पिटलला देणगी दिलेली कधीही योग्य राहील हे मला एक डॉक्टर म्हणून खूप प्रामाणिकपणे वाटतं. राजकीय नेतेमंडळींना तर निवडणूक आल्यावरच जाग येते. सरकारी दवाखान्याला अत्यावश्यक गोष्टी देण्यापेक्षा चांगला रस्ता तोडून पुन्हा तो रस्ता बनवणे किंवा गावाच्या वेशीवर कमान बांधून दिली की लोक जास्त खूश होतात हे नेत्यांना माहीत आहे. त्यामुळे खरंच आपण आतातरी डोळे उघडून गोष्टींकडे लक्ष दिलं पाहिजे. काही अंशी कोरोना हा राजकीय मुद्दा किंवा scam असला तरी बऱ्याच अंशी तो खरादेखील आहे; कारण जो कोणी या भयावह अवस्थेतून गेला आहे किंवा ज्याने खूप काही गमावले आहे त्यालाच त्याची कल्पना आणि अनुभव आहे.

कोरोनाचं संकट लवकरच दूर होणार आहे, तोपर्यंत आपली मानसिक स्थिती ढळू नाही दिली पाहिजे. सूर्यप्रकाश वाढू लागला की दवबिंदू आपोआप नाहीसा होतो. तसेच, वेळेनुसार कोरोनाचं हे मळभही लवकरच दूर होईल. तोपर्यंत बुद्धी वाढलेल्या नकारात्मक गवताची स्वच्छता करून जीवनाचा प्राजक्त टवटवीत ठेवला पाहिजे.

।। सर्वे सन्तु निरामया:।।


★

**povs14@gmail.com**

नवं कोरं

कोरोनाच्या वैश्विक संकटाचा
विविधांगी आढावा...

युद्ध कोरोनाशी





लेखक
डॉ. अनिल गांधी

पृष्ठसंख्या : २५४
किंमत : ₹३५०

Book Available

रिस्क थोडी, फायदा फार...
पैसा वसूल गुंतवणुकीचा मूलमंत्र...

गुंतवणुकीची कामधेनू




लेखक
डॉ. अनिल गांधी

पृष्ठसंख्या : २३६
किंमत : ₹३२०

Book Available


नवं कोरं

# मॅडेलिन लेन्गल यांच्या
## The Time Quintet
या पंचकडीतील पुस्तके




हॅरी पॉटरच्याही आधी, तब्बल पन्नास वर्षांपूर्वी निर्माण झालेली न्यू बेरी मेडलने सन्मानित पाच अद्‌भुतिका कादंबऱ्यांची मालिका प्रथमच मराठीत... सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर गाजलेलं कथानक...

मॅडेलिन लेन्गल या लेखिकेची 'द टाइम क्विन्टेट' ही मालिका म्हणजे वैज्ञानिक अद्‌भुतिकांमधील अनमोल ऐवज. या पाच कादंबऱ्यांची मालिका मरी कुटुंबियांच्या विलक्षण करामती मांडते. कधी पृथ्वीला विनाशाकडे नेणाऱ्या दुष्ट शक्तींशी लढा देणारे चार्ल्स आणि मेग, तर कधी पुरातन वाळवंटात हरवलेले दोघे जुळे भाऊ, एकाहून एक रंगतदार घडामोडींमध्ये गुंतले जातात आणि या अद्‌भुतिका एक अफलातून सफर घडवतात.




**कालपटलावरील सुरकुती**
पृष्ठसंख्या : १८८
किंमत : ₹२७०



**दारातील वादळ**
पृष्ठसंख्या : १९६
किंमत : ₹२७०




**वेगाने कलणारा ग्रह**
पृष्ठसंख्या : २४८
किंमत : ₹३००




**अमाप पाणी**
पृष्ठसंख्या : ३०४
किंमत : ₹३६०

**अनुकूल काळ**
पृष्ठसंख्या : ३१२
किंमत : ₹४००



अनुवाद - मुग्धा गोखले

Book Available



# अनिश्चिततेच्या आवर्तातून...

**सिद्धी नितीन महाजन**

चीनमधील वुहानच्या एका सी-फूड मार्केटमध्ये सापडलेला कोरोना व्हायरस पसरत पसरत जगभर होऊन आता वर्ष उलटेल, नव्हे दोन वर्षं होतील आता. या कालखंडात रोगाचा प्रसार झालाच, अन् त्याबरोबर बऱ्याच उलथापालथी घडल्या. जगभरात आर्थिक, सामाजिक पातळीवर अनेक समीकरणे बदलली. काळ बदलेल, परिस्थिती अधिकाधिक सुकर बनत जाईल. काही समीकरणे सुटतील अशी आशा आहे; मात्र काही समीकरणे 'सुटेल न सुटेल' अशा गुंत्यात अडकून बसली आहेत.

कोरोनामुळे पर्यावरणावर झालेला परिणाम हा त्यापैकी एक. जागतिक महामारीचे पडसाद पर्यावरणावरही उमटलेच. पहिले लॉकडाउन लागले, तेव्हा रस्त्यावरची वर्दळ ठप्प झाली, गर्दीने आणि ट्रॅफिकने ओसंडून वाहणाऱ्या रस्त्यांवर चिटपाखरूही दिसेना. माणसं घरात कोंडली गेली, दैनंदिन व्यवहारांवर मोठ्या प्रमाणात निर्बंध आले; मात्र हे निसर्गासाठी वरवर पाहता, काहीसे फायद्याचेच ठरल्याचे दिसत होते.

माणसासाठी अत्यंत गैरसोयीच्या ठरलेल्या या घटनाक्रमात निसर्गाने मात्र मोकळा श्वास घेतलेला दिसला. या काळात नासा आणि युरोपियन स्पेस एजन्सीच्या उपग्रहांनी एक छायाचित्र प्रसिद्ध केले. या छायाचित्रात चीनच्या वातावरणातील 'नायट्रोजन- डाय-ऑक्साइड' या जीवाश्म इंधनाच्या ज्वलनातून उद्‌भवलेल्या घातक वायूचे व्यस्त प्रमाण दिसून येते. २०१९ या वर्षात हे प्रमाण धोकादायक पातळीपर्यंत सघन झाल्याचे दिसून आले होते; मात्र २०२० या वर्षात १ जानेवारी ते २५ फेब्रुवारीपर्यंत हे प्रमाण अतिशय घसरलेले दिसून आले. एकंदरीत हरित वायूंचे उत्सर्जन कमी होत गेले. 'पंजाबातील जालंधर येथून २०० कि.मी. अंतरावर असलेल्या हिमाचल प्रदेशातील हिमालयाच्या रांगा दिसायला लागल्या आहेत,' असा संदेश व्हॉट्सॲपवरून सर्वत्र पसरला. हा संदेश, ती ध्वनिचित्रफीत खरी होती. माणसांची वर्दळ कमी होत चालल्याने वातावरण स्वच्छ होत असताना, इतर प्रकारचे प्रदूषणही कमी होत चालले होते. राजधानी दिल्लीतील ध्वनिप्रदूषण ४०-५० टक्के पातळीपर्यंत घसरल्याचे दिसून आले. एरवी १०० डेसिबलपर्यंत सहज पोचणारी आवाजाची पातळी ३०-४० डेसिबलपर्यंत कमी झाली. शहरांमध्ये कर्फ्यू लागले, आभाळ स्वच्छ झाले, परिणामी, प्रकाश प्रदूषणातही प्रचंड घट झाली.

जलस्त्रोतही प्रदूषणमुक्त बनत चालले. कारखान्यातील टाकाऊ, हानिकारक रासायनिक पदार्थ आणि घरगुती सांडपाणी अनेक ठिकाणांहून थेट नद्यांमध्ये सोडले जात होते, त्याला आळा बसला. गणेशोत्सव, दुर्गापूजा आणि बाकी सार्वजनिक सणांचे अतिरेकी उत्सवी स्वरूप आटोक्यात आले. विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी का होईना, अनेक नागरिकांनी लहान आणि पर्यावरणपूरक मूर्ती आणून तिचे घरच्या घरीच विसर्जन करून नदी, तलावासारख्या जलस्त्रोतांचे प्रदूषण करणे टाळले. गंगा आणि यमुना या भारतातील दोन प्रमुख नद्यांचे पाणी हळूहळू शुद्ध होऊ लागले होते. गंगा नदीचे प्रदूषण ३६ ठिकाणी मोजले जाते. या ३६ ठिकाणांपैकी २७ ठिकाणचे पाणी अंघोळीस योग्य व वन्यजीव, मत्स्यपालनास अनुकूल झाले, असे पर्यावरणतज्ज्ञांचे मत होते. औद्योगिक पट्ट्यातून सांडपाणी कमी झाल्याने नद्यांचे पाणी स्वच्छ दिसू लागले. ज्यांना नेहमी स्वच्छ पाण्यात राहणे आवडते, अशा वैशिष्ट्यपूर्ण डॉल्फिन माशांना जगभरच्या नद्यांच्या पाण्यात पुन्हा मनसोक्त बागडताना पाहिले. पक्ष्यांची किलबिल, प्राण्यांची चहलपहल, निसर्गातील अनवट शांतता पुन्हा अनुभवता येऊ लागली.

टाळेबंदीचा पर्यटनावर मोठा परिणाम झाला. पर्यटन व्यवसाय ठप्प झाले. सामाजिक वावरावर आलेल्या निर्बंधांमुळे पर्यटनस्थळे ओस पडली. तिथे पर्यटकांची वर्दळ आणि तिथल्या निसर्गात होणारा हस्तक्षेप कमी झाला. थायलंडमधील सर्वांत मोठ्या समुद्रकिनारी समुद्राच्या पाण्याचा रंग हळूहळू बदलू लागला, की जो पर्यटकांच्या पोहण्यामुळे, अंघोळ करण्यामुळे, पाण्यातल्या खेळांमुळे आणि मोटरबोट्‌समुळे सहसा गढूळ झालेला असायचा. मानवी उपभोगाची पदचिन्हे हळूहळू पुसट होऊ लागली होती. नुसत्या सार्वजनिक अनुपस्थितीमुळे निसर्गावर खोलवर झालेल्या अतिक्रमणाच्या खुणा पुसल्या जाऊ शकतात, याची खात्री वाटत होती.

गेली अनेक वर्षे घातक प्रदूषणाशी झगडणाऱ्या, त्यामुळे आजार आणि निर्बंधांना तोंड देणाऱ्या अनेक देशांमधील जनतेसाठी हा मोकळा श्वास होता. 'निसर्गाच्या जखमा भरून येत आहेत,' असा दावा जगभर होत राहिला. कोविड या आजारामुळे आणि त्याबरोबर ओढवलेल्या 'न भूतो न भविष्यति' अशा परिस्थितीमुळे गांजून गेलेल्या जनतेला थोडंसं हायसं वाटलं.

पण, हे सगळे वरवरचे सुटकेचे निःश्वास होते. ज्या महामारीचे मूळ जिथे पर्यावरण असंतुलनामुळेच खोलवर रुजले, तिथे तिने पर्यावरणावर आघात केले नसते तरच नवल!

हो! बरोबर वाचलंत. हवामान बदलाने पृथ्वीवरच्या सजीव घटकांशी असलेले आपले नाते मुळापासून बदलून टाकले आहे. झूनोटिक डीसिज किंवा एखाद्या प्राण्यामार्फत प्रसार झालेल्या सूक्ष्म जीवाच्या माध्यमातून पसरलेला कोविड१९ हा काही पहिलाच साथीचा आजार नाही. स्पॅनिश फ्ल्यू, झिका विषाणू, Severe Acute Respiratory Syndrome (एसएआरएस), (एचआयव्ही), इबोला आणि लाइम हे गेल्या दशकात थोड्याफार प्रमाणात प्रसार पावलेले रोगही यात समाविष्ट आहेत. अल निनो, ला निना, उष्णतेच्या लाटा, दुष्काळ, पूर, तापमानवाढ आणि कमी-जास्त होणारा पाऊस यांसारख्या नैसर्गिक घटकांचा संसर्गजन्य रोगांच्या प्रादुर्भावावर मोठा परिणाम दिसून आला आहे. वन्य प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासात माणसाने केलेली घुसखोरी, जंगलतोड, शहरीकरण, वन्य जीवांची हत्या आणि त्यांच्या मांसाचा अन्नासाठी केला जाणारा वापर या मानवनिर्मित कारणांचाही अंतर्भाव त्यात आहे.

आर्क्टिक आणि सबआर्क्टिक प्रदेशातील पर्माफ्रॉस्ट किंवा कायम गोठलेल्या अवस्थेत असलेल्या हिमथराचे वितळणे यामुळे तिथल्या मृदेची गुणवत्ता, परिसराचे स्वरूप बदलत आहे. नैसर्गिक अधिवासात होणारा हा बदल तिथल्या वनस्पती आणि वन्यजीवांच्या संरचनेत लक्षणीय बदल घडवून आणत आहे.

पर्माफ्रॉस्टचे वितळणे प्राचीन सूक्ष्म जीव आणि इतर सजीवांच्या लाखो वर्षं सुप्त राहिलेल्या दफनभूमीस उघडकीस आणू शकते. ज्यामुळे भूतकाळातील प्राणघातक संसर्गजन्य आजारांचे पुनरुज्जीवन होणे शक्य आहे. तापमानवाढीमुळे रशियाच्या एकूण प्रदेशातील सुमारे एक पंचमांश

भाग व्यापणाऱ्या Republic of Sakha किंवा यकुतिया प्रांतातील संसर्गजन्य रोगांचा धोका प्रमाणाबाहेर वाढला, असे नुकत्याच केलेल्या एका संशोधनात दिसून आले आहे.

विविध प्रदेशांतील त्या त्या भूभागात आढळून येणाऱ्या परिसंस्थेत फुललेली जैवविविधता स्वाभाविकपणे हवामानानुरूप लवचिक आणि परिस्थितीशी जुळवून घेणारी असते. परस्पर सहयोगाने नांदणाऱ्या विविध प्रजातींच्या उपजीविकेला पोषक बनत ती साथीच्या रोगांचे नियमन करण्यास मदत करते. एखाद्या परिसंस्थेत जेवढे जास्त जैववैविध्य असेल, तेवढाच एखाद्या रोगाचा प्रसार होणे किंवा त्याचे वर्चस्व बनणे कठीण होईल. मानवी हस्तक्षेपामुळे जैवविविधता अभूतपूर्व वेगाने कमी होत आहे, ज्यामुळे विशिष्ट रोगजनक सूक्ष्म जीवांच्या प्रसारासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे. कोरोना व्हायरस हा अशाच विषाणूंचा एक समूह आहे. जागतिक तापमानवाढीमुळे भूपृष्ठाचे तापमान जसजसे वाढते आहे, तसतसा याचा प्रसार वाढतो. व्हायरसचा वेगाने बदलणारा जनुकीय आराखडासुद्धा मानवी हस्तक्षेप आणि हवामान बदलाचाच परिपाक आहे. पर्यावरण असंतुलनामुळे उद्‌भवलेल्या या महामारीमुळे पर्यावरण असंतुलन कसे उद्‌भवले, हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल.

वातावरणातील नायट्रोज- डाय-ऑक्साइड या वायूमुळे होणारे प्रदूषण जरी रोडावले असले, तरीही एक दुसरी भीती डोके वर काढत होती, ती होती कणस्वरूप पदार्थांमुळे उद्‌भवणाऱ्या प्रदूषणाची. कोळसासदृश पदार्थांच्या ज्वलनामुळे, वातावरणात साचून राहणाऱ्या कणांमुळे (Particulates) श्वसनासंबंधात आधीच मोठ्या प्रमाणात वाढलेल्या रोगांमध्ये अजूनच वाढ होत होती.

कोरोना लॉकडाउनमुळे परिसरात माणसाचा एरवी होणारा हस्तक्षेप कमी झाला. प्राणी, पक्षी मोकळ्यावर फिरू लागले. वृक्षतोडीचे, जंगलांवर होणाऱ्या अतिक्रमणाचे प्रमाण अचानक कमी झाले; मात्र वर्क फ्रॉम होममुळे संरक्षित वनक्षेत्रे, सागरी क्षेत्रे आणि अभयारण्ये या ठिकाणी देखरेख ठेवणाऱ्या व्यक्ती, वन संरक्षक आणि पर्यावरण रक्षणासाठी कटिबद्ध असलेले कार्यकर्ते या सर्वांना परिस्थितीवर काटेकोर लक्ष ठेवणे, म्हणावे तसे शक्य झाले नाही. परिणामी, बेकायदेशीर वृक्षतोड, वन्यजीवांची शिकार, मासेमारी, वाळू उपसा या सर्व प्रकारांमध्ये लक्षणीय वाढ झाली. निसर्गाविरुद्ध होणारे गैरप्रकार वाढीस लागले.

कोरोना काळात पर्यावरणाची अवस्था अशी दोन पारड्यांत तोलू पाहणाऱ्या तराजूसारखी झाली. उद्योग बंद, कारखाने बंद, या परिस्थितीमुळे एरवी सर्वाधिक प्रदूषित मानल्या जाणाऱ्या ९१ शहरांमधील हवेची गुणवत्ता लक्षणीयरीत्या सुधारली; मात्र एकीकडे अधिकाधिक जनता घरी बसून असल्यामुळे वातावरणात होणारे वायूउत्सर्जन जरी थांबले असले तरीही त्याचे मूळ कारण काही नष्ट झालेले नाही. निसर्गाची होणारी हानी तात्पुरती थांबली असली, तरीही ही परिस्थिती तात्पुरती आहे, यावर आपले बारीक लक्ष असायला हवे.

फार दूर जायची गरज नाही. जसजशी टाळेबंदी उठू लागली, सारे काही आवश्यक निर्बंधांसकट सुस्थितीत येऊ लागले, तसतसे या तात्पुरत्या सुटकेचे खरे स्वरूप बाहेर येऊ लागले आहे. समस्या त्याच राहिल्या, त्यांची कारणे, त्या उत्पन्न करणारे स्रोत आणि त्यामागचे बोलविते धनी तेच राहिलेत. त्यांची मानसिकता तीच राहिली असून, आता त्यात काही नवीन समस्यांची भर पडली आहे. त्यापैकी मुख्य संकट आहे, ते कचरा व्यवस्थापनाचे.

कोरोना व्हायरसमुळे दळणवळणावर निर्बंध आले. वाहतुकीची साधने सुलभरीत्या उपलब्ध होईनाशी झाली. गरजेच्या वस्तूंची आवकजावक झटपट झाली नाही. शेतमाल, मासळी यांचा योग्य विनियोग न झाल्याने, या नाशवंत वस्तू एकाच ठिकाणी कुजून सडल्या आणि ओल्या कचऱ्याचे संकट उभे राहिले.

सुक्या कचऱ्याची तर कथाच निराळी. वैद्यकीय कचरा व्यवस्थापन हा सर्वांत भीषण प्रश्न या महामारीच्या निमित्ताने आपल्या सर्वांसमोर उभा राहिला आहे. कोविड उद्रेकाचे केंद्र असलेल्या वुहानमधील रुग्णालयांमध्ये महामारी उच्चतम पातळीवर असताना दररोज २०० टनांहून अधिक प्लास्टिक आधारित वैद्यकीय कचरा (डिस्पोजेबल फेस मास्क, ग्लोव्हज आणि गाउन) तयार झाला. हा कचरा सिंगल यूज प्लॅस्टिक, म्हणजे पुनर्वापरास अयोग्य अशा प्लॅस्टिकने बनलेला होता. अन्य मार्ग उपलब्ध नसल्याने आणि संसर्गाची भीती असल्याने या कचऱ्याची विल्हेवाट, बहुतेक पारंपरिक पद्धतीनेच, म्हणजे जाळून टाकत करण्यात आली. ही कहाणी वैद्यकीय क्षेत्रातली; मात्र सामान्य माणसाच्या आयुष्यात काही वेगळं घडत नाहीय.

'Stay at home! घरी राहा!' या नाऱ्याला प्रतिसाद देत जनता घरी बसली. पॅक केलेले अन्न किंवा रोजच्या वापराच्या वस्तू घरपोच मागवण्याचे प्रमाण वाढले, अन् त्याबरोबर येणाऱ्या या अशा सिंगल यूज प्लॅस्टिकचे प्रमाणही वाढले आहे. रुग्णांनी वापरलेल्या, संसर्ग पोचलेल्या, अशा आरोग्याला हानिकारक वस्तू जलस्रोतांत निष्काळजीपणे फेकून दिलेल्या आढळतात. काही देशांनी तर पुनर्वापर योग्य प्लॅस्टिकवर अनिश्चित काळापुरती बंदी जाहीर केली. सिंगल यूज प्लॅस्टिकचा वापर अत्यंत चिंताजनक प्रमाणात वाढला आहे. यामुळे प्लॅस्टिक रिसायकलिंग किंवा पुनर्वापर चळवळीला मोठी खीळ बसली आहे, जी इतक्या लवकर सुटेल असं वाटत नाही.

जागतिक महामारीमुळे उत्पन्न झालेल्या कचऱ्याच्या अवाढव्य भस्मासुराने कचरा व्यवस्थापन प्रक्रियेचा बोऱ्या वाजवलाय. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी अत्यंत अयोग्य पद्धतींचा अवलंब केला जातोय. उदाहरणार्थ, केरकचरा जाळून टाकण्याच्या भट्टीचा (Mobile Incinerator) वाढलेला वापर, टाकाऊ गोष्टींचे जमिनीत टाकलेले भराव आणि कचऱ्याचे ढीगच्या ढीग जाळले जाणे, स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर, पर्यावरणाच्या आरोग्यापेक्षा मानवी आरोग्याला दिली गेलेली प्राथमिकता (जी अर्थातच परिस्थितीवश रास्त असली, तरी दूरदृष्टीने हानिकारकही आहे.) अनेक बाजूंनी अक्षम्य तडजोड करायला लावते आहे.

आपल्या समाजात कचरा व्यवस्थापनाविषयी जागरूकता तशी सहसा कमीच दिसून येते. या अपुऱ्या ज्ञानानिशी वावरणाऱ्या समाजघटकांवर महामारीची तीव्रता येऊन कोसळली. परिणामी, वैद्यकीय कचरा रोजच्या कचऱ्याबरोबर टाकला जात असल्याने रोगाचा सामान्य माणसापर्यंत वेगाने प्रादुर्भाव होत आहे. फ्रन्टलाइन वर्कर्स किंवा महामारीविरोधात पहिल्याच फळीत काम करणारे कर्मचारी या प्रादुर्भावामुळे सर्वात जास्त धोक्यात आले आहेत. स्थानिक कचरा व्यवस्थापन केंद्रांनी व्हायरसचा

वाढता प्रसार लक्षात घेऊन आपल्या कचरा व्यवस्थापन कार्यक्रमांना अनिश्चित काळासाठी स्थगिती दिल्याने कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

याबरोबर अजून एका समस्येवर लक्ष देणे गरजेचे आहे, ती म्हणजे रासायनिक द्रव्यांच्या वापरामुळे होणारे प्रदूषण. महामारीमुळे साहजिकच आरोग्य रक्षणासाठीची आवश्यक खबरदारी अधिक काटेकोरपणे घ्यावी लागत आहे. निर्जंतुकीकरण करण्यासाठी वापरली जाणारी रासायनिक द्रव्ये सांडपाण्यातून जलस्रोतांत मिसळली जात आहेत. चीनमध्ये तर व्हायरस पसरू नये, म्हणून जलस्रोतांत मोठ्या प्रमाणात क्लोरीन वायू सोडला गेला. या प्रक्रियेतून आरोग्यास अत्यंत हानिकारक अशी उप-उत्पादरूपी रसायने तयार झाली, ज्यांचा धोका व्हायरसपेक्षाही जास्त दूरगामी आहे.

पर्यावरणावर झालेल्या या सर्व परिणामांची तीव्रता अधिक आहे. यातले सगळे सकारात्मक परिणाम वरवरचे असून, फार काळ टिकणारे नाहीत, हे लगेच दिसून येते. तसेच सगळे नकारात्मक परिणाम दूरगामी आहेत, हेही लगेच समजते. जसे कोविडविरुद्ध आपल्याला सर्वांना एकत्र येऊन झगडावे लागले, तसेच त्याच्या पर्यावरणावर उमटलेल्या, फारशा शोभिवंत नसलेल्या खुणा पुसण्यासाठी एकत्र यावे लागणार आहे. अन् हे एकत्र येणे अनिश्चित काळापुरते असणार आहे. शाश्वत विकासाच्या जुन्या मुद्द्यांना नव्या समजुतीने स्पर्श करणारे असणार आहे.

शाश्वत औद्योगिक विकास हा नवा परवलीचा शब्द असेल. आर्थिक स्वायत्ततेसाठी औद्योगिकरण महत्त्वाचे आहेच; मात्र त्याला शाश्वत विकासाचे कोंदण देणे गरजेचे आहे. म्हणजे नक्की काय होईल? कारखाने काही विशिष्ट प्रदेशात वसवले जातील, ते जीवाश्म इंधनावर अवलंबून न राहता, अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा जास्तीत जास्त वापर करतील, कारखान्यात ऊर्जेचा वापर हा काटेकोर आणि कमीत कमी व्हावा यासाठी काही सूचना अमलात आणल्या जाऊ शकतात. हे सर्व एका साखळीत गुंफले जाऊ शकते, की जिथे एका प्रकारच्या उद्योगाचे दुसऱ्या प्रकारच्या उद्योगावर अवलंबून असणे गृहीत धरलेले असेल, अन् त्यातून निर्माण होणाऱ्या औद्योगिक कचऱ्याचा पुनर्वापर दुसऱ्या उद्योगासाठी कच्चा माल म्हणून केला जावा. उदा. टाकाऊ प्लॅस्टिकचा वापर डिझेलनिर्मितीसाठी करता येईल. यात सांडपाणीप्रक्रिया, कचराव्यवस्थापन आणि एका विशिष्ट काळानंतर त्या उद्योगाची फेरबांधणी करणे किंवा आवर्तन करणे या गोष्टींचा अंतर्भाव करता येईल.

रोजच्या जगण्यात आपण यादृष्टीने बदल करण्यासाठी प्रयत्न करू शकतो का? अगदीच अशक्य नाही. दरडोई एक वाहन, यामुळे वाहनांची वाढत चाललेली संख्या आणि पर्यायाने जीवाश्म इंधनाच्या साठ्यात होत चाललेली घट रोखण्यासाठी सार्वजनिक वाहनांचा वापर वाढवला जाऊ शकतो. लहानसे अंतर कापण्यासाठी पायी चालणे हे तर आरोग्यासाठीही उत्तम आहे. अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर-सौरऊर्जा, पवनऊर्जा या पर्यायांचा जास्तीत जास्त विचार व्हावा.

कोविडनंतर थंड पडलेल्या निसर्ग पर्यटनाला नव्याने चालना द्यावी लागेल. पुन्हा गाडे रुळावर आणण्यासाठी थोडेसे फेरबदल करावे लागतील; मात्र हे सगळे पर्यावरणाकडे डोळेझाक करून केले, तर येऊ घातलेल्या हवामान बदलाच्या संकटाचे परिणाम अजूनच तीव्रपणे जाणवतील, हे नक्की. नेहमीच्या जीवनातील छोटे छोटे पर्यावरणपूरक बदल अंगी बाणवण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय सहयोगाने काही निर्णय विचारपूर्वक घ्यावे लागतील.

एकूणच आपण सगळे अनिश्चिततेच्या आवर्तात भिरकावले गेलो आहोत. वर दिलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी सर्वांना करणे क्रमप्राप्त आहे; कारण येऊ घातलेल्या पुढील संकटांचे पूर्णपणे निर्मूलन करणे जरी शक्य झाले नाही, तरी त्यांची तीव्रता काही प्रमाणात कमी करणे शक्य होईल. पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा परस्पर संबंध निरोगी ठेवला तरच माणसाच्या निरामय आरोग्याची हमी देणे शक्य आहे. जैवविविधता, पर्यावरण संवर्धन आणि संसर्गजन्य रोगांचा प्रसार यातील परस्पर संबंध समजून घेणे हे यापुढील संशोधनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट असेल. हा परस्पर संबंध समजून घेणेच मानवजातीसाठी फायदेशीर ठरणार आहे.

'पंचस्वन्तु पुरुष आविवेशतान्यन्त: पुरुषे अर्पितानि' पंचतत्त्व म्हणजेच निसर्गापासून उत्पन्न झालेले हे मानवी शरीर, पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने अनारोग्याचा सामना करत आहे. आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी आपल्याला पुन्हा निसर्गाकडे वळावे लागेल, यात काहीही दुमत नाही; पण या प्रक्रियेचा वेग ठरवणे प्रत्येकाच्या हातात नक्कीच आहे. मानवजातीच्या भविष्यात नक्की काय वाढून ठेवले आहे, हे तो वेगच ठरवेल; मात्र काळाचा शिक्का हा त्यावरचा शेवटचा निर्णायक शिक्का असेल, हे नक्की!

★

**snmhjn33@gmail.com**

आजचा वाचक उद्याचं नेतृत्व करण्यास लायक ठरतो.

**- मार्गारेट फुलर**



# कोरोना आणि अवकाश विज्ञान

रुचिरा सावंत



माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. त्याला एकत्र समूहात राहायला आवडतं. त्याच्या या गुणवैशिष्ट्यांना साजेसं तो जगत असताना २०२०च्या मार्च महिन्यात अकल्पितपणे यापूर्वी सामान्य माणसाने दैनंदिन जीवनात कधीच न ऐकलेले टाळेबंदी, विलगीकरण सारखे शब्द अचानक महत्त्वपूर्ण झाले. हे शब्द केवळ शब्द न राहता ती जीवन जगण्याची एक पद्धती म्हणून स्वीकारणं जरुरीचं झालं. सुरुवातीचे काही दिवस जिवाच्या भीतीने आणि कोरोना नावाच्या संकटापासून स्वतःला वाचवण्यासाठी माणसाने हे पर्याय स्वीकारले असले तरी हे सगळं माणसाला जमेल याविषयी साशंकता होती. अनिश्चिततेचं हे सावट जसजसं वाढू लागलं तसं या नव्या थोपवल्या गेलेल्या जीवनपद्धतीविषयी भीती, चीड आणि असहाय्यतेची भावनासुद्धा घट्ट होऊ लागली. इतर माणसांना भेटता न येण्याच्या विचाराने, समाजापासून दूर राहण्याच्या सक्तीने अनेकांना मानसिक दडपण आले. यावर पर्याय देण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, वैद्यकीय क्षेत्रातील लोक, सरकार असे सारेच ही समस्या सोडवण्यासाठी सज्ज झाले.

याच दरम्यान एका वेगळ्याच क्षेत्रातील काही माणसं पुढे आली. विलगीकरण, एकांतवास हे शब्द त्यांच्यासाठी बिलकूल नवे नव्हते. ते त्यांच्या जीवनपद्धतीचा एक भाग होते. आणि म्हणूनच आपला हा अनुभव जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवून त्यांना धीर देण्याचं, या काळात आपलं मानसिक व शारीरिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी स्वतः करत असलेल्या वेगवेगळ्या क्लृप्त्या सर्वांना सांगण्याचं त्यांनी ठरवलं. हे असं जगणारी माणसं नक्की कोण असतील, हा प्रश्न तुम्हाला जरूर पडला असेल ना! कोरोना काळात परिचयाचे झालेले 'आयसोलेशन', 'क्वारंटीन' सारखे शब्द कुणाला तरी कोरोनापूर्व काळापासून माहीत असणं आणि ते त्यांच्या जगण्याचा भाग असणं हेच मुळात सामान्य माणसासाठी आश्चर्यकारक. तर ही माणसं म्हणजे कुणी सामान्य माणसं नव्हतीच. या अशा पद्धतीचा अंगीकार शक्य आहे आणि तो फार कठीण नाही, या विषयी जगाला विश्वास देणारी ही माणसं म्हणजे विविध देशांतील अवकाशवीर होते. विलगीकरण पाळणं अवकाशयान उडवण्यासारखं मुळीच कठीण नाहीय. ते फार सोप्पं आहे आणि कुणासाठीही शक्य आहे, असं सांगत त्यांनी आपले अनुभव सर्वांना सांगितले. सामान्य माणसांना धीर दिला.

अवकाशात सलग वर्षभर राहिलेले स्कॉट केली, पहिले कॅनेडियन अवकाशयात्री - क्रिस हॅडफिल्ड यामध्ये आघाडीवर होते. अनेक ठिकाणी त्यांनी याविषयी चर्चा केल्या, आपले अनुभव सांगणारे लेख लिहिले आणि बऱ्याच मुलाखती दिल्या. अनिश्चिततेच्या त्या काळात त्यांचे हे अनुभव ऐकून अनेकांना धीर आला आणि अवकाशविज्ञान व अवकाशयात्री यांच्याविषयीचे कुतूहल पुन्हा एकदा जागृत झाले. याच दरम्यान स्कॉट आणि क्रिस सोबत मी मेलद्वारे केलेल्या संवादादरम्यान अनेक सविस्तर माहिती देणाऱ्या साइट्स आणि मुलाखतींची यादीच गवसली. यापूर्वी प्रत्यक्ष भेट झालेले, अवकाशात सर्वाधिक म्हणजेच सात वेळा जाण्याचा विश्वविक्रम केलेले अमेरिकन अवकाशवीर जेरी रॉस आणि स्कॉट स्केली सोबत वर्षभराच्या त्या मोहिमेमध्ये सहभागी झालेले रशियन अवकाशवीर मिखाईल कोर्निएन्को यांनी सविस्तर समजावलेल्या या पद्धतीची मला आठवण झाली. मिखाईलने वर्णन केलेला एक छोटासा अनुभव इथे सांगावासा वाटतोय. अवकाशात दीर्घ काळ वास्तव्य केल्यानंतर ते येथील माणसांना आणि त्याहून जास्त येथील निसर्गाला तिथे आठवत असत. या आठवणी इतक्या जास्त झाल्या की काही काळाने त्यांना झाडांचे भास होऊ लागले. यावर पर्याय म्हणून त्यांनी सगळीकडे झाडांची चित्रं लावली. या अशा अनेक लहान वाटणाऱ्या पण महत्त्वाच्या गोष्टी. टाळेबंदीच्या या काळात या अवकाशवीरांनी अनेकांना आणि त्यातही लहानांना या क्षेत्राविषयी आणि पेशाविषयी गोडी व कुतूहल निर्माण करण्यात यश मिळवलं आणि कोणतीही गोष्ट (अगदी कोरोनाही) सगळ्या सीमांच्या पल्याड असणाऱ्या त्या अवकाशाला गवसणी घालण्यासाठी माणसाला रोखू शकत नाही याची झलक मिळाली.



**गगनयान मोहिमेसाठी तयार करण्यात आलेल्या प्रणालीची प्रतिकृती.**

अवकाश विज्ञानाच्या क्षेत्रात मागच्या काही वर्षांत नासा, युरोपियन स्पेस एजन्सी, इसरो अशा सरकारी संस्थांच्या जोडीने खासगी संस्थांचे योगदान आणि कामगिरीही ठळक झालेली जाणवते. २५ मे, १९६१ हा दिवस या क्षेत्रातील ऐतिहासिक दिन म्हणून सोनेरी अक्षरांत नोंदवला गेला. कारणच तसे होते. त्यावेळचे

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष - जे. एफ. केनेडी यांनी याच दिवशी चंद्रावर माणूस पाठवण्याचा मनसुबा त्यांच्या प्रसिद्ध भाषणाद्वारे जगासमोर मांडला. त्यानंतर ५९ वर्षांनी, म्हणजे मे २०२०मध्ये अखंड जग आपलं भविष्य काय असेल याविषयी अगदीच गोंधळलेलं असताना अवकाश विज्ञानाच्या याच क्षेत्रात एक क्रांतिकारी पाऊल ठेवलं जात होतं. घरबसल्या सारं जग साक्षीदार होण्यासाठी सज्ज होत होतं आणि हे पाऊल 'स्पेस एक्स' नावाची एक खासगी संस्था ठेवणार होती.



नासाने तयार केलेल्या 'स्पेस एक्स डेमो- २' या खासगी संस्थेच्या मोहिमेंतर्गत अवकाशयात्री रॉबर्ट बेनकेन आणि डॉगलॅस हर्ली.

या मोहिमेअंतर्गत स्पेस एक्सच्या फाल्कन ९ या अग्निबाणातून ड्रॅगन क्रू या स्पेस कॅप्सूलमधून नासाचे २ अवकाशयात्री आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाकडे रवाना झाले. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाकडे अवकाशयात्री एका खासगी मोहिमेतून जाण्याची ही पहिलीच वेळ असल्यामुळे ही मोहीम अत्यंत महत्त्वाची आणि अनेक नव्या संधींची दारं उघडणारी होती इतकं नक्की. २७ मे रोजी होणार असलेली ही मोहीम वातावरणामुळे ३० मे, २०२० रोजी यशस्वी झाली. अवकाश स्थानकातील ६२ दिवसांच्या दीर्घ मुक्कामानंतर ऑगस्ट महिन्यात हे यात्री पृथ्वीवर परतले. या ड्रॅगन कॅप्सूलची २७ प्रक्षेपणं झाली असून, २५ वेळा आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाला भेट दिली आहे. या ऐतिहासिक मोहिमेचे साक्षीदार जगभरातील अनेक आबालवृद्ध झाले.

मार्च २०२०मधील टाळेबंदीनंतर केली जाणारी ही पहिलीच मोहीम होती. अनिश्चिततेच्या काळात जगाला आणि अवकाश विज्ञानाला आशा देणारी मोहीम म्हणून ही मोहीम लक्षात राहील.

नव्या मोहिमा आखण्यावर व कामावर कोरोनाकाळात निर्बंध आलेले असले तरी आधीच प्रक्षेपणाची तयारी झालेल्या मोहिमांचे काम अखंड सुरू होते. याचेच एक उदाहरण म्हणजे मंगळ मोहिमांचे. जुलै २०२० या महिन्यात तीन अवकाश संस्थांच्या तीन मंगळ मोहिमा प्रक्षेपित झाल्या. नासाची मंगळावरील परझिव्हर्नस मोहीम. युनायटेड अरब एमिरेट्सची एमिरेट्स मंगळ मोहीम आणि चीनची 'तायनवान- १' ही मंगळ मोहीम. फेब्रुवारी २०२१ मध्ये ही तीनही याने मंगळ ग्रहाच्या कक्षेत पोहोचली. कोरोना काळातील निर्बंधांमुळे या संस्थांमध्ये काम करणाऱ्या माणसांना गरजेव्यतिरिक्त प्रवेश मिळत नव्हता. बरंच काम घरबसल्या करण्याचा प्रयत्न होत होता. महत्त्वाच्या मोहिमांवर काम करणारी माणसं संस्थांमध्येच राहत होती. नासाच्या परझिव्हर्नस सोबत इंजेन्युटी हेलिकॉप्टर मंगळावर पाठवण्यात आलं. हेलिकॉप्टर बनवणाऱ्या या टीमचे प्रमुख अभियंता असणारे डॉ. बॉब बलराम यांच्यासोबत झालेल्या गप्पांदरम्यान त्यांनी या साऱ्या गोष्टी सांगत जगातील कोणतीच समस्या आमच्या अनेक दशकांच्या स्वप्नाच्या आड येऊ शकत नाही, असं हसत सांगितल्याचं मला आठवतंय.

योगायोगाने या वर्षी फेब्रुवारीमध्येच मंगळावरील ३६वं नवीन वर्ष होतं. हो, बरोबर ऐकताय तुम्ही. मंगळावरसुद्धा नवीन वर्ष असतं. दर वेळी अमेरिकेतील मार्स या शहरात मोठ्या उत्साहात नासा हे नवं वर्ष साजरं करते. या वर्षी टाळेबंदीमुळे ते शक्य झालं नसलं तरी या तीन यानांची त्याच महिन्यात मंगळ ग्रहाला भेट म्हणजे वेगळ्या प्रकारचा सोहळा होता, असं म्हणायला मुळीच हरकत नाही.

अनिश्चिततेतही या क्षेत्रातील काम सुरू राहिलं असलं तरी कामाचा वेग, प्राधान्य आणि लक्ष्य मात्र नक्कीच बदलले. भारतामध्ये इस्रोला जवळपास दहा मोहिमांचे काम पुढे ढकलावे लागले. बरीचशी इन्डस्ट्री बंद असल्याकारणाने 'गगनयान,' 'चांद्रयान - ३' यांसारख्या भारतातील सर्वाधिक महत्त्वाकांक्षी मोहिमांचे काम काही काळासाठी ठप्प झालेले. अवकाशात भारतीय माणूस धाडण्याचे स्वप्न पूर्ण करू पाहणारी 'गगनयान' ही मोहीम. याविषयी इस्रोचे अध्यक्ष डॉ. सिवन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले होते. या मोहिमेसाठीची डिसेंबर २०२१मध्ये होणार असलेली पहिली मानवरहित चाचणी कोरोनामुळे २०२२मध्ये होईल असं डॉ. शिवन यांनी नुकतंच जाहीर केलं आहे. याच मोहिमेच्या मिशन डायरेक्टर असणाऱ्या डॉ. ललिताम्बिका, आमच्या संवादादरम्यान याविषयी त्या आशावादी असल्याचं सांगत होत्या.

इस्रोच्या मोहिमांसाठी लागणाऱ्या सामग्रीसाठी खासगी कंपन्यांवर ते अवलंबून असतात. कोरोना काळात या कंपन्या बंद झाल्यामुळे त्याचा परिणाम मोहिमांवर होणे स्वाभाविक आहे. इस्रोचे मोहिमांचे काम मंदावले असले तरी या काळात कोरोनाविरुद्धच्या युद्धात लढण्यासाठी, देशाला सर्व प्रकारची मदत करण्यासाठी तेथील वैज्ञानिक प्रयत्नरत होते. विविध राज्यांतील सरकारला लिक्विड ऑक्सिजन उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. अवकाश विज्ञानाच्या क्षेत्रात लिक्विड



**इंटरनॅशनल स्पेस स्टेशनमध्ये गिटार वाजवण्याचा आनंद घेताना अवकाशयात्री क्रिस हॅडफिल्ड.**

ऑक्सिजन हे एक महत्त्वाचे संसाधन असून, क्रायोजेनिक इंजिनमध्ये ऑक्सिडायझर म्हणून त्याचा वापर केला जातो. अशी वेगवेगळ्या प्रकारची मदत इस्रोने या काळात सरकारला केली आहे.

अवकाश मोहिमांवर काम करत असताना कोरोनाविरोधातील लढ्यासाठी काम करणारी इस्रो ही एकमेव संस्था नव्हती. नासानेसुद्धा आपली संसाधने व लक्ष्य याकडे वळवले. या काळात हवा प्रदूषणावर झालेला परिणाम, ओझोनच्या थरावर झालेला परिणाम, कोरोनाचा पर्यावरणावर झालेला परिणाम अशा अनेक गोष्टींचा त्यांनी अभ्यास करायला सुरुवात केली. नासा ऑफिस ऑफ इन्स्पेक्टर जनरलच्या मार्च २०२१मध्ये प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टनुसार मार्च २०२०मध्ये अमेरिकेतील सरकारने २.३ ट्रिलियन डॉलर्स इतकी रक्कम Coronavirus Aid, Relief and Economic Security (CARES) ॲक्टसाठी जाहीर केली. या ॲक्टअंतर्गत नासाला ६० मिलियन डॉलर्स देण्यात आले. या पैशांचे नासाने सात वेगवेगळ्या व्यापक कॅटेगरीजअंतर्गत हिस्से केले. एप्रिल २०२०च्या मध्यापर्यंत नासातील ९० टक्के लोक घरून काम करत होते, तर १२ शाखांचे १८ महत्त्वाचे विभाग बंद करावे लागलेले. काम थांबल्यामुळे महत्त्वाच्या मोठ्या मोहिमांवर याचा परिणाम झाला. हे आणखी समजून घेण्यासाठी काही उदाहरणं पाहू.

रोमन स्पेस टेलिस्कोप या महत्त्वाच्या प्रकल्पाची प्रक्षेपणाची तारीख सहा महिन्यांनी पुढे सरकली. काम थांबल्यामुळे SLS प्रोग्रॅमसाठीचा खर्च अंदाजे ३६० मिलियन डॉलर्सनी वाढू शकतो. विविध मोहिमांसाठी नासाच्या विविध पार्टनर्सवर याचा परिणाम झाल्यामुळे त्या कामात होणारी दिरंगाई. उदाहरणार्थ, निसार प्रकल्पासाठी स्थानिक व आंतरराष्ट्रीय भागीदारांना होत असलेला दोन आठवडे ते चार महिने इतक्या मोठ्या रेंजमधील उशीर. हे त्या अनेक प्रकल्पांपैकी काही मोजके.

अशा अनेक गोष्टींमुळे या क्षेत्रावर जागतिक पातळीवर परिणाम झाला. पैसे, वेळ, मनुष्यबळ आणि महत्त्वाकांक्षा या सगळ्याच बाजूंनी या क्षेत्रात विविध समस्या येत असल्या तरी आशा पल्लवित करणारे प्रसंग आणि मोहिमाही पुष्कळ आहेत.

२०२०च्या मार्च महिन्यात भारतीय अवकाशविज्ञान, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात खासगी कंपन्यांसाठी एक धोरण जाहीर झाले आणि या क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. या क्षेत्राचं रूप बदललं. हे क्षेत्र केवळ सरकारी संस्थांची मक्तेदारी न राहता सरकारी व खासगी संस्थांच्या सहयोगाने उभं राहणारं आणि कैक संधी उपलब्ध करणारं क्षेत्र आता बनू पाहतंय. येथील अनेक खासगी कंपन्या सॅटेलाईट ते रॉकेट अशा व्यापक रेंजमध्ये लक्ष्य आता बनवू लागलेत. याच काळात भारतातील बंगळूरू येथे एलोन मस्क याच्या टेस्ला कंपनीचे भारतातील कारभारासाठीचे एक ऑफिस रजिस्टर झाले आणि बंगळूरू शहराचं अवकाश विज्ञानाच्या क्षेत्रातील योगदान व महत्त्व, तसेच येथील अवकाश विज्ञानाच्या क्षेत्रातील खासगी कंपन्यांसाठी उपलब्ध होत असलेल्या संधी हा साराच योग जुळून आल्यामुळे अनेक शक्यता आणि तर्क केले जात




**सब ऑरबायटल टूरिस्ट रॉकेटमध्ये प्रवास करण्यासाठी निवड झालेल्या वैज्ञानिकांपैकी एक असलेल्या प्रसिद्ध संशोधक आणि प्लॅनेटरी वैज्ञानिक डॉ. ॲलन स्टर्न यांचा फ्लाइटमधील एक क्षण.**



**फेब्रुवारी २०२१मध्ये मंगळ मोहिमेसाठी तयार करण्यात आलेल्या हेलिकॉप्टर बनवणाऱ्या टीमचे प्रमुख अभियंता डॉ. बॉब बलराम.**

आहेत.

या काळात खासगी कंपन्यांनी मात्र फार नेटाने काम केलेलं दिसून येतं. दुसऱ्या महायुद्धादरम्यानच्या अमेरिका आणि रशियातील स्पेस रेस नंतर आताची 'बिलोनियर स्पेस रेस' यासाठीच प्रसिद्ध होतेय. अनेक खासगी कंपन्या या घडीला या क्षेत्रात काम करत असल्या तरी एलोन मस्कची 'स्पेस एक्स,' रिचर्ड ब्रॅन्सनची 'व्हर्जिन गॅलक्टिक' आणि जेफ बेझॉसची 'ब्ल्यू ओरिजिन' या कंपन्या यात आघाडीवर आहेत. सध्या टूरिस्ट रॉकेट तयार करण्यात आणि त्याच्या चाचण्या घेण्यात ते व्यस्त आहेत.

ऑक्टोबर २०२०मध्ये अशाच एका सब ऑरबायटल टूरिस्ट रॉकेटमध्ये प्रवास करण्यासाठी एका वैज्ञानिकाची निवड झाल्याची घोषणा झाली. ती कंपनी म्हणजे - व्हर्जिन गॅलक्टिक. आणि ते संशोधक आहेत नासाचे प्रसिद्ध प्लॅनेटरी वैज्ञानिक - डॉ. ॲलन स्टन. सोबत ते अवकाशात जाणाऱ्याा पहिल्या काही संशोधकांपैकी एक ठरणार आहेत. या पहिल्या प्रवासादरम्यान ते दोन प्रयोगांचा अभ्यास करणार आहेत. हे स्पेस शिप लोकांना पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणापलीकडे जाऊन वजनविरहित अवस्थेचा अनुभव देण्यासाठी तयार केले गेले आहे. या घोषणेपूर्वी हे दोन्ही प्रयोग आणि दोन माणसं या स्पेसशिपमधून प्रवास करून आलेत; पण अजूनही कुणी संशोधक या प्रवासासाठी गेले नाहीत.

जुलै २०२१ हा महिना स्पेस टूरिझम या अनेक वर्षं केवळ कल्पना वाटणाऱ्या स्वप्नाच्या दिशेने आगेकूच करणारा महिना ठरला. जुलै ११, २०२१ रोजी व्हर्जिन गॅलक्टिकचं युनिट २२ विमान अवकाशात झेपावलं. कंपनीचे संस्थापक रिचर्ड ब्रॅन्सन यांच्यासह अन्य पाच जणांनी या विमानात प्रवास केला. त्यापैकी एक होती भारतीय वंशाची - शिरीषा बांदला. या मोहिमेसोबत खासगी अवकाश पर्यटनाच्या क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यानंतर लगेच म्हणजेच २० जुलै, २०२१ रोजी ब्ल्यू ओरिजिनच्या न्यू शेपर्डच्या री-यूजेबल यानामधून कंपनीचे संस्थापक जेफ बेझॉस, त्यांचे बंधू मार्क आणि सोबत ८२वर्षीय वॉली फंक आणि १८वर्षीय ऑलिव्हर यांनी प्रवास केला. यासोबतच अवकाशात जाणारी सर्वांत तरुण आणि सर्वांत वयस्कर व्यक्ती असे दोन्ही विक्रम या एकाच मोहिमेत ब्ल्यू ओरिजिन कंपनीने आपल्या नावे नोंदवले. अवकाश पर्यटनाच्या क्षेत्रातील या नव्या वाटचालीमुळे एक वेगळ्या प्रकारची रेस सुरू झालीय. आधीच उल्लेख केल्याप्रमाणे तिला 'बिलोनिअर स्पेस रेस' असं संबोधलं जातंय. यामुळे होणारे फायदे, नुकसान आणि याची गरज याविषयी चर्चा सुरू आहे. वेगवेगळे मतप्रवाह यामुळे पाहायला मिळताहेत. असं असलं तरी एक अशक्य वाटणारी कल्पना प्रत्यक्षात उतरवणारी ही घटना आणि माणसं एक नवं कल्पनेपल्याडचं जग तयार करताहेत आणि आपण सारेच त्याचे साक्षीदार असणार आहोत. या प्रवासाचा भाग असणार आहोत, हे कुणीच नाकारू शकत नाही.

हे सगळं सुरू असताना चीनने रशियाच्या मदतीने पृथ्वीच्या लोअर अर्थ ऑर्बिटमध्ये आपलं स्वतःचं अवकाशस्थानक बांधण्याची तयारी सुरू केली आहे. २०२२पर्यंत त्यांना हे काम पूर्ण करायचे आहे. तायनगॉन्ग असे त्याचे नामकरण करण्यात आलेले असून, त्याचा अर्थ 'स्वर्गातील महाल' असा होतो. सावकाशपणे इतर देशांनीही आपल्या मोहिमा आणि चाचण्यांना सुरुवात केली आहे. इस्रोनेही ऑगस्ट महिन्याच्या २८ तारखेला 'गगनयान' मोहिमेसाठीच्या सिस्टिम डेमॉन्स्ट्रेशन मॉडेल (SMD)ची पहिली हॉट टेस्ट यशस्वीरीत्या संपन्न केली आहे. पुढील अनेक मोहिमांसाठी आता या साऱ्याच संस्था जोर धरताहेत. सज्ज होताहेत.


कितीही समस्या आल्या तरी आपलं काम न थांबवण्याची शिकवण देणारं हे क्षेत्र मानवी आकांक्षांच्या बळावर भविष्याविषयी आशा निर्माण करतं यात दुमत नाही. कोरोना काळातील या क्षेत्रातील घटना मानवाला प्रेरणा देत असताना जगात काहीच अशक्य नाही, हेसुद्धा सांगतात. नव्या रहस्यांचा शोध घेण्यासाठी समस्यांना तोंड देत, त्या स्वीकारत पुढे जात राहण्याला पर्याय नाही, हे अधोरेखित करतात.

★

**ruchirasawant48@gmail.com**

(लेखिका अवकाश विज्ञान संवादक आहेत.)

## नवं कोरं




नात्यांचे कंगोरे शोधता शोधता स्वजाणिवेच्या आविष्कारापर्यंत पोहोचणारी साहित्य अकादमी विजेते लोकप्रिय गुजराती लेखक दिनकर जोषी यांची विलक्षण कादंबरी


मूळ लेखक - दिनकर जोषी
अनुवाद - प्रतिभा काटीकर

पृष्ठसंख्या : १३२
किंमत : ₹१९५

### इथे कुणी नाही

Book Available

---




स्पर्धा परीक्षांच्या चक्रातून निसटलेले अर्जुन आणि तो चक्रव्यूह भेदू पाहणारे अभिमन्यू... स्पर्धा परीक्षांसाठी उमेदीच्या वर्षांमध्ये चिवटपणे झुंजणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अर्ध्या दशकातील आयुष्याचं स्मरणरंजन...

लेखक - मिलिंद महांगडे


पृष्ठसंख्या : ३५२
किंमत : ₹४५०

'कर्मण्येवाधिकारस्ते, मा फलेषु कदाचन'

### अर्ध दशक

Book Available

---




स्थलांतरात झुरणारं... स्थलांतरात फुलणारं.. एका किशोरवयीन मुलाच्या आयुष्याचं जगणं चितारणारी साहित्य अकादमी विजेते अनीस सलिम यांची विलक्षण कादंबरी


मूळ लेखक - अनीस सलिम
अनुवाद - सुनीता कट्टी

पृष्ठसंख्या : २४४
किंमत : ₹२९५

### छोट्या शहराचा दर्या

Book Available

---





अनाथपणातली हतबलता आणि कूळ, वंशासारख्या संकल्पनांतील अर्थहीनतेवर सखोल चिंतन करायला भाग पाडणारी हृदयस्पर्शी कादंबरी...

### कर्णलोक

मूळ लेखक - ध्रुव भट्ट
अनुवाद - सुषमा शाळिग्राम

पृष्ठसंख्या : २१६
किंमत : ₹३२०

Book Available



# सीमेआत... घुसमटतोय श्वास

विजय प्रभाकर

कोरोनासारख्या भयंकर संकटाला सामोरं जात असतानाच एकामागून एक नवीन संकटं जगावर येत आहेत. कोरोनाची दुसरी लाट ओसरतानाच जवळपास शंभर टक्के लसीकरण पूर्ण झाल्याच्या आनंदात असणाऱ्या इस्राईलला पॅलेस्टाइन किंवा पर्यायाने हमाससोबतच्या संघर्षाला तोंड द्यावे लागले. एकीकडे अत्याधुनिक शस्त्र असणारा इस्त्राईल तर दुसरीकडे कित्येक इस्लामी राष्ट्रांचा पाठिंबा असणारा पॅलेस्टाईन यांच्यातला संघर्ष जगाची मोठी हानी करणारा ठरला असता; मात्र त्याला वेळीच आळा घालण्यात जागतिक संघटना यशस्वी ठरल्या. हा संघर्ष शांत होतोय न होतोय तोवर अफगाणिस्तानवर तालिबान्यांनी अवैध सत्ता मिळवलीय आणि त्याचे दूरगामी परिणाम भारतासहित जगाला भेडसावत आहेत.

मध्य आशियातल्या अफगाणिस्तानवर यापूर्वीही तालिबान्यांनी सत्ता मिळवली होती. याच काळात भारताचं एअर इंडियाचं विमान 'आय. सी. ८१४' तालिबान्यांनी हायजॅक करून अफगाणिस्तानच्या कंधार भागात नेलं होतं आणि त्या बदल्यात मसूद अझरची सुटका भारताला करावी लागली होती. तालिबान म्हणजे 'पश्तो' भाषेत विद्यार्थी. सोविएत रशियाच्या अफगाणिस्तानातून घेतलेल्या माघारीनंतर तालिबानचा उदय १९९०च्या दशकाच्या सुरुवातीला उत्तर पाकिस्तानात झाला. सुरुवातीला तालिबानचे सदस्य हे तथाकथित मुजाहिदीन होते, ज्यांनी अमेरिकेच्या साहाय्याने सोविएत रशियाच्या फौजांना अफगाणिस्तानातून १९८०मध्ये काढता पाय घेण्यास भाग पाडले. तालिबानच्या स्थापनेमागे हात नसल्याचा दावा पाकिस्तानने अनेकवेळा केलेला असला तरी, तसे अनेक पुरावे वेळोवेळी दिसून आलेले आहेत. सुरुवातीच्या काळात तालिबानी चळवळीत सहभागी झालेले अनेक अफगाणी हे पाकिस्तानातल्या मदरशांमध्ये शिकलेले असल्याचे समोर आले. मागच्या वेळी तालिबानला समर्थन करणाऱ्या फक्त तीन देशांमधील पाकिस्तान हा एक होता. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती हे इतर दोन देश होत. राजनैतिक संबंध तोडणाऱ्यातला पाकिस्तान हा शेवटचा देश होता. याही वेळी पाकिस्तानने तालिबानच्या सत्ता काबीज करण्याचे समर्थन 'तालिबानने गुलामीच्या बेड्या तोडल्या' अशा शब्दांत केलंय. त्यामुळे पाकिस्तानचे तालिबानशी निकटचे संबंध नाकारता येत नाहीत आणि त्यामुळेच पाकिस्तानकडून होणाऱ्या आतंकी कारवाया वाढण्याची शक्यताही.

नैर्ऋत्य अफगाणिस्तानातून सुरू झालेला तालिबानचा प्रसार हळूहळू झपाट्याने वाढत गेला. १९९५मध्ये तालिबानने इराण सीमेजवळ असलेला अफगाणिस्तानचा 'हेरात' हा प्रांत ताब्यात घेतला. पुढे १९९८पर्यंत जवळपास ९० टक्के अफगाणिस्तान तालिबानच्या ताब्यात होता. हा तालिबानचा अफगाणिस्तानातला पहिला कार्यकाळ. तालिबानने त्या काळातच शरिया कायद्यानुसार कडक शिक्षा देण्याला सुरुवात केली होती. खुनाच्या आरोपींना सार्वजनिक फाशी देणे, तसेच चोरीच्या गुन्हेगारांचे हात-पाय तोडण्यासारख्या शिक्षा तालिबानने तेव्हाच सुरू केल्या. टीव्ही, संगीत, तसेच पाश्चिमात्य सिनेमा आणि साहित्य यावर बंदी घातली होती. पुरुषांना दाढी वाढवणे बंधनकारक केले गेले होते, तर स्त्रियांना संपूर्ण शरीर झाकणारा बुरखा परिधान करण्याची सक्ती केली गेली होती. आजही तालिबानने काबूलवर ताबा मिळवताच शहरात एकाएकी बुरख्याची मागणी वाढली आणि त्यांची चढ्या भावाने विक्री व्हायला सुरुवात झाली. तालिबानची सत्ता आणि त्यांची दहशत अफगाण नागरिकांना नवी नाहीये. त्यामुळेच की काय तालिबानला सत्ता मिळवताना कुठेही फारसा विरोध होताना दिसत नाहीये.

९/११चा संदर्भ घेऊन आणि लादेन अफगाणिस्तानात असल्याचा दावा करून तत्कालीन अमेरिकन अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी अमेरिकी सैन्य अफगाणिस्तानात घुसवलं. जवळपास वीस वर्षांनंतर अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सैन्य वापसीचा निर्णय घेतला आणि आताचे अध्यक्ष जो बिडेन यांनी तो पूर्णत्वास नेला. अमेरिकेने वीस वर्षांत प्रचंड मोठा पैसा अफगाणिस्तानात वाया घालवला. परिणामी, काही प्रमाणात मनुष्यहानीही सहन करावी लागली. इतकं सगळं होऊनही अफगाणिस्तानला एकाकी अराजकतेत सोडून जाण्याबद्दल जागतिक स्तरावर टीकाही सोसावी लागतेय. स्वतःच्या हितासाठी अमेरिकेने घेतलेला हा निर्णय योग्य की अयोग्य हे ठरवता येणं शक्य नसलं तरी, हा निर्णय काही काळ थांबवता नक्कीच आला असता. अमेरिकेच्या एकाएकी जाण्याने अफगाणिस्तान सरकारला सत्ता टिकवणं अर्थातच कठीण होतं आणि त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. अफगाणी सरकार पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळले. ठरल्याप्रमाणे ३१ऑगस्ट रोजी अमेरिकेचा शेवटचा सैनिक अफगाणिस्तानच्या बाहेर पडला; पण त्याच्याही काही दिवस आधीच तालिबानने अफगाणिस्तानवर ताबा मिळवला. तालिबान्यांच्या सत्तर हजार मनुष्यबळापुढे तीन लाखांचं सैन्य असलेल्या अफगाण सरकारने न लढताच नांगी टाकली. अगदी सहज तालिबानला विजय मिळवता आला याची कारणे अनेक आहेत. तालिबान्यांच्या प्रचंड दहशतीमुळे एकेक करत जिल्हे ताब्यात घेत असताना, कुठेही त्याला विरोध झाला नाही. एकेक करून निम्म्याहून अधिक टिपलेले अफगाण वायुदलाचे पायलट असो किंवा त्यामुळे इतरांनी घेतलेली माघार असो, मोठं तरी फक्त कागदोपत्री असणारं सैन्य असो किंवा जनसामान्यांशी, मातीशी नाळ न जोडलं गेलेलं आणि ऐनवेळी देश सोडून गेलेलं नेतृत्व असो... इत्यादी. तब्बल वीस वर्षे अफगाणिस्तानात राहूनही तिथल्या सरकारला, सैन्याला किंवा सामान्य जनतेला कुठल्याही दहशतवादी ताकदीविरोधात लढण्यास सक्षम न करण्याचं पातक मात्र अमेरिकेच्या माथी चिटकणार आहे. अर्थात याला तिथला स्थानिक भ्रष्टाचारसुद्धा तितकाच जबाबदार आहे. अफगाणिस्तानचे अध्यक्ष नोटांचे बंडल, कार, हेलिकॉप्टरमधून घेऊन पळून गेल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या याचेच हे द्योतक.

आज अनेक माध्यमांतून किंवा समाजगटांतून तालिबान पूर्वीपेक्षा सुधारला असल्याच्या वल्गना केल्या जात असल्या तरीही तालिबान पहिल्यापेक्षा अधिक क्रूर झाल्याच्या घटना समोर आलेल्या आपण पाहतोय. एका गरोदर पोलीस महिलेची हत्या तिच्या घराच्यासमोर करण्यात आली, हे आपण माध्यमांवरून बघितलंच; त्याआधीही 'डी डब्ल्यू' या वृत्त वाहिनीच्या पत्रकाराच्या नातेवाइकाची हत्या तालिबानने केली. भारतीय पत्रकार आणि २०१८ चे पुलित्झर पुरस्कार विजेते डॅनिश सिद्दीकी यांना केवळ भारतीय असल्याच्या कारणावरून चिरडून मारण्यात आले. तालिबान्यांना महिलांनी नोकरी करणे किंवा शिक्षण घेणे पसंत नाही. काही तालिबानी प्रवक्त्यांकडून असं स्पष्टीकरण देण्यात येतंय की,



आता फक्त सुरक्षा कारणांमुळे महिलांना आम्ही घरी बसवत आहोत. कालांतराने जेंव्हा सुव्यवस्था लागू होईल तेव्हा हे निर्बंध उठवले जातील; पण अफगाणी महिलांचा तालिबानच्या मागच्या कार्यकाळातील (१९९६-२०००) अनुभव सांगतो की, अशी सुव्यवस्था कधीच आली नाही आणि तेव्हापासून महिलांना कायम घरीच बसावे लागले. घराबाहेर पडताना महिलांसोबत पुरुष सहकारी अनिवार्य असण्यासारखे त्या काळचे नियम आताही पुनरुज्जीवित होत आहेत. पडदा असल्याशिवाय बाहेर पडायचं नाही किंवा कॉलेजात गेलात तरी स्त्री आणि पुरुष विद्यार्थ्यांची शिकण्याची व्यवस्था वेगवेगळी ठेवण्याचे आदेश तालिबानने दिले आहेत. नुकतंच हेरातमध्ये काही महिलांनी तालिबान विरोधात प्रदर्शन केले. त्यातली एक आरोग्य क्षेत्रात (ज्यात विषेशकरून तालिबान्यांनी लोकांना तातडीने कामावर येण्यास बजावले आहे) काम करणारी महिला सांगतेय की, तिलाही कामावर येण्यास सांगितले; परंतु सैन्यात असलेला तिचा पती तीन वर्षांपासून गायब आहे आणि घरात कुणीही प्रौढ पुरुष नाही. या कारणामुळे तिला परत कामावर न येता घरी राहण्याचं फर्मान बजावण्यात आलं; कारण घराबाहेर पडताना तिच्यासोबत पुरुष नाहीये. घरातल्या तीन लहान मुलांसाठी कमावती एकटीच असणारी ती आता उसनवारी करून जगतेय. अर्थात, अशा रीतीने ती जास्त काळ जगू शकणार नाही; पण यावर पर्यायही नाही. महिलांसोबतच शरिया कायदा लागू करण्यासाठी उतावीळ असणारा तालिबान पुरुषांवर वेगवेगळ्या पद्धतीने अत्याचार करतोय. भर चौकात फोडून काढणे, गळ्यात टायर बांधून शहरभर फिरवून मारणे इत्यादी. अशा प्रकारच्या सामाजिक प्रश्नांसोबतच अफगाणी जनतेला आता आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. अफगाणिस्तान असाही फार श्रीमंत देश नाही; मात्र भारतासारख्या अनेक देशांनी अफगाणला होणारी आपली रसद थांबवली आहे आणि त्यामुळे आता तालिबान्यांची आर्थिक कोंडी होत आहे. त्याबरोबरच अफगाणी केंद्रीय बँकांच्या ठेवी ज्या अमेरिकेसोबतच इतर काही प्रगत देशांत होत्या त्या सर्व गोठवून ठेवण्यात आल्या आहेत. अर्थात, त्या तालिबानच्या हाती न लागता सुरक्षित राहणार आहेत. म्हणजेच तालिबानकडे अफगाणच्या एकूण राशीपैकी एक टक्क्यांहून कमी राशी उपलब्ध आहे. त्यामुळे सरकार आणि प्रशासन चालवण्यासाठी तालिबानला मोठ्या प्रमाणात अडचणी येणार आहेत. यातून चीनसारखे बलाढ्य देश आर्थिक मदत करून अफगाणला स्वतःच्या जाळ्यात ओढण्याची मोठी शक्यता आहे. याचा परिणाम जगासोबतच भारतीय व्यापारावर होण्याची भीती आहे. अफगाणिस्तान आणि त्यामार्गे उत्तर आशियातल्या काही देशांसोबत होणाऱ्या व्यापारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. तालिबान काबूलजवळ पोचताच अफगाणी नागरिकांनी बँकांसमोर लांबच लांब रांगा लावल्याचं चित्र पाहायला मिळालं. सर्वच एटीएममध्ये खडखडाट सुरू झाला. अगदी अलीकडे आलेल्या वृत्तानुसार काबूलसारख्या परिसरात विजेची मोठ्या प्रमाणावर टंचाई जाणवतेय. त्यामुळे बरेच उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. परिणामी, बेरोजगारी आणि उपासमारीसारख्या संकटांना अफगाण नागरिकांना सामोरं जावं लागणार आहे. यातूनच गृहयुद्धाचा धोका संभवतो. तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या आतंकवादी संघटना याचा फायदा घेऊन मोठ्या प्रमाणात आतंकवादी कारवाया घडवून आणण्याचीही भीती नाकारता येत नाही.

आताच्या तालिबानच्या सत्ता हस्तांतरात पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादी संघटनांचा मोठा हात असल्याचं दिसून येतंय. नुकत्याच अफगाणिस्तानच्या उत्तरेकडे असणाऱ्या पंजशीर या भागात पाकिस्तानी वायुदलाने हल्ला केल्याचे कळतेय. पंजशीर हा भाग अजूनही तालिबानच्या हाती आलेला नाही. तिथला 'अहमद मसूद' हा तालिबानविरोधी नेता स्थानिक लोकांना सोबत घेऊन तालिबानशी लढतोय. त्याला अफगाणिस्तानचे माजी उपराष्ट्रपती असणारे आणि राष्ट्रपती पळून गेल्यानंतर स्वतःला प्रभारी राष्ट्रपती घोषित करणारे अमरुल्लाह सालेह यांची सोबत आहे. तालिबान शांततेच्या मार्गाने पंजशीरवर ताबा मिळवण्याच्या गोष्टी करत असला, तरी अतिशय दुर्गम असलेला हा भाग त्याला लढून मिळवता येणार नाही, हे सत्य आहे. पाकिस्तान कितीही तालिबानधार्जिणा असला तरी अफगाणिस्तानची आर्थिक घडी बसविण्याची कुवत पाकिस्तानमध्ये नाही. त्याचा फायदा आधीच चीनने तालिबानशी हातमिळवणी करून घेतलाय. त्याद्वारे अफगाणिस्तानातल्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताबा मिळवण्याचा अर्थातच चीनचा प्रयत्न असणार. नव्वदच्या दशकात आधीच हात पोळून घेतलेला रशियादेखील तालिबानला रोखून स्थिर सरकार वगैरे देण्याच्या फंदात पडणार नाही आणि अमेरिकेने तर आधीच हात काढून घेतलाय. आता या मोठ्या सत्ताच तालिबानला स्वीकारून त्यांच्याशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असतील तर भारतासारखा देशही तालिबानच्या विरोधात जाणार नाही असंच दिसतंय.

बळजबरीने सत्तेवर आलेल्या शक्तींसोबत भारत कधीही जाणार नाही, अशी भारताची सुरुवातीची भूमिका असली तरी आता त्यात बदल

घडविण्याशिवाय पर्याय दिसत नाही. यापूर्वीच्या तालिबानच्या अफगाणिस्तानातल्या कारकिर्दीत भारताने विरोधाचे धोरण पत्करले होते. त्या काळाशी जरी ते सुसंगत असले तरी आता मात्र भारताचे हात तिथे अडकले आहेत. जवळपास बावीस हजार कोटींची गुंतवणूक भारताने अफगाणिस्तानमध्ये केलेली आहे. अफगाणिस्तानच्या मोठ्या धरणांपैकी एक असा सलमा डॅम भारताने हेरात प्रांतामध्ये बांधलेला आहे. 'अफगाण-इंडिया मैत्री डॅम' या नावाने ओळखला जाणारा हा प्रकल्प सध्या लाखो एकर शेतीसाठी सिंचनव्यवस्था पुरविण्याबरोबरच तितक्याच मोठ्या प्रमाणात विजेची उपलब्धता करीत आहे. त्याबरोबरच जवळजवळ शंभर एकर परिसरात भारताच्या केंद्रीय बांधकाम विभागाने अफगाणिस्तानसाठी संसद इमारतीची उभारणी केली आहे. हा भाग भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींच्या नावाने ओळखला जातो. भारत-अफगाणिस्तानच्या व्यापारी संबंध वाढीसाठी भारताच्या 'बी.आर.ओ' ने 'झारंज-देलाराम' हा २१८ किमीचा हायवे प्रकल्प पूर्ण केलाय. पाकिस्तानने भारताला स्वतःचा भूभाग व्यापारासाठी वापरण्यास मनाई केल्यामुळे इराणच्या चाहबहार बंदरापासून सुरू होणारा हा महामार्ग भारताला अफगाणिस्तानमध्ये जाण्यासाठी पर्यायी मार्ग झालाय. अफगाणिस्तानसोबत त्याच्या उत्तरेकडे असणाऱ्या विविध देशांशी भारताला जोडण्यासाठी या प्रकल्पाचा उपयोग होईल, या दृष्टीने भारताने यात गुंतवणूक केलेली आहे. या आणि अशाच आणखी काही प्रकल्पांमध्ये भारताने एकूण बावीस हजार कोटी रुपये अफगाणिस्तानमध्ये ओतले आहेत. यामुळे आता तालिबानशी फटकून राहण्याचा निर्णय हे भारतासाठी उलटे पाऊल ठरणार आहे. यापूर्वीही कित्येक देशांशी तिथल्या आंतरिक बाबी दुर्लक्षित करून आपण सलोख्याचे राजनैतिक संबंध प्रस्थापित केलेले आहेतच. तेच धोरण आपल्याला आता तालिबानबाबतही स्वीकारावे लागेल. तालिबानसोबत सलोख्याचे संबंध राखणं भारताला सुरक्षेच्या दृष्टीनेही तितकंच महत्त्वाचंय. पाकिस्तान आमचं दुसरं घर आहे, हे तालिबानने आधीच जाहीर केलंय. यामुळे काश्मीर प्रश्नावर ते पाकिस्तानला लपूनछपून का होईना पण मदत करणार हे निश्चित आहे. भारतातल्या आतंकवादी संघटना काश्मीरप्रश्नी तालिबानला साद घालत आहेत. त्यांना रोखण्यासाठी भारताला आता सावध व्हावेच लागेल. या सगळ्या पार्श्वभूमीवर भारताला तालिबानशी नाइलाजाने का होईना सलोख्याची भूमिका घ्यावीच लागणार आहे. मागच्या काही दिवसांत पाकिस्तानपुरस्कृत आतंकवादी संघटनांनी तालिबानला मदत केल्याचे दिसून आले आहे. त्याबरोबरच तालिबानने जरी सत्ता काबीज केली असली तरी त्यांना सत्ता राबवायचा तितका अनुभव नाही. याही बाबतीत तालिबान पाकिस्तानची मदत घेणारच. अर्थात याची परतफेड तालिबानला करावी लागेल.

पाकिस्तानला वेळोवेळी रशियासारखे देश आतंकवादाच्या नावाखाली शस्त्रास्त्रांची किंवा इतर मदत नाकारत आले आहेत. आता मात्र पाकिस्तानला अफगाणी भूमी आतंकवादासाठी मिळणार असून, पाकिस्तान आपले आतंकवादी तळ तिकडे हलवण्याची शक्यता जास्त आहे. त्याद्वारे पाकिस्तान स्वतःच्या भूमीतून कुठल्याही दहशतवादी कारवाया होत नाहीत, हे सिद्ध करण्यात आणि आंतरराष्ट्रीय समुदायाकडून मदत मिळविण्यात यशस्वी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारताबरोबरच अनेक देशांना निर्वासितांच्या मोठ्या प्रश्नाला सामोरं जावं लागणार आहे. भारताने सध्यातरी सरसकट सगळ्यांना मानवतेच्या दृष्टिकोनातून आपत्कालीन व्हिसा दिलेला आहे. त्यामुळे भारतीयांबरोबरच अनेक अफगाण नागरिकसुद्धा भारतात पोचले. त्यांच्या राहण्याची, रोजगाराची, तसेच शिक्षणाची सोय आता भारत सरकारला करावी लागेल. अर्थात, ही सगळी व्यवस्था किती काळ करायची हे मात्र अनुत्तरित आहे.

स्त्री आणि पुरुषांना एकत्रित नसलं तरी शिक्षण देण्याला तालिबान्यांनी परवानगी दिलीय. घरातल्या प्रौढ पुरुषांसोबत का असेना; पण फिरण्याची मुभा त्यांनी स्त्रियांना दिलीय याच काय त्या सकारात्मक बातम्या आतापर्यंत मिळाल्या आहेत. तालिबान्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना हवी असणारी कायदा आणि सुव्यवस्था लवकर सुरळीत होवो आणि त्यानंतर तरी स्त्रियांना बाहेर फिरण्याचं, नोकरी, व्यवसाय किंवा शिक्षणाचं स्वातंत्र्य मिळो एवढी अपेक्षा आपण करू शकतो.

आता या सगळ्या परिस्थितीशी सामान्य माणूस म्हणून आपला काय संबंध? मला स्वत:ला जाणवलेल्या दोन घटना...

वर नमूद केल्याप्रमाणे अफगाणचे राष्ट्रपती अशरफ घनी हे अक्षरशः नोटांचे पोते घेऊन आपल्या कुटुंबासहित देश सोडून गेले. मातीशी नाळ असणारा कुठलाही देशभक्त नेता अशी वर्तणूक करणार नाही.


भारतीय लोकशाहीने आपल्याला आपलं नेतृत्व निवडायचे अधिकार दिलेत, याचा आपण सुयोग्य वापर केला पाहिजे. समाजहिताचं आणि देश- हिताचं भान असणारा नेताच आपण निवडला पाहिजे. परदेशात स्वतःची प्रचंड संपत्ती जमा करून ठेवणारं आणि देश अडचणीत आला की धूम ठोकणारं नेतृत्व आपण कदापि निवडता कामा नये. दुसरी घटना म्हणजे नुकताच व्हायरल झालेला अफगाणिस्तानचे शीख सांसद नरेंद्र खालसा यांचा फोटो. स्वतः हात पकडलेलं एक मूल, पत्नी आणि तिच्या हातात असलेलं एक बाळ आणि काही मोजक्या बॅगा. फक्त इतकंच घेऊन ते भारतात विमानतळावर उतरलेत. सांसद म्हटल्यावर पैशाची किंवा संपत्तीची काय कमी असणार? पण सगळं तिथेच ठेवून त्यांना स्वदेश सोडावा लागला. याहून मोठं दुर्दैव ते काय? अर्थात याला उपाय होताही. स्वतःचं स्वातंत्र्य त्यागून टाकायचं, धर्मच सोडून द्यायचा आणि तालिबानी म्हणतील तो धर्म स्वीकारायचा, ते म्हणतील तसं आचरण करायचं. त्या बदल्यात स्वतःची संपत्ती स्वतःकडे ठेवायची. अर्थात, त्यांनी धर्म आणि स्वातंत्र्य स्वीकारलं आणि देश सोडून भारतात आले. या सगळ्यावरून प्रत्येक भारतीयानी हेच शिकलं पाहिजे की, जर स्वतःचं स्वातंत्र्य, संपत्ती, धर्म अबाधित ठेवायचा असेल तर आधी आपला देश सुरक्षित राहिला पाहिजे. त्याच्या सीमा सुरक्षित राहिल्या पाहिजेत. प्रत्येकासाठी देश सर्वोतोपरी असला पाहिजे.

★

vijaylagdive@gmail.com

# संघर्षाची पासष्टी

सुनील गावडे



घोंगडे भिजत ठेवणे म्हणजे नेमके काय असते, याचा अनुभव घ्यायचा असेल तर बेळगाव सीमाभागाला एकदा अवश्य भेट द्यायला हवी. बेळगाव, कारवार, निपाणी, खानापूर, बिदर, भालकीसह एकूण ८६५ खेड्यांतील मराठी भाषिक गेली ६५ वर्षे महाराष्ट्रात जाण्यासाठी संघर्ष करत आहेत. या संघर्षात दोन पिढ्या संपल्या. तिसरी पिढी कार्यरत आहे अन् आता चौथी पिढीही सक्रिय होत आहे. चार पिढ्यांच्या या संघर्षात अनेकांना हौतात्म्य प्राप्त झाले. कित्येक जायबंदी झाले. हजारो लोकांनी तुरुंगवास भोगला; पण सरकार नावाच्या व्यवस्थेला काही पाझर फुटला नाही. एवढा प्रदीर्घ लढा लढल्यानंतर माणसं थकतात, त्यांच्यात नैराश्य निर्माण होते. लढ्याची धार बोथट होते; पण सीमाभागातील मराठी जनता याला अपवाद ठरली आहे. आजदेखील सीमावासीय मराठी भाषिक कर्नाटक सरकारचा अन्याय व अत्याचार सहन करत महाराष्ट्रात जाण्यासाठी त्याच उमेदीने लढत आहेत.

'बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे', 'रहेंगे तो महाराष्ट्र में, नही तो जेल में' अशा घोषणा फक्त सीमाभागातच ऐकायला मिळतात. साठच्या दशकात सुरू झालेल्या या घोषणा आजही तितक्याच तडफेने दिल्या जातात. का? तर बेळगावसह कारवार ते बिदरपर्यंत महाराष्ट्राला लागून असलेली असंख्य गावे (सीमाभाग) १९५६मध्ये लोकेच्छेविरुद्ध अन्यायाने तत्कालीन म्हैसूर प्रांतात डांबण्यात आली. तेव्हापासून सीमाभागात हा लढा अव्याहतपणे सुरू आहे. आता हा लढा थेट सर्वोच्च न्यायालयात पोचला आहे. त्यालाही १६ वर्षे उलटली आहेत. सरकारी विलंबाची झळ किती दाहक असू शकते, याचे सीमाप्रश्न हे एक उत्तम उदाहरण आहे. संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरू झाला, तेव्हा बेळगावसह सीमाभागात मराठी भाषिक बहुसंख्य होते. कारवार जिल्ह्यातील हल्याळ तालुक्यात तर ८४ टक्के जनता मराठी भाषिक होती. कालौघात त्यांची संख्या थोडी घटली असली तरी आजही बेळगावसह सीमाभाग मराठीबहुल आहे. सीमाभागात आजही मराठीतून व्यवहार केले जातात. या परिसरावरील मराठी संस्कृतीचा ठसा आजही आहे. मात्र, तो पुसून टाकण्याचे प्रयत्न कर्नाटक सरकार वेळोवेळी करत आले आहे. मराठी शाळा जाणीवपूर्वक बंद केल्या जात आहेत. मराठी माहितीदर्शक फलकही काढून टाकले जात आहेत. मराठीचे नामोनिशाण मिटवण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

महाराष्ट्र एकीकरण समितीची स्थानिक राजकारणातली ताकद, निवडणुकीतील विजयाचा इतिहास हा मराठी भाषकांच्या न्याय्य हक्काचे प्रतीक आहे. एवढेच नव्हे तर ग्रामपंचायती, तालुका पंचायत व महापालिकेत सीमाभाग महाराष्ट्रात सामील करण्याबाबतचे ठराव संमत करण्याची परंपरा होती. पण, सीमाप्रश्नाचा लढा न्यायालयात गेल्यानंतर कर्नाटक सरकारने बरखास्तीचे हत्यार उपसण्यास सुरवात केल्याने ही परंपरा खंडीत झाली. तरीसुद्धा सीमाभागात भरविल्या जाणाऱ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनांमध्ये आजदेखील सीमाप्रश्नी ठराव केला जातो. पण, त्यावरही कर्नाटकी वक्रदृष्टी असतेच. सीमाभागात दरवर्षी तीन वेळा हुतात्मा दिन व काळा दिन पाळला जातो. त्याशिवाय मराठी फलक, कागदपत्रे वा न्याय्य हक्कांसाठी वेळोवेळी शांततामय व सनदशीर मार्गाने आंदोलने केली जातात. तरीसुद्धा कर्नाटकचे पोलीस जाणीवपूर्वक आडकाठी आणून परिस्थिती बिघडवितात. अलीकडच्या काळात पोलिसांबरोबर बाहेरून आलेल्या काही कन्नड संघटनांचा उपद्रव वाढल्याने बेळगाव परिसर वारंवार अशांत होत आहे. या पार्श्वभूमीवर सीमाप्रश्न नेमका काय आहे, हे जाणून घेणे आवश्यक बनते.

**लढ्याची पार्श्वभूमी**

२ ऑक्टोबर, १९५३ रोजी तेलगु भाषिक आंध्र प्रदेशची निर्मिती झाली. अन् तिथूनच भाषावार प्रांतरचनेची मागणी जोर धरू लागली. तत्कालीन मुंबई प्रांतातील मराठीबहुल बेळगाव व आजूबाजूचा प्रदेश महाराष्ट्रात विलीन झाला पाहिजे, अशी मागणी बेळगावातूनही होत होती. बेळगावसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी रेटण्यासाठी २० फेब्रुवारी, १९५३ रोजी बेळगावात बैठक घेण्यात आली. अन् त्यातून महाराष्ट्र एकीकरण समितीची स्थापना झाली. म. ए. समितीचे पहिले अध्यक्ष होते बा. रं. सुंठणकर, तर सचिव डॉ. मो. शा. कोवाडकर यांची निवड झाली.

**फाजल अली कमिशन**

भाषावार प्रांतरचनेची वाढती मागणी लक्षात घेऊन केंद्र सरकारने डिसेंबर १९५३मध्ये न्यायमूर्ती फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय कमिशनची स्थापना केली. त्यात पंडित हृदयनाथ कुंजरू व सरदार के. एन. पन्नीकर यांचा समावेश होता. हेच ते फाजल अली कमिशन. देशभरात दौरे करून जनमत आजमावणे व त्याचा अहवाल केंद्र सरकारला देणे हे या कमिशनचे काम होते. त्यानुसार कमिशनने २० जून, १९५४ रोजी बेळगावात येऊन सर्व पक्ष व संघटनांची मते जाणून घेतली. त्याच दिवशी बेळगाव नगरपालिकेनेही नगराध्यक्ष एन. पी. साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत बेळगावसह मराठीबहुल भाग महाराष्ट्रात विलीन करा, असा ठराव संमत केला. नगरपालिकेच्या ३६ पैकी २८ सदस्यांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले. तरीही फाजल अली कमिशनने सीमा भागातील मराठी भाषिकांचा अपेक्षाभंग केला. कमिशनने १० ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रावर अन्याय करणारा अहवाल प्रसिद्ध केला. विदर्भ वगळून महाराष्ट्र व गुजरातचे द्विभाषिक राज्य करून, मुंबई राजधानी करावी. गुजरात राज्य, विदर्भासह महाराष्ट्र राज्य व मुंबई वेगळी करावी. तसेच बेळगावसह कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह सीमाभाग तत्कालीन म्हैसूर राज्याला द्यावा, अशा त्यातील प्रमुख शिफारशी होत्या. अर्थात या शिफारशी मराठी माणसाला मान्य होणे निव्वळ अशक्य होते.

**सीमाभाग मुंबईपासून तोडला**

कमिशनच्या अहवालाविरोधात महाराष्ट्रासह सीमाभागात संतापाची लाट उसळली. बेळगावातील मराठी भाषिकांनी युनियन जिमखान्यावर ४० हजार लोकांची सभा घेऊन एक लाख, २६ हजार लोकांच्या सह्यांचे निवेदन तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना पाठवून अहवाल मागे घेण्याची मागणी केली. अहवालाला विरोध करण्याबरोबरच मुंबई, बेळगाव, कारवार, बिदरसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी मुंबईतील गिरणी कामगारांनी २१ नोव्हेंबर, १९५५ रोजी संप पुकारला. गिरणगावातून सुमारे पाच लाख लोकांचा मोर्चा निघाला. विधानभवनासमोर या मोर्चावर लाठीमार करण्यात आला. त्यानंतर



झालेल्या गोळीबारात १०५जण हुतात्मा झाले. तरीही पंतप्रधान नेहरूंनी १६ जानेवारी, १९५६ रोजी फाजल अली कमिशनच्या शिफारशी लागू केल्या. त्यानुसार विदर्भासह महाराष्ट्र, गुजरात व मुंबई अशी तीन केंद्रशासित राज्ये बनविण्यात आली. तर बेळगावसह कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह सीमाभाग मुंबई प्रांतातून तोडून म्हैसूर राज्याला जोडण्यात आला.

#### पहिले आंदोलन

केंद्र सरकारच्या निर्णयाचे तीव्र पडसाद बेळगावात उमटले. त्याच दिवशी म. ए. समितीने तातडीची बैठक घेऊन या अन्यायाविरुद्ध १७ जानेवारी १९५६ रोजी सीमाभागात कडकडीत बंद पाळण्याचा निर्णय घेतला. त्या दिवशी सकाळपासूनच संतप्त मराठी भाषिक रस्त्यावर उतरले होते. त्यांना आवरणे कठीण झाले होते. त्या वेळी हा भाग मुंबई प्रांतात होता अन् मुख्यमंत्री होते मोरारजी देसाई. आंदोलकांचा आक्रमक विरोध पाहून पोलिसांनी गोळीबार सुरू केला. त्यात पहिले हुतात्मा झाले कंग्राळीचे पैलवान मारुती बेन्नाळकर. त्यानंतर महादेव बारागडी, मधू बांदेकर, लक्ष्मण गावडे यांनाही हौतात्म्य प्राप्त झाले. निपाणीत कमळाबाई मोहिते यांनी देह ठेवला. या आंदोलनात आणखी काहींनी प्राण गमावले. अनेकांना अपंगत्व आले. हजारोंना लाठ्या खाव्या लागल्या. या दिवसाची आठवण म्हणून दरवर्षी १७ जानेवारी हा दिवस सीमाभागात हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात येतो. या दिवशी सर्वत्र सीमाभागात कडकडीत हरताळ पाळला जातो.

#### काळा दिन

बेळगावातील आंदोलनानंतर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ तीव्र होऊ लागली. महाराष्ट्रावर झालेल्या अन्यायाविरोधात दाद मागण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीने सत्याग्रहाचे हत्यार उपसले. त्यानुसार ९ मार्च, १९५६ रोजी जयंतराव टिळकांच्या नेतृत्वाखाली बेळगावात सत्याग्रह करण्यात आला. १ नोव्हेंबर, १९५६ रोजी स्वतंत्र म्हैसूर राज्याची निर्मिती करण्यात आली. बेळगावसह कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह सीमाभागातील ८६५ खेडी म्हैसूर राज्यात डांबण्यात आली. हा दिवस सीमाभागातील मराठी लोकांच्या आयुष्यातील काळाकुट्ट दिवस होता. तेव्हापासून सीमाभागात दरवर्षी हा दिवस काळा दिन म्हणून पाळण्यात येतो.

#### सत्याग्रह पर्व

राज्य पुनर्रचना आयोगाच्या अन्यायकारक शिफारशींना विरोध करण्यासाठी एस. एम. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र एकीकरण समिती कार्यरत होती. त्यात कॉ.  डांगे, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, उद्धवराव पाटील आदींचा समावेश होता. तर शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर- शेख व गवाणकर यांची कलापथके जनजागृती करत होती. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र जागृत केल्याने १९५७च्या निवडणुकीत काँग्रेसला दारुण पराभव पत्करावा लागला. त्यातच पंतप्रधान नेहरू ३० नोव्हेंबर, १९५७ रोजी प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी येणार होते. त्या वेळी समितीने वाईत त्यांना काळे झेंडे दाखवून संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणा दिल्या. १ नोव्हेंबर, १९५८ रोजी सत्याग्रहाचे दुसरे पर्व सुरू झाले. भाई माधवराव बागल यांनी बेळगावात सत्याग्रह केला. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी कारवारमध्ये आंदोलन केले. त्यांना अनुक्रमे मंगळूर व कारवारच्या तुरुंगात टाकण्यात आले. या सत्याग्रहात सुमारे ११ हजार लोकांनी तुरुंगवास भोगला. समितीने १७ डिसेंबर, १९५८ रोजी दिल्लीत हजारो कार्यकर्त्यांसह मोर्चा काढून केंद्र सरकारचे या प्रश्नाकडे लक्ष वेधले.



### साराबंदीचा लढा

म. ए. समितीने १ जानेवारी, १९५९ रोजी ८० टक्क्यांपेक्षा अधिक मराठी भाषिक असलेल्या सीमाभागातील १०५ गावांमध्ये साराबंदी लढा जाहीर केला. या लढ्याचे नेतृत्व कॉ. विष्णुपंत चितळे व भाई दाजीबा देसाई यांनी केले. यासाठी २१ मार्च, १९५९ रोजी शिनोळीत सभा घेऊन लढ्याची रूपरेषा समजावून देण्यात आली. ३१ मार्चनंतर पोलिसी कारवाईला सुरवात झाली. डिसेंबरनंतर ही कारवाई तीव्र झाली. शेतसारा न भरणाऱ्यांवर जप्ती वॉरन्ट बजावण्यात आले. जप्तीवेळी जनतेने प्रतिकार करताच लाठीमार अन् गोळीबार करण्यात आला. शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त करून त्यांना तुरुंगात डांबण्यात आले.

### मैना गावाकडेच राहिली

बेळगावात सुरू झालेला साराबंदी लढा संपूर्ण महाराष्ट्रात पेटण्याची शक्यता होती. त्यातच काँग्रेसचे सर्व निवडणुकांत पतन होत होते. १९६२ची निवडणूक जवळ आल्याने केंद्र सरकारने नरमाई स्वीकारली. मुंबई, विदर्भासह महाराष्ट्र राज्य तर अहमदाबाद राजधानी असलेले गुजरात राज्य निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार १ मे, १९६० रोजी मराठी माणसांचे महाराष्ट्र राज्य उदयास आले; पण बेळगावसह कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह सीमाभागातील ८६५ खेडी म्हैसूर राज्यातच अडकली. या दुःखातून शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी 'माझी मैना गावाकडे राहिली...' ही अजरामर छक्कड लिहून सीमावासीयांच्या नेमक्या भावना व्यक्त केल्या. महाराष्ट्राची निर्मिती झाली तरी सीमाभागातील मराठी माणूस डगमगला नाही. हा लढा असाच तीव्र स्वरूपात पुढे नेण्याचा निर्धार करण्यात आला.

### सेनापती बापटांचे आंदोलन

मुंबईत २० मे, १९६६ रोजी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक होणार होती. त्यासाठी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी येणार होत्या. या बैठकीवेळी आंदोलन करण्याचा निर्णय म. ए. समितीने घेतला. धडक मोर्चा व उपोषण असे त्याचे स्वरूप होते. समिती नेते बा. रं. सुंठणकर, बळवंतराव सायनाक, पुंडलिकजी कातगडे आदींसह थोर स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट मुख्यमंत्री निवासस्थानासमोर होणाऱ्या उपोषणात सहभागी होणार होते. तर काँग्रेसची बैठक असलेल्या ठिकाणी मोर्चाने जाऊन निवेदन देण्याची योजना होती; पण पोलिसांनी हा मोर्चा अडवून बेदम लाठीमार केला. मोर्चेकऱ्यांना अटक करून नंतर सोडून देण्यात आले. बॅ. नाथ पै यांनी आंदोलनाची माहिती पंतप्रधान गांधी यांना दिली. याची दखल घेऊन पंतप्रधान गांधी यांनी सीमाप्रश्न सोडविण्यासाठी एकसदस्यीय आयोगाची नेमणूक केली. ही माहिती मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी सेनापती बापट व इतर आंदोलकांना दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

### महाजन आयोगाची स्थापना

केंद्र सरकारने २५ ऑक्टोबर, १९६६ रोजी एकसदस्यीय आयोग नेमण्याचा निर्णय जाहीर केला. तर १५ नोव्हेंबर रोजी न्यायमूर्ती मेहरचंद महाजन यांची आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती झाली. न्या. महाजन यांनी वर्षभरात सीमाभागाचा दौरा करून २७ ऑक्टोबर, १९६७ रोजी आपला अहवाल सादर केला. याच अहवालाला महाजन आयोगाचा अहवाल म्हणतात. तामिळनाडू व आंध्रच्या सीमाप्रश्नात मध्यस्थी केलेले हरिभाऊ पाटसकर यांचा खेडे हा एक घटक ठरविण्याचा तोडगा महाराष्ट्रानेही सुचविला होता. तो महाजन आयोगाने जाहीररीत्या अमान्य केला. महाजन आयोगाने मराठी भाषिकांची व महाराष्ट्राची चेष्टाच केली. महाजनांनी आपल्याच तत्त्वांना हरताळ फासत व भाषावार प्रांतरचनेची मूलभूत तत्त्वे (पाटसकर सूत्र) पायदळी तुडवून मराठी भाषिकांवर अन्याय करत मनमानी अहवाल सादर केला. महाराष्ट्र विधानसभेत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा अहवाल फेटाळून लावला. केंद्र सरकारनेही तो स्वीकारला नाही. त्यामुळे या अहवालाच्या शिफारशी लागू झाल्या नाहीत. महाजन आयोगाच्या स्थापनेला कर्नाटकने विरोध केला होता; पण त्यांनाच झुकते माप मिळाले. त्यामुळे कर्नाटक सरकार महाजन आयोगाचे तुणतुणे आजही वाजवते.

### शिवसेनेचे आंदोलन

बाळासाहेब ठाकरे यांनी १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना करून सीमालढ्यात उतरण्याचे जाहीर केले. महाजन अहवाल फेटाळून सीमाप्रश्न लवकर सोडवावा या मागणीसाठी तत्कालीन उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांना भेटण्याचा निर्णय घेण्यात आला. ते ८ फेब्रुवारी, १९६९ रोजी मुंबईत येणार होते; पण त्यांनी शिवसैनिकांचे निवेदन स्वीकारण्यासह त्यांना भेटण्यासही नकार दिला. त्या वेळी शिवसैनिकांनी त्यांची मोटार अडविण्याचा प्रयत्न केला; पण आंदोलकांवर मोटार चालवून ते निघून गेले. पोलिसांनी लाठीमार करून आंदोलकांना अटक केल्याने मुंबईत जनक्षोभ उसळला. संतप्त शिवसैनिक रस्त्यावर उतरले. त्यांच्यावर पोलिसांनी केलेल्या बेछूट गोळीबारात ६७ शिवसैनिक हुतात्मा झाले, तर अनेकजण जखमी झाले. बाळासाहेब ठाकरेंसह अन्य नेत्यांना अटक करण्यात आली. या आंदोलनातील हुतात्म्यांची आठवण म्हणून सीमाभागात ८ फेब्रुवारी हा दिवसही हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो.

#### कन्नडसक्तीचा वरवंटा

म्हैसूरचे नामकरण १९७१पासून कर्नाटक असे झाले. सीमाप्रश्नासाठी आंदोलन सुरू असतानाच इकडे सीमाभागात आपली पाळेमुळे रोवण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकार करत होते. त्यासाठी कन्नडसक्तीचा आग्रह धरला जाऊ लागला. कार्यालयीन कामकाज व फलकांचे कानडीकरण करण्याचा प्रयत्न होताच सीमाभागात संतापाची लाट उसळली. याच्या निषेधार्थ बाबूराव ठाकूर व आमदार बळवंतराव सायनाक यांच्या नेतृत्वाखाली २२ जुलै, १९७३ रोजी मराठी भाषिकांनी मोर्चा काढला. या मोर्चावर पोलिसांनी केलेल्या लाठीमारात आमदार सायनाक यांच्यासह शेकडो कार्यकर्ते जखमी झाले. या लाठीमाराच्या निषेधार्थ २४ जुलै रोजी बेळगावात कडकडीत बंद पाळण्यात आला. सीमाप्रश्नी जागृती आणि देशाचे लक्ष वेधण्यासाठी समिती नेते दीपक दळवी यांच्या नेतृत्वाखाली बेळगाव ते मुंबई पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. हजारो सीमावासीयांनी त्यात सहभाग घेतला. १२ मार्च, १९८५ला सुरू झालेली ही पदयात्रा १ मे रोजी मुंबईत पोचली. शिवाजी पार्कवर पदयात्रेचे रूपांतर धरणे आंदोलनात झाले. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, बाळासाहेब ठाकरे आदींनी आंदोलकांना भेटून प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर मुख्यमंत्री पाटील यांनी सर्वपक्षीय शिष्टमंडळ नेऊन पंतप्रधान राजीव गांधी यांची भेट घेतली.

#### कन्नडसक्तीविरोधी उद्रेक

गोकाक अहवाल मान्य केल्याने राज्यातील सर्व शाळांमधून कन्नड शिकवणे कर्नाटक सरकारला अनिवार्य होते. त्यामुळे, मराठी माध्यमाच्या शाळांतूनही कन्नड विषय सक्तीने शिकविण्याचे धोरण सरकारने जाहीर केले. याविरोधात मराठी भाषिकांत संतापाची लाट उसळली. सीमाप्रश्न प्रलंबित असताना सीमाभागाचे कानडीकरण करण्याचा कर्नाटकचा डाव स्पष्ट झाला होता. चळवळ कमजोर करण्याचा सरकारचा मनसुबा लक्षात येताच भाषा धोरणाला विरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी महाराष्ट्रातील नेत्यांनी पुढाकार घेतला. कोल्हापुरात झालेल्या परिषदेत कन्नडसक्तीविरोधात आंदोलन छेडण्याचे ठरविण्यात आले. बाळासाहेब ठाकरे व एस. एम. जोशी यांच्या सूचनेनुसार शरद पवार यांनी १ जून, १९८६ रोजी गनिमी काव्याने राणी चन्नम्मा चौकात दाखल होऊन सत्याग्रहाला सुरवात केली. सीमाभागासह महाराष्ट्रातून लोक स्वयंस्फूर्तीने सत्याग्रहात दाखल होत होते. शिवसेना नेते छगन भुजबळ यांनी तर वेषांतर करून आंदोलनात भाग घेतला. बेळगावबंदी असूनही महाराष्ट्रातील नेत्यांनी बेळगावात येऊन सत्याग्रह यशस्वी केल्याने कर्नाटक सरकार खवळले. शरद पवारांसह अन्य नेत्यांना अटक करण्यात आली. त्यामुळे परिस्थिती स्फोटक बनली. लोक रस्त्यावर उतरून आंदोलन करू लागले. बंद पाळला गेला; पण पोलिसांनी आंदोलन मोडीत काढण्यासाठी आंदोलकांवर अमानुष गोळीबार केला. त्यात आठजणांना हौतात्म्य प्राप्त झाले. हा संघर्ष बराच काळ सुरू होता. सीमाप्रश्नाची तीव्रता दाखविण्यासाठी १९८८मध्ये मुंबईत पुन्हा एकदा ५०८ दिवसांचे विक्रमी धरणे आंदोलन करण्यात आले.




#### सर्वोच्च न्यायालयात धाव

७३वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन य. दि. फडके यांच्या अध्यक्षतेखाली बेळगावात भरले होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात शेवटचा पर्याय म्हणून महाराष्ट्र शासनाने सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात न्यावा, असा प्रस्ताव मांडला. प्रदीर्घ लढ्याला कुठेतरी न्याय मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाने म. ए. समिती नेते, सीमासत्याग्रही नेत्यांशी चर्चा करून २००४मध्ये सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला. भाषावार प्रांतरचनेमुळे महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांना समान वागणूक मिळायला हवी होती. तशी ती मिळालेली नाही. त्यामुळे, घटनेतल्या समानतेच्या तत्त्वाचा भंग झाला आहे. खेडे हा घटक, भाषिक बहुसंख्यता, भौगोलिक सलगता व लोकेच्छा या चार मूलभूत तत्त्वांच्या आधारे महाराष्ट्राने कर्नाटकातील ८६५ गावांवर हक्क सांगितला आहे. सीमाप्रश्न न्यायप्रविष्ट असला तरी म. ए. समितीने रस्त्यावरची लढाई कायम ठेवली आहे.

#### का रेंगाळला सीमाप्रश्न?

वरील घटनाक्रम पाहता सीमाभागातील मराठी माणसावर अन्याय झाला आहे आणि होत आहे, हे कुणीही मान्य करेल. कोणतीही ज्वलंत समस्या थंड होऊ दिल्यास ती आपोआप नामशेष होते, असे मानले जाते. सीमाप्रश्नाबाबत याच सूत्राचा आधार घेण्यात आला आहे, असे दिसून येते. सीमाप्रश्न न सुटण्यामागे काही कारणे आहेत. लोकभावनेचा




अनादर, केंद्र सरकारची अनास्था व वेळकाढूपणा, महाराष्ट्राची सहिष्णुता व सर्वपक्षीय एकीचा अभाव, कर्नाटकची सर्वपक्षीय एकजूट व अडेलतट्टू भूमिका, राष्ट्रीय पक्षांची सोयीस्कर भूमिका ही त्यातील प्रमुख मानता येतील. लोकशाहीत लोकभावना सर्वश्रेष्ठ असायला हवी; पण इथे लोकभावनेचा विचारच केलेला नाही. केंद्रातील काँग्रेस सरकारनेही कधी ठाम भूमिका घेतली नाही. महाराष्ट्राचे राजकीय अपयशही त्याला कारणीभूत आहे. केंद्रावर सर्वपक्षीय दबाव टाकून निकाल मिळवता आला असता; पण राज्यातील नेत्यांनी सीमाप्रश्नासाठी प्रतिष्ठा पणाला लावली नाही. राज्यांच्या सीमा निश्‍चित करणे हा विषय गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत येतो. राज्यातील यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, शिवराज पाटील, सुशीलकुमार शिंदे असे बडे नेते केंद्रात गृहमंत्री पदावर येऊन गेले; पण त्यांच्या कारकिर्दीतही सीमाप्रश्न सुटला नाही. राज्याची सहिष्णू वृत्ती, सुसंस्कृतता आडवी आली. केंद्राला तातडीने कार्यवाही करण्यास भाग पाडण्यात महाराष्ट्र सरकार आणि राजकीय पक्ष कमी पडले. शिवसेनेने सीमाप्रश्नावर सातत्याने आक्रमक भूमिका घेतली. राष्ट्रवादी काँग्रेसही सीमाप्रश्नाबाबत आग्रही असतो; पण काँग्रेस आणि भाजपाने नेहमीच बोटचेपे धोरण स्वीकारले. दुसरीकडे सीमाप्रश्नी कर्नाटकात सर्वपक्षीय एकजूट दिसून येते. सीमाप्रश्न म्हटला की राज्यातील सर्व पक्ष एकवटतात. तसेच कर्नाटकाने नेहमीच सीमाप्रश्नाबाबत अडेलतट्टू भूमिका घेतली आहे. सीमाप्रश्न संपला आहे, महाजन आयोग हीच अंतिम बाब आहे, अशी ओरड कर्नाटक सरकार नेहमी करते.

### दाव्यानंतर वाढली दडपशाही

महाराष्ट्राने सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केल्यानंतर कर्नाटकच्या पायाखालची वाळू सरकली आहे. न्यायालयात आपली बाजू बळकट करण्यासाठी धडपड सुरू आहे. त्यासाठी लोकशाही मूल्यांनाही तिलांजली दिली जात आहे. दडपशाहीचा वापर करून कानडीकरणाचा वरवंटा फिरवला जात आहे. सीमाभागातील मराठी भाषा व संस्कृती पुसण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यासाठी येळ्ळूरचे उदाहरण पुरेसे ठरावे. गावाच्या वेशीत कैक वर्षांपासून ‘महाराष्ट्र राज्य येळ्ळूर’ असा फलक दिमाखाने झळकत होता; पण क्रौर्याची परिसीमा गाठून, पोलिसी बळाचा वापर करून तो पाडण्यात आला. एवढ्यावरच न थांबता फलक पाडण्यास विरोध करणाऱ्या ग्रामस्थांना घराघरात घुसून अमानुष मारहाण करण्यात आली. लहान मुले, वृद्ध व गर्भवती महिलांनाही सोडले नाही. अनेकांवर खोटे गुन्हे नोंदवून तुरुंगात डांबण्यात आले. त्याशिवाय काळ्या दिनी निषेधाचे मोर्चे काढणाऱ्या तरुणांना तुरुंगात पाठवणे, त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करणे, भाषिक अल्पसंख्याकांना कायद्यानुसार मिळणारे हक्क डावलणे, मराठी तरुणांना नोकऱ्या मिळणार नाहीत अशी सोय करणे, कार्यालयीन कामकाज व फलकांचे कानडीकरण करणे, असे प्रकार गेल्या १५ वर्षांत वाढले आहेत. बेळगाववर आपला हक्क सांगण्यासाठी प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाही कर्नाटकने २००६पासून शहरात विधिमंडळाचे अधिवेशन भरविण्यात येत आहे. त्यासाठी ‘सुवर्णसौध’ नावाची विधिमंडळाची इमारत बांधून बेळगावला उपराजधानीचा दर्जा दिला आहे. कहर म्हणजे बेळगावचे मराठमोळे नाव बदलून ‘बेळगावी’ केले आहे. त्या अमानुषपणाला रोज तोंड देणं ही खायची गोष्ट नाही; पण महाराष्ट्रात जाण्याच्या प्रबळ इच्छेपोटी सीमाभागातील मराठी जनता हे अत्याचार सहन करत आहे.

### हवी महाराष्ट्राची साथ

सीमाप्रश्नाबाबत कोल्हापूर, सांगली, सोलापूर वगळता उर्वरित महाराष्ट्रात फारशी जागरूकता दिसत नाही. त्यामुळे कर्नाटकचे फावले आहे. त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात सीमाप्रश्नाबद्दल चळवळ उभी राहण्याची गरज आहे. सीमाभागासाठी इतकी वर्षे भांडल्यानंतर आता काय मिळणार, असा युक्तिवादही केला जातो; पण हा केवळ भूभागाचा प्रश्न नाही. तर भाषिक, सांस्कृतिक आणि नैतिक प्रश्न आहे. सीमाभागाअभावी संयुक्त महाराष्ट्र अपुरा आहे. सीमाभाग महाराष्ट्रात येत नाही तोपर्यंत महाराष्ट्राचा नकाशा पूर्ण होणार नाही. आता हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात असला तरी रस्त्यावरची लढाई अटळ आहे. त्यासाठी सीमावासीयांना महाराष्ट्राची साथ हवी आहे. ही साथ बेळगावात येऊन देण्याची त्यांची अपेक्षा नाही. तर तुम्ही लढा, आम्ही पाठीशी आहोत, एवढे शब्दही पुरेसे आहेत. महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांनी त्यांचे सर्व मतभेद विसरून या प्रश्नावर एकत्र येण्याची गरज आहे. तरच कर्नाटकवर दबाव वाढून सीमावासीयांवरील अत्याचार कमी होतील. अन् सीमावासीयांचे सहा दशकांचे स्वप्न पूर्ण होईल.

★

**bluenawab@rediff.com**

# कैफियत संभाजीराजांची !

सदानंद कदम



होय, मी शिवपुत्र संभाजी. बखरकार आणि नाटककारांनी ज्याच्याकडं बोट दाखवलं, थोरातांची कमळा, सती गोदावरी, मोहित्यांची मंजुळा अशा अनेक कथांचा... खरं तर दंतकथांचा नायक ठरवलं तोच दुर्दैवी युवराज संभाजी! नाटककारांनी ज्याला रगेल आणि रंगेल ठरवलं तोच शिवपुत्र संभाजी. आज आपल्या कर्तृत्वाची जयगाथा सांगण्यासाठी भीमा-इंद्रायणीच्या पवित्र संगमावरून महाराष्ट्राच्या लोकभूमीत प्रकटत आहे. आबासाहेबांच्या स्मृतीला आणि मराठी मातीला आपल्या कर्तृत्वाचे अर्घ्य वाहण्यासाठी आज लोकगंगेत उतरत आहे.

मी आबासाहेबांचा लाडका शंभू. माँसाहेबांचा शंभूबाळ. काय सहन केलं नाही मी त्या बालवयात? सहनशीलता हेच ज्याचं रक्त होतं असा युवराज होतो मी; पण स्वार्थी आणि कपटी राजकारणानं माझी ही ओळख पुसून टाकली. अपार दु:ख दिलं. केवळ आबासाहेबांचं श्रींच्या राज्याचं स्वप्न साकार व्हावं यासाठीच नियतीच्या त्या दुर्दैवी चक्राचे आघात आम्ही संयमानं सहन केले. अगदी त्या कर्णासारखे. माझं उभं आयुष्य त्या सूर्यपुत्रासारखंच गेलं. आऊसाहेबांच्या मावळी बोलीत जेव्हा जेव्हा मी महाभारताची ती कथा ऐकत असे तेव्हा तेव्हा माझ्या बालमनाला कर्णाची ती एकच व्यक्तिरेखा साद घालत असे. तेव्हा काय माहीत की माझं सारं आयुष्यच त्या कर्णासारखंच जाणार होतं... उपेक्षेचं... मानभंगाचं.

एकाकी रुद्रासारखा या भूमीवर जन्म घेतलेला मी, अवघ्या दुसऱ्या वर्षीच मातृसुखाला पोरका झालो. आबासाहेबांच्या कर्तृत्वाची ऊब आणि आऊसाहेबांची माया अपार मिळत होती; पण मातृवियोगाचं दु:ख मला एकट्यालाच सहन करावं लागत होतं. सुखाचे वाटेकरी चहू दिशांनी येतात; पण दु:खाचा प्याला ज्याचा त्यालाच रिता करावा लागतो. येणाऱ्या नव्या दु:खाला सामावून घेण्यासाठी. हेच तर मला वयाच्या अवघ्या दुसऱ्या वर्षी दैवानं शिकवलं होतं. त्याच्यासारखा गुरू कुठून लाभणार? जन्माला येताना मी सगळं सोबत घेऊन आलो होतो, एकट्या दैवाशिवाय. गुरू कधीच शिष्यासोबत येत नाही, असं म्हणतात. म्हणूनच का त्या दैवानं मला आपलं बोट धरू दिलं नसेल? आपली उणीव मला भासू नये म्हणून का त्यानं दुर्दैवाला माझ्यासोबत पाठवलं होतं? माझं सारं आयुष्यच शिड फाटलेल्या नौकेसारखं भरकटणार होतं का? त्या वयात असे अनेक प्रश्न मस्तकात दौडत असायचे.

वयाच्या आठव्या वर्षी या बालशंभूला प्यादं म्हणून राजकारणाच्या पटावर आणलं गेलं. की नियतीकडून मी आयुष्यभर असाच वापरला जाणार होतो याचा तो पहिला धडा होता? ‘साक्षात काळ’ असं ज्याचं वर्णन करावं लागेल अशा औरंगजेबाच्या तावडीत आम्ही सापडलो. त्यासमयी केवळ आबासाहेबांचे शब्दच आधाराला होते. आई जगदंबेची कवड्यांची माळ सोबतीला होती. आऊसाहेबांची आठवण मनाला उभारी देत होती. म्हणूनच स्वराज्याचा हा छावा त्या पराक्रमी सिंहासोबत निसटू शकला. तो दिवसही गोकुळ अष्टमीचाच. ऐकलं होतं की याच दिवशी तो श्रीकृष्णही असाच निसटला होता कैदेतून. याच तिथीला. ती आठवण आली आणि माझे आबासाहेब मला त्या वसुदेवाचंच रूप वाटू लागले. आम्ही सुटलो. यमुनातीरी आलो. माझ्या सुरक्षिततेसाठी आबासाहेबांनी मला मथुरेत ठेवलं. त्या कृष्णाच्याच सान्निध्यात; पण हे सारं कळण्याचं माझं वय होतं का? माझी बालमिठी आबासाहेबांना सोडवत नव्हती; पण तरीही ते आम्हाला सोडून गेले. काय वाटलं असेल माझ्या मनाला तेव्हा? वाटायचं या मथुरेत तो श्रीकृष्ण कुठं खेळत असेल? कुठं बसत असेल? अनेक प्रश्न मनाच्या सरोवरात तरंग उठवायचे; पण ते विचारायचे कुणाला? जवळ ना आबासाहेब होते, ना आऊसाहेब. कृष्णाला सुदामा भेटला तसं इथंच आम्हाला कवी कलश भेटले. या सोबत्यानं अखेरच्या श्वासापर्यंत आम्हाला साथ दिली.

आम्ही स्वराज्यात परतलो. श्रींचं राज्य झपाट्यानं विस्तारत गेलं. आबासाहेबांनी अवघा मावळ बसत्याचा उठता केला. उठत्याचा दौडता केला आणि साऱ्या मावळमुलखावर भगवा फडकवला. त्यांच्या धवल कर्तृत्वापुढं देशोदेशीचे राजे नतमस्तक झाले. आबासाहेबांचा राज्याभिषेक झाला. आम्ही युवराज झालो. केवढा दिव्य सोहळा तो; पण याच दिवसापासून आमची उपेक्षा सुरू होणार होती, हे दैवाचं कटू सत्य आम्हाला कुठं माहीत होतं? आमचं युवराजपद सोयराबाईसाहेबांच्या डोळ्यांत खुपू लागलं. कारभारी भर घालू लागले. पदोपदी मानभंग सहन करणारं ते सतरा वर्षांचं पोर कुणाकडं दाद मागणार होतं? आबासाहेब तर सतत राजकारणात गुंतलेले. त्यांचा घोडा साऱ्या मुलखात दौडत होता. अशा वेळी आम्ही कुणाकडं मन मोकळं करणार होतो? आबासाहेबांच्या कर्तृत्वाच्या नौबती चहू दिशांना वाजत होत्या. अशा वेळी आमचं गाऱ्हाणं मांडून त्यांना तोशीस देणं आम्हाला पटत नव्हतं. निदान आमच्याकडून तसं घडणार नव्हतं. आमचं दु:ख आम्ही मनात साठवत राहिलो. आमच्या व्यथा काळजात साठवत राहिलो. दु:ख असं सांगून सरत नसतं. त्यासाठी दैवच पुरतं व्हावं लागतं. न्यून ते सरावं लागतं.

सत्तेच्या राजकारणात मोह शिरला की साम्राज्याचा डोलाराही कोसळू लागतो. तसाच स्वार्थी राजकारणाचा डाव रायगडी जमू लागला होता. आबासाहेब मुलखात तर आऊसाहेब पायथ्याला. याचा फायदा आमच्या कारभाऱ्यांनी उचलला. स्वार्थी राजकारणाच्या पटावर ते डाव टाकू लागले. आमचं आयुष्य प्यादं म्हणून वापरू लागले. कुणीही उठावं आणि कुणाशीही आमचं नाव जोडावं, असा खेळ सुरू झाला. त्यांच्या खेळाच्या पटावर आमच्या आयुष्याचा रथ हिंदोळू लागला. या युवराज संभाजीबद्दल मग अनेक वावड्या उठू लागल्या. उठवल्या जाऊ लागल्या. त्यांचा संभाजी मग नशेबाज ठरवला गेला. तो रात्रीअपरात्री गड उतरू लागला. कुणा नसलेल्या गोदावरीला भेटण्यासाठी. अशा अनेक दंतकथा मग आबासाहेबांच्या कानावर पडू लागल्या. घातल्या जाऊ लागल्या. आम्ही मात्र शांत राहिलो, ते केवळ श्रींच्या राज्याचा भार सदोदित शिरावर बाळगणाऱ्या आमच्या आबासाहेबांना हा घरचा त्रास नको म्हणूनच. नाहीतर असल्या वावड्या उठविणाऱ्या घरभेद्यांना निपटून काढायची ताकद या संभाजीच्या बाहूत खचितच होती; पण तरीही आम्ही गप्प बसलो ते आमच्या आबासाहेबांकडं बघूनच. आमच्या या मौनाचा अर्थ मात्र विपरीत लावला गेला. तो तसा लावला जाईल हे आमच्या स्वप्नातही आलं नव्हतं कधी; पण बखरकारांनी आपली पानं सजवलीच.

आम्ही दिलेरखानाच्या गोटात गेलो. उणापुऱ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यात एवढी एकच चूक आमच्या हातून घडली म्हणे; पण त्या वेळची आमची मन:स्थिती, आमच्या मनीचे डावपेच इतिहासानं कधी जाणून

घेतलेच नाहीत. या तरुण युवराजाचा दिल कधी कुणाला उमगलाच नाही. इतिहासही मौन बाळगून बसला. का? का? हा प्रश्न आम्ही अनेकदा नियतीला विचारला; पण आमच्या बाबतीत तिनं आमच्या जन्मापासूनच मौन धारण केलं होतं. आमच्या आजवरच्या कुठल्याच प्रश्नाचं उत्तर तिनं आम्हाला दिलं नव्हतं. आम्हाला ते मिळालं नव्हतं.

आमचे आबासाहेब गेले. तो प्रतापी सूर्य क्षितिजाआड गेला आणि मावळभूमीवर अंधारून आलं. या अंधारलेल्या भूमीला पुन्हा तेजाची शलाका दाखवण्यासाठी आम्ही सिद्ध झालो. आबासाहेब नुकतेच आम्हाला पन्हाळगडी भेटून गेले होते. त्यांच्या मनीचा राजकारणाचा डाव समजावून सांगून गेले होते. तीच भेट अखेरची ठरेल असं आम्हाला वाटलं नव्हतं. रायगडी त्यांचा काळ झाला; पण महाराणी म्हणविणाऱ्या सोयराबाईसाहेबांनी ना आम्हाला खबर दिली, ना कारभाऱ्यांनी तसा खलिता धाडला. आबासाहेबांचा लाडका शंभू त्यांच्या अखेरच्या क्षणी असा दूर राहिला. काय यातना झाल्या असतील तेव्हा आमच्या मनास? यावर कळस म्हणजे हेच करभारी आम्हास... म्हणजे स्वराज्याच्या या अभिषिक्त युवराजास कैद करण्यासाठी पन्हाळगडी आले. मग त्यांना आम्ही कोणता नजराणा द्यावयास हवा होता? तरीही आम्ही त्यांना माफ केलं. त्यांना पुन्हा नेमणुका दिल्या ते केवळ भविष्यावर नजर ठेवून. या घरच्या राजकारणापेक्षा आमची नजर दूरवर रेंगाळत होती. बुऱ्हाणपुरी आलेल्या औरंगजेबावर. आबासाहेबांची खबर ऐकून तो स्वराज्यावर दौडत आला होता. त्या क्षणी आबासाहेबांची खूप याद येत होती. त्यांच्या लाडक्या राजगडावर, मथुरेवरून आम्ही परतल्यावर ते आम्हाला म्हणाले होते, 'बाळ शंभू, आयुष्यात दोन गोष्टींवरील तुमची नजर तुम्ही कधी ढळू देऊ नका. एक मृत्यू आणि दुसरा औरंगजेब.' त्यांचे हे बोल आम्हाला सतत ऐकू येत होते. म्हणूनच आम्ही या कारभाऱ्यांना माफ केलं होतं; कारण त्यांच्यापेक्षा हे श्रींचं राज्य आम्हाला महत्त्वाचं होतं. ते राखणं गरजेचं होतं. त्यापायी आमच्यासारखे एकच काय अनेक संभाजी खर्ची पडले तरी आम्हाला त्याची पर्वा नव्हती.

पण, स्वार्थानं बरबटलेले हे जीव शत्रूपुत्रास मिळण्याचा घाट घालत आहेत, हे कानी पडताच आम्ही संतापलो. विवेकावर संतापानं मात केली आणि आम्ही त्यांना मृत्युदंडाची शिक्षा फर्मावली. केवळ ते शत्रूला मिळताहेत हे सिद्ध झालं म्हणूनच. याउपर कोणती किताबत आम्ही त्यांना द्यायला हवी होती? कोणता नजराणा बहाल करायला हवा होता? पण इथंही आम्हाला संतापी, उग्रप्रतापी ठरवलं गेलं. रागीट आणि अविवेकी ठरवलं गेलं. धन्य त्या लेखणीबहाद्दरांची आणि इतिहासाची, ज्यानं या शंभूला कधी समजूनच घेतलं नाही.

घरची माणसं फंदफितुरीत गुंतलेली. शत्रू तर असा उरावर येऊन थांबलेला. दैव तर आमच्यासोबत कधीच नव्हतं. अशा वेळी अवघ्या तेवीस वर्षांच्या आम्हाला कुणाचा आधार होता? कुणाचं पाठबळ होतं? काय करायला हवं होतं आम्ही? तेव्हा ना आबासाहेब होते, ना आऊसाहेब. तेव्हा अखेरपर्यंत आम्हाला साथ दिली ती सखीराज्ञी जयती येसूबाईंनी. अवघ्या सतरा वर्षांच्या त्या आबासाहेबांच्या लाडक्या सुनेनं. त्या आमच्या पाठीशी रायगडाच्या बेलाग कड्यासारख्या उभ्या राहिल्या. तितक्याच ताठपणानं. म्हणूनच ती नऊ वर्षं आम्ही दौडत राहिलो.

घरभेद्यांचं रान माजलेलं. बादशहा औरंगजेबानं वतनाची लालूच दाखवलेली. फंदफितुरी तर सततचीच. अशा वेळी या संभाजीच्या पाठीशी होती ती इथली रयत. त्या रयतेच्या बळावरच आमची झुंज सुरू होती. एकाच वेळी अनेक आघाड्यांवर आम्ही लढत होतो. आमच्या तलवारीचं पाणी चाखलेल्या त्या गोवेकर फिरंग्यांनी आमची नोंद केली ती 'युद्धप्रिय राजपुत्र' म्हणूनच. झोप नाही. विश्रांती नाही. उणीपुरी नऊ वर्षांची आमची कारकीर्द... तीही घोड्याच्या पाठीवरच काढलेली. रणांगणावरच घालवलेली; पण त्या सगळ्या दिवसांत प्रत्येक क्षणी एक जाणीव होती... अगदी प्रत्येक श्वासागणिक होती... स्वराज्याच्या रक्षणाची. आबासाहेबांच्या स्वप्नाची आणि या मावळ मुलखाच्या भाग्याची.

अखेर बादशहाच्या फंदफितुरीला यश आलं. नियतीच जोरावर होती म्हणायचं. दुसरं काय? आम्ही कैद झालो; पण अखेरच्या क्षणापर्यंत स्वराज्याशी बेईमान झालो नाही. हसत हसत मृत्यूला सामोरे गेलो. त्याला उराउरी भेटलो. अरे, मृत्यूला घाबरेल तो आबासाहेबांचा पुत्र कैसा? या मातीचा राजा कैसा? मृत्यू तर येणारच होता, नव्हे सामोरा आला होता; पण जाताना या मावळ भूमीला नवी दृष्टी देऊन जाणार होता.

औरंगजेबानं आमचा छळवाद मांडला. देहाची लक्तरं काढली. डोळ्यांत तापत्या सळया फिरवल्या; पण आम्ही डगमगलो नाही की खचलो नाही. इंद्रायणी-भीमेच्या त्या पवित्र संगमावर, शहाजी महाराजांच्या त्या तुळापुरी मृत्यूनं साक्षात आपलाच मृत्यू पाहिला. नियतीनं आपला अखेरचा श्वास घेतला. या पवित्र संगमावर आम्ही आत्मार्पण केलं यापरती या नश्वर देहाची सार्थकता काय असू शकणार होती? या एकाच बाबतीत आजही आमची मान अभिमानानं ताठ आहे; कारण... कारण आजवर या भूमीच्या कुठल्याच अभिषिक्त राजाला असा रक्ताभिषेक झाला नव्हता. मृत्यूचा असा नजराणा मिळाला नव्हता. या अभिषेकानंच तर आमच्या राजेपणाची सार्थकता झाली होती. या भूमीच्या सत्त्वासाठी आम्ही आमचं देहार्पण केलं होतं.

त्या अखेरच्या क्षणीही एकच विचार आमच्या मनी तरळत होता. एकच स्वप्न डोळे काढलेल्या त्या नजरेसमोरून सरकत होतं. हे स्वराज्य आबासाहेबांचं... श्रींचं आणि मावळ मुलखाचं. ते विस्तारत चाललंय. त्याला साम्राज्याचं रूप आलंय. ही मराठ्यांची ध्वजा अखंड फडकत राहिलीय. कुणीतरी दिल्लीपर्यंत गेलंय. ते असुरी तख्त फोडलंय. तिथल्या लाल किल्ल्यावर मावळ मुलखाचा भगवा फडकवतंय. याच... केवळ याच स्वप्नासाठी स्वराज्याच्या त्या महायज्ञात आम्ही आमच्या देहाची समिधा अर्पण केली. या भूमीचा अभिषिक्त राजा म्हणून. या यज्ञाचा यज्ञवेदी म्हणून; पण इतिहासाच्या पटावर मात्र मोजक्या लेखणीबहाद्दरांनी आम्हाला नादान ठरवलं, आमच्यावर कल्पनेच्या कथा रचल्या. बेबंदशाही नाटकं रचली.

आबासाहेब, आज आपल्याला स्मरून आम्ही आमची जयगाथा सांगतो आहोत, ते आम्हाला मोठेपणा मिळावा म्हणून नव्हे. 'शिवपुत्र' यापेक्षा दुसरा काय मोठेपणा असू शकतो? 'आपला पुत्र' यापेक्षा दुसरं कुठलं मोठं लेणं असू शकतं? आबासाहेब, हा संभाजी बेदरकार असेल, संतापीही असेल; पण स्वराज्यद्रोही कधीच नव्हता. म्यानातून उसळलेली

तलवार कधी त्यानं शत्रूचं रक्त चाखल्याशिवाय म्यान केली नाही की रणांगणात मातीला पाठ टेकली नाही, हे उगवत्या पिढीला कळावं म्हणूनच ज्ञानोबा-तुकोबांच्या या लाडक्या भीमा-इंद्रायणीच्या काठावरून आम्ही आज बोलत आहोत. मिळालीच त्यातून काही प्रेरणा तर उमलणारी नवी पिढी नियतीला सामोरी जाईल. संकटाचे दुर्गम डोंगर पार करत कर्तृत्वाची ध्वजा फडकवेल. केवळ याच अपेक्षेनं आम्ही आज आमची गाथा उलगडत आहोत. आज अवतरलो आहोत आम्ही या भीमा-इंद्रायणीच्या तीरावर. आमच्यासंबंधीच्या गैरसमजांना तिलांजली देण्यासाठी. आमच्या मनीची कैफियत अवघ्या मावळ मुलखासमोर मांडण्यासाठी. आम्ही मांडलेली ती कैफियत या मावळ मुलखानं ऐकली आबासाहेब. बेदरकार बखरकारांनी रचलेल्या भाकडकथांना याच मावळमुलखानं पायाखाली तुडवलेलं आज आम्ही पाहतो आहोत. 'शिवपुत्र संभाजी'चा डंका चहू मुलखांत घुमताना ऐकतो आहोत. आमची ही कैफियत इथल्या गडकोटांनी ऐकली आणि तटाबुरूजांनाही याद आली आम्ही दिलेल्या कडव्या झुंजीची. आमच्या पार्थ पराक्रमाची. आता सह्याद्रीच्या कडेकपारीतून एकच गर्जना ऐकू येते आबासाहेब...


देश धरमपर मिटनेवाला, शेर शिवा का छावा था।
महापराक्रमी परमप्रतापी, एकही शंभूराजा था।
एकही शंभूराजा था।

ती गर्जना आमच्या कानावर पडते आबासाहेब आणि आम्ही धन्य धन्य होतो. पुरंदरी जन्माला आल्याची सार्थकता अनुभवतो आणि आपला पुत्र असल्याचा अभिमानही. आता आमच्या समाधीसमोर लाखोंच्या संख्येनं मावळे जमतात. भीमा-इंद्रायणीच्या तीरावर, आमच्या नौबती झडतात. हे सारं आपल्यामुळं आबासाहेब. केवळ आपल्यामुळं. म्हणूनच आज इतक्या वर्षांनी आम्ही मोकळेपणानं बोललो आबासाहेब.

★

**kadamsadanand@gmail.com**


नवं कोरं




उतरत्या वयातही आत्मसन्मानाचं बी पेरणारा,
साहित्य अकादमी विजेते गुजराती लेखक
दिनकर जोषी यांनी सांगितलेला मूलमंत्र...

मूळ लेखक - दिनकर जोषी
अनुवाद - प्रतिभा काटीकर

पृष्ठसंख्या : १५२
किंमत : ₹१९५

Book Available




दैनंदिन जीवनातल्या छोट्याछोट्या
जीवनानुभवांचा रंगतदार कोलाज..

लेखक - सुप्रिया वकील

पृष्ठसंख्या : १५२
किंमत : ₹२२०

Book Available

## नवं कोरं




नकळत्या वयात फाशीचा दोरखंड हातात घेणारी जल्लाद चेतना मलिकची कल्पनारम्य गाथा... इतिहास, प्रणय आणि राजकीय परिस्थिती यांची गुंफण असलेली एक अत्यंत समन्वित कथा


मूळ लेखक - के.आर.मीरा
अनुवाद - रेश्मा कुलकर्णी-पाठारे

पृष्ठसंख्या : ५२८
किंमत : ₹५९५

### लेडी जल्लाद

Book Available

---




जपानच्या फुलपाखरासारख्या नाजूक मदाम, च्यो-च्योची आशानिराशेच्या हिंदोळ्यावर भिरभिरणारी हळवी अलवार कहाणी


मूळ लेखक - रेई किमुरा
अनुवाद - डॉ.शुचिता नांदापूरकर-फडके

पृष्ठसंख्या : १७८
किंमत : ₹२५०

### मदाम बटरफ्लाय

Book Available

---




धर्म आणि लौकिक जीवन यांच्यातील द्वंद्वाचं प्रभावी चित्रण करणारी कादंबरी

### न भां त म णी

लेखक - प्रा. शशिकांत कुगांवकर

पृष्ठसंख्या : ३१६
किंमत : ₹४२०

Book Available

---




तरुणाईची मानसिकता, मोकळ्या अवकाशातलं स्वातंत्र्य आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या आव्हानांचा सुरस मेळ असणारी बाबाराव मुसळे यांची नवी कादंबरी


लेखक - बाबाराव मुसळे

पृष्ठसंख्या : ३३६
किंमत : ₹४५०

### नो नॉट नेव्हर

Book Available

## नवं कोरं





भारतीय न्यायव्यवस्थेच्या अभेद्य भिंतीला पडलेल्या फटी
आणि इथल्या भोंगळ कारभाराची पोलखोल करणारे
अरुण शौरी यांचे स्फोटक अनुभवकथन...

मूळ लेखक - अरुण शौरी
अनुवाद - उदय भिडे

पृष्ठसंख्या : ३२४
किंमत : ₹४५०

### अनिताला जामीन मिळतो

Book Available





हजारोंच्या जीवनात आशेचे दीप उजळवणारे
दृष्टिहीन उद्योगपती डॉ.भावेश भाटिया
यांची जीवनगाथा...

शब्दांकन - डॉ. सचिन पाचोरकर
अनुवाद - सुप्रिया वकील

पृष्ठसंख्या : २६४
किंमत : ₹३२०

### रुक जाना नहीं...

Book Available





जगण्यामध्ये खराखुरा अर्थ भरणाऱ्या, पंडित भीमसेन जोशी,
व्यंकटेश माडगूळकर, डॉ. के.एच. संचेती
यांच्यासारख्या दिलदार माणसांचं जीवनभाष्य

लेखक - प्रज्ञा ओक

पृष्ठसंख्या : १३२
किंमत : ₹१९५

### बुकमार्क

Book Available




महागाईच्या मानवनिर्मित संकटाचं मानवनिर्मित निरसन...
महागाईचा चक्रव्यूह भेदण्याचा मूलमंत्र

लेखक - हिमसागर ठाकूर

पृष्ठसंख्या : २०४
किंमत : ₹२५०

### महागाई एक चक्रव्यूह

Book Available

# प्रवीण अक्कानवरूच्या तीन कविता

## भीती

या सुन्नाट दुपारीही
भरून राहतोय भीतीचा काळोख मनामनांत
माथ्यावरचा सूर्यकिरणांचा शिरोलंबही
भीतीच्या अभेद्य कातळावर आदळून
परततोय हिरमुसल्या दिशेने

चिडीचूप रस्त्यावरील एकाकी म्हाताऱ्याच्या
घशात अडकले आहेत शब्द
त्याच्या कुडीत उरलेल्या शेवटच्या क्षणांसारखेच

मनातल्या उद्‌गारांचा प्रतिध्वनी ऐकून
भांबावून बघतेय इकडेतिकडे
ती एरवीची अतिशूर, पदर खोचलेली बाईही

चावडीवरच्या गर्दीत ओसंडून वाहतेय अनोळखी शांतता
नुसतेच बघतायेत सगळे एकमेकांकडे कसनुशा डोळ्यांनी
पिकलेल्या भीतीचं ठिबक सिंचन वर्तमानाला पुरवत

आधी कोण बोलणार?
हा विषारी विडा पहिल्यांदा कोण उचलणार? कारण,

जो बोलेल त्याच्या मानेचे डोहाळे लागतील
मग सत्तेच्या अविरत सुऱ्याला
क्षणिक उकळलेलं त्याचं रक्त ओरपलं जाईल
त्याच्याच हाडांचे स्ट्रॉ वापरून
त्याच्या जिभेचेही लुसलुशीत कबाब
चवीने वाढले जातील गिधाडांच्या पंगतीत
त्याच्या आत्मभानाच्या खेळल्या जातील
अन् ठिकऱ्या नियमबद्ध अमानुषतेने


भीती आधीही वाटायची, भीती पुढेही वाटत राहिलच
पण आजच्या भीतीला रंग आहे, प्रसंगानुरूप बदलणारा
पोत काटेरी तर चण वैश्विक लाभली आहे तिला
या भीतीची कडवट चव रेंगाळत राहतेय नेणिवेच्या तळाशीही
अन् तिचा बर्फाळ स्पर्श उमटवतोय शहारा,
नव्या नव्या जन्मांच्या मुळाशीही

म्हणूनच,

मूर्तिमंत हिरवळीवर चढून राहिली आहेत काळीसावळी पुटं आताशा
नजरेत न मावणारं आभाळ झालंय छपराइतकं थिटं आताशा

उत्क्रांतीनेही कूस पालटून चालवला आहे प्रवास परतीचा,
शब्दांतला मानवी अंश मिटवण्याकडे
कालातीत मूल्यांचे यथोचित गर्वहरण करण्याकडे
वर्षानुवर्षे थोपवलेले सत्य नावाचे मिथक संपवण्याकडे
बोलवित्या धन्याच्या आदेशावरून, अगदी गप्प गप्प होण्याकडे





## दोन रेग्युलर...दोन इनकॉग्निटो

चार साइट्स उघडतो जन्मजात सवयीने
दोन रेग्युलर...दोन इनकॉग्निटो

रोबोट नसण्याचे देतो पुरावे मग
नेहमीच्याच निर्विकार यांत्रिकपणे

सज्ञान असण्याचाही करतो सोपस्कार पूर्ण
मूर्तिमंत बालिश अधीरतेने

हा अनंताचा प्रवास की शून्यातून शून्याकडे
फुटत नाहीत आताशा तात्त्विक निवडुंग मनाला

बारमाही वाहत्या जगात शोधू पाहतो
'मी' भरतीलायक वाटेन असा एखादा खुर्द-बुद्रुक समुद्र

स्क्रोल करता करता गवसत जातो; परंतु
प्रत्येक तळाशी नवा नवा मुळारंभ

भोगतो अघोरी दमछाक संगती लावताना
भरगच्च क्लाउड्स अन् माझ्या रित्या अवकाशाची करणी केल्या

तर्जनीने तरीही
धुंडाळतच राहतो मोक्षाचं महाद्वार

हसतो, रडतो, चिडतो, भांडतोही,
स्रवतो मग अमानुष सहजतेने
विझतो पुन्हा पुन्हा
अकाली...

निरर्थकतेच्या राखेतून दर दिवशी उभा राहतो
कसनुसा फिनिक्स होऊन

आणि...

चार साइट्स उघडतो जन्मजात सवयीने
दोन रेग्युलर...दोन इनकॉग्निटो...

# सोशल मीडिया आणि 'मी'

मी फेसबुकवर विचारी
ट्विटरवर आक्रमक
इन्स्टावर देखणा
आणि टिंडरवर रंगेल आहे...
अस्तित्वाची समयोचित शकलं करून
जागोजागी पेरली आहेत मी, व्यवस्थित
माध्यमांत विरघळलेल्या समाजाच्या
मागणी-पुरवठा तत्त्वावर

व्हॉट्स ॲपवरच्या थोतांडाचं वजन वाढवतो कधी कधी
मनोहारी दंतकथेवर हुबेहूब सत्यान्वेषाचा
बेमालूम मुलामा चढवून
किंवा
जीव तोडून करतो प्रतिवादही
मला न आवडणाऱ्या असत्याचा

पब्लिक मेमरीसारखी
कापरागत उडून  जाणारी स्नॅपचॅटवरची तथ्ये
चाळवतात माझ्यातलं ॲनिमल इन्स्टिंक्ट वरचेवर
अन् शब्दांचे भाले खुपसत
रक्तबंबाळ करणारे ट्रोलर्सचे जत्थे
भासतात मला एका नाळेने जोडल्यागत आपलेसे
किमान अर्ध्या वेळा तरी

मी लिहितो, मी भेकतो
मी मिरवतो, मी रेकतो
दर वेळी अधीर, बहुतेकदा बधिर
बोचणारं खोटं बोलतो,
सुखावणारं खोटं ऐकतो,
गहिवरतो, चिडतो, रडतो
दातखीळ बसून, मुठी आवळून
स्क्रीनवरती उडत राहतो, उडत राहतो

मुसक्या आवळून असंख्य रात्री कोंडल्याचा
नसलेला भूतकाळ स्मरत
कंदिलातून बाहेर पडल्यासारखा
उगाचच खणत जातोय
विनाकारण खणतच राहतोय


अलबत, मी आजन्म ग्राहक आहे इथला
पण मी आहे उत्पादक, होलसेलर अन् रिटेलरही
धारणांच्या झुलत्या काट्यानुसार
अल्गोरिदमच्या अतिमानवी रेट्यानुसार
बहरहाल,
मीच तर साला उत्पादन आहे
या तंत्रोद्धारीत अनाकलनीय सांस्कृतिक संकराचं,
एक-शून्याने मूर्तरूप दिलेल्या एकदिशीय अपरिहार्यतेचं
वर्तमानातच धूसर भासणाऱ्या या 'समकाल'नामक आख्यायिकेचं

– प्रवीण अक्कानवरू
**psa1888@gmail.com**



## नवं कोरं

बलात्काराच्या चुकीच्या आरोपाखाली भरडल्या गेलेल्या रॉन विल्यमसनच्या दफनविधीनंतर आलेल्या श्रद्धांजलीपर लेखानं जॉन ग्रिशॅमचं त्याकडे लक्ष वेधलं आणि एका निरपराध बळीची ही सत्यकथा त्यातल्या खऱ्याखुऱ्या पात्रांसह आकाराला आली.




### द इनोसंट मॅन

मूळ लेखक - जॉन ग्रिशॅम
अनुवाद - संजय गडकरी

पृष्ठसंख्या : ३९२
किंमत : ₹५००

**TBC 29 - 4** Book Available

मेजर सूझन टर्नरच्या आवाजानं मोहित होऊन जॅक रीचर व्हर्जिनियाला पोहचतो, पण तोवर ती तिथून गायब झालेली असते. आणि एक चमत्कारिक घटनाक्रम सुरू होतो. ली चाइल्डनी साकारलेली जॅक रीचरची वेगवान, रहस्यमय साहसकथा..




### नेव्हर गो बॅक

मूळ लेखक - ली चाइल्ड
अनुवाद - बाळ भागवत

पृष्ठसंख्या : ४२४
किंमत : ₹५५०

**TBC 29 - 5** Book Available

धूर्तपणे रचलेलं कथानक आणि रेशमी शैलीत वाचकांना गुंगवणाऱ्या मास्टर एन्टरटेनर जेफ्री आर्चर यांच्या उत्कंठावर्धक कथा...



### अ क्विव्हर फुल ऑफ ॲरोज


मूळ लेखक - जेफ्री आर्चर
अनुवाद - लीना सोहोनी

पृष्ठसंख्या : १९२
किंमत : ₹२५०

**TBC 29 - 6** Book Available

धूर्तपणे रचलेलं कथानक आणि रेशमी शैलीत वाचकांना गुंगवणाऱ्या मास्टर एन्टरटेनर जेफ्री आर्चर यांच्या उत्कंठावर्धक कथा...

### अ ट्विस्ट इन द टेल



मूळ लेखक - जेफ्री आर्चर
अनुवाद - लीना सोहोनी

पृष्ठसंख्या : २२४
किंमत : ₹३००

**TBC 30 - 1** Book Available

अशक्यप्राय कामगिरी पार पाडणाऱ्या साहसवीरांची रोमांचकारी युद्धकथा...





### व्हेअर ईगल्स डेअर

मूळ लेखक - ॲलिस्टर मॅक्लीन
अनुवाद - माधव कर्वे

पृष्ठसंख्या : २६०
किंमत : ₹३५०

**TBC 30 - 2** Book Available

जगाच्या उत्पत्तीचे सत्य उलगडू पाहणाऱ्या कर्षच्या हत्येभोवती फिरणारी रहस्यमय, थरारक कादंबरी...





### ओरिजिन

मूळ लेखक - डॅन ब्राऊन
अनुवाद - मोहन गोखले

पृष्ठसंख्या : ६१२
किंमत : ₹७२०

**TBC 30 - 3** Book Available



कथा जिद्दीने भरलेल्या माणसांच्या, कथा इतिहासातल्या युद्धाच्या,
कथा नात्यांच्या, दुःखाच्या, संघर्षाने भारलेल्या जगण्याच्या...
कथा बंधनात पिचलेल्या बाईच्या... कथा मायेत अडकलेल्या आईच्या...
कथा तुमच्या-आमच्या सगळ्यांच्या....

छोट्या छोट्या गोष्टींच्या जुळवणुकीतूनच महान गोष्टी जन्माला येतात.

**– व्हिन्सेंट व्हॅन गॉग**



गोष्टी सहज घडत नाहीत, त्या घडवाव्या लागतात.

**– जॉन एफ. केनेडी**



कविता अशी बिलगून राहिली म्हणजे प्रचंड ओरबाडून टाकणारे दु:खताप हलके होत जातात. पुन्हा नव्यानं उभं राहण्याची, जगण्याची उमेद येत राहते.

**– ना. धों. महानोर**



# सरकारचं काही चुकतंय का?

प्रा. पुरुषोत्तम रामकृष्ण रामदासी



‘सरकारचं काही चुकतंय का?’ प्रश्न त्याच्या मनात येतोय; पण त्याला त्या प्रश्नाशी काही घेणं-देणं नाही. त्याचं खरं उत्तर शोधावं अशीही त्याची इच्छा नाही आणि पात्रता तर त्याहून नाही. इतर कुणाला विचारण्यात अर्थ नाहीये; कारण तो मोर्चात सामील आहे. मोर्चा सरकारच्या विरोधात आहे. म्हणजे तोही सरकारच्या विरोधातच आहे. याचा अर्थ निश्चितच सरकारचं चुकत आहे. तरीही प्रश्न दशांगुळं शिल्लक आहे. मोर्चा अथांग आहे. अथांग सागरासारखा. सागराशी कुणी पंगा घेत नाही हे तो जाणतो; कारण तसा पंगा म्हणजे बुडून मरणं आहे हेही तो जाणतो. तसंच आता आपल्याशी कुणी पंगा घेणार नाही; कारण आपण मोर्चात आहोत, मोर्चा नेत्यानं काढलाय. त्या अर्थानं तो नेत्याचा माणूस ठरतो. नेत्याच्या माणसाला कुणी बोट लावण्याची हिंमत करणार नाही; कारण मोर्चाची, नेत्याची शक्ती पाठीशी आहे. तो भाडोत्री असला तरी मोर्चाचा हिस्सा आहे, कुणी मारणार नाही. त्याच्या मनात, त्याच्या चालत असलेल्या पावलांसारखेच विचारही चालत आहेत. त्याला मरायचं नाही. त्याला जगायचंय. जगायचंय स्वतःला, जगवायचंय स्वतःच्या बायकोला आणि छकुलीलासुद्धा. भले ते जगणं लोकांच्या नजरेत कुत्र्यासारखं असेल; पण कुत्राही त्याच्या कुवतीनुसार कुठंतरी हाड चघळत छोटं छोटं सुखं भोगतोच की! तो फक्त माणूस नाही आणि मोर्चेकरी माणूस आहे! हाड आणि मोर्चा... एवढाच तर फरक!

ठरावीक घोषणा तो देत आहे. ‘रद्द करा, रद्द करा, नवीन कायदा रद्द करा.’ कंठशोष करीत तो ओरडतोय. कंठशोष करावाच लागतो. त्यासाठीच तर पाचशे रुपये मिळणार आहेत. मोर्चाला माणसं पुरवणारा दलाल भेटला होता. तो नेत्याचा खास माणूस, नेत्याचा उजवा हात आहे आणि नेत्याचा डावा हात व्हायचीही त्याची तयारी आहे. त्याचा गळा जाड सोनसाखळीनं आणि हाताची बोटं सोन्याच्या अंगठ्यांनी सजलीत. तो रंगानं सावळा असला तरी धिप्पाड आहे. तो नेहमी कपाळावर उभं कुंकू लावतो. त्यानं लाल ऐवजी काळं गंध लावलं तर तो डाकू वाटेल, असं वस्तीतला मंग्या गमतीत म्हणतो. दलाल, पांढरेशुभ्र परीटघडीचे कपडे घालतो. त्यामुळं तो देवाचा भक्त वाटतो; पण सगळ्यांना, अगदी पोलिसांनाही माहीत आहे की तो देवाचा नाही तर नेत्याचा भक्त आहे. नेत्याच्या आशीर्वादानं तो अनेक जोडधंदे करतो. मोर्चा किंवा सभा असली की तो येतो. तसा तो दोनेक दिवसांपूर्वी झोपडपट्टीत येऊन गेला. त्याला माहिती मिळाली की मोर्चा आहे. सामील झालं तर दरडोई पाचशे रोकडा मिळेल; पण मोठमाठ्यानं घोषणा दिल्या पाहिजेत, कंठशोष केला पाहिजे तरच रोकडा मिळणार आहे.

झोपडपट्टीतील लोकांनी नावं नोंदवली. घोषणा पाठ केल्या. तो आपल्या बायकोला म्हणाला, ‘‘...चंद्यासंगत त्याची शालूपण येतीय, तूही चल मोर्चात. दोघांचे मिळून एक हजार रुपये मिळतील. चार दिवस साजरे होतील.’’ पण, तिच्या अंगावर दूध पिणारी छकुली होती. तिची नजर धारदार झाली. ती खसकन म्हणाली त्याला, ‘‘शालू चंद्याची रांड हाय आन् मी तुझी बायको. चार बुकं शिकलास तरीबी अक्कल नाय तुला आन् काय रे, दूधपित्या छकुलीला कुठं टाकू?’’ तो निमूट झाला. चार बुकं शिकलो ती चूकच झाली. बया उद्धार करती जाता येता. शाळा अर्धवट सोडल्याचा त्याला पुन्हा एकदा पश्चात्ताप झाला; पण पश्चात्तापाची धार बोथट झाली आहे; कारण वस्तीतला सुरेश पंधरा यत्ता शिकला; पण त्याला हवा तसा रोजगार मिळत नाही. तो दारू प्यायला की गल्लीत राडा घालतो. दुनियेला शिव्या घालतो. काय उपेग शाळा पूर्ण शिकल्याचा! तरीही बायकोचं खसकणं ऐकून तो घुम्मणढुसका बनला.

पुन्हा घोषणा घुमतायत... ‘रद्द करा, रद्द करा. नवीन कायदा रद्द करा,’ तो घोषणा देतोय. बेंबीच्या देठापासून ओरडतोय. त्याला कायदा कशाबद्दल आहे याची माहिती नाही; कारण कायदा अवघड आहे, कायदा सामान्यांना कळणारा नाही, जनतेला नाडणारा आहे, हा कायदा सरकारची मनमानी आहे... नेत्याच्या भाषणात त्यानं सगळं ऐकलंय; पण त्याला कायदा कळलेला नाही. ‘कसला कायदा आहे?’ शेजारून चालणाऱ्या माणसाला तो विचारतोय. शेजारी खांदे उडवतो; कारण त्यालाही माहीत नाही. शिवाय त्याच्या हातात बॅनर आहे. उंच काठीला पुठ्ठा आहे, पुठ्ठ्यावर लिहिलंय, ‘थाडानी होई मालामाल, जनता होई भुके कंगाल।’ अनेक बॅनर आहेत मोर्चात. धरणारे हात अवघडलेत; पण बॅनर उंच राहिला पाहिजे. जनतेला बॅनर दिसला पाहिजे. जनतेच्या भल्यासाठी नेता उन्हातान्हात मोर्चा काढतोय, स्वतःच्या जिवाची पर्वा करत नाही, पोलिसांना भीत नाही, वेळप्रसंगी लाठ्या खातो, जनतेच्या भल्यासाठी कष्ट घेतोय... हे सगळं जनतेला दिसलं पाहिजे. नेत्यासाठी जनता माय-बाप आहे, निवडणुकीच्या काळात जनताजनार्दन, सर्वस्व आहे नेत्यासाठी. म्हणून जनतेला नेत्याचे कष्ट दिसले पाहिजेत. त्यासाठी बॅनर उंच धरला पाहिजे. पाचशे रुपयांचा सवाल आहे. दुसरा रोजगार उपलब्ध नाही. हाच एक मार्ग आहे, पाचशे रुपयांत दोनेक दिवस पोट भरणार आहे.

घोषणा घुमत आहेत. तो चालत आहे. आतापावेतो अर्धाच रस्ता कटलाय. अर्धाअधिक रस्ता बाकी आहे. अजून जिल्हाधिकारी कचेरी बरीच लांब आहे. त्याचे पाय भरून आलेत. काल त्याच्या बायकोनं घरात होता-नव्हता तेवढा दाणागोटा वापरून वेळ भागवली. आता पोट रिकामं आहे. मोर्चा सुरू होताना नेत्यानं एकेक वडापाव आणि पाण्याची पिटुकली बाटली वाटली म्हणे; पण तो तिथं पोहोचेपर्यंत सगळं संपलं होतं. तो हळहळत मोर्चात सामील झाला; पण आता त्याला भूक लागलीय. तरीही तो घोषणा देतोय. कंठशोष करतोय. पायामध्ये येणारे गोळे विसरू पाहतोय. पाचशे रुपये मिळणार आहेत. त्या पाचशे रुपयांतून ‘उद्या भागणाऱ्या भुकेसाठी’ आताची भूक मारली पाहिजे. भूक भागणार आहे ही आशा चिरंजीव आहे, म्हणून चालायला पाहिजे, घोषणा द्यायला पाहिजे आणि तसंही भूक मारणं काही नवीन नाही. सवय आहे. भुकेलाही माहितीय... गरिबाचं पोट आहे. थोडा वेळ कावकाव करायची आणि मरून जायचं. तरीही गरिबांच्या भुकेसाठी कायदा रद्द झाला पाहिजे. रद्द करा, रद्द करा, नवीन कायदा रद्द करा... घोषणा चालू आहेत.

मोर्चासोबत कडेनं पोलीस फौजफाटा चालत आहे. हातातील लाठ्याकाठ्या सज्ज आहेत. फट् म्हणता ब्रह्महत्या होऊ शकते. डोकी फुटू शकतात. पळापळ, चेंगराचेंगरी होऊ शकते. फौजफाटा सज्ज आहे. त्यांचेही हात सळसळताहेत. त्यांच्यासाठी रोजचाच मामला आहे, त्यांची लाठी दहशतीचं प्रतीक आहे... प्रतिकाला कायद्याचं बळ आहे. मोर्चा काढणारा नेता बिसलेरी पाण्याची बाटली पितोय. नुसताच हात वर करतोय. तो घोषणा देत नाहीये, फक्त नेतृत्व करतोय. सोबत चालणाऱ्या



वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याशी मधूनच बोलत आहे. सलगीचं हसू आहे. साहेबही जाणतोय... जनता भुलली तर कदाचित उद्या हाच सत्तेच्या खुर्चीत विराजमान होईल. चांगले संबंध राखण्यात शहाणपण आहे. सुमधुर संबंधातून सुवर्णमुद्रांची खुळखुळ वाजे! नेता सर्वज्ञ आहे, सगळं जाणतो. नवीन कायद्यामुळं होऊ शकणारे अन्याय त्याला आधीच उमजलेत. कायदा अजून लागू झालेला नाही; पण तो कायदा भयंकर असल्याचा त्याला साक्षात्कार झालाय. अशा कायद्यापासून आम जनतेचं रक्षण करणं त्याचं कर्तव्य आहे, अशी ठाम समजूत आहे. जनतेचा उद्धार मीच करीन असं त्याचं मत आहे. सरकारला वठणीवर आणायचं आहे. तो इरेला पेटलाय. हवा तेवढा पैसा ओतायला तयारेय. 'रद्द करा, रद्द करा... नवीन कायदा रद्द करा'. तो बेंबीच्या देठापासून घोषणा देतोय. त्याच्या घशाला तहानेची जाणीव होत आहे. घसा कोरडा पडलाय; पण पाचशे रुपये मिळणार आहेत. पाणी कधीही मिळेल; पाचशे रुपये पाण्यापेक्षा अधिक मोलाचे आहेत.

उन रणरणतंय. उन क्षणाक्षणानं उग्र होतंय. रस्त्याच्या कडेला असलेली, रस्तारुंदीकरणातून वाचलेली, मोजकी झाडं उन्हानं कोमेजलीत. पानं सुकलीत. सावली देण्याची कुवत संपलीय. गळून पडू पाहातायत. उन रणरणतंय. उग्र होतंय. तुटक्या रबरी चपला तापल्यात. चटके बसताहेत; पण उन्हापेक्षा कायदा अमलात येण्याचा दाह अधिक आहे आणि चटक्यांपेक्षा पाचशे रुपये मोलाचे आहेत. चटके जीव घेत नाहीत. रुपये जीवघेणे असतात. ते पाहिजेतच. रुपयांनीच पोटातील कावळ्यांची कावकाव थांबते. ते नसतील तर कावळे मरतात, कावकाव मरते. घोषणा घुमत आहेत. अवतीभवती वाहनांची गर्दी वाढतेय. लोकांना कामाला जायचंय. त्यांची रोजीरोटी पक्की आहे. त्यांना पोहोचायचंय वेळेवर. सरकारी ऑफिस किंवा खासगी कंपनी... त्यांचे पगार निश्चित आहेत. आणि इतरही बरंच काही. भत्ते वगैरे. काहींची बायकोदेखील नोकरीत आहे. त्यांचं उत्पन्न डबल आहे. डबल इंजिनाची गाडी घाटात थकत नाही. त्यांना कायद्याशी काहीच देणं-घेणं नाही. येऊ घातलेल्या कायद्यामुळं त्यांचं काही वाकडं होणार की नाही, माहीत नाही. क्वचित ते चॅनेलवरच्या तज्ज्ञांच्या चर्चा ऐकत असतील-नसतील. पडद्यावर झळकणारे तज्ज्ञ बेंबीच्या देठापासून ओरडत आपलं सखोल ज्ञान दर्शकांवर फेकतात. डबल इन्कमवाले लोक चारेक मिनिटं ऐकतात किंवा चॅनेल बदलून स्वतःला मनोरंजनात बुडवतात. त्यांच्यासाठी मनोरंजनाचे असंख्य पर्याय आहेत. म्हणून ते नवीन कायदा विसरून जातात; कारण ते चौकटीत सुरक्षित आहेत. कदाचित सुखीसुद्धा! त्यांची छकुली सुखाच्या उबेत जगते. त्यांचा छकुला इंग्रजी शाळेत जातो. इंग्रजी बोलतो. त्याचं बोबडं इंग्रजी ते कौतुकानं ऐकतात. त्यांच्याकडे पाहुणे आले की ते छकुल्याला 'ट्विंकल ट्विंकल लिटिल स्टार' म्हणायला सांगतात. पाहुणे छकुल्याचं कौतुक करतात आणि पुख्खा झोडून जातात. त्यांना नवीन कायद्याचं सोयरसुतक नाहीये. तो घोषणा देतोय; पण त्याचं मन वेगळीकडं गुंतलंय.

मोर्चामुळं रहदारीचा लोचा झालाय. वाहनांचे हॉर्न कर्कश वाजताहेत. त्यांना कामावर पोहोचायचंय. वेगवेगळ्या वाहनांच्या हॉर्नचे आवाज एकमेकांत मिसळून जणू घोषणा बनत आहेत. 'बंद करा, बंद करा, मोर्चा काढणं बंद करा...' वाहनं घोषणा देतात का कधी... तो उगीचच क्षीण हसतोय. काही का असेना, आज पाचशे रुपये मिळणार आहेत. आज पुन्हा हातभट्टी प्यायला मिळणार आहे. जमलंच तर मिळेल पोटभर जेवायलाही. मटन महाग आहे. चिकनही हल्ली महागलंय. वस्तीतला मंग्या नशेमध्ये उच्चवर्णीयांना शिव्या देत सांगतो... यांच्यापायी वशाट महाग झालंय. त्याला अर्थ कळत नाही. कळला तरी तो मनावर घेत नाही; पण मटन-चिकन महागलंय हे वास्तव आहे. तरीही एक जागा त्याला माहितीय.

वस्तीच्या रोडवर रात्री रहदारी ओसरल्यावर चौकातील कॉर्नरला एक मावशी जर्मनची भगुली घिऊन बसती. धा रुपयात चिकन रस्सा आणि एक रोटी देती. ते खाता येईल. काळपट पाणीदार रश्शात कोंबडीचा एखादा तुकडा... आणि वातड रोटी; पण कावकाव मिटवायला चालतं तेही. चिकनच्या आठवणीनं त्याच्या कोरड्या तोंडात लाळ येतीय. पाणी नाही; पण लाळेनं तोंड ओलं होतंय. वाहनांचे आवाज वाढताहेत. काळा धूर सर्वत्र... नाकांत, तोंडात. सोबत धूळही; पण ठसका लागत नाही. सवय झाली आहे धुराची, धुळीची. गावगन्ना पुढाऱ्यांविषयी तो कृतज्ञ आहे. ते ऊठसूट मोर्चे काढतात, कधी पाचशे देतात तर कधी पाचशेसोबत वडापाव बी देतात. कार्यकर्त्यांना चिकन आणि एक चपटी मिळते. मोर्चा म्हणजे रोजगार आहे, मोर्चा म्हणजे पोटापाण्याची बेगमी आहे. तो घोषणा देतोय, 'रद्द करा, रद्द करा... नवीन कायदा रद्द करा.' लोकांच्या नजरेत कमालीचा वैताग दिसतोय. 'रद्द करा, रद्द करा, नवीन कायदा रद्द करा.' तो घोषणा देत आहे. लोकांच्या चिडण्याची पर्वा नाही कुणाला. तो घोषणा देतोय; पण त्याचा आवाज शिणलाय. मघाशी तोंडात आलेली लाळ संपून गेलीय. तो पुन्हा चिकनची, मटनाची आठवण काढतोय, काळपट रस्सा आठवतोय; पण आता लाळ सुटत नाहीये. बहुधा शरीरातील लाळ संपली आहे. तहान लागली आहे, तहान. पाणी हवंय, पाणी; पण मोर्चाला हवाय फक्त कंठशोष. हवाय मोठा आवाज. संभावित अन्यायाविरुद्ध न्याय मागण्यासाठी. त्याशिवाय सरकारचे कान उघडणार नाहीत. सरकारचे डोळे उघडणार नाहीत. मोर्चा काढून धडा

शिकवायचाय सरकारला!

चॅनेलचे प्रतिनिधी कडेकडेनं चालताहेत. त्यांना अशा सरळसोट मोर्चात इन्टरेस्ट नाही. काहीतरी घडलं तरच ब्रेकिंग न्यूज मिळेल. ब्रेकिंग न्यूज ही त्यांची भूक आहे, आशा आहे. त्याच आशेवर ते तग धरून वार्तांकन करताहेत. कडेच्या दुकानांमध्ये खरेदी करणारे लोक आहेत, ते त्यांच्या विश्वात दंगलेत. त्यांचं काही ना काही शॉपिंग चालू आहे. सेल लागलेत. अमुक इतक्या खरेदीवर तमुक डिस्काउंट मिळतोय. एकावर एक फ्री मिळतंय. शॉपिंग आनंदानं चालू आहे. जणू मोर्चा हे वेगळं जग आणि ही आनंदी, आपापल्या कोषात जगणारी माणसं या जगातील नाहीतच जणू! एकाच जगात दोन दोन जगं आहेत. दोन्ही जगांना एकमेकांशी काही घेणं-देणं नाही. त्याला कळत नाही... त्या जगातही माणसंच. आपणही माणूस. असं कसं! आणि का? सरकारचं काही चुकतंय का? प्रश्न पुन्हा उठत आहे; पण त्याला उत्तर माहीत नाही. उत्तर कुणी देत नाही. जे देतात ते कळत नाही. मुळात सरकार म्हणजे कोण हेच त्याला माहीत नाही.

सव्वीस जानेवारीला एकानं त्याला अडवून, तोंडासमोर माइकचं बोंडूक धरून विचारलं होतं, 'आज काय विशेष आहे?' तो म्हणाला, 'विशेष हेच की आजही मला रोजगार मिळाला नाही.' त्याच्या तोंडासमोर बोंडूक धरून त्यानं त्याला पुन्हा विचारलं होतं, 'देशाबाबत आज काय घडलं होतं?' तो क्षणभर बावचळला. मग म्हणाला, 'माझी बायको आज देशाचे कागदी झेंडे विकते, चार पैसे कमावू पाहते; पण पोलीस तिला हाकलतात... चकचकीत रस्त्यावरून थोर थोर नेत्यांच्या गाड्या सायरन वाजवत जाणार असतात म्हणे. त्यांना झेंड्याचा अभिमान आहे... त्यांच्या बापजाद्यांनी फार पूर्वी झेंडा खाली पडू नये म्हणून लाठ्याकाठ्या खाल्ल्यात म्हणे. त्याच पुण्याईवर ते खुर्चीत बसलेत. झेंडे हवेत; पण झेंडे विकणारे नकोयत रस्त्यावर!'

प्रश्न विचारणारा हसत दुसऱ्याकडं वळला होता. घोषणा चालू आहेत, त्याच्या घशाला अधिकच कोरड पडली आहे. नेतृत्व करणाऱ्यानं पहिली बाटली फेकून बिसलेरीची दुसरी बाटली घेतलीय. त्यानं फेकलेली बाटली त्याला उचलायची आहे. कदाचित त्या बाटलीत घोटभर पाणी असेल. त्या घोटानं घसा ओला होईल. त्यानं धडपड केली; पण पुढच्या लोकांनी बाटली पायाखाली तुडवली. जणू घोटभर पाण्याची त्याची आशा तुडवली. तो हताशपणे घोषणा देतोय. मोर्चामध्ये आता माणसं वाढली आहेत. अनुभवावरून तो जाणतो की वस्तीत राहणारी काही माणसं मोर्चामध्ये शेवटी शेवटी घुसतात आणि पैसे मिळवतात; पण तो तसा नाहीये. मोर्चा जिथून सुरू होणार असतो तिथून तो मोर्चात सामील होतो. तो बायकोचे शब्द मानतो. ती सांगते त्याला... 'तू खोटेपणा केलास तर आपल्या छकुलीला परिणाम भोगावे लागतील.' छकुलीवर त्याचा अपार जीव आहे. खोटेपणा करायचा नाही. छकुलीला काही भोगावं लागता कामा नये. घोषणा सुरू आहेत. रहदारी तुंबत आहे. लोकांच्या नजरेत राग आहे, तिरस्कार आहे... 'कसले मोर्चे काढतात +++ ...कामधंदे नाहीत साल्यांना...' लोकांच्या नजरेतून शब्द ऐकू येतायत. तो आता नुसताच तोंड हलवतोय. तोंडातून आवाज येत नाही. त्याची चलाखी शेजारच्याच्या लक्षात आलीय. 'घोषणा दे ना' तो खेकसतो त्याच्यावर! तो पुन्हा घोषणा देतो... 'रद्द करा... रद्द करा... नवीन कायदा रद्द करा.'

कचेरी जवळ आली आहे. घोषणांचा जोर वाढलाय. नेत्याला स्फुरण चढलंय. बिसलेरीची दुसरी बाटली पिऊन त्याचा घसा ओलावलाय. कचेरीच्या अलीकडं पोलिसांनी बॅरिकेड्स लावलेत. नेता ते तोडून पुढं जाऊ पाहतोय, त्याचे बगलबच्चे जीव खाऊन... 'दादा, तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है...' म्हणत त्याला प्रोत्साहन देतायत. गोंधळ वाढलाय. मोर्चासोबतचा फौजफाटा तयार आहे. ठिणगीचा अवकाश आहे. घोषणांचा भडिमार विस्कळीत झालाय. तो भांबावलाय. घोषणा देणं त्यानं थांबवलंय. गर्दी अनावर आहे आणि कुणीतरी चप्पल भिरकावलीय. ती मोठ्या साहेबाच्या तोंडावर आपटली तसा पोलिसांनी लाठीचार्ज सुरू केलाय. मोर्चातील काही कंटकांनी दगडफेक सुरू केली. चेंगराचेंगरी, पळापळ... तो स्वतःला वाचवू पाहतोय; पण तरीही तो तिथंच थांबणार आहे. प्रश्न आहे रुपयांचा, पाचशे रुपये घ्यायचेत दलालाकडून! रक्त आटवलंय घोषणा देऊन! रक्त आटवलंय कायदा रद्द करावा म्हणून! गोंधळ वाढलाय. पोलीस दिसेल त्याला बडवताहेत. तो हेलपाटला... पोलिसाच्या कक्षेत सापडला. पायावर, ढुंगणावर, हातावर सपासप लाठ्या... तो कळवळत पळू पाहतोय. एक लाठी बसली हातावर... जीव कळवळला त्याचा. हाड मोडलं बहुधा; पण थांबून चालणार नाही. पोलिसाला त्याच्या तुटलेल्या हाताची पर्वा नाही. कळवळत तो कडेला गेलाय.

पोलिसांची निळी व्हॅन तयार आहे... नेत्याला पोलिसांनी घेरलंय... बगलबच्च्यांसह तो घोषणा देत व्हॅनमध्ये चढलाय, मोर्चाचं वार्तांकन आता इन्टरेस्टिंग झालंय, कॅमेरे नेत्याला कॅच करतायत, नेता मनोमन खूष, मोर्चा काढायचा हेतू सफल झाला... ठणकणारा घायाळ हात धरत तो बाजूला जातोय. त्याची नजर दलालाला शोधतेय. पोलिसांचा लाठीचार्ज चालू आहे. मोर्चेकरी पळताहेत. चपला, बूट अस्ताव्यस्त पडल्यात. शोधक नजरेनं त्यानं पाहिलं. नेत्याबरोबर दलालही जाळीच्या गाडीत गेलाय. गाडी निघालीय. तो वेदनेनं कळवळतोय. बाकी मोर्चेकरी केव्हाच पळाले मार खाऊन. पोलिसांचं काम संपलंय. रहदारी पुन्हा अखंड वाहू लागलीय. चपला-बूट ढकलले गेलेत कडेला धुळीत. तो तिथंच बसलाय. धुळीत; चपला-बुटांमध्ये. अंग हुळहुळतंय लाठ्यांचे तडाखे खाऊन. लाठी खाल्लेला हात सुजलाय टम्म! वेदना अपार. तहान-भूक मरून गेलीय. शरीराचं ओझं उचलणंही अवघड झालंय. उर्वरित जग जसं होतं तसंच आहे आणि बहुधा तसंच राहणार आहे.

'भारत माझा देश आहे; पण मी देशाचा कुणी आहे का?' त्याच्या मनात नवा प्रश्न आलाय. त्याचं मन मरू घातलंय. तो रस्त्याच्या कडेला धुळीत आडवा झाला आहे. झोपडीत छकुलीची आई पाचशे रुपयांतून काय काय करता येईल याची स्वप्नं रंगवित बसली आहे.

★

**ramdasipr@gmail.com**

# भस्मासूर

शशिकांत काळे



प्रोफेसर ज्ञानेश बुद्धीसागर, वयाची साठी ओलांडलेले एक वनस्पतीशास्त्रज्ञ पलंगावर पडल्यापडल्या विचार करत होते. आजच त्यांना त्यांनी केलेल्या कृषीविषयक संशोधन आणि एकूणच दिलेल्या योगदानाबद्दल 'कृषिरत्न' पारितोषिक स्वीकारण्याबाबत भारत सरकारकडून विचारणा झाली होती. त्यांच्या प्रयोगशाळेत जेव्हा ते पत्र आलं, तेव्हापासून उत्साह संचारला होता; कारण तो सत्कार वैयक्तिकरीत्या जरी प्रो. बुद्धीसागरांना मिळणार होता, तरी त्या निमित्ताने सबंध संशोधन संस्थेचं नाव पुढे येणार होतं. 'त्या' संस्थेमध्ये काम करतो, प्रो. बुद्धीसागरांबरोबर काम करतो, हे अभिमानाने सांगता येणार होतं. असं भाग्य फारच थोड्याजणांना मिळत असतं. संगतीचा लाभ किंवा तोटा असतोच. महान शास्त्रज्ञ राजा रामण्णा ज्या यु.डी.सी.टी.मध्ये होते त्यांच्यावेळी त्या लॅबचा असिस्टंट होतो, हेपण सांगणारे आहेत.

ज्ञानेश बुद्धीसागर हे एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले. वडील सुशिक्षित आणि सधन शेतकरी होते, तेव्हा मुलानेपण शेतकीत उच्च शिक्षण घेऊन घरच्या शेतीत अधिक लक्ष घालावं, असं त्यांना स्वाभाविकपणे वाटे. त्यामुळे प्रथमपासूनच त्यांनी तसे प्रयत्नपण केले होते. सुदैवाने, हो! सुदैवच म्हणायला पाहिजे; कारण हल्लीच्या जगात पालकांची जरी खूप इच्छा असली तरी, मुलांना वेगळ्याच विषयाची गोडी असते आणि मग पालकांची किंवा मुलाची फरपट चालू होते. ज्ञानेशालापण त्या विषयाची आवड होती. त्यामुळे त्यानेपण शेतकी महाविद्यालयात प्रवेश घेतला. इथपर्यंत सगळं ठीक झालं. ज्ञानेशाने प्रथमपासूनच अभ्यासात चमक दाखवली. सर्व परीक्षांतून प्रथम येणाऱ्या ज्ञानेशने अभ्यासक्रम संपल्यावर मात्र घरी न परतता तेथेच राहून संशोधन करण्याचे ठरविले. त्याच्या प्रोफेसरांनीसुद्धा त्याच्या वडिलांकडे रदबदली केली. खरं म्हणजे ज्ञानेशनेसुद्धा पुढील शिक्षण / संशोधन सोडून घरच्या शेतीत लक्ष घालायलाच हवं होतं अशी तातडीची परिस्थितीपण नव्हती. त्याचा मोठा भाऊ घरची शेती सांभाळत होता. ज्ञानेश अधूनमधून गावाला जात असे. त्या वेळी तो भावाशी सल्लामसलत आणि विचारविनिमयपण करीत असे. त्याचा फायदापण घरच्या लोकांना होत होता. तरीसुद्धा ज्ञानेशने त्याचं संशोधन घरी राहूनच करावं असं त्याच्या आईने सुचवूनही पाहिलं; पण त्याला अपेक्षित असं संशोधन घरी करता येणं शक्य नाही, हे ज्ञानेशने तिला समजावून सांगितलं; कारण आधुनिक संशोधन म्हणजे दोन जातींचा संकर किंवा वेगवेगळ्या खतांची मिश्रणे, कलमबांधणी एवढंच मर्यादित नसतं. त्यासाठी अनेक उपकरणांची आवश्यकता असते. रासायनिक चाचण्यांसाठी प्रयोगशाळा उपलब्ध असावी लागते. योग्य वाढीसाठी नियंत्रित तापमान, आर्द्रता ठेवण्याची आवश्यकता असते. इतकं सगळं गावाला त्यांच्या घरी उपलब्ध होऊ शकलं नसतं; कारण काही उपकरणं वैयक्तिक पातळीवर खरेदी करणं शक्य नव्हतं. एवढंच नव्हे तर अगदी कितीही खर्च केला तरी ते शक्य झालं नसतं; कारण हल्ली संशोधन ही एकट्याची बाब राहिलेली नाही. ती एक सांघिक प्रक्रिया असते. तुमचे सहायक जर मनापासून काम करत असले तरच ते शक्य असतं. त्याशिवाय वेगवेगळी उपकरणं वापरणे व त्यांची निगा राखणारे तंत्रज्ञ यांचापण मोठा वाटा असतो.

आपला भारत देश जरी शेतीप्रधान असला तरी शेती उत्पन्नातील बराचसा भाग वेगवेगळ्या प्रकारे नाश पावत असतो, हे सत्य आहे. वेळीअवेळी पडणारा लहरी पाऊस, त्यामुळे कधी पिके कुजतात, तर कधी सुकतात. वेगवेगळ्या किडी, कीटक कधी पाने तर कधी दाणेच खाऊन टाकतात. उरलेल्या व साठवलेल्या धान्यावर पक्षी, उंदीर, घुशी ताव मारतात. हे सर्व थांबवायचं असेल तर पिकांनी तग धरून राहण्याची, प्रतिकार करण्याची शक्ती वाढवली पाहिजे. रोगप्रतिबंधक शक्ती वाढवायला पाहिजे, हे सर्वजण जाणून होतेच. सर्व कृषी केंद्रांतून वेगवेगळ्या रोगप्रतिबंधक जाती तयार होत होत्या; पण त्याबरोबरच नवीन रोगही तयार होत होते. कीटकनाशकांना दाद न देता सुखनैव वाढण्याची कलापण कीटक आत्मसात करत होते. ही एक न संपणारी लढाईच होती. मानव व कीटक यांच्या अस्तित्वाचाच लढा चालू होता. बुद्धिचातुर्याने मानवाला विजय मिळतो आहे असं वाटत असतानाच कीटक नवीन अस्त्रं घेऊन प्रतिकारास तयार होत होते. ते ज्ञान त्यांच्या नव्या पिढीमध्ये संक्रमित करीत होते.

निसर्गाने सजीवांमध्ये प्राणी व वनस्पती असे दोन वेगवेगळे गट तयार केलेले आहेत. त्यांच्या पुनरुत्पादनातही भेद आहेत. तसे पाहिले तर स्त्री-पुरुष किंवा नर-मादी हे भेद दोनही प्रकारांत आहेत. तरीपण निसर्गाने वनस्पतींना काही खास सवलती दिलेल्या आहेत. त्यापैकी त्यांचं बीज हे दीर्घ काळापर्यंत सुप्तावस्थेत राहू शकतं, ही सवलत होय. त्यामुळे त्यांचा प्रसार अनेक मार्गांनी म्हणजे हवा, पाणी, पशू, पक्ष्यांची विष्ठा किंवा त्यांच्या अंगावर चिकटूनही होऊ शकतो; पण सजीवांना त्यांचे गर्भ पोटातच तयार करावे लागतात किंवा अंडे या स्वरूपात ठेवावे लागतात. त्यामुळे त्यांच्या जीवित राहण्यावर कालमर्यादा पडते. अंडीसुद्धा शरीरातच तयार करावी लागत असल्याने संख्येवरपण मर्यादा पडते. त्याशिवाय काही वनस्पतींनी कलम ही पद्धत विकसित केलेली आहे. (खरं म्हणजे फक्त मानवानीच ती पद्धत विकसित केली आहे; कारण स्वत: वनस्पती किंवा प्राणी कलमे करू शकत नाहीत.) त्यासाठी नर-मादी भेदाची आवश्यकता नाही. त्यातही वड-पिंपळासारखे वृक्ष किंवा दुर्वांसारखे गवत तर बसल्याबसल्याच हात-पाय पसरतात. या सर्वांना एक कारण असावं, ते म्हणजे प्राणी वा कीटक. हे आपली जागा सोडून इतरत्र हिंडूफिरू शकत होते. याउलट वृक्ष वा वनस्पती या एकाच जागी जखडलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना नर-मादी निवडीचं स्वातंत्र्यच नव्हतं. त्यावरही उपाय म्हणून प्रजननासाठी आवश्यक असलेले नर-मादी हे दोनही प्रकार एकाच वनस्पतीने तयार करणे हा प्रकार त्यांनी अवलंबिला होता. तरीसुद्धा परागकणांसाठी त्यांना बाह्य मदतीची आवश्यकता भासेच. ते काम वारा किंवा सर्वसाधारण कीटक करीत. अर्थात त्यासाठी त्यांना थोडीबहुत मधाची लालूच दाखवावी लागे. हीच वनस्पतींची दुर्बलता होती आणि कीटक याचा पुरेपूर फायदा उठवत होते. जमेल तसे व जमेल तेव्हा ते त्याचा पुरेपूर फायदा उठवत होते. इतर प्राणीसुद्धा कमी नव्हते. ते त्यांचं भक्षण करीतच होते. सजीवांच्या उत्पत्तीपासूनच ही व्यवस्था अस्तित्वात आली होती. वनस्पतींनी सूर्यप्रकाश, माती आणि पाणी वापरून स्वत:चं अन्न स्वत:च तयार करायचं, वाढवायचं आणि इतर सजीवांनी त्यावर ताव मारायचा. मग तो साधा सरपटणारा सुरवंट असो वा महाकाय हत्ती वा पाणघोडा असो, भक्ष्य आणि भक्षक हीच वाटणी युगानुयुगे चालत आलेली आहे. निसर्गालासुद्धा त्यात बदल



करावासा का वाटला नाही, याचं उत्तर बहुदा डार्विन साहेबांनापण मिळालं नसावं.

निसर्गाने प्राणिमात्रांना मेंदू दिला. अगदी किडा-मुंगीपासून हत्ती, देवमाशापर्यंत सगळ्यांना दिला; पण वनस्पतींना मात्र त्यानी वंचित ठेवलं. प्राणिमात्रांनी त्याचा पुरेपूर फायदा उठविला आणि वनस्पतींवर राज्य केलं. स्वत:चं अन्न स्वत:ला तयार करता न येणं या कमतरतेमुळे प्राणी परभक्षी झाले. जलचर, भूचर किंवा उडणारे कोणीही असो, ते परभक्षीच झाले. काही शाकाहारी तर काही मांसाहारी, तर काही उभयआहारीपण. एकूण, प्राणी परभक्षीच झाले, तेव्हा भक्ष्य मिळवणे वा जीव वाचवणे यासाठी वेगवेगळ्या युक्त्यापण अवलंबिल्या जाऊ लागल्या. त्यांत आपले रंग, रूप किंवा चवही बदलणे हे प्रकार अवलंबिले जाऊ लागले. त्यामुळे त्यांनी बचावापेक्षा उत्पादन वाढवण्याचाच मार्ग स्वीकारला. त्यांनी वेगवेगळ्या प्रकारांनी कीटकांना आकर्षित करणारी पाने, फुले, गंध, चव वगैरे प्रकार विकसित केले. नाही म्हणायला काही वनस्पती मात्र आपले वेगळेपण दाखवत होत्या. म्हणजे त्यांच्यापैकी काही जाती जेव्हा इतर रोगजंतूंच्या वा कीटकांची शिकार होत होत्या, त्या वेळी त्यांच्यात प्रतिजैविके तयार होत होती. प्रो. बुद्धीसागरांनी याच गुणांवर लक्ष केंद्रित करायचं ठरवलं होतं. त्यांच्या संशोधनात तसं नवीन काहीच नव्हतं; कारण तशा अनेक जाती आतापर्यंत संशोधकांनी विकसित केलेल्या होत्याच; पण बुद्धीसागरांनी आपलं संशोधन खास करून तांदूळ व गहू यांसारख्या पिकांवर केंद्रित केलं होतं. मुख्य कारण म्हणजे ही दोनच धान्यं जगभर पिकवली जात होती आणि मानवाच्या आहारात त्या धान्यांचाच प्रमुख हिस्सा होता.

प्रो. बुद्धीसागरांनी विकसित केलेली भाताची पहिली जात 'बुद्धीसागर-१२' ही होती. त्या जातीचं वैशिष्ट्य म्हणजे त्यातील एका विशिष्ट जनुकामुळे पक्षी त्या भाताचे दाणे लगेच पचवू शकत नसत. परिणामी, त्यांची भूक मंदावे. कीटक जरी परागीकरण करीत असले तरी पक्षी मात्र तयार दाणेच खातात. त्यामुळे परागीकरणासाठी त्यांचा उपयोग नसतो. एवढंच नव्हे, तर खाता खाता अनेक दाणे जमिनीवर पडूनही नाश पावतात. त्यामुळे पिकांचं खूपच नुकसान होतं. पीक राखणीचं एक कामच होऊन बसतं. आता भूक मंदावल्यामुळे एकदा दाणे खाल्ले की ते दीर्घ काळ पिकांकडे परत फिरकत नसत. त्यामुळे पिकांचा नाशही कमी होई. जेव्हा बुद्धीसागर हे नवीन विकसित बियाणं घरी घेऊन आले तेव्हा भाऊपण खूष झाला होता; पण त्यांची आई मात्र नाराज होती. ती म्हणाली, ''अरे ज्ञानेश! देवाने ही सृष्टी सर्वांसाठी केली आहे. पक्ष्यांना कुठे शेती करता येते? म्हणून तर ते आपल्या शेतावर येतात. तो त्यांचा वाटा आहे, त्यांना तो घेऊ दे. त्यांची वीणही याच हंगामात होते. ती आपल्या पिल्लांना दूध पाजू शकत नाहीत. त्यांचा आहार म्हणजे हे दाणेच किंवा त्यावर पोसणाऱ्या आळ्याच नाही का? हेच त्यांचं व त्यांच्या पिल्लांचं अन्न आहे. त्यांचं अन्न तोडणारं हे कसलं रे तुझं संशोधन?''

त्यावर ज्ञानेश म्हणाला होता, ''आई! अगं, माणूस जगला तर सृष्टी जगवेल. या प्राण्यांकडे आहे का ती अक्कल? त्यांना फक्त पोटभर खायचं एवढंच माहीत आहे. अगं, काही किडे किंवा फुलपाखरं आपली चवच पक्ष्यांना आवडणार नाही असे करतात; तर काही घाणेरडा वास तयार करतात. अगं, काही वनस्पतीसुद्धा काटे धारण करतात त्याला कारण हेच आहे. शत्रूपासून बचाव करणे. आपण माणसे बघ, कोंबडी, कबुतरे मारून खातो; पण कावळे मारतो का? नाही नाऽ. तसंच आहे हे. मी या झाडांना स्वसंरक्षणाचं शस्त्र दिलं आहे. बाकी काही नाही आणि हे वाण फक्त आपल्याच शेतात लावणार आहोत. इतरांची शेते तशीच आहेत. शिवाय, पक्षी काय, इतर किडे किंवा फळेपण खातील की, तुला नको त्यांची काळजी.''

हळूहळू त्या वाणाचा प्रसार होत गेलाच. सुरुवातीला भीती वाटत होती की पक्ष्यांप्रमाणे माणसांची भूक मंदावेल. एका दृष्टीनी बरंच झालं असतं. अन्नधान्य वाचलं असतं; पण त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाचा उठाव कमी झाला असता; पण माणसांवर तसा विपरीत परिणाम दिसत नव्हता. अगदी वाटलंच तर शिजवण्यापूर्वी चिमूटभर मीठ जरी टाकलं

तरी काहीच दुष्परिणाम जाणवत नसत. खरं म्हणजे एका विशिष्ट तापमानाला त्या जनुकाचा परिणामच नष्ट होत असे; पण शेतकऱ्यांचा राखणीचा खर्च व मेहनत वाचली होती. उत्पादनात वाढ झाली होती. म्हणजे खर्च कमी आणि फायदा जास्त झाला होता. पक्षीगण आता शहाणे झाले होते. ते आता भाताची जात ओळखू लागले होते. त्यांची नवी पिढी ती शेते टाळू लागली होती.

थोड्याच दिवसांत 'बुद्धीसागर-१२' हे वाण प्रसिद्ध झालं. तांदळापाठोपाठ गव्हाचीपण तशीच जात विकसित करण्यात प्रो. बुद्धीसागरांना यश मिळालं होतं. परत एकदा त्यांच्या आईने तिची नाराजी व्यक्त केली होती.

"अरे ज्ञानेशाऽऽ, हे काय चालवलं आहेस तू? मागच्या वेळेला म्हणाला होतास की, हे वाण फक्त आपल्या शेतापुरतंच आहे म्हणून; पण आता तर ते सगळीकडे पसरलं आहे ना? अरे, दुसरं काहीतरी कर बाबा; पण बिचाऱ्या पक्ष्यांच्या तोंडचा घास नको काढून घेऊस. जग सगळ्यांचं आहे, देवानं हीच पद्धत घालून दिलेली आहे. त्यामागे काहीतरी योजना असणारच. त्यात ढवळाढवळ करू नकोस. या मुक्या पक्ष्यांचे शाप घेऊ नकोस."

पण, ज्ञानेशाला हे म्हणणं पटलं नव्हतं. त्याचं म्हणणं एकच, "काही वनस्पती एका विशिष्ट रोगापासून वा कीटकापासून आपला बचाव कसा करायचा हे विकसित करू शकतात. कीटक डी.डी.टी.सारख्या कीटकनाशकांना तोंड द्यायची किमया करू शकतात. ही विद्यापण त्यांना देवानीच दिली ना? दुर्दैवाने ही विद्या वनस्पतींकडे नाही. मी फक्त विद्या किंवा शक्ती त्यांना देतो आहे. यात माणसाचं कल्याण आहेच आणि वनस्पतींचंपण कल्याण आहेच."

"ते सगळं ठीक आहे रेऽ; पण अयोग्य किंवा अपात्र ठिकाणी केलेलं दान किंवा विद्या ही स्वनाशालाच कारणीभूत ठरू शकते. मी बापडी फार शिकलेली नाही; पण पुराणातील एक गोष्ट सांगते.

भगवान शंकरांना सर्वांगाला लावण्यासाठी चिताभस्म लागायचे. ते आणण्याची जबाबदारी त्यांनी एका भक्तगणावर सोपवली; पण काही कारणांमुळे एके दिवशी त्याला चिताभस्म मिळाले नाही आणि त्याने आपले ते रडगाणे शंकरांपुढे गायले. भगवान शंकर भोळेभाबडे; त्यांनी त्याचे हाल वाचावेत आणि आपल्यालासुद्धा वेळेवर भस्म मिळावे या स्वार्थी हेतूनी, मागचा-पुढचा विचार न करता "तू ज्याच्या डोक्यावर हात ठेवशील त्याचे लगेच भस्म होईल," असा वर दिला. अरे, अशी शक्ती मिळाल्यावर त्या शिवगणाचा असुरच झाला. त्याला लोक भस्मासुर म्हणू लागले आणि एके दिवशी तो भस्मासुर खुद्द शंकरांच्या डोक्यावरच हात ठेवायला निघाला. श्री विष्णूंनी नंतर मोहिनीचं रूप घेऊन त्या असुराचा नाश केला.

कुठल्याशा नाटकात ते पेंढारकर एक पद म्हणतात, 'एकाने दुसऱ्यास गिळावे, हाच जगाचा न्याय खरा।' म्हणून मी सांगते, अरे, जपून टाक पाऊल जरा. मी आणखी तरी काय सांगू!" असं म्हणून त्याची आई गप्प बसली.

आता धान्य उत्पादनात खूपच वाढ झाली होती, असं म्हणण्यापेक्षा धान्याची शेतातील नासाडी कमी झाली होती. दर एकरी जास्त उतारा मिळत होता, तरी गोदामात उंदीर, घुशी धान्ये फस्त करीतच होत्या. बुद्धीसागरांनी त्यावर उपाय शोधून काढला होता. परत तीच युक्ती. ते धान्य उंदीर, घुशींनी खाल्ल्यावर त्यांच्या पचनसंस्थेवर परिणाम होणार होता. त्यांचीपण भूक मंदावली होती. परिणामी, ते प्राणीपण गोदामांकडे कमी फिरकत होते. परत मिठाची प्रक्रिया केलेले दाणे मानवासाठी संपूर्णपणे सुरक्षित होते. किरकोळ विक्रीसाठी प्लास्टिकच्या पिशव्यांत भरण्याआधी त्यावर मिठाची प्रक्रिया केलेली असायचीच. त्यामुळे सामान्य जनतेला काहीच त्रास जाणवला नव्हता. या सर्व गोष्टींची दखल भारत सरकारने घेतली होती आणि म्हणूनच त्यांना 'कृषिरत्न' हा पुरस्कार प्रदान केला जाणार होता. त्यांची संमती विचारणे ही केवळ एक औपचारिक बाब होती.

योगायोगाने आजच त्यांच्याकडे संशोधनासाठी आणखी एक समस्या आलेली होती. कालानुरूप त्यांनी विकसित केलेल्या जातीमधील दाण्यांतील गुण हळूहळू खोडांतही संक्रमित झाला होता. त्या जातीचा कडबा खाणाऱ्या गुरांची भूकही मंदावली होती. परिणामी, कमी खाण्यामुळे त्या गुरांचे कुपोषण होत होते. शेतीसाठी वा दुभत्यासाठी असो, त्या चाऱ्यावर पोसलेली जनावरं अशक्त, कमजोर होत होती. पूर्वी शेतातला कडबा त्यांची गुरंच खाऊन संपवीत असत; पण आता तो कडबा त्यांची गुरं खात नव्हती. त्या कडब्याचं काय करायचं हेपण त्यांना कळत नव्हतं; कारण आजूबाजूलापण त्या कडब्यासाठी गिऱ्हाइक नव्हतं. एकीकडे कडबा गोठ्यात जागा अडवून बसला होता आणि दुसरीकडे त्यांना गुरांसाठी नवीन चारा विकत घ्यावा लागत होता. शेतकरी दोन्ही गोष्टींकडून हैराण होत होते. त्यांना नवीन कडब्याची जात हवी होती.

प्रो. बुद्धीसागरांनी इतरही रिपोर्ट्स चाळले होते. शेतावर येणारे पक्षीगण आता कमी झाले होते हे खरं. त्याचं आणखी एक कारण म्हणजे भूक मंदावल्याने कमी खाणं. त्यामुळे कुपोषण, अशक्तपणा, परिणामी, मोठ्या संख्येने पक्षीगण नाश पावले होते. त्यांची संख्याच रोडावली होती. कित्येकांनी स्थलांतर केलं होतं. आता खोडकिडे किंवा तत्सम किड्यांना मुक्त रान मिळालं होतं. त्या किड्यांचा प्रादुर्भाव वाढला होता. कीटकनाशकांवर त्या किड्यांनी विजय मिळवला होता आणि नैसर्गिक शत्रूपण उरला नव्हता.

निसर्गाच्या अन्नचक्रामध्ये पशू-पक्षी वनस्पतींवर जगत होते. प्रो. बुद्धीसागरांनी उत्साहाच्या भरात अजाणतेपणाने त्या साखळीतील एक कडीच नष्ट करायचा प्रयत्न केला होता. आता त्यांना त्यांच्या आईचे शब्द आठवले. त्यांनी एक भस्मासुर जन्माला घातला होता. त्याला वेळीच थांबवणं आवश्यक होतं. म्हणून बुद्धीसागरांनी झोपण्यापूर्वी निर्णय घेतला होता, ते कृषिरत्न पुरस्कार नाकारणार होते. एवढंच नव्हे, तर 'बुद्धीसागर-१२' या त्यांनीच विकसित केलेलं बियाणं बाजारातून परत घेऊन त्याच्या लागवडीवर बंदी घालण्याची शिफारस ते सरकारला करणार होते. कोणी मोहिनी येईल याची वाट न बघता त्यांनाच त्या भस्मासुराच्या नाशासाठी पावलं उचलायला हवी होती.

★

**svkale39@gmail.com**

# कमलची जिद्द!

एकनाथ आव्हाड



“आयं, आलीस व्हय कामावून..... कित्ती वेळ लावलास गं आज घरी यायला.....दिवाबत्तीची सांजची येळ झालीय. परशा तर सारखं कवापासून मला एकच गोष्ट इचारीत होता- ‘आय कधी येणार, आय कधी येणार’ म्हणून. कशीतरी काढली बाई मी त्याची समजूत; पण गुलाम ऐकतोय कसला. त्याची भुणभुण एकसारखी माझ्या मागं सुरूच”...आईनं घरात पाय टाकल्याबरोबर चिमुकल्या कमलची एकसारखी बडबड सुरू झाली. कमलला या दिवाळीत अकरावं सरून बारावं वरीस लागलं होतं; पण कमल वयापेक्षा जास्त समजूतदार होती. आईच्या कष्टांची तिला जाणीव होती. वडिलांचं छत्र हरवल्यावर आई दिवसभर रोजंदारीच्या कामाला जायची आणि कमल परशाला सांभाळून घरची सारी कामं उपसायची. परशा तिचा लहान भाऊ. आता पाचवं संपून त्याला नुकतंच सहावं वरीस लागलं होतं.

आईनं परशाला जवळ घेतलं. मायेनं त्याच्या तोंडावरून हात फिरवून त्याचा मुका घेतला. परशाची कळी खुलली. तो आईच्या कुशीत शिरला. कमलनं कामावरून दमून आलेल्या आईला तांब्याभर पाणी दिलं. मग परशाकडं बघत हसून म्हणाली, “हूं... तू जवळ घेताच गडी खुललाय बघ कसा! आता बोलंल चुरुचुरु.”

परशा पट्‌कन म्हणालाच, “आयं, आज काय झालं म्हाहीत हाय?”

कमल पट्‌कन त्याला थांबवत म्हणाली, “लागला लगेच मधीमधी बोलायला. अरे, जरा दमधीर धर की! ती आत्ताच आलीय ना. तिला घोटभर चहा घेऊ दे. मग निवांत सांग. सारी रात पडलीय.”

आई पट्‌कन म्हणाली, “कमे, काय झालं ते आधी पट्‌कन सांग बरं. अगं, चहाचं राहू दे बाजूला. आधी जे काय घडलंय ते सांग मुकाट. नको काही दडवून ठेवू. उगाच माझा जीव टांगनीला लागतो.”

कमल पट्‌कन आतून गरम चहा कप-बशीत आणून आईच्या हाती देत म्हणाली, “अगं, सांगते....सांगते. समदं सांगते. आधी हा गरम चहा तर घे. नाहीतर गार होऊन जाईल बघ. आन एवढी नको घायकुतीला येऊस. काय वाईट नाय घडलं एवढं घाबरायला.” आईला कमलचा हट्ट माहीत होता. आपण चहा पिल्याबगर ती आपल्याला काहीच सांगणार नाही. मग आईनं पट्‌कन कपातला चहा बशीत ओतला. आणि बशी ओठांजवळ नेऊन पटापटा चहाचे घोट घेतले. कमलनं तेवढ्यात आईनं आणलेल्या पिशवीतून मेथीची जुडी बाहेर काढली. मग ती जुडी पुढ्यात घेऊन मेथीची भाजी ती लागली खुडायला.

भाजी खुडताखुडताच ती आईला म्हणाली, “आज सगळा स्वयंपाक राहिलाय बघ.”

आईनं चकित होऊन विचारलं, “का बरं? या वक्ताला तर समदा स्वयंपाक होतो की तुझा. फकस्त भाकऱ्याच करायच्या राहत्यात.”

कमल हसून म्हणाली, “तुला तर बाई जराबी दम नाही. जाऊ दे. आता समदं सांगूनच टाकते. त्याशिवाय तुझाबी जीव शांत होणार नाही. आगं आयं, तू सकाळी रोजगार हमीच्या कामावर गेली होतीस ना, तवा घरी कोण आलं होतं ठाव हाय? अगं, आपल्या गावच्या झेड.पी.च्या साळंतले कांबळे गुरुजी घरी आले होते. आता तुला ठावंच हाय, घरच्या कामामुळं आणि परशाला सांभाळायचं असल्यामुळं मला साळंत जायला जमत नाय. अगं म्हणूनशान आज कांबळे गुरुजीच घरी आले. मला म्हणाले ‘कमल, पोरी, तुला चांगलं डोकं हाय. कायबी झालं तरी साळा चुकवू नकोस पोरी. रोज साळंत ये. अगं, तुझ्या भावाला पण साळंत आण. तुझ्या भावाचं नाव आपण पहिलीच्या वर्गात घालू.’ आयं, बा देवाघरी गेल्यानंतर घरच्या कामामुळं मला साळंत जाताच आलं न्हाय. माझी मधीच साळा हुकली म्हणून गुरुजी घरापर्यंत आले बघ. आयं, अगं कांबळे गुरुजी, आम्हा दोघांनाबी साळंत घेऊनच गेले. खरं सांगू का आयं, दिवसभर साळंत बसून, अभ्यास करून, कविता, गाणी म्हणून...आभाळाएवढा आनंद झाला बघ मला. परशाबी जाम खुश होता. साळंत दुपारच्या वक्ताला जेवायला गरमागरम खिचडीबी मिळाली. गुरुजींनी तर माझं खूप कौतुक केलं. त्यांच्या बोलानं माझा जीव हरखून गेलाय बघ. साळंत आज खूप नव्या नव्या गोष्टी करायला मिळाल्या. आयं, मला आता वाटतंय शिक्षणानं पंखात नवं बळ घेऊन उंच उडायचंय. तू घरची नगं काळजी करू; म्या समदं पाईन; पण आयं, आता म्या रोज साळंत जाईन. म्या आता ठरवलंय...अगदी मनाशी पक्कं. यापुढं रोज साळंत जायचं. मी साळा शिकीन. बुकं वाचीन. परशाला सांभाळून घरचं कामबी करीन; पण आता म्या रोज साळंत जाईन.”

पोरीचं बोलणं ऐकून आई विचारात पडली. कमलनं आईचा चेहरा बरोबर वाचला. ती म्हणाली, “तू नको आता विचारी की बिचारी होऊस. परशाचीबी नको बिलकूल काळजी करूस. मी हाय की सावलीसारखी त्याच्यासोबत. अगं, मी एक शिकले तर आपला परशाबी शिकंल. हळूहळू शिक्षणाचं मत्त्व त्याच्याबी डोक्यात बसंल. साळंमुळंच हा इस्वास म्या खरा करून दावीन. आयं, कामाच्या पगाराचा हिशोब नेहमी चुकतो ना तुझा. म्या आता तुलाबी वाचाय-लिवाय शिकवणार हाय. मग बघ कसा तू चटचट हिशोब करशील.”

पोरीचं बोलणं ऐकून आईला एकाएकी हसूच फुटलं. मग हसतच ती लेकीला म्हणाली, “अगं एडी का खुळी तू. माझं काय शिकायचं वय राहिलंय व्हय आता?”

कमल पट्‌कन आईची पुढची वाक्यं तोडत म्हणाली, “आयं, अगं शिकायला वयाचं कायबी नस्तंया; फकस्त शिकायची जिद्द असली पाहिजे. मी तर शिकून खूप मोठ्ठी होणार बघ...जिल्ह्याची कलेक्टरच. थोडी कळ काढ. माझं हे सपान मी खरं करून दावीन.” आईला पोरीचं कौतुक वाटलं. डोळे भरून ती पोरीकडं पाहत होती आणि जिवाचा कान करून तिचं बोलणं ऐकत होती.

कमल आईला पुढं म्हणाली, “ साळंत गुरुजी म्हणाले, ‘साळा हा माणसाचा तिसरा डोळा हाय.’ पण आयं, तुला खरं सांगू का, अगं, साळा आपल्यासाठी भाकरीचा गोळा हाय. पोटासाठी, घरासाठी तुझी वणवण ठावं हाय मला. एका घोटासाठीबी आराम न्हाय मिळत तुला; पण आयं, आता अडाणी राहून न्हाय चालायचं. साळंमुळंच म्या आपली गरिबी दूर सारीन.”

आता मात्र आईचे डोळे भरून आले. किती वेळ पातळ पापण्यांच्या आड दडवलेले तिचे अश्रू बाहेर पडले, तसा तिनं डोळ्याला पदर लावला. कमल लगेचच जागची उठून आईच्या जवळ गेली. आईला म्हणाली, “आयं, आता डोळ्याला पदूर कशापाई लावतियास? अगं, मला घरच्या कामाचा तरास न्हाई. मी, परशा आणि तू. आपण तिघंच

एकमेकांना आधार. तू दारचं काम बघ; मी घरचं काम बघीन. अगं, तुझीच लेक हाय मी. कष्टाला मागं न्हाई सरणार. खरंच, तू घरची नको काळजी करूस. डोळे पूस बघू आधी. आणि आता आल्या आल्या घरच्या कामाला नको बिलगूस. हाय तो चहा परत गरम करते. आणखी एकदा चहा घे. बरं वाटंल तुला. चहा लय लाडका हाय तुझा, माहीत हाय मला. मी साळंतून आल्यावर मोरीतली वल्ली कापडं सारी धुतलीय बघ. पाणीबी भरून ठिवलंय. आता ही बघ तुझ्याशी बोलता बोलता मेथीची जुडीबी खुडून झालीय. आता मस्तपैकी मेथीची भाजी करते. भाकऱ्या तेवढ्या शिकव मला. मग सांजच्याचा सारा स्वैपाक मीच करत जाईन.''

आई तिच्या डोक्यावरून मायेनं हात फिरवत म्हणाली,''व्हय गं माझ्या पोरी. लय गुणाची हायस तू. मी तुझी आय हाय; पण मला आता वाटतंय तूच माझी आय झालीयस.''

इतका वेळ माय-लेकीचं बोलणं ऐकत बसलेला परशा आईला म्हणाला, ''आयं, भूक लागलीय मला. साळंत मोकार अभ्यास केलाय म्या.''

कमल हसून पट्कन म्हणाली,''मोकार अभ्यास म्हणं...लबाडा.... परशा, चल, तुला चहा-बटर देते. चहा-बटर खा आणि मी पाटीवर लिवून दावलेली 'क'ची बाराखडी वाचायला घे. मग उद्या तुझ्या सरोदेबाईंना घडाघडा वाचून दाखीव. ऐकशील ना ताईचं?''

परशानं जोरात होकारार्थी मान हलवली. आई मात्र डोळ्यांत मुलीचं कौतुक साठवत होती.

★

eknathavhad23gmail.com

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'खळाळता अवखळ झरा आणि इतर कथा' या आगामी बालकथासंग्रहातून)**



## नवं कोरं





शांघायच्या उपवर मुली 'पर्ल आणि मे'ला जुगारी बाप डावावर लावतो. सक्तीच्या लग्नामुळे चीनमधून अमेरिकेची वाट पकडताना दोघींची आयुष्यं आव्हानांनी भरून जातात. या स्थलांतरात कधी असूयेची धार तर कधी प्रेमाचा वर्षाव अनुभवत दोघींना जीवन उद्ध्वस्त करणारं गुपित सांभाळावं लागतं. तरी या विलक्षण कादंबरीतल्या शांघायच्या मुली आपली मुळं अखंड जोपासतात.

### शांघायच्या मुली

मूळ लेखक - लिसा सी  पृष्ठसंख्या : ४०४
अनुवाद - सुनंदा अमरापूरकर  किंमत : ₹ ४९५

---





हिंदुस्थानातील अठराव्या शतकाचा काळ. म्हैसूरच्या राजाच्या छत्रछायेत वाढलेल्या आणि हिंदुस्थानाविषयी कमालीचा जिव्हाळा असणाऱ्या उमा ब्रुकला एका ब्रिटिश कॅप्टनशी विवाह करावा लागतो आणि एका नाट्याची सुरुवात होते.
एका ऐतिहासिक पैंजणाचा रहस्यमय प्रवास आणि हळुवार फुलत जाणारं रोमांचक प्रेम यांची अलवार गुंफण असलेली विलक्षण प्रेमकथा..

### द म्यूट ॲंक्लिट

लेखक : राधिका नाथन  पृष्ठसंख्या : ३१२
अनुवाद : माधुरी परांजपे  किंमत : ₹ ४००

Book Available

---




स्थलांतरात होरपळलेला सुरंजन, नियतीच्या तालावर चालत राहणारी किरणमयी, बलात्काराचं जहर पचवणारी माया आणि फिनिक्स भरारी घेणारी करारी जुलेखा या चार पात्रांची गोष्ट सांगता सांगता उलगडत जाणारा एका अराजकाचा पट.. मूलतत्त्ववादाच्या फेऱ्यात अडकलेल्या स्थलांतरितांचं दुःख मांडणाऱ्या, तसलिमा नासरिन यांच्या जगप्रसिद्ध 'लज्जा' कादंबरीचा उत्तरार्ध..

### बेशरम

लेखक : तसलिमा नासरिन  पृष्ठसंख्या : २५२
अनुवाद : मंजिरी धामणकर  किंमत : ₹ ३५०

Book Available

---




चीन म्हणजे १३ कोटी स्थलांतरित कामगारांचं वसतिस्थान. त्यातले सगळेच तिशीच्या आतले. अशाच भविष्याची स्वप्नं घेऊन तोंगकुआनला आलेल्या दोन बहिणींची ही गोष्ट. स्वस्त चिनी मालाच्या निर्मितीसाठी होणाऱ्या कामगारांच्या शोषणाचा भयावह चेहरा उघड करणारी सत्यकथा.

### फॅक्टरी गर्ल्स

लेखक : लेस्ली टी छांग  पृष्ठसंख्या : ३९६
अनुवाद : गौरी देशपांडे  किंमत : ₹ ४९५

Book Available

# ज्यू बांधवांची सुटका

**मूळ लेखक : गिडिअन राफ**
**इंग्रजीमधून मराठीमध्ये**
**स्वैर अनुवाद : मीना जगदीश साठे**



**'ऑपरेशन ब्रदर्स'' कथेचा तपशील – ज्यू बांधवांची सुटका**

'ज्यू बांधवांची सुटका' ही कथा 'ऑपरेशन ब्रदर्स' या इंग्लिश कथेचा स्वैर अनुवाद आहे. 'ऑपरेशन ब्रदर्स' या कथेचे लेखक 'गिडिअन राफ' हे इस्राईली ज्यू असून, अनेक वर्षं अमेरिकेतील लॉस एंजेलिस या शहरात स्थायिक आहेत. ते स्वत: उत्तम लेखक व सिने दिग्दर्शक आहेत. त्यांनी अनेक गुप्तहेरकथा, युद्धकथा लिहिल्या आहेत. त्यांच्या 'ऑपरेशन ब्रदर्स' या कथेवर हॉलीवूडमध्ये इंग्लिश सिनेमा तयार झाला. त्याचं नाव 'द रेड सी डायव्हिंग रिसॉर्ट' या सिनेमाचं दिग्दर्शन 'गिडिअन राफ' यांनीच केलं आहे.

इस्रायल देश ज्यूधर्मीय लोकांचा देश आहे. ज्यू धर्म फार प्राचीन धर्म आहे. इ.स. पूर्व ५०० वर्षांपूर्वीच ज्यू धर्माचा प्रसार आफ्रिका व युरोप खंडात झाला. आजतागायत तेथे लाखो ज्यूधर्मीय लोक आहेत. जगात कुठेही ज्यूधर्मीय लोकांवर अन्याय झाला, तर इस्रायली सरकार त्यांच्या मदतीला धावून जाते. त्यांना धार्मिक स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करते.

इथियोपिया व सुदान देशातील मुस्लीम सरकारने सन १९८४ व १९८५च्या काळात तेथील स्थानिक ज्यू कृष्णवर्णीयांचा अतोनात छळ सुरू केला. काही प्रमाणात कत्तलही केली. त्या वेळी इस्रायल सरकारने जवळजवळ आठ हजारच्या वर लोकांना इस्रायलमध्ये आश्रय दिला. त्यांचे धर्मस्वातंत्र्य अबाधित राखले. ही सत्य घटना आहे. या सत्य घटनांना 'ऑपरेशन मोझेस' व 'ऑपरेशन जोशुआ' संबोधले जाते. या सत्य घटनेवर आधारित लेखकाने 'ऑपरेशन ब्रदर्स' ही कथा लिहिली आहे.

इस्रायल देशाची 'इस्रायल इन्टेलिजन्स एजन्सी' या नावाची विशेष कामगिरी करणारी एक सरकारी संघटना आहे. सन १९८४च्या मध्यास ॲरी लेविनसन व सॅमी नेवॉन या दोन इस्रायलस्थित ज्यू नागरिकांनी या एजन्सीमधून दोन वर्षांचं खडतर ट्रेनिंग पूर्ण केलं आहे. ज्या दिवशी त्यांचं ट्रेनिंग संपलं, त्याच्या दुसऱ्याच दिवशी या एजन्सीचे सर्वांत वरिष्ठ अधिकारी 'मिस्टर इथन लेविन' हे त्यांच्या 'तेल अविव' येथील ऑफिसात या दोघांना बोलावून घेतात. त्यांच्यापुढे कामाचा तपशील सादर करतात. काम समजावून सांगताना बोलू लागतात.

''ॲरी व सॅमी, तुम्हा दोघांसाठी एक महत्त्वाचं 'मिशन' आहे. आफ्रिका खंडाच्या पूर्व भागातून 'तांबडा समुद्र' किनारी इथियोपिया देशामध्ये पूर्वापार ज्यू धर्माचे आफ्रिकन निग्रो लोक राहत आहेत. त्यांचा तेथील सध्याचे कम्युनिस्ट सरकार या ना त्या प्रकारे अतोनात छळ करत आहे. त्यांचं धर्मस्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी त्यांना आपल्या देशात, इस्रायलमध्ये घेऊन यायचं आहे. आपण त्यांना आश्रय देणार आहोत. हे काम सरकारी असून, अतिशय गुप्तपणे झालं पाहिजे. 'कबेडो बिमरो' या नावाचा व्यक्ती तेथील ज्यू लोकांचा स्थानिक लीडर आहे. तो आपल्या एजन्सीसाठी काम करतो. तुमच्या मदतीसाठी या 'कबेडो बिमरो'ची नेमणूक करत आहे. या कृष्णवर्णीय ज्यू लोकांची सुटका करून त्यांना इथे कसे घेऊन यायचं, यासंबंधीचा सर्व प्लॅन तुम्हीच आखायचा आहे. तुम्हाला लागणारी सर्व मदत आपली एजन्सी देईलच. या कामाला लवकर सुरुवात करा.''

मि. इथन लेविनसोबत मीटिंग झाल्याबरोबर ॲरी लेविनसन व सॅमी नेवॉन या दोघांना 'इस्रायल इन्टेलिजन्स एजन्सी'च्या दुसऱ्या खास विभागात बोलावलं गेलं. तिथे त्यांना इथियोपिया देशातील सामाजिक व राजकीय परिस्थितीची माहिती दिली जाते. इ.स. पूर्व ५०० वर्षांपासून इथियोपिया देशाच्या काही भागांत ज्यू धर्म स्थिरावला आहे. येथील काही टोळ्यांनी ज्यू धर्म स्वीकारला. त्यामुळे तेथील बऱ्याच लोकांवर ज्यू धर्माचा पगडा आहे. सन १९७४पासून येथे मिलिटरी कम्युनिस्ट सरकारविरुद्ध देशातील बंड करणारे लोक यांच्यात यादवी युद्ध सुरू आहे. ते आज सन १९८४ मध्येही चालूच आहे. त्यातून १९८३पासून येथे महाभयंकर दुष्काळ पडला आहे. त्यामुळे अनेक लाख लोक मरण पावले आहेत आणि जवळजवळ ४०,०००च्या वर लोकांनी जवळील देशात पलायन केलं आहे. महत्त्वाचं म्हणजे, मिलिटरी सरकारने 'ज्यूधर्मीय' लोकांच्या विरुद्ध कारवाई करायला सुरुवात केली आहे. ज्यू लोकांची घरं जाळू लागले आहेत. तरी या ज्यू लोकांना त्यांच्या इथियोपिया देशातून हलवून आपल्या 'इस्रायल'मध्ये त्यांना आसरा द्यावयाचा आहे. या कामासाठी तेथील ज्यू लोकांचा स्थानिक लीडर व इस्रायली इन्टेलिजन्सचा हस्तक 'कबेडे बिमेरो' याला ताबडतोब कॉन्टॅक्ट करून काम सुरू करायचं आहे.'' हे ज्यू लोक कोणत्या भागात आहेत हे ॲरी व सॅमीला दाखवलं जातं.

नकाशा बघून ॲरी व सॅमीच्या लक्षात येतं की, हे तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यापासून फार लांब नाहीत. तसेच, सुदान देशाची बॉर्डरही तशी जवळच आहे. या लोकांना समुद्रकिनारी घेऊन जा व यांना तेथून इस्रायलच्या बोटीने इस्रायलमध्ये पाठवून द्यायचे, असा प्लॅन ॲरी व सॅमी आखतात. त्याप्रमाणे इन्टेलिजन्स एजन्सीला कळवून बोटीची तजवीज करून ठेवतात. आणि इथियोपियाच्या ज्यू लोक ज्या भागात आहेत त्या भागात पोहोचतात. तेथे कबेडो बिमेरो या दोघांची वाट बघतच असतो. बिमेरो या दोघांना लपून बसलेल्या निग्रो ज्यू लोकांकडे घेऊन येतो. तिथे बिमेरोने शंभरच्या वर लोकांना त्यांच्या सुटकेसाठी एकत्र केले आहे. जवळचा रस्ता किंवा नदी पार करून समुद्रकिनाऱ्याकडे या लोकांना घेऊन जायचे आहे. हे लोक पायी चालायला लागतात. तेवढ्यात त्यांच्यातीलच एक लहान मुलगा खबर घेऊन येतो की, 'रस्ता व नदी दोन्ही सुरक्षित नाही. तेथे खूनखराबा चालू आहे.' म्हणून ॲरी, सॅमी व बिमेरो या लोकांना घेऊन दुष्काळाने सुकलेल्या शेतातून पळायचे आणि समुद्रकिनारा गाठायचा असे ठरवतात.

या लोकांना घेऊन लपतछपत पळत असताना सरकारी मिलिटरीचे सैनिक त्यांना बघतात आणि त्यांचा पाठलाग करून पळणाऱ्या लोकांवर बेछूट गोळीबार करतात. त्यात बहुतांशी कृष्णवर्णीय ज्यू मरण पावतात. १० ते १५जणच वाचतात. अशा वेळी ॲरी व सॅमी, बिमेरोच्या मदतीने

आपला प्लॅन बदलायचं ठरवतात. ते तिघं ठरवतात की, या लोकांना घेऊन जवळ असणाऱ्या सुदान देशात जावं व तेथे असणाऱ्या 'ज्यू रेफ्यूजी' कॅम्पमध्ये नेऊन सोडावं. म्हणजे निदान हे लोक सुरक्षित तरी राहतील.

ॲरी-सॅमी व बिमेरो आणि कृष्णवर्णीय ज्यू लोक लपतछपत, मजल-दरमजल करीत सुदान देशाची बॉर्डर क्रॉस करून सुदानमध्ये पोहोचतात; परंतु ॲरी व सॅमीचं हे प्लॅनिंग नीट जमत नाही. या सर्वांना सुदामी सरकारचे सैनिक पकडतात. काळ्या ज्यू लोकांची रवानगी मात्र 'ज्यू रेफ्यूजी कॅम्प'मध्ये करतात. आणि ॲरी, सॅमी व बिमेरो यांना सरकारी कैदेत अडकवतात. सुदान देशाची राजधानी 'खार्टूम' येथे अमेरिकन एम्बसी आहे, ही एम्बसी या तिघांची सुटका करायला सुदानी सरकारला भाग पाडते. त्याप्रमाणे या तिघांची सुटका झाल्यावर अमेरिकेचे सीआयएचे एजंट ॲरी, सॅमी व बिमेरो यांची गाठ घेतात आणि त्यांना इस्रायलला पाठवून देतात.

इस्रायलमधील सरकारी इन्टेलिजन्स एजन्सीचे दोन अधिकारी 'तेल-अविव' येथील हेडक्वार्टरमधील ऑफिसात ॲरी व सॅमीला बोलावून घेतात. या दोघांना सांगितलेलं काम जमलं नाही म्हणून चांगलं फैलावर घेतात व 'असल्या कामाला तुमची जरूरी नाही' म्हणून चक्क कामावरून काढून टाकण्याची धमकी देतात.

यावर ॲरी त्यांना विनंती करतो की, 'मला फक्त एकच संधी द्या, माझ्याकडे एक सॉलिड प्लॅन आहे. तुम्ही माझी सर्वांत वरचे अधिकारी इथन लेविन सर यांच्याशी गाठ घालून द्या. मी माझी योजना त्यांना सांगतो.' ॲरीचे म्हणणे अधिकारी मान्य करतात आणि मि. इथन लेविन यांच्यासोबत ॲरीची मीटिंग ठरवतात.

ॲरी, मि. इथन लेविन यांना भेटतो व आपला प्लॅन कथन करतो. ''मी या वेळी इथियोपियाला न जाता सुदानला जाण्याचं ठरवतो आहे. सुदानी सरकारने 'ज्यू रेफ्यूजी कॅम्प'मध्ये हजारो कृष्णवर्णीय ज्यू अडकवून ठेवले आहेत. हे रेफ्यूजी त्यांची सुटका होण्याची वाट बघत आहेत. या रेफ्यूजींची सुटका मी करू शकतो. त्यासाठी या लोकांना लपवायला एखादी इमारत हवी व त्यांना घेऊन जाण्यासाठी वाहनंही हवी आहेत. त्यासाठी मी पुढील विचार केला आहे. सुदानमध्ये तांबड्या समुद्राच्या किनारी 'अराउज व्हिलेज' या छोट्या गावामध्ये एक बंद पडलेलं 'डायव्हिंग रिसॉर्ट' हॉटेल आहे. या रिसॉर्टच्या समुद्रातून चक्कर मारायला बोटी आहेत. तसेच काही ट्रक व टेम्पोही आहेत. आपल्या एजन्सीने एक महत्त्वाचं काम करायचं ते म्हणजे आपल्या देशाची एक बोट या समुद्रकिनाऱ्यावर योग्य त्या कायदेशीर अंतरावर उभी करायची. हा डायविंग रिसॉर्ट आपण चालू केला आहे, असे दाखवू. ज्यू रेफ्यूजींना त्यांच्या कॅम्पमधून कौशल्याने पळवून येथे लपवून ठेवू. मग पुढचं सोपं आहे. तरी मला हे काम करण्याची परवानगी द्या. मी तिथे एका टूरिस्ट कंपनीचा मॅनेजर म्हणून जॉइन होईन, कोणाला संशयही येणार नाही.''

ॲरी लेविनेसनचा नेहमीपेक्षा वेगळा असा प्लॅन ऐकून मि. इथन लेविन थोड्या नाखुषीनेच त्याला मंजुरी देतात व 'गो अहेड' म्हणून हिरवा कंदील दाखवतात.

ॲरी लगेचच पुढच्या तयारीला लागतो. प्रथम त्याचे या एजन्सीमधील आधीचे सहकारी 'मिस रॅशेल रीटर', 'सॅमी नेव्हॉन', 'जेक वोल्फ' व 'मॅक्स रोज' यांची या कामासाठी भरती करतो. अर्थात कबेडो बिमेरो यालाही यामध्ये सामील करून घेतो. बाकीची सर्व तयारी झाल्यावर ही टीम सुदानमध्ये पोहोचते. प्रथम ॲरी व रॅशेल तेथील सरकारी टूरिझम कंपनीत जातात, तिथे सरकारी अधिकाऱ्यांना पटवून देतात की, आम्ही 'युनिकोअर टूरिझम कंपनी'चे अधिकारी असून, आम्हाला 'रेड सी डायव्हिंग रिसॉर्ट'चं हॉटेल भाडेतत्त्वावर हवं आहे.' या मंडळींची मागणी सुदानी अधिकारी भरपूर लाच घेऊन मगच मान्य करतात.

अशा तऱ्हेने हॉटेल ताब्यात आल्यावर ॲरी लेविनसनची टीम हॉटेलवर हजर होते. प्रथम इस्रायलहून आणलेली 'स्पेशल इलेक्ट्रिक इक्विपमेन्ट' हॉटेलमध्ये एका गुप्त जागी फिट करण्याचे काम ही टीम पार पाडते. स्वत:चा कॉन्टॅक्ट इस्रायलसोबत प्रस्थापित करते. त्यानंतर स्थानिक कृष्णवर्णीय कामगारांची भरती करून हॉटेलची साफसफाई करून घेतली जाते. 'युनिकोअर टूरिझम' कंपनीच्या जाहिरातीची पत्रके छापून घेतात. त्याचे आजूबाजूच्या मोठ्या गावात वाटप करतात. ही सर्व तयारी चालू असताना रेड सी म्हणजेच तांबड्या समुद्र किनाऱ्यापासून बारा मैलांवर रेफ्यूजींना घेऊन जाण्यासाठी इस्रायलची बोट हजर होती. इकडे हॉटेलमध्ये स्थानिक कृष्णवर्णीय सुदानी व बाहेरच्या देशांतील प्रवाशांची ये-जा सुरू होते. हॉटेल एकदम चालायला लागते. ॲरी व त्याच्या टीमला हॉटेलमध्ये जसा 'माहोल' पाहिजे तसा होऊ लागतो.

सुदानची राजधानी खार्टूम या शहरात अमेरिकन एम्बसी आहे. तेथील सीआयएचे एजंट ज्यांनी पूर्वी ॲरी व सॅमीची सुदानी सरकारच्या ताब्यातून सुटका केली होती, त्यांना ॲरीच्या युनिकोअर टूरिझम कंपनीचा सुगावा लागतो. त्याबरोबर या एजंटना संशय येतो की, ॲरी, सॅमी, बिमेरो ही मंडळी परत इथियोपियन ज्यू रेफ्यूजींची सुटका करण्यासाठी इथे हजर झाली असावीत. हा विचार हे एजंट आपल्या ज्युनिअर एजंटजवळ बोलतात व बजावतात की, 'या सर्व टीमला काही मदत लागली तर तत्परतेने आपण मदत करणं आपलं काम आहे, त्यासाठी सज्ज राहा.'

'रेड सी डायविंग रिसॉर्ट'मध्ये बाहेरचे प्रवासी येणं-जाणं सुरू होतं. ॲरी व त्याची टीम यावर खूश आहे; कारण या टूरिस्टमुळे त्यांचा ओरिजनल प्लॅन लपून राहू शकतो. थोड्याच दिवसांत बिमेरो ५०-६० इथियोपियन ज्यू रेफ्यूजींची सुदानी कॅम्पमधून हिकमतीने सुटका करून लपतछपत हॉटेलवर घेऊन येतो. आणि हॉटेलच्या एका ठरावीक हॉलमध्ये लपवून ठेवतो. आणि ॲरीला सांगतो की, 'आपल्याला या वेळी जास्त काळजी घेणं भाग आहे; कारण या कॅम्पवर नवा कमांडर 'अब्दुल अहमद' म्हणून आला आहे, तो जास्त खतरनाक आहे.'

एका रात्री त्यांचं मिशन सुरू होतं. हॉटेलच्याच ट्रकमध्ये या सर्व ज्यू रेफ्यूजींना घेऊन ॲरी, सॅमी व बिमेरो तांबड्या समुद्राच्या किनाऱ्याकडे जाऊ लागतात. या किनाऱ्यावर इस्रायली कोस्ट-गार्ड त्यांची वाट बघत थांबलेले असतात. या किनाऱ्याकडे ट्रकमधून जाताना त्यांना एकदम रॅंडम चेक पोस्ट लागते. ते बघून ॲरी विचारात पडतो, 'येथे थांबावे की नाही?' परंतु, न थांबता तो ट्रक तसाच भरधाव पुढे नेतो. ज्यू रेफ्यूजींचा ट्रक किनाऱ्यावर पोहोचतो. तेथे इस्रायली कोस्टगार्डच्या बोटीतून हे ज्यू



लोक इस्त्रायलच्या बोटीत पोहोचवले जातात. हे मिशन यशस्वी होते.

रँडम चेकपोस्टवाले सुदानी मिलिटरीचा अधिकारी अब्दुल अहमदला खबर देतात की, 'ट्रकचा ड्रायव्हर कोणी गोरा माणूस होता.' हे ऐकून या अब्दुल अहमदला संशय येतो की, 'या लोकांनी इथियोपियन ज्यू रेफ्यूजींना स्मगल करण्याचं काम चालू केलं आहे की काय?'

पहिलं मिशन यशस्वी झाल्यानंतर बिमेरो अजून ५०-६० ज्यू रेफ्यूजींची कॅम्पमधून सुटका करवून या हॉटेलवर घेऊन येतो. तिथे ठरावीक जागी त्यांना लपवून ठेवलं जातं. याच सुमारास अब्दुल अहमद हॉटेलवर काय चाललं आहे याची पाहणी करायला जातो. ॲरी, सॅमी, रिशेल यांचं स्वागत करतात. चांगली सरबराई करतात. अब्दुल अहमद, मिलिटरी खाक्या दाखवून हॉटेलची तपासणी करतो; परंतु, त्याला ज्यू रेफ्यूजी नजरेस पडत नाहीत. तरीसुद्धा कमांडरच्या मनात संशय आहे की, 'ॲरी व त्याची टीम काहीतरी कामात गुंतलेली आहे.'

असं असलं तरी ॲरी व त्याची टीम मिशन नंबर २ सुरू करतात. मिशन नं. १प्रमाणेच लपवून ठेवलेल्या ज्यू रेफ्यूजींना इस्त्रायलच्या बोटीपर्यंत पोहोचवलं जातं.

मधूनमधून कमांडर हॉटेलवर पाहणी करायला जात असतो; पण त्याच्या हाती काही लागत नाही. सात-आठ महिन्यांचा काळ उलटून गेला आहे. हॉटेल जोरात चालू आहे. मिस रॅशेल व जेक वोल्फ हॉटेल प्रवाशांची देखभाल करत असतात. मॅक्स रोज या हौशी प्रवाशांना डायविंगचे धडे देत असतो. आणि ॲरी, सॅमी व बिमेरो ज्यू रेफ्यूजींची सुटका करण्यात गुंतलेले असतात. या सात-आठ महिन्यांत लागोपाठ १७ मिशन यशस्वी होऊन दीड ते दोन हजार ज्यू रेफ्यूजी इस्त्रायलमध्ये आश्रयाला पाठवतात. ॲरीची टीम यशस्वी झाली आहे.

इकडे ज्यू रेफ्यूजी कॅम्पमधील खूप माणसं कमी झालेली कमांडर अब्दुल अहमद याच्या लक्षात येतं. या माणसांची कोण सुटका करत आहे, याचा शोध घेऊनही तपास लागत नाही, या गोष्टीचा राग येऊन कमांडर ज्यू रेफ्यूजींचा अतोनात छळ सुरू करतो. काय चाललं आहे हे बघण्यासाठी ज्यू रेफ्यूजींना बंदुकीने गोळ्या घालून ठार करू लागतो.

या सर्व घटना ॲरीचे वरिष्ठ बॉस मि. इथन लेविन यांच्या कानावर जात असतातच. एक दिवस ते ॲरीला कॉन्टॅक्ट करतात व सांगतात, 'तुमच्या टीमचं काम चांगलं चालू आहे. 'डायविंग रिसॉर्ट' चालवण्याच्या 'फ्रन्ट'वर तुमचं 'ज्यू रेफ्यूजींची' त्यांच्या छळछावणीतून सुटका करण्याचं अत्यंत खतरनाक काम मोठ्या प्रमाणावर यशस्वी झालं आहे; परंतु आता कमांडर अब्दुल अहमद, निरपराध ज्यू लोकांचा छळ करून ठार मारत आहे. तसेच, तुमचं मिशन जवळजवळ एक वर्ष चालू आहे. ही गोष्ट इतर राष्ट्रांच्या समोर यावयास वेळ लागणार नाही. त्यातही धोका आहे. तरी हे मिशन आता थांबवू या. आपल्या सरकारचाही हे मिशन थांबवा, असा दबाव येत आहे.

ॲरी, इथन लेविन बॉसचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतो; पण हे मिशन थांबवावं लागत आहे, या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्णयाने अस्वस्थ होतो. बॉसचा निर्णय ॲरी आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या कानावर घालतो. त्या क्षणी ते सहकारी हे काम सोडून देण्याची इच्छा बोलून दाखवतात. बॉससोबत झालेलं बोलणं ॲरी बिमेरोला सांगतो. सहकारीही हे काम पुढे रेटून न्यायला थोडे नाखूश आहेत, असं सांगतो. यावर बिमेरो, ॲरीला विनंती करतो की, 'एकदाच आपण हा प्रयत्न करूया. खूपसे ज्यू रेफ्यूजी आपली येथून सुटका होईल या आशेवर तग धरून आहेत.' बिमेरोचं म्हणणं ॲरीला पटतं. ॲरी या कामासाठी सॅमी, रिशेल व इतर सहकाऱ्यांची संमती घेऊन बॉस इथन लेविनशी संपर्क करून ठामपणे सांगतो, ''शेवटचा एक प्रयत्न आम्ही करतो. मग हे काम थांबवतो.'' बॉसची याला संमती मिळते.

आता ॲरी, सॅमी व रिशेल या तिघांच्या डोक्यात नवीन कल्पना येते की, 'अमेरिकन सीआयए एजंटांची भेट घ्यावी. त्यांनी ॲरी व सॅमीची सुदानी सैनिकांच्या ताब्यातून पूर्वी एकदा सुटका केली होती. त्याच एजंटांची जर मदत घेतली तर हे शेवटचं काम फत्ते होऊ शकेल.'

इकडे सुदान देशाची राजधानी खार्टूममधील अमेरिकन एम्बसीला इस्त्रायली एजंटांचा सर्व प्लॅन माहीत झालेला असतो. ॲरी व त्याची टीम ज्यू बांधवांची सूटका कशी करत आहेत, याबद्दलचा सर्व तपशील अमेरिकन अधिकाऱ्यांनी माहीत करून घेतलेला असतो. एक ना एक दिवस आपली मदत या इस्त्रायली एजंटांना नक्की लागणार याचीही त्यांना

खात्री असते. तशी कल्पना सीआयए एजंटांनाही दिली जाते.

अशा पार्श्वभूमीवर ॲरी व सॅमी खार्टूममध्ये, अमेरिकन सीआयए एजंट यांच्याकडे मदत मागायला जातात. या एजंटांची गुप्तपणे भेट घेतात व कशा प्रकारे मदत पाहिजे याचा प्लॅन सांगतात आणि कळकळीने मदत देण्याची विनंती करतात. दोघंही सीआयए एजंट ॲरीला पाहिजे तशी मदत द्यायला तयार होतात. त्यावर ॲरी एजंटांना उद्देशून म्हणतो, ''ज्यू बांधवांचे धर्मस्वातंत्र्य' या मिशनसंबंधात इतिहासात तुमचं नाव अजरामर होईल.''

ॲरी, सॅमी व रिशेल 'डायविंग रिसॉर्ट हॉटेल'वर परत येतात. अमेरिकन सीआयए एजंटसोबत झालेली बोलणी व त्यासंबंधीचा सर्व प्लॅन ॲरी आपल्या सहकाऱ्यांना सांगतो. ज्यू रेफ्यूजींची शेवटची टीम बिमेरोने हॉटेलमधील नेहमीच्या गुप्त ठिकाणच्या हॉलमध्ये लपवून ठेवलेली असते. तेवढ्यात कमांडर अब्दुल अहमद त्याच्या काही सैनिकांसह हजर होतो व सैनिकांना आज्ञा करतो की, 'सर्व हॉटेल पिंजून काढा. ज्यू रेफ्यूजी कुठे लपलेत त्याचा शोध घ्या.' त्याप्रमाणे सैनिक शोध घ्यायला सुरुवात करतात. हॉटेलच्या लॉबीमध्ये ॲरी, सॅमी व मॅक्स अब्दुल अहमदला गप्पा मारण्यात गुंतवून ठेवतात. त्याची खुशमस्करी करत त्याला हॉटेलबाहेर काढण्यात यशस्वी होतात. अब्दुल अहमद मिलिटरी व्हॅनमधून निघून जातो. सैनिक अजून शोध घेत असतात. कोणी रेफ्यूजी सापडत नाहीत म्हणून तेही माघारी फिरून जाऊ लागतात. या सैनिकांपैकी एक सैनिक गुप्त हॉलपर्यंत पोहोचतो व लपलेल्या रेफ्यूजींना बघतो. तेथे रेशेल या ज्यू बांधवांची देखभाल करण्यासाठी थांबलेली असते. ती या सैनिकाला गोळी मारून ठार करते.

ॲरी व त्याचे सर्व सहकारी यांनी 'हॉटेल रिसॉर्ट'मधून कायमचं बाहेर पडण्यासाठी सर्व तयारी गुप्तपणे करून ठेवली आहे. त्या दिवशी सकाळीच सर्व ज्यू रेफ्यूजींना भल्या मोठ्या ट्रकमध्ये बसवलं जातं. ॲरी स्वत: हा ट्रक चालवणार आहे. बिमेरो त्याच्याबरोबर आहे. बाकीचे सहकारी दुसऱ्या व्हॅनमधून ट्रकच्या मागोमाग निघतात. या हॉटेलपासून एक तासाच्या अंतरावर एक वापरात नसलेला मोठा रनवे आहे. त्यावर अमेरिकन सीआयए एजंटने अमेरिकन मिलिटरीचं मोठं पॅसेंजर विमान उडण्याच्या तयारीत ठेवलेलं आहे. त्या दिशेने ट्रक व व्हॅन जोरात निघाले आहेत. इकडे अब्दुल अहमदला त्याचा सुगावा लागतो. त्याचे सैनिक ट्रक व व्हॅनचा पाठलाग करू लागतात; परंतु, ट्रक व व्हॅन वेळेत पोहोचतात. 'ज्यू बांधव' ॲरी, बिमेरो व इतर सर्व सहकारी अत्यंत घाईने विमानात चढतात आणि विमान टेक ऑफ घेते.

विमानात ॲरी, सॅमी, बिमेरो यांच्या गप्पा सुरू होतात. गप्पांचा विषय म्हणजे सुदानमध्येच अजून अडकून राहिलेल्या 'ज्यू बांधवांचे' धर्मस्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी काय योजना आखायची? ही योजना आखताआखताच विमान इस्रायलमधील जेरूसलेमच्या विमानतळावर पोहोचते. तिथे इथियोपियन ज्यू बांधवांचं स्वागत करायला इस्रायल इंटेलिजन्स एजन्सीचे प्रमुख अधिकारी हजर असतात.


ॲरी, सॅमी, बिमेरो व त्यांचे सहकारी यांनी 'ऑपरेशन ब्रदर्स' हे मिशन मोठ्या प्रमाणावर यशस्वी केलं. त्यांनी अपेक्षेपेक्षा जास्त ज्यू बांधवांचं धर्मरक्षण केलं, याबद्दलची प्रशंसा करायला स्वत: इथन लेविन एअरपोर्टवर हजर राहतात. या सर्व टीमला ते भेटतात आणि दुसऱ्या अशाच मिशनसाठी तयार राहा म्हणून आज्ञा करतात.

★

**meenasathe@gmail.com**

नवं कोरं

कल्पवृक्षाची कन्या




पुराणांतल्या अद्भुत महिलांचं प्रसिद्ध लेखिका

सुधा मूर्ती

यांनी दाखवलेलं स्त्रीसामर्थ्याचं विराट रूप..


अनुवाद - लीना सोहोनी

पृष्ठसंख्या : १८०

किंमत : ₹१९०

Book Available

आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी




सुधा मूर्ती

यांच्या खास निर्व्याज, आकर्षक व सहजसुंदर शैलीत उतरलेल्या कथा


अनुवाद - लीना सोहोनी

पृष्ठसंख्या : २००

किंमत : ₹२५०

Book Available

## नवं कोरं




कॅनव्हास तोच, माणसं तीच..
पण हटके अभिव्यक्ती असलेल्या अफलातून कथा..


### कॉकटेल कार्निव्हल

लेखक : चेतन जोशी
अनुवाद : मंजिरी धामणकर

पृष्ठसंख्या : ३०४
किंमत : ₹ ३९५

Book Available

---




विविधरंगी भावनांची मनोहारी गुंफण
असलेल्या कथा..


### रुजवाई

लेखक : प्रतिमा कुलकर्णी

पृष्ठसंख्या : १९२
किंमत : ₹ २५०

Book Available

---




जालियनवाला बाग हत्याकांडाच्या पाशवी वर्तणुकीविरोधातला एका ध्येयवेड्याचा एल्गार.. राष्ट्रनिष्ठा आणि ध्येयासक्तीची विलक्षण कहाणी..


### जालियनवाला बाग

लेखक : अमेय जाधव

पृष्ठसंख्या : ३५२
किंमत : ₹ ४९५

Book Available

---




वेगानं बदलणाऱ्या जगात दूर देशीच्या घरांचा
शोध घेणाऱ्या जीवांच्या कथा...

### दूर घर माझे...

लेखक : लेइला अबोउलेला
अनुवाद : सुनंदा अमरापूरकर

पृष्ठसंख्या : १८०
किंमत : ₹ २५०

Book Available

# हलाला...

स्नेहा नंदकिशोर ढोले



बसमधल्या खिडकीतून सतत बाहेर पाहत असली तरी त्या बाहेरच्या निसर्गदृश्याच्या पल्याड कुठंतरी शून्यात तिची नजर अडकून पडल्याचं माझ्या केव्हाच लक्षात आलं होतं.

नखशिखांत बुरख्यात लपेटलेली असली तरी डोळे तेवढे उघडे होते. ओठांतून बाहेर पडणाऱ्या शब्दांनी कितीही दगाबाजी केली तरी डोळ्यांतली आर्तता आजवर कोण्या स्त्रीला लपवता आली बरं?

ती तिची कमजोरी नसून मला ते तिच्यातल्या प्रामाणिकपणाचं द्योतक वाटतं.

पुरुषाच्या नजरेतली वासना आणि स्त्रीच्या नजरेतलं प्रेम फार काळ दडून राहत नाही. तसंच काहीसं तिच्या नजरेतल्या आर्ततेचं झालं असावं.

''कुछ परेशानी है क्या?''

लांबचा प्रवास आणि तिची ती अनामिक घालमेल पाहून मला राहवलं नाही. म्हणून थेटच सवाल केला.

''आँ? नही जी! कोई नही।''

थोडंसं भांबावल्यागत झालं असलं तरी तिनं सावरून उत्तर दिलं. त्या लपवण्यात एक सराईतपणा डोकावत होता. यातनांना मनाच्या तळघरात डांबून ठेवून, एक भलं मोठं कुलूप मारल्यासारखं तिचं वागणं पाहून मी अधिकच बेचैन झाले.

''कोई तबियत का मसला हो तो गाडी रुकवाने को कहूँ? शायद तुम्हें अच्छा लगे!''

मला केवळ तिला बोलतं करायचं होतं...

''जी नही तो! मैं बिल्कुल ठीक हूँ!''

आणि तिनं पहिल्यांदा माझ्याकडे निरखून पाहिलं; पण ज्या तऱ्हेनं तिनं बिल्कुलवर जोर दिला त्याच वेळी कळून चुकलं की 'कुछ भी ठीक नही हैं।'

''मैं कब से देख रही हूँ, बड़ी खोयी खोयी सी लग रही हो! मैं जबरदस्ती तो नही करूँगी और नाही वादा करूँगी कीं तुम्हारी परेशानी का हल मेरे पास हैंही... पर फ़िर भी तुमने तो कई बार सुना होगा ना? अगर बाँटो तो तकलीफ़ आधी हो जाती हैं... बस इसलिए...''

मला मध्येच तोडत ती बोलली, ''जब खुदाही बंदे से रहम की नज़र हटा दे तो इन्सान क्या खाक तक़लीफ़ बाँट सकेगा, बाईजी!''

तिच्या आवाजात कमालीची खिन्नता आणि कुठल्याही संवेदनशील मनाला पीळ बसावा अशी विषण्णता होती.

''खुदा कीं खुदाई कई बार आम इन्सान कें समझ से परे भी तो हो सकती हैं ना? क्या पता तुम्हारी तक़लीफ़ कुछ हल्की हो जाये, इसलिये उसने हमें रहनुमा के तौरपर मिलाया हों!''

तिच्या ओठांवर त्याही अवस्थेत एक हलकीशी लकेर उमटली.

''अरे वा! आप तो बड़ी अच्छी हिंदी बोल लेती हैं! वैसे तो थोडी देर पहले फोनपर मराठी बोल रहीं थी...''

तिचा मूड चेंज होत असल्याचं पाहून माझ्यातही उत्साह संचारला.

''होय. मातृभाषा मराठीच आहे माझी; पण जुबाँ कोई भी क्यों ना हों, मुझे अपनीसी लगती है। फ़िर हम दोनों एक दूसरे को अपना लेती हैं!''

तिचा नूर पुन्हा पालटला,

''अपना लेते हैं.... हं... अपना लेना अगर हर बार इतना आसान होता तो...? शायद मेरी कहानी भी कुछ और होती!.... पर यहाँ आसान सिर्फ़ एकही बात हैं, किसीको किसी कीं ज़िंदगी से बेदखल कर देना... अपनाना कहाँ आसान है?''

तिच्या जीवजड दुःखाची तीव्रता आता पापण्यांच्या कडांवर उतरली होती. एका गैर स्त्रीसमोर त्या मूर्त दुःखाचा कडेलोट न होऊ देण्याचा तिचा भाबडा प्रयत्न मलाही बघवत नव्हता. म्हणून ती गैरपणाची खोळ टाकून देण्यासाठी तिचा तो पांढराशुभ्र, पण थरथरता हात मी माझ्या हातात घेऊन मायेनं घट्ट दाबला. या अनपेक्षित कृतीनं ती क्षणभर भारावली; पण सेकंदात तिचा बांध फुटला... गदगदा खांदे हलवत ती हमसून हमसून रडायला लागली.

मला मात्र हे अनपेक्षित होतं. ती पूर्णपणे शांत होईपर्यंत मी तिला रडू दिलं. अजूनही डोळ्यांत अश्रू शिल्लक असणं हे तिच्या जिवंतपणाचं अन् जिवंत मनाचं लक्षण नव्हतं का?

ती थोडी शांत झाली तसं हळूच पर्समधून पाण्याची बाटली काढून मी तिला प्यायला पाणी दिलं. हिजाब वर सारून तिनं कसेबसे दोन घोट पाणी पिलं. तेवढ्या मिनिटभरातच तिची काय ती झलक दिसली... अगदीच ओझरती.

''साकिया नाम है मेरा ! अब्बाजान सिव्हिल सर्व्हिसमध्ये मोठ्या पदावर काम करत होते. माझ्या माहेरी आमचे शेजारी एक मराठी कुटुंब असल्यानं मला बऱ्यापैकी मराठी येतं; पण तुम्ही एवढं लाघवी हिंदी बोलत होतात की मलाही ते ऐकत राहावंसं वाटलं....''

तिचं नेमक्या ठिकाणी नेमकं बोलणं आणि अगदी स्पष्ट शुद्ध मराठी शब्दाचे उच्चार ऐकून मीही हबकून गेले.

''घरात सगळे शिकले-सवरलेले असल्यानं मला फार नाही, पण बऱ्यापैकी मोकळीक होती. ग्रॅज्युएशनपर्यंत रेग्युलरमधूनच माझं शिक्षण झालं. पी.जी.करून नंतर सेट-नेट करायची, नोकरी करायची माझी फार फार इच्छा होती; पण शेवटच्या वर्षाची परीक्षा जवळ आली आणि मला अल्ताफचं स्थळ आलं. नाव ठेवावं असं त्याच्यात, त्याच्या कुटुंबीयांत काहीच नव्हतं. त्यात त्याची क्लास टूची पोस्ट. एकंदरीत सगळीच रेलचेल. अब्बूंना मनातून हे स्थळ आवडलं. माझा शिक्षणाचा ओढा त्यांना माहीत होताच; पण जेव्हा त्या संदर्भात मी त्यांना बोलायला गेले, तेव्हा-''

''साकिया बेटा... अगर तालीम और अच्छा शौहर इन दोनों में कुछ चुनना पड़े तो औरतजात ने हमेशा शौहर चुनना चाहिये! आख़िर, जमाने कीं जन्नत शौहर के क़दमो में ही होती हैं।''

असं बोलून मला गप्प केलं. आणि चार महिन्यांच्या आत अल्ताफसोबत माझा निकाह लावून दिला. स्वतःच्या मनाच्या विरोधात जाऊन मला तोंडदेखली 'कुबूल है!'ची संमती द्यावीच लागली; कारण आवाम के सामने इज्जतचा जेव्हा-जेव्हा पैदा होतो तेव्हा तेव्हा अच्छी औलाद ज़बान गिरवी ठेवून, स्वतःच्या अंतरात्म्याशी प्रतारणा करत 'कुबूल है!' चा कित्ता गिरवत असते. तो फ़िर मैने भी कौनसी नई बात की थी!...''

''मराठी में बहुत ही प्यारा लफ्ज हैं 'नव्याची नवलाई.' तसंच झालं. सुरवातीला सगळं छान छान चाललं असलं तरी सहाच महिन्यांत माझ्या हरेक लहान-मोठ्या कामात अल्ताफला ऐब दिसू लागले. आधी ओरडायचा. घरातल्या वस्तू फेकायचा, फोडायचा; पण एक दिवस... एक दिवस त्यानं हात उचलला. उस दिन मैने रोका नही और उसके बाद वो हाथ उठता ही रहा!''

''अगर वक़्त पर गलत को गलत ना बोलो ना बाईजी, तो उसे सही समझकर दोहरानेवालों की इस दुनिया में कोई कमी नही!''

तिनं लांब सुस्कारा सोडला...

"मग?"

तिला तेवढीही उसंत घेऊ न देता मी अधीरतेनं विचारलं.

"...फ़िर क्या, एक दिवस हे सगळं फार असह्य झालं. रागाच्या भरात अल्ताफनं माझं डोकं भिंतीवर आदळलं. काय झालंय हे कळायच्या आत मी भोवळ येऊन रक्ताच्या थारोळ्यात भिजत पडले. माझा जीव जाईल या भीतीपोटी म्हणा किंवा मग पोलीस केस होईल या भीतीपोटी... पण त्यानं मला दवाखान्यात भरती केलं.

"त्याही अवस्थेत, "बाथरूम में पैर फिसलकर गिर गयी थी!" हे माझ्यातल्या आदर्श पत्नीचं उत्तर होतं. हा सगळा प्रकार अम्मी -अब्बूला समजला तेव्हा ते लगोलग मला भेटायला आले. माझी ती मरणासन्न अवस्था बघून त्यांना राहवलं नाही आणि अल्ताफच्या माघारीच ते मला माहेरी घेऊन गेले.

'बच्ची ठीक हो जायें तो भिजवा दूँगा!'

असं अब्बाजान त्याला फोन करून म्हणाले खरे; पण आधीच शीघ्रकोपी असणाऱ्या अल्ताफला आपल्या माघारी आपल्या बायकोला नेल्याचं सहन झालं नाही. त्याच्या तानाशाही वृत्तीला उसके मर्जी के ख़िलाफ़ अगर कोई साँस भी ले तो गवारा नही था।

'अगर मुझे बताएँ बिनाही लें गये तो अब बताने की क्या ज़रूरत! उस मनहूस का मुँह दोबारा देखने का मुझे कोई शौक नहीं! और नाही अब उससे मेरा कोई ताल्लुक हैं!

'तलाक! तलाक!! तलाक!!!'

अब्बाजानच्या हातून फोन खाली घरंगळला. उभे होते त्याच ठिकाणी क्षणात कुणी जीव काढून घ्यावा तसे ते हवालदिल होऊन मटकन खाली बसले...कोसळलेच!

"लाखो रुपयांची उधळण करून लावलेला निकाह अल्ताफनं फोनवर उच्चारलेल्या त्या तीन शब्दांमुळं सरळ सरळ मोडीत निघाला होता, फोल ठरला होता. एका क्षणात माझा शौहर गैरमर्द झाला होता. निकाह लावताना ना अब्बूंनी ऐकलं, ना तलाक घेताना नवऱ्यानं विचारलं. या सगळ्या खेळ- खंडोब्यात स्वतःच्या जमीरचा किस पाडून घेणारी मी केवळ एक बाहुली ठरले.

"वर्ष असंच निघून गेलं... टोमणे खात का होईना, पण त्याही जगण्याची मी सवय करून घेऊ लागले; पर अल्लाह को शायद ये भी कुबूल नही था, के एक और तूफ़ान मेरी रही-सही ज़िंदगी को भी बर्बाद करने को चला आया! हलाला!"

"हलाला?"

जे ऐकलं त्याहीपेक्षा भयंकर अजून काय असू शकतं या भावनेनं शहारून जाऊन मी तिला विचारलं. ती पुन्हा बोलू लागली.

"घरच्यांच्या म्हणजे त्याच्या अम्मी -अब्बूंच्या दबावानं म्हणा किंवा हक्काचं अन् फुकटचं मनोरंजन नाहीसं झाल्यानं म्हणा... पण अल्ताफला पुन्हा माझी आठवण झाली. त्यानं अब्बूशी संपर्क केला. स्वतःहून.

"...आणि तसंही, एका मुलीचे आई -वडील म्हटलं की त्यांना सारं काही असावं; पण स्वाभिमान तेवढा असू नये. अब्बाजान लगेच तयार झाले; पण यात फार मोठी मेख होती. हलालाची मेख!!!

"कारण याआधीही अल्ताफने स्वतःच्या आततायी स्वभावाच्या आहारी जाऊन तलाक घेतला होता. पर तीन महीने के अंदर उसने उसकी भूल सुधार ली तो मयके जाने की नौबत आयी ही नही। पर उस दिन उसने अब्बू के सामने फोन पर जो कहाँ, वो तिसरा तलाक था। जिसके बाद मियाँ -बीवी को अगर फ़िर से साथ-साथ बतौर हमसफ़र रहना हो, तो एकही ज़रिया हैं - 'निकाह हलाला!' म्हणजे नवऱ्याव्यतिरिक्त एका परपुरुषाशी निकाह लावून त्याच्याशी शरीरसंबंध प्रस्थापित करायचे. मग त्याच्याशी तलाक घेऊन पुन्हा आधीच्या नवऱ्याशी निकाह! त्याशिवाय दोघांना एकत्र येणं शक्य नाही.

"आधीच शरीराची चाळण झालेली अन् मनानं खचून गेलेली मी... निकाह हलालाच्या कल्पनेनंही पार हादरून गेले. अल्ताफसोबत पुन्हा एका छताखाली राहण्यात मला काडीचंही स्वारस्य नव्हतं; पण असं असलं तरी एकेकाळी तो माझा नवरा होता और मैने अपना सब कुछ उसके नाम कर दिया था। असं असताना दुसऱ्याच कुणा पुरुषानं साधा नजरेनं केलेला स्पर्शही मला नापाक होता.

"पर मैं तो ठहरी कठपुतली, बाईजी! जिसके हाथ में जाऊँ वही तय करेगा कि मुझे कैसे और किस के सामने नाचना हैं।

"नको तेच झालं... निकाह हलालाचा राजरोस कारोबार चालवणाऱ्या एका हृदयशून्य अन् नालायक मौलवीसोबत माझा निकाह हलाला झाला. माझ्या मनाच्या विरोधात माझ्यावर होणाऱ्या बलात्कारासाठी मेरे खुद के शौहर ने उस मौलवी को दो लाख रुपये दिये। ता-उम्र मेरी इज्जत बेदाग रखने की जिसने कसम खाई थी उसनेही खुद के हाथों से मेरी निलामी कर दी।

"'सिर्फ़ एक ही तो रात की बात है, इतना दिल से लगाने की कोई जरूरत नही। कल आकर मैं ले भी जाऊँगा तुझे...' एवढं बोलून तो चालता झाला."

"साकिया..."

मी सुन्न झाले...

"अलग अलग बायकांच्या शरीराची गोडी लागलेला तो हरामजादा रोज माझे लचके तोडत राहिला. हवे तसे... हवे तेव्हा. जब अम्मी, अब्बू और खुद के शौहर ने ही हलाल होने के लिए छोड़ दिया तो आप ही बताए बाईजी मैं खुद को छुपाऊँ भी तो किसके दामन के पीछे?

"एका रात्रीचा सौदा झालेला तो मौलवी नंतर सपशेल फिरला आणि सोडेनासा झाला. त्यानं तलाक देऊन मोकळं केल्याशिवाय मला अल्ताफकडं परतणं शक्य नव्हतं आणि 'सिर्फ एक रात की तो बात है' म्हणत मला बेवारस सोडून जाणारा अल्ताफ नंतर पंधरा दिवसांनी तिकडं फिरकेनासाच झाला."

छद्मी आणि जणू काही स्वतःवरच हसत साकिया अखेरचं बोलली,

"पता हैं बाईजी? मैने अल्ताफ को कभी बासी या जुठा खाना नहीं खिलाया। कभी भी नहीं! तो अब ये जुठी और बासी बीवी उसे कैसे रास आएगी! नहीं? कुछ भी हो...गलती तब भी मेरी थी। गलती अब भी मेरी हैं!"


माझा स्टॉप आला... साकियाचा बुरख्याआडचा चेहरा अखेरपर्यंत दिसलाच नाही. तशी गरजही वाटली नाही. वेगळ्या ओळखीची!

कारण हलालाच्या लांच्छनानं सोलवटून निघणाऱ्या प्रत्येक साकियाची ती प्रतिनिधीच नव्हती का?

★

snehadhole111@gmail.com

## नवं कोरं




नाझीव्याप्त फ्रान्समधील ब्रिटिश सिक्रेट एजंट्स स्टार बंधूंची खरी कहाणी...


लेखक : चार्ल्स ग्लास
अनुवाद : वृन्दा उन्हाळे

पृष्ठसंख्या : २८६
किंमत : ₹ ३५०

**ते एकाकी लढले**

Book Available

---




भारतीय नौदलात जाण्याचं स्वप्न पूर्ण करत एका विलक्षण अनुभवपटाला सामोरं जाणाऱ्या तरुणाची कथा


लेखक : सुशांत सैनी
अनुवाद : जुई कुलकर्णी

पृष्ठसंख्या : २५६
किंमत : ₹ ३२०

**भारतीय सैनिक**
विश्वासाची कथा

Book Available

---




अमेरिकन आर्मीतील स्त्रीदमनाविरोधात कणखर आवाज उठवत नवी क्रांती घडविणाऱ्या अनुराधा भगवती यांचं आत्मकथन


लेखक : अनुराधा भगवती
अनुवाद : उदय भिडे

पृष्ठसंख्या : ४००
किंमत : ₹ ४९५

**अनुचित**
शिस्तभंगाची स्मरणयात्रा

Book Available

---




दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर 'वेगळा ते विशेष' प्रवास करणाऱ्या ललितची विटामिन ज़िन्दगी...

लेखक : ललित कुमार
अनुवाद : मंजिरी धामणकर

पृष्ठसंख्या : २१६
किंमत : ₹ २८०

**विटामिन ज़िन्दगी**

Book Available

# कवी आणि कविता

संदेश कुडतरकर



कवीला हळूहळू प्रसिद्धी मिळू लागली आणि कधीही फोन न करणारे मित्रही जवळीक दाखवू लागले. 'मजाय बाबा तुमची!' वगैरे वाक्यं फेकू लागले. ''मावशीच्या मैत्रिणीचा पन्नासावा वाढदिवस आहे, कविता लिहून दे ना, ताईच्या मुलाचं बारसं आहे, चारोळी लिहून दे ना,'' अशी आर्जवं करणारे ढिगाने गोळा होऊ लागले. कवीने हे चकल्या पाडण्याचं कामही आनंदाने स्वीकारलं. या सगळ्याबद्दलचा राग त्याने मनात धुमसत ठेवला.

मित्रांचं गेट-टुगेदर करायचं ठरलं, तेव्हा आग्रहाने सर्वांनी कवीलाही निमंत्रण पाठवलं. जेवणाची वेळ झाली, तेव्हा सर्वांनी प्लेट्सकडे मोर्चा वळवला. आपापल्या ताटात पनीरची भाजी, पुऱ्या, जिरा राईस आणि दाल फ्रायचे डोंगर रचत सर्वांनी एकेक वर्तुळ निवडलं आणि गॉसिप्स करायला सुरुवात केली. 'माझा मुलगा किती छान चित्रं काढतो', 'माझी सासू अजूनही कसा छळ मांडते' यावर आता बायका झालेल्या, तरीही स्वत:ला शाळकरी मुली समजणाऱ्या ललनांची चर्चा चालू होती. लग्न झालेले पुरुष अजूनही स्वत:ला टीनेजर समजत या ललनांबद्दलच चर्चा करत होते.

केवळ कवीसोबत स्वत:हून कुणी बोलायला गेलं नाही. त्याने आपल्या प्लेटमध्ये हवे ते पदार्थ घेतले आणि तो सगळ्यांपासून दूर जाऊन बसला. त्याने एकवार सभोवती नजर फिरवली. त्याला 'ती' दिसली. त्याच्यासारखीच! एकटीच स्वत:ची प्लेट घेऊन बसलेली. तिच्या डोळ्यांत अश्रू होते की, त्याला भास झाला; त्याचं त्यालाच कळेना. क्षणभरच दोघांची नजरानजर झाली. तिने किंचित हसून नजर फिरवली. तोही हसला.

निरोपाची वेळ आली, तेव्हा त्या ललनांमधली एक म्हणाली, ''आपण असंच भेटत राहिलं पाहिजे. पुढच्या वेळी एखाद्या रिसॉर्टला ट्रिप प्लॅन करू. अशी मस्त संध्याकाळ आणि याच्या रोमॅन्टिक कविता ऐकू. सगळं कसं मेमोरेबल होऊन जाईल. काय रे! ऐकवशील ना कविता?'' त्याला नकार द्यायची सवय नव्हतीच. तो हसून ''हो!'' म्हणाला. इतरांनी 'वा! वा!' म्हणत या कल्पनेला दाद दिली. फक्त 'ती' काहीच बोलली नाही. तिच्याशी कुणीच बोलत नव्हतं, तरी तिचा काही आक्षेप नव्हता त्याला. हा गोडमिट्ट समारंभ कधी संपतोय, असं त्याला झालं होतं. अखेर तो संपला.

नंतर ठरल्याप्रमाणे सर्व मित्रांची सहल रिसॉर्टला गेली. कवीही गेला. 'ती'ही होतीच. आनंद ओरबाडून घ्यायला आल्यासारखे सगळे बेहोष झाले होते. कवी तटस्थपणे सगळं पाहत होता. त्याला ही सगळी गर्दी झोंबीसारखी भासत होती. 'ती' मात्र यावेळीही तशीच मावळणाऱ्या सूर्याकडे पाहत बसली होती. तिला काही विचारावं, असं कुणाला वाटलं नाही. ठरल्याप्रमाणे काव्यवाचनाचा कार्यक्रम झाला. मात्र, सर्वांच्या मनात होतं, तसं काही झालं नाही. कवीच्या कविता ऐकून आपल्याला प्रसन्न वाटेल, साहित्यातलं आपल्यालाही थोडंफार कळतं, ही भावना कुरवाळून घेता येईल, या भ्रमात सगळे होते; पण झालं भलतंच. कवीच्या कवितांनी कुठल्यातरी अनाम दु:खाची तार छेडली. केशरी सायंकाळ अभद्र वाटू लागली. रात्र दबक्या पावलांनी येऊ लागली, तशी सर्वांच्या मनावरची काजळी अधिक गडद होऊ लागली. त्या रात्री सर्वांचा उत्साहच मावळून गेला. रात्रीची जेवणं झाली, तेव्हाही नेहमीसारखा किलबिलाट नव्हता. मरणकळा आल्यासारखे सगळे शांतपणे जेवून आपापल्या खोल्यांत गेले.

दुसऱ्या दिवशीची सकाळ भयानक होती. रिसॉर्टचा मालक चिंतेत होता. त्याला काही सुचत नव्हतं. कवी लॉनवर ब्रेकफास्ट करण्यासाठी आला तेव्हा त्याला एका खोलीतून ओले केस वाळवत फक्त 'ती' बाहेर येताना दिसली. इतर कुणाचाही मागमूस नव्हता. कवीला काहीच उलगडा होईना. रिसॉर्टच्या मालकाकडून त्याला कळलं की तिच्याव्यतिरिक्त इतर सर्वांनी आत्महत्या केली आहे. कुणी पंख्याला फास लावून घेतला होता. कुणी नस कापून घेतली होती. कुणी झोपेच्या गोळ्या घेतल्या होत्या. ज्यांना एकट्याने आत्महत्या करायचा धीर झाला नाही, त्यांनी छोटे छोटे गट करून एकमेकांना संपवलं होतं.

कवीला तरीही भीती वाटली नाही. 'कर नाही, त्याला डर कशाला' हे माहीत असल्याने यात पोलीस इन्व्हॉल्व्ह झाले, तरी आपल्याला काही होणार नाही, हे कवीला पक्कं ठाऊक होतं. भूक पोटात धक्के देत होती. त्याने रचलेल्या प्लेट्समधली एक प्लेट उचलली आणि त्यात उपमा, इडली, चटणी भरून घ्यायला सुरुवात केली. तितक्यात 'ती'ही तिथे आली. दोघांनी एकमेकांकडे पाहून स्मितहास्य केलं. त्याने तिला विचारलं, ''तुला नाही वाटली आत्महत्या करावीशी?'' ती हसत म्हणाली, ''वेडा आहेस का? तुझ्या कविता मलाही आवडतात; पण कालच्या तुझ्या कवितांतून रोजचंच जगणं अनुभवत होते मी. सवय आहे मला या सगळ्याची. कुणी मला आपल्यात सामावून घेत नाही, माझं लग्न होत नाहीये, म्हणून मी त्यांना 'त्यांच्यातली' वाटत नाही, या सगळ्या विचारांपासून मी फार पूर्वीच दूर निघून आलेय. माझ्या आयुष्यातही येईलच की कुणीतरी. त्यासाठी तुझ्या कवितेच्या दंशाने मी माझ्यावरचं प्रेम का कमी करू? शब्दांचे खेळ करण्याशिवाय काय येतं रे तुला?'' तिचं बोलणं ऐकून तो राक्षसी हसला. दोघं टेबलवर बसून ब्रेकफास्ट करू लागले. कवी ज्या कवितेच्या शोधात होता, ती चिरंतन प्रेमकविता त्याला फायनली सापडली होती.


★

msgsandesa@gmail.com



# पाण्याखालची माती ममतेहून जादा मुलायम

नितीन थोरात



''सोमनाथा... अय सोमनाथाव... सोमाव.. आरं बाबा, दोन घास तं खाऊन घे. कवंर राबतो लोकांचं रानानी ? सतरांबाऱ्या आवाज दिला तरी ऐकत ना बाबा तू. आरं... चल आता. पोटापाण्याची काळजीबिळजी हाये का नाय ?''

अंगाचा सापळा झालेली चंदानानी कंबरेत वाकून उन्हात उभी होती. माणसं मेणावानी विरघळावी असलं ऊन. कपाळावर हात ठेवत, डोक्यावरचा पदर नीट करत सोम्याकडं बघत चंदानानी त्याला आवाज देत होती; पण सोम्या ऐकूनबी न ऐकल्यासारखंच करत होता.

'तू जा घरी' असा वैतागून इशारा करत होता; पण चंदानानीबी त्याचीच आई. हमखून तीबी उन्हातच तशीच थांबलेली.

अंगावर हिरवं लुगडं. पाठीला चार ठिकाणी ठिगळं मारलेली खणाची जुनाट चोळी. मोकळं कपाळ. उन्हानं रापून काळीठिक्कुर पडलेली कातडी. तिडतिडी शरीरयष्टी. पायात चामड्याच्या जाडजूड पण जीर्ण झालेल्या वहाणा. गुडघ्याखालची काळी काटक नडगी तर कुरणातल्या बाभळीच्या लाकडावानी टणक. चेहऱ्यावर चादरीसारखी नक्षी वाटावी एवढ्या सुरकुत्या; पण त्या सुरकुत्यांनाही हेवा वाटावा एवढा मायेचा ओलावा तिच्या मिचमिच डोळ्यांत साचलेला.

ममतेनं काठोकाठ भरलेल्या डोळ्यांनी लेकाकडं एकटक पाहत चंदानानी उन्हात तास झाला उभी होती. शेवटी वैतागून सोम्या तिच्यापाशी आला आणि रागानी तिला इशारा करत घरी जायला सांगू लागला. तशी तेवढ्याच आपुलकीनं चंदानानी इशारा करत त्याच्याशी बोलू लागली,

''आरं लेकरा, घरी चल रं. ती लोकं तुला राबवू घेत्यात. तुझ्या पोटाची हाये का त्यांना काळजी? घरी चल, जेवणं कर. ऊन उतरल्यावर माघारी ये. तोक् तिकडून आभाळ आल्यावानी वाटतं. कवाबी पाऊस यीन. शेळ्यांना चरायला सोडलं. त्यांना घरी आण. कोंबड्या डालायच्यात. ती कामं सोडून तू फुकटची कामं का करतो रं पोरा?''

हातांनी, डोळ्यांनी इशारे करत चंदानानी पोटतिडकीनी बोलत होती; पण सोम्या काही ऐकायच्या मन:स्थितीत नव्हता. बोलता बोलता चंदानानीला ठसका आला आणि ठसकत ठसकतच ती खाली बसली. भेदऱ्या डोळ्यांनी चंदानानीकडं बघत सोम्यानी तिला उचललं आणि भराभरा पावलं टाकत घराकडं आला. झोपडीसमोरच बाभळीखालच्या बाजावर तिला बसवत रांजणातून तवलीभर पाणी तिच्यासमोर धरलं. मंद धापा टाकत चंदानानीनं हळुवार पाणी प्यायलं आणि क्षणभर डोळे बंद केले. शांतपणे श्वास घेऊ लागली. बाजासमोरच मातीत सोम्या दोन पायांवर बसलेला. त्याच्या डोळ्यांत काळजी गच्च साचलेली. तशी चंदानानी तवली बाजूला धरत बोलू लागली,

''लेका, तू मूक-बधिर असल्याचा लोकं फायद्या उठीवतत रं. तू असं कुणाच्याबी वावरात जाऊन बैलावानी फुकट काम करतो, तवा या आईचं काळीज तूट तूट तूटतं रं. हे बघ, ही मोठ्याची लोकं आपल्याला वापरत्यात अन् फिकूनबी देत्यात. तुझ्या बापाचंबी असंच हाल केलं. तुला समजत कसं नाय? जरा जपून वाग या दुनियेत.'

कसलाच इशारा न करता चंदानानी बोलली. त्यामुळं सोम्याला काहीच कळलं नाही. तो शांतपणे तिच्या हलणाऱ्या ओठांकडं पाहतच होता.

खाकी फुलपॅन्ट. पायात स्लिपर, अंगावर निळा ढगळा सदरा. भारदस्त तब्येतीचा एकोणीस वर्षाचा तो पोर चंदानानीसारख्या कृश म्हातारीचा पोरगा म्हणून शोभत नव्हता; पण आठ पोरींच्या पाठीवर झालेला नवसाचा पोरगा म्हणून चंदानानीनी त्याला तळहातावरच्या फोडासारखा जपलेला. आठ पोरीतल्या चार जगल्या. चारींचे हात पिवळे झाले. नवरा वारला अन् एवढा एक आधार राहिलेला; पण त्याला ना बोलता येत होतं ना ऐकता. त्यामुळं चंदानानीच्या आयुष्याचं गाणं तसं मूकबधिरच झालेलं.

आपण पोटतिडकीनी बोलल्याचं सोम्याला काहीच समजलं नाही, याची जाणीव होताच चंदानानीनी दीर्घ उसासा टाकला आणि बाजावर हात टेकवत उभी राहिली. ती झोपडीत निघाली तसा सोम्याही तिच्यामागोमाग झोपडीत आला.

दहा बाय बाराची ती झोपडी. चारी बाजूंनी शेणानी लिपलेली. कोपऱ्यातल्या मातीच्या चुलीपाशी चंदानानी बसली. पितळी आणि तांब्या घेऊन सोम्या तिच्याशेजारी बसला. चंदानानीनं चरवीतलं दूध पितळीत ओतलं अन् टोपल्यातून बाजरीच्या दोन भाकऱ्या त्याच्या मांडीवर ठेवल्या. सोम्यानं स्मित केलं. चंदानानीच्या चेहऱ्यावर गुलाब फुलले. दोघा मायलेकरांच्या मूक गप्पा सुरू झाल्या. इशाऱ्यानं बोलत दोघं जेवण करू लागले. दारातला झेंडू आनंदानी डोलत होता. मेडीवर बसलेल्या चिमण्यांची मंद चिवचिव सुरू होती.

दिवस मावळला. आभाळ भरून आलं होतं. सोम्यानी टारल्याखाली कोंबड्या डालल्या अन् दोन्ही शेळ्या दाव्याला बांधल्या. चंदानानी आणि रखमामावशी दारात मेथी निवडत बसलेल्या. तोंडावर पाणी मारत सोम्या चौकाच्या दिशेनं पळाला. तशी लगबगीनं चंदानानी ओरडली,

''अय सोमा... लवकर येव घरी. अय सोमा...''

चंदानानीनी आवाज दिला तशी आजूबाजूची पोरं मोठमोठ्यांनी हसायला लागली. आपल्या लेकरावर बाकीची पोरं हसल्याच्या विषारी सुया चंदानानीच्या काळजात खचाखच घुसल्या. तोच रखमामावशी पोरांवर ओरडली,

''दात काढायला लाज कशी वाटत नाय कारट्यांना? तो बहिराहे त्यात त्याचा काय दोष ? बघाव तवा हसत असत्यात मुडदी.''

रखमामावशी असं ओरडली तशी समोरच्या सिमेंटच्या घरातली पस्तिशीतली बाई बांगड्या मागं घेत दारात आली आणि रखमामावशीकडं बघत म्हणाली,

''अय म्हतारे, मुडदी कुणाच्या लेकरांना म्हणती गं ? आमची लेकरं का तुझ्याकडं बघून हसल्यात ?''

''आगं, माझ्यासारख्या थेरडीला हसली तरी परवडली असती; पण असं मुकंबहिऱ्यावर हसाय लाज कशी वाटत नाय तुझ्या लेकरांना ? स्वत: धडधाकट असलाव म्हणून दुसऱ्याव हसायचं असतं का? शाळेत हेच शिकवत्यात का पोरांना ?''

तसा बनियन घातलेला एक धडधाकट पुरुष घरातून बाहेर आला आणि दरडावलेल्या स्वरात म्हणाला,

''अय रखमे, मापात राहून बोल. नवरा दूधडेरीत वॉचमन म्हणून काम करतो ना ? मग मापात बोलायचं. आमच्या म्हशीचं रोज पंचवीस

लिटर दूध जातं डेरीत. चेरमनला सांगितलं तर उद्यापासून नवऱ्याचं काम बंद व्हईल. खायला महाग होशील. काय?''

करड्या आवाजातले सूचक ठळक शब्द रखमामावशीच्या कानात गेले तशी तिची दातखिळी बसली. पुढं काय बोलावं तिला उमजेना. थोडा वेळापूर्वी हसणारी पोरं पुन्हा हसायला लागली. त्यांच्या बोचऱ्या हास्ण्याकडं पाहत रखमामावशी शांत झाली. चंदानानी जाग्यावरून उठली. तिने रखमामावशीच्या खांद्यावर प्रेमानं हात टाकला आणि तिला घेऊन झोपडीत गेली. चिमणी चेतवली. चिमणीच्या मिणमिणत्या उजेडात दोघी म्हाताऱ्या बसल्या.

''चाय टाकू का वं माय ?''

चंदानानीचा हा प्रश्न कान टवकारत रखमामावशीच्या कानात पोहचला. तशी भानावर येत तिनं नकारार्थी मान डुलवली. स्मित करत चंदानानीनी चूल पेटवली अन् चहाचं पातीलं ठेवलं.

''मला माहितीये, तुला चाय आवडतो, रखमा.''

चंदानानीच्या या वाक्यावर रखमामावशीनं बळजबरी स्मित केलं. पंधरा-वीस मिनिट कापरासारखे उडून गेले. चंदानानीनी चहाची कप-बशी पुढं सरकवली. तशी शून्यात हरवलेली रखमामावशी भानावर येत म्हणाली,

''ते नक्की आमच्या ह्यांना कामावून काढाय नाय ना सांगणार चंदे ? खायची आबळ होईल बये आमची.''

''अगं, नाय सांगणार तो. तू गप बसली तसा तोबी गप बसलाच की. तूबी जरा आवर घालत जा बाई तोंडाला, रखमा. आपला सोम्या मूकबधिर हे. लोकं हसणारच त्याला; पण आपण तरी किती जणांना गप बसाय सांगणार गं ?''

चहा बशीत ओतत रखमामावशीनं शांतपणे चंदानानीचं वाक्य ऐकलं अन् चहा पिऊ लागली. तोच घरात सोम्या आला आणि रडवेल्या डोळ्यानं चंदानानीकडं पाहू लागला. डोळे पुसत, रागीट चेहरा करत, हातवारे करत, इशाऱ्यांमध्ये एकापाठोपाठ एक सवाल विचारू लागला.

''पिंटुवाणी म्हणतो, की तुझा बाप माझ्या दुकानात चोरी करायचा. बिस्कीट पुडा चोरताना त्यानी तात्याला पकडला होता, असंबी तो म्हणतो. सगळी पोरं माझ्यावं हसत्यात आये. चोरट्याचा पोरगा म्हणत्यात. खरं का आये ?''

चंदानानीनी हातातली बशी खाली ठेवली आणि पुढं सरकत पदरानी सोमाचे डोळे पुसू लागली. तसा आईचा हात झटकत सोमा तिला ''उत्तर दे'' असे चिडून इशारे करू लागला,

''आधी मला सांग आये. तात्या चोर होते का ? त्यांनी पिंटुवाण्याच्या दुकानातून बिस्कीटपुडा चोरला होता का? काय गरज होती त्यांना चोरी करायची? पोरांना तोंड दाखवायची लाज वाटाय लागली मला.''

चंदानानीला लेकाचे एकूणयेक इशारे कळत होते. त्याच्या प्रत्येक प्रश्नानं चंदानानीचं काळीज रक्तबंबाळ होत होतं. चंदानानी त्याला शांत करू पाहत होती; पण पोरांच्या खिल्लीनी सोमाचंही काळीज तेवढंच जखमी झालं होतं. आई नीट उत्तरं देत नाही, म्हणून चिडलेला सोमा तसाच रागवैतागानं पाय आपटत घराबाहेर पडला आणि नदीकडं चालत निघाला.

तशी रखमा चंदानानीकडं पाहत म्हणाली,

''काय म्हणत होता गं सोमा?''

बारकाल्या मिचमिच्या डोळ्यांना पदर लावत चंदानानीनी नकारार्थी मान डोलवली.

रखमामावशीनी चहाचा कप खाली ठेवला अन् मिणमिणत्या चिमणीकडं पाहत बोलू लागली,

''तुझ्या लेकराचे सवाल तुलाच समजत्यात बाई अन् त्याला तूच समजून सांगू शकती; पण पोरगं मोठं झालं आता. त्याच्या डोक्यावर परिणाम होणार नाय याची काळजी घे. अवखळ वयातली पोरं कशामुळं चिडत्यात काय भरोसा नसतो. अन् तुझं पोरगं किती तापटहे तुलाच माहिती. त्याच्या डोक्यात काय प्रश्न असत्यान त्येची उत्तरं दे, नायतर त्याच्या आयुष्याचं नुकसान व्हईन.''

चंदानानीनी होकारार्थी मान डुलवली तशी रखमामावशी निघून गेली.

रात्रीचे दहा वाजले तरी सोमा घरी येईना. आभाळ काळंभंगार झालेलं. चहुकडून भरून आलं. भर उन्हाळ्यात रात्रीच्या टायमाला गार वारा सुटला. लाइट गेली अन् सारा गाव अंधारात बुडाला. क्षणात विजांचा कडकडाट झाला आणि धो धो बरसायला लागला. चंदानानीचा जीव घाबरा झाला. सोमा अजून घरी आला नव्हता. कुठं गेला असेल लेक या विचारानी चंदानानी व्याकूळ झाली. अर्धा तास झाला तरी पाऊस थांबंना. तशी डोक्याव गोणी अन् हातात कंदील घेऊन ती म्हतारी सोमाला शोधायला बाहेर पडली.

इकडं-तिकडं फिरू लागली. पाऊस काय थांबायचं नावं घेईना. चंदानानी सोमाला आवाज देऊ लागली. आपण कितीबी आवाज दिले तरी लेकाला ते ऐकूच जाणार नाहीत याची खात्री असतानाबी त्या म्हतारीच्या तोंडातून लेकाचं नाव येतच होतं. मेन चौक, कैकाड्यांची वस्ती, दौंडाळी, रामोशीवाडा, खालचा चौक असं सार गावभर फिरत म्हातारी खोकरोबाच्या टेकडीजवळ आली आणि नेमका वडाखालच्या मरीआईच्या देवळात दिव्यापाशी बसलेला सोमा तिला दिसला.

क्षणात डोळ्यांत आनंदाचा पाऊस नाचू लागला. ओल्याचिंब झालेल्या चंदानानीच्या काळजात मायेची ऊब जन्माला आली.

'आरं लेका, तुझ्या बापानी चोरी केली होती; कारण तुला भूक लागली होती. तुझ्या बापानी चोरी केली; कारण तुझ्या आईचं दूध आटलं होतं. तुझ्या बापानी चोरी केली; कारण त्याला तुझ्या पोटाचा खळगा भरायचा होता. तुला काय वाटलं ? तुझ्या बापानी चोरी करायच्या आधी उधार मागितलं नव्हतं का ? उधार मागितलं. अगदी दुसऱ्या दिवशी नदीवरून कावडीनी तुमच्या घरची पाच टिपाडं भरतो असंबी बोलला होता; पण पिंटुवानी तयार नाय झाला. कुणी दोन रुपयाचीबी मदत केली नाय पोरा. भूकंमुळं रडूरडू तू व्याकूळ झालता पोरा. म्हणून मग तुझ्या बापानी दुकानातून एकच पुडा गुपचूप खिशात घातला; पण खालच्या जातीचा माणूस, दुसऱ्या गावचा माणूस, उपरा माणूस म्हणून साऱ्या गावानी हात धून घेतला. चारपाचशे लोकांच्या एका एका लाथेनी तुझा बाप मेला, पोरा; पण त्याचं मन साफ होतं लेका. फक्त तुझं पोट भरावा म्हणून त्यानी बिस्कीटपुडा चोरला होता. फक्त तुझ्या पोटासाठी तुझा बाप चोर ठरला होता, लेकरा.'

मनातल्या मनात चंदानानी असं बोलली आणि जाग्यावरच उभी

राहिली. लेकाला सगळं हितंच सांगायचं अन् त्याला घरी नेऊन पोटभर जेवू घालायचं असा विचार करत चंदानानी झपाझप पावलं टाकत, त्याला आवाज देत पुढं निघाली तोच तिचा पाय चिखलात घसरला आणि ओढ्याशेजारच्याच काळ्या कठीण कातळावर म्हतारीचा मणका आदळला. हाड मोडल्याचा कचदार आवाज आला. पावसाच्या अगणित थेंबांत विरूनही गेला.

कंदील खाली पडला तसा विझला.

कुट्ट अंधारात पाठीवर पडलेली चंदानानी वेदनेने विव्हळत नरड्याची शीर ताणेस्तवर लेकराला आवाज देत होती.

''सोमा.... अय सोमा'' असं ओरडत होती. कंबरेवर पडलेल्या चंदानानीच्या मणक्यात काळीज गोठवणारी चमक निघत होती. वेदनेची शिरशिरी साऱ्या अंगात नाचत होती.

विव्हळत चंदानानी उठण्याचा प्रयत्न करत होती; पण तिला उठताच येईना. पाय बधिर झाला, उजव्या पायात गुडघ्यापर्यंत मुंग्या आल्या. कंबरेच्या डाव्या बाजूच्या वेदनेने अंगातलं अवसानच गेलं. सबंध पाठीत काचा घुसल्यासारख्या वेदना उमटल्या. पाऊस थांबत नव्हता. हजारो थेंब तोंडावर कोसळत होते. चंदानानीचा आवाज क्षीण होत गेला. तोंडावर पाणी पडत असल्यानं तिला नीट बघताही येत नव्हतं. तरीही कशीबशी आधार देत ती थोडी सरकून बसली. मंद श्वास घेत लेकराकडं पाहू लागली. मरीआईच्या देवळात बसलेला सोमा डोळे पुसत होता.

''लेकरा, नको पुसू डोळे. तुझा बाप चोर नव्हता. हा गाव चोरहे. मी सांगते लेका, तुझा बाप चोर नव्हता.'' अशी पुटपुटत चंदानानी अवतीभवती पाहत होती. शेजारच्या ओढ्याचं पाणी वाहत तिच्या पायापर्यंत आलं. हळूहळू वाढू लागलं. ओढ्यातलं पाणी वाढत असल्याच्या भीतीनं चंदानानीचं मन थरथरू लागलं. अंगातल्या वेदनेनं आणि मनातल्या भीतीनं व्याकूळ झालेल्या चंदानानीनं लेकराकडं पाहत पुन्हा एकदा हलकासा आवाज दिला.

''सोमा, अय सोमा...''

चंदानानीच्या तोंडातून आलेला तो क्षीण आवाज आता तर तिच्याही कानापर्यंत पोहचला नाही. हातपाय गार पडत गेले. अंग गार पडत गेलं. सबंध अंग बधिर होऊ लागलं.

एवढा वेळ लांब असलेला ओढा आता चंदानानीच्या भोवती व्यापला होता. चंदानानीच्या चारी बाजूंनी पाणी जमा झालं. वेगानं वाहू लागलं. चंदानानी पोराकडं पाहत होती. सोमा डोळे पुसतच होता. बापाला दोष देतच होता. ते पाहत चंदानानी आवंढा गिळत होती.

'त्याच्या डोक्यात काय प्रश्न असत्यान त्याची उत्तरं दे, नायतर त्याच्या आयुष्याचं नुकसान व्हईन,' रखमामावशीचं वाक्य चंदानानीच्या डोळ्यांपुढं नाचू लागलं, तसं तिला गुदमरल्यासारखं झालं.

'माझ्या लेकाचा बाप चोर नव्हता एवढंच मला सांगू दे,' अशी देवाला विनवणी करत चंदानानी अंगात बळ आणण्याचा प्रयत्न करत होती; पण पाणी वाढू लागलं, तसे चंदानानीचे पाय पाण्यावर तरंगू लागले.

आपल्याला उठायला हवं, बाहेर जायला हवं. आपण वाहत जाऊ शकतो, असे विचार तिच्या डोक्यात येत होते; पण काहीच करणं शक्य नव्हतं. हातही पाण्यावर तरंगू लागले. अंगाखालची माती वाहू लागली. सोमा देवळातून उठून उभा राहिला. सोमा उठला तसं चंदानानीच्या मनावरची माती बाजूला झाली. आता आपण लेकाच्या मनातला गाळ धुऊ शकतो. त्याचा बाप चोर नव्हता हे त्याला सांगू शकतो, अशा आनंदी विचारांनी चंदानानीच्या मनात क्षणभर का होईना, बळ आलं; पण बळ मनात आलं, शरीरात नाही. तिला जागचंही हलता येईना.

आता तो माझ्याकडं पाहील. धावत येईल. मला बाहेर काढेल, असा विचार करत चंदानानी मोठ्या आशेनं त्याच्याकडं पाहू लागली; पण पाणी वाढतच होतं. चंदानानीच्या चारी बाजूंनी धावणारं पाणी जमा झालं. क्षणात चंदानानी पाण्यावर तरंगू लागली.

पाण्यातून कचरा वाहून जावा तशी ती तरंगत इकडं-तिकडं हलू लागली. सोमा देवाच्या पाया पडताना तिला दिसत होता. देवासोबत काहीतरी बोलताना, देवाला दोष देताना दिसत होता. बापाच्या नावानं खडे फोडताना दिसत होता.

'नाय रे लेका नाय. असं कायबी नाय. तू इकडं तरी ये. मी समजून सांगते तुला.'

असे विचार चंदानानीच्या मनावर तरंगत होते आणि तिचं शरीर पाण्यावर.

'आता माझा लेक बाहेर येईल. आईला असं पाण्यात पाहून दहा घोड्यांचं बळं घेऊन धावत येईल.' असा विचार करत असतानाच चंदानानी अतिशय मंदपणे वाहू लागली. सोमा देवळातून बाहेर आला आणि त्यानं पायात चप्पल घातली. चंदानानी कुट्ट अंधारात ओढ्याच्या पाण्यात अलगद वाहू लागली. तिच्या नाकातोंडात पाणी जात होतं. ती ओरडत होती तशी तिच्या पाठीत कळ निघत होती. विजा चमकत होत्या. वारा सुटला होता. आभाळ कडाडत होतं. मणक्यात कळ निघत असतानाही चंदानानी ओरडत होती. आपण मरणार याची तिला भीती नव्हती. लेक आयुष्यभर बापाला चोरच समजेल याची सल तिच्या मणक्यातून काळजापर्यंत पोचत होती. काही झालं तरी आपण लेकाच्या डोक्यातला गैरसमज दूर केलाच पाहिजे, असा विचार करत चंदानानीनं अंगात मोठं बळ एकवटलं; पण एवढं बळ एकवटूनही ना ती ओरडू शकली, ना हलू शकली.

सोमा देवळातून बाहेर आला आणि आपली आई घरी एकटी असेल या विचारानं घराकडं पळत निघाला.

लेक बापाला नावं ठेवत असला तरी त्याला आपली काळजी आहेच की. एवढ्या छोट्याशा आनंदाचा श्वास घेत चंदानानी अलगद पाण्याखाली गेली. ओढ्यातल्या पाण्यासोबत वेगानं वाहत निघाली.

पाण्याखालची माती ममतेहून जादा मुलायम होती. अगदी सहज नाकातोंडात गेली.

★

**nitin.thrt@gmail.com**

# जयंत जाधवची सीक्रेट लाइफ?

सुमेध इंगळे



जयंत जाधव लहानपणापासूनच शाकाहारी होता. ट्रेन्ड म्हणून किंवा धार्मिक कारणास्तव तो शाकाहारी नव्हता. तो एक 'इच्छाधारी कोंबडा' असल्यामुळे त्याला स्वतःला चिकन, मटन खायची इच्छाच नसायची. जयंत तेरा वर्षांचा होता तेव्हा त्याच्या लक्षात आलं होतं, की तो एक इच्छाधारी कोंबडा आहे. तेराव्या वर्षी एका अमावस्येच्या रात्री तो पहिल्यांदा कोंबडा बनला होता. पहिल्या रात्री तो पुरता गोंधळून गेला होता. टीनेजमध्ये प्रवेश करताना आपल्या शरीरात एवढे मोठे बदल होतील, असं त्याला स्वप्नातही वाटलं नव्हतं; पण नंतर असं वारंवार घडत राहिलं. आणि दर दोन-तीन महिन्यांत एकदा तो रात्री कोंबडा बनत राहिला. हळूहळू ते एक रुटीन बनलं. कोंबड्यात शरीर बदलल्यावर तो स्वतःला बेडरूममध्ये लपवून टाकायचा. डोळे बंद करून एका जागी बसून राहायचा. कोणालाच काहीच कळायचं नाही. तो सवयीचा भाग झाला होता.

जयंत एक इच्छाधारी कोंबडा असल्याचा संशय आजपर्यंत कोणालाही आला नव्हता. नाही म्हणायला, तो इंजिनिअरिंगला असताना हॉस्टेलवर रात्री कोंबडा बनल्यावर लपून बसायची चोरी व्हायची. तेव्हा तो हॉस्टेलच्या बाथरूममध्ये स्वतःला कोंडून घेत असे. एकदा त्याच्याकडून नजरचुकीने कोंबडा बनण्याआधी बाथरूमची कडी आतून बंद करायची राहिली. बॉडी कोंबड्यात बदलली गेल्यावर त्याला पंखांनी कडी लावता आली नाही, तेव्हा तो प्रचंड घाबरला होता. पहाटे पाच वाजता उठून अंघोळ करायला आलेली यवतमाळची पोरं बाथरूममध्ये आली. कोंबडा बघून भल्या पहाटे त्यांच्या तोंडाला पाणी सुटलं. कोंबडा मारून दुपारी त्याचं कालवण बनवायचा त्यांनी प्लॅनदेखील केला होता. जयंत कसाबसा पंख फडफडवत त्यांच्या तावडीतून सुटला. त्यानंतर यवतमाळच्या चिकनप्रेमी लोकांपासून जयंत आयुष्यभर दूर राहिला.

नोकरी धरून बायकोसोबत राहतानाही त्याने हे सिक्रेट नीट जपून ठेवलं होतं. गेली कित्येक वर्षं हे सिक्रेट आपल्या पोटात दाबून ठेवलं होतं. बायको घरात आवडीने चिकन बनवायची तेव्हा तो घराबाहेर जायचा. त्याला ते आवडायचं नाही; पण हे आयुष्य त्यानं स्वीकारलं होतं. त्याला स्पायडरमॅनसारखं डबल-लाइफ हिरो बनायचं नव्हतं. त्याला सामान्य मनुष्य बनूनच आयुष्य जगायचं होतं. त्याला रिस्क नकोच होती. आपण, आपली बायको, आपली नोकरी अन् घर एवढंच सांभाळत त्याला आयुष्य मोठं करायचं होतं.

पण, हल्ली तो रात्री जागाच राहू लागला होता. त्याला स्वतःबद्दल एक्झिस्टन्शिअल प्रश्न पडत. आपण असे अर्धवट माणूस अन् अर्धवट कोंबडा 'का?' आहोत हा प्रश्न त्याला खायचा. टेक्निकली तो इच्छाधारी नागीण वगैरेसारखा इच्छाधारी कोंबडा नव्हता; कारण इच्छाधारी म्हणजे इच्छा असेल तेव्हा आपल्याला रूप बदलता येतं. जयंतला मनात खूप इच्छा आणूनही मनानेच कोंबडा बनता यायचं नाही. ती शी आल्यासारखी प्रोसेस होती. हळूहळू त्याला आतून कळायचं की आता ते घडणार आहे. पुढच्या तीन-चार रात्रींत तो कोंबडा बनायचा. कधी एखाद्या तासासाठी. तर कधी एक संपूर्ण दिवस. या सगळ्या प्रोसेसवर त्याचा कन्ट्रोल नव्हता. मुळात हे सर्व त्याच्यासोबत का घडतंय हेच त्याला कळलं नव्हतं. एखाद्या मोहिमेवर निघून याचा शोध घ्यावा, असं त्याला बिलकूल वाटत नव्हतं. फॉर सिक्युरिटी रीझन्स.

पण, जेव्हापासून त्याच्या कर्वेनगरच्या घरासमोर एकाने मोमोजची गाडी सुरू केली तेव्हापासून त्याला फारच त्रास होऊ लागला. चिकनच्या वासाने रात्री डोकं भणभण करू लागायचं. तंदुरी मोमो, शेजवान मोमो, तळलेले मोमो इ. वेगवेगळे वास त्याच्या नाकावाटे थेट छातीत शिरायचे आणि त्याला छातीत दुखायचं. तो घराबाहेर जाणं टाळायचा. बायको काय झालं विचारायची. बाम लावून द्यायची; पण त्याला काहीच सांगता यायचं नाही.

एका रात्री विशेष काहीच घडलं नव्हतं, तरीही त्याने एक मोठा निर्णय घेतला. कोंबडा बनल्यावर शूर बनायचं. स्वतःला बेडरूममध्ये किंवा बाथरूममध्ये कोंडून घ्यायचं नाही. एकदम शूर बनायचं. त्याने मनाशी ठरवलं, पुढच्या वेळी कोंबडा बनल्यावर थेट गच्चीवर जाऊन फिरून यायचं.

मोठं धाडस होतं ते.

कोंबडा बनल्यावर गच्चीवर एकट्याने जाणं या विचारानेच तो थरारला. 'देवाने आपल्याला असं बनवण्यामागे काहीतरी कारण असेल. कदाचित कोंबड्याच्या डोळ्यांनी जग पाहून मी ज्ञानप्राप्ती करून घ्यावी, असं देवाला वाटलं असेल. कदाचित मला ज्ञानप्राप्ती होऊन मी नव्या युगाचा बुद्ध बनू शकतो. स्वतःचा नवा धर्म काढू शकतो. कदाचित विष्णूचा शेवटचा अवतार मीच असू शकतो. कुक्कुटावतार.' त्याच्या कल्पनेलाही पंख होते. कल्पनेत बराच उडायचा तो.

जयंत जाधव त्यानंतर पंधरा दिवसांनी कोंबडा बनला.

भल्या मध्यरात्री कोंबडा बनल्यावर नेहमीप्रमाणे त्याने आरशात स्वतःला पाहिलं. एक लाल-जांभळा गावठी कोंबडा होता तो. डोक्यावर मोठा तुर्रा असलेला एक रुबाबदार कोंबडा. माणूस म्हणून तो एवढा देखणा नव्हता. कोंबड्याच्या रूपात नेहमीप्रमाणे स्वतःला आरशात न्याहाळल्यावर जयंत जाधवला नेहमीप्रमाणेच छान वाटलं. स्वतःला या रुबाबदार रूपात पाहून तो मनोमन खूश व्हायचा. बाजूच्या खोलीत जाऊन त्याने बायको गाढ झोपलेली आहे हे व्यवस्थित चेक केलं. आता गच्चीवर जाण्यासाठी तो तयार होता.

गच्चीवर जाणं मोठं दिव्य होतं. कर्वेनगरच्या त्याच्या नवीन बिल्डिंगमध्ये त्याचा फ्लॅट तिसऱ्या मजल्यावर होता. पूर्ण बिल्डिंग आठमजली होती. पुढचे पाच मजले चढून जाणं फार अवघड काम होतं. जयंत जाधव मानवाला झपाझप पायऱ्या चढून जाणं सोपं होतं; पण जयंत जाधव कोंबड्याला फडफडत त्या पायऱ्या चढायच्या होत्या. कोंबडा म्हणून एवढा व्यायाम करायची त्याला बिलकूल सवय नव्हती. तरी त्याने ते दिव्य पार पाडलं. चक्क पाच मजले चढून, फडफडून गच्चीत गेल्यावर त्याला गच्चीचा दरवाजा बंद दिसला. दरवाज्याची कडी चोचीचे टोचे मारत उघडणं फारच अवघड होतं. अन् तो दमलाही होता. जयंत तासभर तसाच बसून राहिला.

त्याच्या मनात वेगवेगळे एक्झिस्टन्शिअल विचार येत राहिले. आपण गच्चीवर का जातोय? गच्चीवर जाऊन आपल्याला नक्की काय मिळणार? कोंबड्याच्या रूपात कर्वेनगर आणि वारजे एरिया पाहून काय हशील होणार? वेगवेगळे विचार त्याच्या मनात येत राहिले. विचारमालिकेतला सर्वांत शेवटचा विचार असा आला की आपल्याकडे एक सुपरपॉवर असूनही, आपण आयुष्यभर विचारच करत राहिलोय. देवाने आपल्याला असं का बनवलं असावं याचा शोध घ्यायची वेळ हीच

आहे. शेवटचा विचार जिव्हारी लागल्यावर अंड्यावर बसलेल्या कोंबडीसारखा निवांत बसलेला जयंत उठला; पण त्याला आता आळस आला होता. पायऱ्या उतरत पुन्हा आपल्या घराकडे जाऊ लागला.

तोच गच्चीचा दरवाजा स्वर्गाचा दरवाजा उघडावा तसा उघडला गेला. स्वर्गातले देव त्या दरवाज्यातून बाहेर यावेत तसे काही टीशर्ट घातलेले तर काही उघडेच मानवी जीव दरवाज्यातून आत आले. चौघं होते ते. गच्चीवरून स्लोमोशनमध्ये हसत हसत दरवाजा उघडून आत आले. जयंतची पिसं उभी राहिली. दोन तरुण आणि दोन तरुणी रात्री गच्चीवर गांजा पिऊन खाली जायला निघाले होते. चौघं हिंदीतून एकमेकांशी बोलत होते. जयंतने अंग चोरून घेतलं. कोपऱ्यात स्वतःचं शरीर निश्चल ठेवलं. चौघंही हसत-खिदळत, धडपडत खाली जाऊ लागले.

''ब्रो.. जस्ट लूक ॲट धिस.. वाद्दाफक?''

एकजण येऊन जयंतजवळ थांबला.

''ये तो मुर्गा है बेन्चो!''

दुसरा मुलगा लाल डोळ्यांनी जयंतकडे पाहत म्हणाला.

दोन्ही मुलीदेखील जयंतजवळ आल्या. त्यापैकी एक जरा क्रिएटिव्ह वाटत होती; कारण तिच्या डोक्यात एक क्रिएटिव्ह आयडिया आली.

''गाइज, इसको उपर लेके चलते है ना! मुर्गेको जॉइन्ट सूंघाते है। व्हॉट से? इट विल बी फन.''

जयंतच्या अंगावरची पिसं उभी राहिली. कोंबडा असताना त्याच्यासोबत अतिप्रसंग व्हायचा प्रसंग आला होता; पण ती पोरं फारच दमलेली होती. कोंबडा घेऊन पुन्हा गच्चीवर जाऊन, गांजाची नवीन बिडी बनवायचा त्यांना कंटाळा आला होता. दुसऱ्या दिवशी ऑफिसला हिंजवडीच्या ट्रॅफिकमधून वाट काढण्याबद्दल त्यांनी तिथेच पायऱ्यावर उभं राहून तब्बल दहा मिनिटं चर्चा केली. नशेत चौघंही गच्चीच्या पायऱ्यांवर सापडलेल्या कोंबड्याबद्दल विसरून गेले. गप्पा मारत मारत चौघं खाली निघून गेले आणि जयंतचा जीव भांड्यात पडला.

स्वर्गाचा दरवाजा उघडलेला होता.

जयंत पंख फडफडवत आणि उड्या मारत दरवाज्यातून पलीकडे गेला आणि गच्चीवर पोचला. आयुष्यभराचं सर्व धाडस छोट्याशा काळजात आणून भिंतीवर उडी घेतली आणि शांतपणे रात्रीच्या अंधारात झगमगणारं शहर पाहू लागला. बॅटमॅन रात्रीच्या वेळी एखाद्या टॉवरवर चढून जसा अख्ख्या गॉथम शहरावर नजर ठेवून असतो तसा जयंत जाधव कर्वे रस्ता, डहाणूकर कॉलनी बघू लागला. विशेष वेगळं काही दिसत नव्हतं तरी त्याला मजा वाटू लागली. आयुष्यातली सर्वांत मोठी मोहीम फत्ते झाली होती. आपले छोटेसे गोलाकार डोळे मिचमिचवत जयंत जाधव पुन्हा खोल विचारात शिरला. प्रत्येक वेळी कोंबडा बनल्यावर 'हा स्पेशल विचार' त्याच्या मनाला शिवायचाच.

'मी खरोखर कोंबडा झालोय का? की हे सर्व माझ्या मनाचे खेळ आहेत? एवढ्या वर्षांपासून मला हे भास तर होत नसतील? मला काही सायकॉलॉजिकल आजार तर नसेल? मी खरोखर कोंबडा न बनता फक्त कोंबडा बनलोय, असा मनाचा समज करून घेतो का? शाळेत असताना मुख्याध्यापकांनी सर्वांच्या समोर स्टेजवर मला कोंबडा बनवलं होतं. साधी चुळबुळ करायची एवढी शिक्षा? असो. पण, त्या दिवसापासूनच माझा आत्मविश्वास हरपला. होय, तेव्हापासूनच मी कोंबडा बनू लागलो. मी खरोखरचा कोंबडा नाहीये. हे सगळे माझ्या मनाचे खेळ आहेत. इथे मी मूर्खासारखा गच्चीच्या भिंतीवर येऊन बसलोय स्वतःला कोंबडा समजून. श्या.. माझ्यासारखा होपलेस मीच!'

त्याचा आत्मविश्वास पुन्हा एकदा तळाशी पोचला. महापालिकेने जे अंडरग्राउंड पदपथ बनवलेत तेवढा खालच्या पातळीवर पोचला त्याचा कॉन्फिडन्स. जयंत जाधवला आयुष्यच निरर्थक वाटू लागलं.

जाऊ द्या. एवढा फालतूपणा केला बस झालं. सरळ खाली घरी जाऊ. या वेळचा ॲटॅक संपेस्तोवर घरात कुठंतरी लपून बसू. मग बायकोच्या कुशीत जाऊन झोपू. एवढा मूर्खपणा पुन्हा करायचा नाही.

जयंत घरी जायला मागे वळला.

तोच दबा धरून बसलेल्या एका मांजराने झडप घातली. जयंतची मान मांजराने आपल्या दातात पकडली. जयंत जाधव केकाटू लागला. कोंबड भाषेत 'सोड मला, सोड मला' म्हणू लागला. मांजराने त्याला हिसका दिला. जयंतने आपले पंख फडफडवले. मांजराची पकड ढिली झाली. जयंतला त्या क्षणी आपलं सर्व आयुष्य आठवलं. आता जर मांजराने आपल्याला खाऊन टाकलं तर आपल्या आयुष्याला काहीच अर्थ उरणार नाही, असा त्याने विचार केला. मांजर यम बनून त्याच्या मानेभोवती पकड घट्ट करतच होतं.

मी सगळं आयुष्य घाबरत जगलो. मी एवढा घाबरलो की स्वतःलाच शिक्षा देऊ लागलो. हळूहळू कोंबडा बनलो. आता जर मी इथून सुटलो तर कधीच आयुष्य घाबरत घाबरत जगणार नाही. संकटांना सामोरा जाईन. सेफ गेम खेळताना आयुष्यच विसरून गेलो मी. देवा, फक्त चान्स दे रे बाबा! प्लीज, या यममांजरापासून वाचव.'

त्या एकाच क्षणात दोन घटना घडल्या.

एका घटनेत मांजराने जयंत जाधवला खाऊन टाकलं. आरामात त्याचा चट्टामट्टा करून आपल्या मालकाकडे, सोसायटीच्या वॉचमनकडे झोपायला गेलं.

दुसऱ्या अल्टरनेट घटनेत मांजराच्या जबड्यातून जयंत जाधव हलकेच सुटला; पण तो गच्चीवरून थेट फडफडत आठ मजले खाली येऊन पडला.

एका घटनेत जयंत जाधव मांजराच्या पोटात मेला. दुसऱ्या घटनेत जयंत जाधव आठ मजले खाली पडूनही जगला. जयंत जाधव या कथेचा वाचक असता तर त्याला तो मेलेला जास्त आवडलं असतं; पण आपलं नाव बाय डिफॉल्ट जयंत जाधव नसल्यामुळे आपण दुसरी टाइमलाइन घेऊन पुढे जाऊ.

जयंत जाधव हवेत गडगडत खाली आला, जमिनीवर आपटला; पण त्याला काही विशेष असा मुका मार लागला नाही. त्याच वेळी तिथून एक कोंबड्यांनी भरलेला मिनी ट्रक चालला होता. रस्त्यावर पडलेला गावठी कोंबडा पाहून ड्रायव्हरने ब्रेक मारला. ट्रक थांबला. ड्रायव्हरने स्वतः उतरून जयंत जाधवला उचललं, त्याची नीट चाचपणी केली. आयताच एक गावठी पीस त्याला फुकट मिळाला होता. जयंत जाधव पुन्हा नवीन संकटात सापडला. त्याने खूप आरडाओरडा केला; पण या वेळी त्याचं काहीही चाललं नाही. ड्रायव्हरने मागची ताडपत्री उघडून आत एका पिंजऱ्यात जयंतला लोटलं. पिंजरा बंद केला. ट्रक चालू लागला.

झटापटीत मूर्च्छित झालेला जयंत जागा झाला तेव्हा त्याच्या आसपास अंधारच अंधार होता. संपूर्ण जग थरथर हलत होतं. त्याला नंतर

रिअलाइझ झालं की जग हलत नसून, फक्त ट्रक व्हायब्रेट होतोय. जयंत पंख फडफडवू लागला. सुटण्याचा आटोकाट प्रयत्न करू लागला; पण आता काहीही शक्य नव्हतं. त्याची तडफड थांबली. तेवढ्यात त्या स्वर्गीय आवाजानं त्याची कर्णपटले तृप्त झाली.

''पंख फडफडवू नकोस. आता शेवटचं उड्डाण भरायचंय.. देवाच्या दिशेने...''

आवाज ज्या दिशेने आला त्या दिशेला एक अतीव सुंदर चेहरा होता.

पाणीदार लालसर डोळे, पिवळी-लाल चोच, पांढरी काया, भरीव छाती, शुभ्र चमकदार पिसे. एक ब्रॉयलर. जयंत तिच्याकडे पाहतच राहिला.

''शांत हो. आपलं मन शांत कर. माझ्याजवळ ये. मी तुझ्या हृदयाला गोंजारून बघते.''

जयंतला नीट काही कळलं नाही. तो तिच्याजवळ गेला. तिने आपला पंख उचलला आणि जयंतच्या पंखाखाली घातला. जयंतला तिच्या पंखाची ऊब जाणवू लागली. त्याचं मन शांत होत होतं. जयंतची नजर तिच्या पायाकडे गेली.

'अगं तुझा पाय.. रक्त येतंय त्यातून.. आता?'

'श्श...' तिने आपली मान जयंतच्या मानेवर ठेवली. 'आता त्या गोष्टींचा विचार करायचा नाही. निरर्थक आहे ते. मला तुझ्याबद्दल सांग.'

जयंत शांतपणे स्वतःबद्दल सांगू लागला. ट्रकमधल्या बाकी कोंबड्या झोपलेल्या होत्या, यामुळे कोणी त्याची बडबड फार काही ऐकली नाही. जयंतने तो इथपर्यंत कसा आला हे सगळं सांगून टाकलं. अगदी लहानपणापासून सर्वकाही. त्याच्या आयुष्यातली सर्व दुःखे, सर्व आनंद, सर्व मिस्टरी, सर्व ज्ञान तिच्यासमोर रितं करून टाकलं. कोंबड्यांच्या भाषेत तो कोणाशी पहिल्यांदाच संवाद साधतोय हेही तो विसरून गेला. तिनेही तिचं नाव सांगितलं. मानवी भाषेत ते उच्चार नाहीत हे जयंतच्या लक्षात आलं. तिनेही तिच्याबद्दल सर्व सांगितलं. एका सामान्य पोल्ट्री फार्ममध्ये गेले अडीच महिने तिची वाढ कशी झाली हे तिने शॉर्टमध्ये सांगितलं; पण तिचं मन, भावना सर्वकाही जयंतकडे इन डिटेल ओतून दिलं. जयंत तिला म्हणाला,

''मी तयार आहे तुझ्यासोबतच मरायला.''

''ते होईलच; पण आता सोबत जगून तर घेऊ.''

''जर मी पुन्हा माझ्या ओरिजिनल फॉर्ममध्ये, म्हणजे मानवी रूपात आलो तर तुला नक्की सोडविन. आय थिंक, माझं प्रेम बसलंय तुझ्यावर. मी प्रेमात पडलोय.''

तिने जयंतच्या डोळ्यांत पाहून विचारलं,

''तुझा ओरिजिनल फॉर्म मानव आहे हे कशावरून? कदाचित तुझं मूळ रूप एका कोंबड्याचं आहे. आणि अधूनअधून तू मानव बनत असतोस..''

जयंतने त्यावर फार विचार केला.

तो एक 'इच्छाधारी मानव' आहे हा विचार त्याला जास्त आवडला नाही, म्हणून त्याने ते मान्य केलं नाही.

सकाळचा पहिला प्रकाश येईपर्यंत दोघंही एकमेकांवर प्रेम करत राहिले. सकाळचा उजेड ताडपत्रीतून ट्रकमध्ये आला तसं ड्रायव्हर माणसाने ताडपत्री उघडली.

डोळे चोळत चोळत कोंबड्या व्यवस्थित आहेत का हे नीट चेक करू लागला.

''ओय.. तुझ्या मायला.. तू कोन हय रे?''

ड्रायव्हरने जयंतला हटकलं. जयंत मानवी रूपात आला होता.

''तू आत कसा आला बे? गांजाडी हाए का? ऊठ,'' ड्रायव्हर नागड्या जयंतला जवळपास ओढूनच काढू लागला.

जयंत मार खात खात ट्रकमध्ये असलेल्या कोंबड्यांत आपल्या प्रेयसीला शोधू लागला. दोनशे सारख्या दिसणाऱ्या ब्रॉयलर कोंबड्यांमध्ये पाय तुटलेली ती कोंबडी शोधून काढणं फार अवघड होतं. जयंत ट्रकबाहेर ढकलला गेला.

ड्रायव्हर शिव्या घालत पुन्हा समोर जाऊन बसला. ट्रक सुरू झाला.

प्रेयसी त्या ट्रकमधून निघाली होती.

ट्रक तिला मृत्यूकडे घेऊन जात होता.


नागडा जयंत त्या ट्रकमागे वेड्यासारखा धावत होता.

त्याला त्या ट्रकमागे धावत असताना आपला पुनर्जन्म झाल्यासारखं वाटलं.

★

**sumedhkumaringle@gmail.com**

नवं कोरं



रत्नाकर मतकरींचा परीसस्पर्श लाभलेल्या अनोख्या कथा...

कृष्णाकन्या

लेखक : रत्नाकर मतकरी

पृष्ठसंख्या : १४०
किंमत : ₹१७०

Book Available




जारणमारण..करणी..
भूतबाधा..बळी देणे..
अशा अघोरी विद्येभोवती विणलेल्या कथानकातून गूढ, अज्ञेय विश्वात घेऊन जाणाऱ्या, वाचकाला शेवटपर्यंत खिळवून ठेवणाऱ्या तीन लघुकादंबऱ्यांचा संग्रह...

आगमन

लेखक : सुनील दांडेकर
पृष्ठसंख्या: १९२।किंमत: ₹२६०

Book Available

## नवं कोरं




एका सच्च्या, प्रामाणिक पुरातत्त्ववेत्त्याचं निखळ, निर्भय आत्मकथन...

लेखक : के.के.मुहम्मद
अनुवाद : डॉ. सुलभा कोरे


पृष्ठसंख्या : २८६
किंमत : ₹ ३५०

### मी भारतीय

पुरातन वारशाला नवसंजीवन देणाऱ्या अवलियाची आत्मकथा

Book Available

---




नामधारी पद मानल्या जाणाऱ्या 'राज्यपाल'पदाला नवा आयाम देत सर्वसामान्यांसाठी राजभवनाचे दरवाजे खुले करणारा किरण बेदी यांचा प्रेरणादायी प्रवास


लेखक : शिवानी अरोरा
अनुवाद : सुप्रिया वकील

### करुणेचा स्वर

पृष्ठसंख्या : १३६
किंमत : ₹ १९५

Book Available

---




शेअरबाजारात अभूतपूर्व यश मिळवणाऱ्या वॉरन बफेच्या गुरूची विलक्षण यशोगाथा...

लेखक : अतुल कहाते


### बेंजामिन ग्रॅहॅम

वॉरन बफेला गुंतवणुकीचा मंत्र देणारा गुरू

पृष्ठसंख्या : १२८
किंमत : ₹ १७०

Book Available

---




कुशल नेतृत्वाचा आदर्श वस्तुपाठ

लेखक: डॉनल्ड टी. फिलिप्स
अनुवाद: गौरी गाडेकर

### लिंकन ऑन लीडरशिप

खडतर काळासाठी एक्झिक्युटिव्ह डावपेच

पृष्ठसंख्या : १२६
किंमत : ₹ २२०

## नवं कोरं




दुसऱ्या महायुद्धात जपानी सैनिकांच्या तावडीत सापडलेल्या मित्र राष्ट्रांच्या सैनिकांच्या अनन्वित छळाचं, दास्यत्वाचं आणि लाचारीचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे एरिक लोमॅक्स. त्याच्या अंतर्मनात उच्छाद मांडणाऱ्या पाशवी सैनिकांना तो तब्बल पन्नास वर्षांनी भेटला आणि त्याला आपल्या छळाचा जाब विचारता आला.

एका असीम धैर्याचा धगधगता आविष्कार असणारी सत्यकथा..


# द रेल्वेमॅन

लेखक : एरिक लोमॅक्स
अनुवाद : उदय बुवा

पृष्ठसंख्या : २६४
किंमत : ₹ ३५०

Book Available

---




दुसऱ्या महायुद्धातला वेदनादायी विध्वंस आणि त्यात होरपळून निघालेल्या एका चिमुकलीच्या संघर्षाची सत्यकथा...


# द कट आउट गर्ल

लेखक : बार्ट व्हॅन एस
अनुवाद : दीपक कुळकर्णी

पृष्ठसंख्या : २६४
किंमत : ₹ ३२०

Book Available

---




महायुद्धाची कारणे, वर्णन आणि परिणामांचा सार्थ आढावा घेणारी महायुद्धाची सर्वंकष गाथा


# पहिले जागतिक महायुद्ध

लेखक : स. शं. देसाई

पृष्ठसंख्या : १४८
किंमत : ₹ १८०

Book Available

---





महायुद्धाची कारणे, वर्णन आणि परिणामांचा सार्थ आढावा घेणारी महायुद्धाची सर्वंकष गाथा

# दुसरे जागतिक महायुद्ध

लेखक : स. शं. देसाई

पृष्ठसंख्या : १६४
किंमत : ₹ २००

Book Available



## वैराग्य

जाळीदार उन्हं पडतायत मजारीवर,
धुपाचा सुगंध आहे,
नुकताच कुणी चादरही चढवून गेलाय.
मजार साधीसुधी नाही.
शैलीदार प्रासादाच्या मधोमध खोवलेली,
खानदानी.
कशाचाच सुतराम स्पर्श
निद्रिस्त शवाला न होऊ देणारी
मजारीची चिरेबंद बांधणी.

संध्याकाळी एक कबुतर
अलगद उतरतं मजारीवर.
धूप निवलेला असतो,
वाऱ्यानं धूळ उडत असते,
फुलाला निर्माल्याची पक्वता आलेली असते,
अशात ते चोच घासत राहतं नक्षीदार टवक्याला,
गुटर्गुम गुटर्गुम आवाज करीत राहतं मधूनच,
अन् अचानक पुन्हा
जाऊन बसतं वळचणीला.

इतकंच,
मजारीतलं निद्रिस्त वैराग्य
मंद हसत कूस बदलतं.

**– अक्षय शिंपी**
**akshayshimpi51@gmail.com**

## झाडांची किमोथेरपी

लोकं अर्थ लावतायेत हजारो वर्षांच्या लिपीचा
पण झाडाच्या हिरव्या लिपीचा अर्थ लावता आला नाही कुणालाही.
रेल्वेच्या प्रवासात मागे पळणारी झाडं
खरंतर पुढे पळत होती, आपल्याही.
परतीच्या प्रवासाला झाडांची किमोथेरपी बघत
हाही दिवस जातो केशकिंगची
जाहिरात बघत; निष्पर्ण.

सागाचं फर्निचर घरात असताना
हिरव्या जागी आपण हिरवे नसतो.
खूप पिळवटून आलं सरदार सरोवरच्या मागनं
एकशे ब्याऐंशी मीटरचं दुःख बघताना,
धरणाच्या पाण्याला रक्ताचा वास
नर्मदे! ही केवढी परिक्रमा...?

आयाने तोडली असेल नसेल फांदी
चुलीतला अंगार एका भाकरीत विझला काय ?
अंगणातला फुलांचा सडा बघून आयाची बाभळ
गुलमोहराला बहर तिच्यामुळे होता.
चिमणीच्या घरांचा गाझा होण्याआधी
घरातल्या चिमणीची वात मंद करताना
मरून गेला पाड्यावरचा कवी

**– कमलेश महाले**
**kamleshmahale16699@gmail.com**



## बाई...

१.
तू उद्याचा दिवस उजाडण्याची वाट
पाहत आहेस,
तुझ्या मोबाइलमधला डाटा
संपला आहे,
तो आजची रात्र घालवण्याचा
आटापिटा करत आहे,
त्याच्या घरातला आटा संपला आहे...

२
या ओढतात संसाराचा गाडा,
घाण्याला जुंपलेल्या बैलासारखा,
खरंतर पुरुषापेक्षा बाईच
जास्त सहनशील आणि सशक्त असते,
पण ही व्यवस्था करत आली आहे
तिचं मानसिक खच्चीकरण
मग उगाच चालवतात योजना
महिला सशक्तीकरण...

३
वीटभट्टीवर राबणाऱ्या मजुराची
नजर जाते विठ्ठलाच्या चेहऱ्याआधी
तो उभा असलेल्या विटेवर..

४
शेतात जाताना बाप आधीच
पुढे निघून जायचा
आणि आई मागून
बापाची भाकर घेऊन जायची..
एक दिवस आई जायच्या
आत बाप झाडाला लटकलेला
होता,
मला भीती वाटते की आई
तिथंही बापाची भाकर
घेऊन जायला नको...



५
मी कामावर असताना एक जण
निरोप घेऊन आला,
तुझ्या आईची तब्येत सीरिअस आहे लवकर चल,
तिला एकदा तुझ्याशी बोलायचं आहे,
पण, मी घरी जायच्या
आधीच आई निघून गेली होती...
आता मलाही आईसोबत
एकदा बोलायचं आहे,
मी कुणाजवळ निरोप पाठवू?

६
म्हणू दे जगाला मला अश्लील ,
म्हणू दे शौकीन, म्हणू दे रंगीन...
पेठेत जाऊन मला ऐकवायच्यायत वेश्यांना
त्यांच्यावर केलेल्या कविता,
मी कशाला त्यांना त्या आठ बाय सहाच्या खोलीत
नागडं होत असताना,
सभ्यतेचा बुरखा ओढून बसलेल्यांसमोर
मंचावर नागडं करू?
त्यांना ऐकवेन आईवर केलेल्या कविता,
ज्या ऐकून त्यांना पाझर फुटून
त्यांचं आईपण जागं होऊन
मला दिलेली 'ए चिकने'ची हाक बदलेल
'ये... माझ्या शोनुल्या'मध्ये...
आणि ऐकवेन प्रेयसीवर रचलेली शायरी
जी ऐकून 'जल्दी काम कर और निकल' न म्हणता
'मुकर्रर' म्हणून, डोक्यावर हात ठेवून त्यांनी म्हणावं,
'ये कवि.... स्साले..
खुदा तेरी कलम और
तुम्हारी जोडी सदा सलामत रक्खे...'

७
बाप मह्या सावकाराकडून कर्ज काढून म्होट्या आशेनं वावर पेरते,
मागच्या वरसाचा तोटा इसरून यंदाच्या वरसाचा हिसाब बोटावरच लावते!
पीकपाणी चांगलं दिसाय लागलं की त्याले खतपाणी घाला लागते,
पण पैसा नसते म्हणून तो आजचं उद्यावर अन् उद्याचं परवावर लोटते!
खताचे भाव पाहून तो तोंडात बोट घालते,
शेवटी मायच म्हाई तिची पोथ काढून देते,
काळजावर दगड ठेऊन तो मुकाट्यानं पोथ सोनाराजवड गहाण ठेवते!
यंदा पीकपाणी चांगलं होईन तवा त्याच पोथीत दोन मनी जास्तीचे करीन असं तो म्हणते,
याच आशेवर माय मग म्हाई तहान-भूक इसरून दिन-रात त्या वावरात राबते!
दिसभर रक्ताचं पाणी करून सांजच्याले अनवाणी पायानंच घरी येते,
डोखं तिचं दुखते तवा डोख्याले पदर बांधते, पाय दुखता तवा तिच्याच हातानं दाबते!
दरसालापेक्षा पीक यंदा जास्त होईन असं गोड सपन ते पायते,
पण काचाची नाजूक वस्तू हातातून पडल्यावर जशी टचकन फुटते!
तसं माह्या मायचं ते सपन तुटते
अन माह्या बापाच्या डोयाइले धार लागते,
जसं आजपर्यंत होत आलं तसं या सालीही होते,
तोंडाशी आलेला घास निसर्ग हिसकते,
पीक जास्त होनं तर दूरच हो, पीक घरात न येता वावरातच सडते,
'याजासकट कर्जाची परतफेड करा' असं टोमणं सावकार बापाजवड लावते!
तिकडे मायची पोथ मह्या सोनाराच्या दुकानातच गंज लागोस्तर गहाण रायते,
त्या पोथीत दोन मनी जास्तीचे करीन म्हणणारा बापच मह्या ते पोथ मोडताना ढसाढसा रडते!
'निसर्गानं साथ सोडली तरी सरकार आपलं हाय तवा फिकीर नाय'
अस तो म्हणते,
पण सरकारबी दुष्काळाची पाहणी करताना इमानातूनच करते!
ज्या वावरात माय-बाप अक्खं आयुष्य वेचते तरी त्याच वावरातला काटा त्याच्या पायात घुसते,
मंग सांगा राव, या सरकारले इमानातून कसं इतकं बरं स्पष्ट दिसते?
सरकारी अधिकाऱ्याइले त्याईच सरकार पोसते,
अन् जगाचा पोशिंदा असलेला बाप मह्या त्या सरकारले पोसते!
तरी त्याच्याच वाटेवर का इतकं संकट येते,
ज्या झाडाले त्यानं पाणी घातलं त्यालेच काहून फाशी घियाची
त्याच्यावर येळ येते?

**– सौरभ हिवराळे**
**hiwralesaurabh358@gmail.com**


## देव्हारा



सनातनी सोवळेबाजीचा
जेव्हा आई करते
उदो उदो
आणि
दिवसरात्र करत राहते
जप
डझनभर देवांच्या नावाचा
तेव्हा कीव येते मला
तिच्या
बाईपणाची
दररोज न चुकता
जेव्हा ती
वाचत असते,
तिच्या देव्हाऱ्यातल्या देवापुढ्यात
सप्तशती स्तोत्र,
महालक्ष्मीची कहाणी,
शिवलीलामृत,
अथर्वशीर्ष
वगैरे
त्या वेळी
मी
पुढ्यात घेऊन
बसलेली असते
माझा स्वतंत्र देव्हारा
ज्यात असतात
सिमॉन द बुव्हा,
व्हर्जिनिया वुल्फ,
ताराबाई शिंदे,
महात्मा फुले,
सावित्रीबाई,
बाबासाहेब आंबेडकर,
आणि
गांधीसुद्धा

आई पोथ्या वाचत असताना
मध्येच
तिच्या अंगात येते
कुणीतरी देवी
आणि
बोलू लागते काहीबाही
अशा वेळी वाटतं
आई वाचत असलेल्या
सगळ्या पोथ्यांची पानं फाडून
टाकून द्यावीत
देव्हाऱ्यासमोरच्याच धुपारतीत
आणि
द्यावी तिला
माझ्या पुढ्यातील
पुस्तकं
आणि सांगावं
रोज
वाचायला
मग बघूयात
येते का
तिच्या अंगात
सिमॉन, सावित्री
वगैरे...!

**– रोहिणी कदम**
**rokadam24@gmail.com**



## व्हायरल

आता जग होतंय व्हायरल
क्षणात एका क्लिकमध्ये
मेसेज पळताहेत इकडून तिकडे
द्वेष घेऊन
सुरा, तलवार, बंदूक वाट बघताहेत मेसेजची
धर्म, जाती उभ्या आहेत
चौकाचौकात
गल्लीगल्लीत
डोक्यात दंगल घेऊन
अशात
गल्लीच्या त्या टोकाला
रंग नसलेल्या घरात
कुणीतरी करतंय प्रार्थना
फाटलेल्या छतातून
आभाळाकडे बघत...
व्हायरल झालेल्या झुंडीला
आपलं
घर न दिसावं म्हणून...

**– सागर चव्हाण**
**sagarchavhan002@gmail.com**

## ओरखडा

पावसाळी ढग दूर निघून गेल्यावर
पोरकं झालेल्या आकाशाच्या तुकड्यासारखं वाटणं वगैरे ठीके
पण ते पोरकेपण रक्तामध्ये पसरत जाऊन
विनाकारण सहानुभूतीची फुलं सतत कुणीतरी
उधळत राहावीत मातीवर
हे असं वाटणं तितकंसं बरोबर नाहीये
आणि नव्हतंही कधी
कदाचित, नसेलही
कारण मातीचा आपला वेगळा संघर्ष असतो भेगांशी
आणि ढगांचा विजांशी
त्यात मध्यस्थी करणारी झाडं होऊ नये आपण

आपण आपल्या ओरखड्यावर मलम शोधावं
किंवा नवीन ओरखड्यासाठी तयार राहावं
हे इतकंच काय ते होऊ शकतं आपल्याने

**– विशाखा विश्वनाथ**
**roopakkala@gmail.com**





# एकशे पंचवीस रुपयांची दिवाळी

त्या रात्री आई तू मांडला होतास
कुठला तरी हिशोब
म्हणालीस,
''फटाके नको मागू यंदा, जा शांतपणे झोप.''
तू मात्र उपसत राहिलीस,
देव्हाऱ्याचा ड्रॉव्हर, डाळीचे डबे, आणखीही काही...
चाचपलीस पुस्तके, स्वामींचा ग्रंथ, कृष्णाची मूर्ती
काही बॅगा, कपाटाचा लॉकर,
मध्येच मला सरकवून
गादीचा कोपराही केलास वर

उशिराच कधीतरी पप्पाही आले
झोपेतच पाहिलं होतं मी,
त्यांच्याही चेहऱ्यावर घामासोबत
चिकटलेले नकार काही...
दोघांत मिळून दिव्याखाली तू
पुन्हा हिशोब गिरवला होतास,
जाग मला आली तेव्हा
केसांतून हात फिरवला होतास...

सकाळी शाळेत जातानाच
मी तुझ्या हातात दिला एक कागद
वाचता-वाचताच रडत तू मला
जवळ घेतलेस अलगद
त्यात मी केला होता हिशोब
यंदाच्या दिवाळीचा
१००-२०० ग्रॅमचे जिन्नस,
शून्य फटाके, जुनेच कपडे
एकूण एकशे पंचवीस रुपयांचा...

एका अजब समाधानाने
तू माझ्याकडे पाहत राहिलीस
माझ्यात काही भेटल्यागत
मला चाचपत राहिलीस
म्हणालीस मला,
'' या देव्हाऱ्यातील एखादं चरित्र
तुला नाही समजलं तरी चालणार आहे
पण तुला, ती कालची रात्र समजली
तेवढं मला पुरेसं आहे... माझ्यासाठी...

**– मेघांत (प्रवीण खांबल)**
**pravinkhambal14@gmail.com**

चिवड्याचं चुकतं गणित
चकली टाकते मान
करंजीचा उकळत्या तेलात
तुटतो नेमका कान
लाडू रुसून होतो टणक
शेव मऊसूत



दिवाळसणाच्या फराळाशी
जमत नाही का सूत?


# रुचिरा

श्रीमती कमलाबाई ओगले

भाग १ व २

सुगरण 'रुचिरा'चा घ्या एकदा सल्ला
रोजचा स्वयंपाकही होईल दिवाळसणासारखा..


५३वी आवृत्ती




पृष्ठसंख्या : ३७६ । किंमत : ₹२७५

Book Available


२३वी आवृत्ती




पृष्ठसंख्या : ३५६ । किंमत : ₹२७५

Book Available

## नवं कोरं




राजर्षी शाहू महाराजांची कारकीर्द आणि त्यांच्या कार्याच्या ऐतिहासिक विश्लेषणावर अधिक भर देणारे शाहूचरित्र


### ॥ समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती ॥

संपादक : डॉ. जयसिंगराव पवार

पृष्ठसंख्या : ५३२
किंमत : ₹ ६९५

Book Available

---




क्रांतिसिंह नाना पाटील यांचे जीवन, कार्य, त्यांची भाषणे व लेख तसेच आठवणी यांवर आधारित ग्रंथ...


### क्रांतिसिंह नाना पाटील

संपादक : डॉ. जयसिंगराव पवार

पृष्ठसंख्या : ८१२
किंमत : ₹ ९९५

Book Available

---




शिवाजीराजे, संभाजीराजे, राजर्षी शाहू, राजाराम महाराज, ताराबाई इ. ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचा आणि तत्कालीन इतिहासाचा अभ्यासपूर्ण वेध घेणाऱ्या लेखांचं संकलन-संपादन


### वेध अमुच्या इतिहासाचा

संपादक : डॉ. मंजुश्री पवार / डॉ. अवनीश पाटील

पृष्ठसंख्या : ५५६
किंमत : ₹ ६९५

Book Available

---




छत्रपती संभाजीराजांच्या पराक्रमाचे, शौर्याचे, राष्ट्रनिष्ठेचे आणि त्यांच्या हृदयस्थ जखमांचे दर्शन घडवत त्यांची प्रतिमा उजळ करणारा ग्रंथ

### छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ

संपादक : डॉ. जयसिंगराव पवार

पृष्ठसंख्या : १०१२
किंमत : ₹ १२००

Book Available



# पुस्तकाच्या पानांतून...

कधी इथल्या मातीतलं अस्सल,
तर कधी देशोदेशीच्या संस्कृतीचं प्रतिबिंब असणारं अनुवादित,
वाचणाऱ्या प्रत्येकाचं आयुष्य समृद्ध करणारं साहित्य
आमच्या माध्यमातून आपल्या भेटीस येत राहिलं आहे...
येत राहील...
कोरोना काळातील अडथळ्यांची शर्यत पार करून
ही नवी पुस्तकं यावर्षी येत आहेत आपल्या भेटीस...
या पुस्तकांच्या पानातला हा अर्क...

मी भारतीय

कर
हर
मैदान
फ़तेह

वज़ीर

विटामिन ज़िन्दगी


फॅक्टरी गर्ल्स

कारट मॅटर्स

खाकी फाइल्स

# कर हर मैदान फ़तेह

**विश्वास नांगरे पाटील**



निवड झाल्यापासूनच घरात माझ्या लग्नाची चर्चा सुरू झाली होती. आमदार- खासदारांपासून उद्योगपतींपर्यंतच्या मुलींचे प्रस्ताव येऊ लागले होते. भुरळ पाडतील अशा आमिषवजा हुंड्याच्या ऑफर दिल्या जात होत्या. साहजिकच गावातल्या तात्यांच्या मित्रांनी त्यांचे कान फुंकण्याचा प्रयत्न केला. त्यांना अशी सुवर्णसंधी पुन्हा येणे नाही, असे निक्षून बजावले. 'आत्ताच हात मारा आबा, परत पोरगा हातातून निघून जाईल.' पण मी ठामपणे माझा निर्णय घरात सांगितला होता. काही झाले तरी मी हुंडा घेणार नाही. उलट ज्या सेवेत मी चाललो आहे, तिथे मला या व अशा प्रवृत्तींविरुद्ध तर लढायचे आहे. तात्यांचा माझ्यावर पूर्ण विश्वास होता, त्यामुळे मित्रांच्या सांगण्याने त्यांची चलबिचल झाली नाही. मी सुट्टीवर येणार हे माहीत असल्याने, तात्यांनी संभावित चार-पाच स्थळांची माहिती घेऊन ठेवली होती. साधारणपणे या दहा दिवसांत चार-पाच मुली पाहून एक स्थळ ठरवयाचेच आणि सुपारी फोडण्याचा मुहूर्त साधायचा, असा बेत होता.

माझे आत्तेभाऊ तानाजी जाधव हे स्थळांच्या पडताळणीचे काम करायचे. तानाजी अण्णा आमच्या भागातले मोठे कंत्राटदार, त्यामुळे त्यांची कमाण्डर जीप माझ्या दिमतीला तयार असायची. सर्वानुमते पहिल्यांदा कोल्हापूरचे स्थळ पाहायला जायचा बेत ठरला. सकाळी एका साखर कारखानदाराची लेक पाहण्याची आणि सायंकाळी एका कार्यकारी अभियंत्याची मुलगी पाहण्याची तयारी होती. मी गावातले काही मित्र सोबत घेतले होते. मी त्यावेळची फॅशन असणारा नाना स्टाईलचा पठाणी पोशाख घातला होता. पोलीस अधिकारी झालो होतो, म्हणून पीळ बसतील अशा मिशा वाढवल्या होत्या. मिशांना तलवारीसारखा शेप राहावा आणि पीळ खाली येऊ नये, म्हणून तूप लावून पीळ दिला. मसुरीवरून येताना आणलेला रेबॅनचा टिपिकल पोलिसी स्टाईलचा गॉगल चढवला. मुलगी पाहायला जाणार, म्हणून आईने तिच्याजवळची दोन तोळ्यांची सोन्याची चेन घालायला दिली. पावलागणिक कराकरा वाजणारी कोल्हापुरी पायताणं पायांत घातली. शरीरयष्टी कृश, त्यात असा पेहराव, त्यामुळे मी बऱ्यापैकी गावगुंड दिसत होतो; पण कोल्हापूरच्या लोकांवर असेच इम्प्रेशन मारायचे असते, असे माझे गावाकडचे सोबती सांगत होते. कोल्हापूरकरांना कसा रांगडा, मर्द मराठा वाटला पाहिजे आमचा साहेब, असे मला हरभऱ्याच्या झाडावर चढवणे सुरू होते. मोठमोठ्या गप्पांचा फड रंगवत आम्ही कोल्हापूरला पोहोचलो.

साखरसम्राटांच्या वाड्यावर आमचे जंगी स्वागत झाले. थोड्याफार गप्पा झाल्या. ज्येष्ठांनी बढाया सुरू केल्या. मिशांवर ताव मारत पोह्यांचा फडशा पडला. मग मुख्य कार्यक्रम मुलगी पाहण्याचा! नऊवारी साडीत स्वतःला सावरत मुलगी चहा घेऊन बाहेर आली. तिला नखशिखान्त सोन्याच्या दागिन्यांनी मढवलेले होते. डोक्यावर पदर आणि कोल्हापुरी आब स्पष्ट दिसत होता. मला बायोडेटामध्ये सांगितलेल्या माहितीत मुलगी पदवीधर असल्याचे लिहिले होते; पण उंची जास्त असूनही चेहऱ्यावरून तिचे वय कमी वाटत होते. ज्येष्ठांनी काही प्रश्न विचारले. आणि मग सर्वांच्या मतानुसार मुलामुलीला वेगळे बोलण्याची संधी दिली गेली. मी अस्वस्थ होतो; कारण मला थोडी गडबड वाटत होती. मी पहिला प्रश्न विचारला, ''तुम्ही खरंच कॉलेज पूर्ण केलं आहे का?'' तिने नकारार्थी मान हलवली. ''मी आता एफवायबीएला आहे आणि माझं वय एकोणीस आहे. आणि मला आत्ताच नाही लग्न करायचं,'' असे तिने स्पष्ट सांगितले. माझी त्रेधातिरपीट उडाली. तिने तर अश्रू ढाळायला सुरुवात केली होती. ''मला आई आणि पप्पांना नाही सोडून जायचं. आणि सगळे म्हणतात, तुमचं तर कुठं भी पोस्टिंग होतं!'' तिच्या या आर्जवी शब्दांवरून माझ्या पूर्ण लक्षात आले होते की, घरच्यांच्या आग्रहाखातर हिला बोहल्यावर जबरदस्ती चढवलं जातंय. मी तिला ''काळजी करू नको, मी पसंती कळवणार नाही,'' असे आश्वस्त करून बाहेर पडलो. माझे मित्र मिश्कीलपणे माझ्या चेहऱ्याकडे पाहत होते. तांबडा-पांढराचा बेत करूनच जा, असा आग्रह पाहुणे करीत होते; पण मी सर्वांना निघण्याचा इशारा केला. असा झाला माझ्या आयुष्यातील मुलगी पाहण्याचा पहिला कार्यक्रम. अनपेक्षित एन्काऊंटरमुळे माझा मूड पुरता ऑफ झाला होता. ओपल हॉटेलमध्ये जाऊन सर्वांनी मटणावर ताव मारला.

सायंकाळपर्यंत वाट न पाहता कार्यकारी अभियंत्यांच्या घरी दुपारीच स्थळ पाहायला जायचे ठरवले. त्या वेळी मोबाइल नव्हते. अण्णांनी लँडलाइनवर फोन केले; पण प्रस्तावित पाहुण्यांचा फोन लागतच नव्हता. आमच्याकडे पत्ता होता, त्यामुळे आम्ही पूर्वकल्पना न देता घरी जायचा निर्णय घेतला. एका आलिशान बंगल्यासमोर आमची जीप थांबली. आतून कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज आला. आम्ही कम्पाउंडच्या गेटमधून थोडे सावधपणे आत घुसलो. मटणानंतर येणारी सुस्ती आणि सकाळच्या पाणउताऱ्यानंतर चेहऱ्यावरचा नूर पालटला होता. आळसावलेले आम्ही त्या बंगल्यासमोर कुठूनतरी आलेल्या निर्वासितांसारखे भासत होतो. बंगल्याची बेल वाजवली. काही क्षणांनंतर दरवाजामागून आवाज आला, ''कोण पाहिजे?'' तानाजी अण्णा म्हणाले, ''अहो, आम्ही आपल्या घरी पाहुणे म्हणून आलोय.'' दरवाजा उघडला गेला. अण्णांचे बोलणे वधुपित्याशीच झाले होते, त्याशिवाय आम्ही सायंकाळच्या ऐवजी दुपारी आल्याने गोंधळ उडाला होता. घरात आम्ही येणार असल्याची कल्पनाच नव्हती. घरातील काम करणाऱ्या मावशीने आम्हाला सांगितले, ''आमच्याकडे कोणी पाव्हणंबिव्हनं येणार नाहीत.'' तरीही अण्णा म्हणाले, ''अहो, आमच्या साहेबांसाठी हे स्थळ पाहायला आम्ही आलो आहोत.'' तर ती छपाक मावशी म्हणाली, ''कुठला बरं यातला तुमचा साहेब?'' मी हे ऐकून ओशाळलो होतो. कोणत्याही अँगलने मी साहेबासारखा दिसत नव्हतो. मला पाहून मावशीने नाक मुरडले आणि म्हणाली, ''अहो, तुम्ही कसले साहेब म्हणताय, सांजच्याला आमच्या ताईसाहेबांना बघायला कलेक्टर साहेब येणार हाईत! अहो, घरची सगळी झोपल्याती. तुम्ही का माझं डोस्कं खाताय. सायेब घरात नायतं. तुम्ही सायेब असताना या बरं!'' आता मात्र आम्ही भलते खजील झालो होतो.

तेवढ्यात गेटमधून एक आलिशान कार आत आली. त्यातून कार्यकारी अभियंता साहेब उतरले. अण्णांच्या चेहऱ्यावर हसू तरळले. ''अहो साहेब, नमस्कार!'' त्या साहेबांच्या चेहऱ्यावर आश्चर्य दिसले, ''अहो अण्णासाहेब, तुम्ही सायंकाळी येणार होता ना? सॉरी हं, मी जरा आमच्या फार्म हाउसवर गेलो होतो.'' त्यांनी उतरताच मावशीला दरडावले, ''अगं, पाहुण्यांना दरवाजात कुठं ताटकळत ठेवलं आहेस.

मॅडमला बोलाव. कोकरूडचे पाहुणे आलेत.'' मावशी घाबरली होती. ती लगबगीने आत गेली. आम्ही आत जाऊन बसलो. माझा चेहरा उतरलेलाच होता. मावशीने माझा रुबाब पुरता उतरवला होता. वधुपित्याची आमच्या अचानक भेटीने तारांबळ उडाली होती. त्यांनी ड्रायव्हरला बाजारात कोल्ड्रिंक आणायला पाठवले. फोन करून त्यांच्या नात्यातल्या एका आमदार महोदयांना बोलवून घेतले. सकाळसारख्याच मोठ्या गप्पा सुरू झाल्या. सायंकाळी येणारा मीच तो कलेक्टर मुलगा हे कळल्यावर त्या घरात काय करू आणि काय नको, असे झाले होते. मुलीची आई जातीनिशी मला काय खायला आवडेल, याची चौकशी करीत होती. अण्णांचा भाव वधारला होता. मावशी काही घेऊन आली की तिला ते हेकटपणे बोलत होते. त्यांचा राग आणि तोरा पाहून मावशी भेदरलेल्या मांजरीसारखी खाण्याचे पदार्थ ठेवून पळ काढायची. प्रचलित प्रथेप्रमाणे मुलगी चहा घेऊन आली; मात्र ही मुलगी मॉडर्न पेहरावात होती. साडी परिधान केली होती; पण तिने तिचे लांबसडक केस मोकळे सोडले होते. उंच, गोरीपान आणि सडपातळ शरीरयष्टी आणि देहबोलीत आत्मविश्वास होता. वडीलधाऱ्यांच्या प्रश्नांना तिने बेधडक उत्तरे दिली. बोली कोल्हापुरी असली, तरी स्पष्ट आणि शुद्ध होती. सगळ्यांच्या चेहऱ्यावर समाधान तरळत होते. मला मात्र थोडा कॉम्प्लेक्स आलाच होता. पहिल्या मजल्यावर आम्हा दोघांना मोकळ्या गप्पा मारण्यासाठी बोलावण्यात आले. आम्हा दोघांना एसी रूममध्ये बसवून मुलीच्या वडलांनी दरवाजा ओढून घेतला. एसी असूनही मला थोडा घाम फुटला होताच. सकाळपासून खूपदा वापरलेला आणि चुरगळलेला माझा हातरुमाल मी काढला आणि चेहऱ्यावरून फिरवला. तिची नजर चुकवून मिशीला थोडा पीळ मारण्याचा प्रयत्न केला. थोडे उसने अवसान आणले आणि धाडस करून प्रश्न विचारला,

''आपली हॉबी काय आहे बरं?''

माझा प्रश्न गिरवलेला आणि ठोकळ स्वरूपाचा होता; पण तिचे उत्तर थोडे विस्मयकारक होते, ''मला घोड्यावर रपेट मारायला आवडतं आणि बुलेट चालवायलाही आवडतं.'' विणकाम, बागकाम, गायन, वाचन असे काहीतरी मला अपेक्षित होते; पण ही स्वारी तर खूपच डॅशिंग होती.

''गेल्या वर्षी राजाराम रायफल्सनं घेतलेल्या एक्वेस्टरीन स्पर्धेत टेन्ट पेगिंगमध्ये मला चॅम्पियनशिप मिळाली होती. बाय द वे, मी घोड्यांना सहज कन्ट्रोल करू शकते.'' हे प्रश्नाचे उत्तर होते की इशारा, मला समजले नव्हते. घोडा इतका छान कन्ट्रोल करते, तर नवरा किती सहज काबूत आणू शकेल, हा त्या रूपगर्वितेचा अहं तिच्या बोलण्यातून अप्रत्यक्षपणे व्यक्त झाला होता.

''तुमची हरकत नसेल, तर मी तुम्हाला एक जोक सांगू का?'' तिने संवादाची कमान आपल्या हाती घेतली होती.

''हो हो, सांगा ना.'' आता पुढे ही बाई काय बॉम्बशेल टाकणार, याची मला धाकधूक लागली.

''आपल्याकडचा नाही बरं हा किस्सा आणि तुम्ही फार सीरिअसली घेऊ नका. एका जोडप्यानं आपल्या लग्नाचा २५वा वाढदिवस साजरा केला. हे जोडपं २५ वर्षांत एकदाही भांडलं नाही, अशी त्यांची ख्याती होती. अशा या आदर्श जोडप्याच्या सुखी जीवनाचं रहस्य जाणून घेण्यासाठी मुलाखत घ्यायला मोठ्या उत्सुकतेनं मीडियाचे लोक पण आले होते. त्यांनी पतिदेवांना प्रश्न विचारला, 'सर, पत्नीशी एकदाही न भांडता २५ वर्षं यशस्वी संसार करणं, हे अविश्वसनीय आहे. कसं बरं तुम्ही हे शक्य केलंत?''

पतिदेव उत्तरले, 'आम्ही लग्नापासून आजपर्यंत सुखी जोडपं आहोत, याचं श्रेय आमच्या माथेरानच्या हनिमूनला जातं. तिथं आम्ही दोघांनी घोड्याची रपेट मारायचं ठरवलं. मी ज्या घोड्यावर बसलो होतो, तो चांगला होता. शिस्तीत चालत होता; पण माझी पत्नी ज्या घोड्यावर बसली होती, तो मध्येच उधळत होता. अचानक त्यानं नको त्या ठिकाणी उडी मारली आणि माझ्या पत्नीला खाली पाडलं. तिला थोडं खरचटलं; पण उभं राहून तिनं घोड्याला थोडं थापडलं आणि म्हणाली, 'ही तुझी पहिली चूक बरं का!' तिनं पुन्हा लगाम खेचून घोड्यावर मांड टाकली आणि आमची रपेट सुरू राहिली; पण पुन्हा तसंच घडलं आणि विनाकारण घोड्यानं उसळी मारली आणि माझ्या पत्नीला खाली पाडलं. ती काही न बोलता उठली. तिच्या बॅगपॅकमधून पिस्तूल काढलं आणि घोड्याला थेट गोळ्या घालून ठार मारलं. हे पाहून मला शॉक बसला आणि मी माझ्या बायकोवर ओरडलो, 'क्रूर बाई, तू हे का केलंस? तू सायको आणि दुष्ट आहेस! तू मुक्या प्राण्याला मारलंस. कुठं हे पाप फेडशील?' माझ्या पत्नीनं माझ्याकडे थंड आणि करारी नजरेनं पाहिलं आणि म्हणाली, 'ही तुझी पहिली चूक होती!' आणि मग काय, त्यानंतर न भांडता सुखानं संसार आपसूकच झाला!'' हा किस्सा होता, जोक होता की मला दिलेला सज्जड, गर्भित दम? माझे धाबेच दणाणले होते.

तिने स्पष्टपणे समारोप केला, ''काही पुरुष हे विनाकारण आपल्या पीळदार मिशा आणि कराकरा वाजणाऱ्या कोल्हापुरी चपला घालून मर्दुमकीचा आव आणतात, असं नाही का तुम्हाला वाटत? आम्ही मुलीही बाहेरून नाजूक दिसत असलो, तरी शरीर आणि मनानं खंबीर आणि कणखर असू शकतो बरं. माझ्या बाबांनी मला मुलगा म्हणूनच मोठं केलं आहे. मी जशी आहे, ते तुम्हाला माहीत असणं मला महत्त्वाचं वाटतं. मी शाहू राजांच्या नगरीत वाढले आहे. महाराणी ताराबाईंचा आमचा वारसा आहे. चूल आणि मूल या चौकटीत मला अडकायचं नाही. मला माझं स्वतःचं व्यक्तिमत्त्व घडवायचं आहे. तुम्ही आय.पी.एस. अधिकारी झाला आहात. बाबा म्हणाले, शेतकऱ्यांच्या घरातून अशी मोठ्या पदावर गेलेली मुलं ही आदर्श असतात. म्हणून मी या सगळ्या प्रथेप्रमाणे होणाऱ्या सोपस्कारांसाठी तयार झाले. खरं तर मला माझं पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करायचं आहे आणि हॉर्स रायडिंगच्या तयारीसाठी इंग्लंडला जायचं आहे. तुम्हाला जर अशी मुलगी पत्नी म्हणून चालत असेल, तरच प्लीज हो म्हणा. माझे बाबा खूप आग्रही आहेत. तुमचं स्थळ हातचं जाऊ द्यायचं नाही, हा त्यांनी अट्टाहास धरला आहे. तुम्हाला मला अजून काही विचारायचं आहे का?''

माझी गात्रे सुन्न पडली होती. मी या वीरांगनेसाठी योग्य वर नाही, याची मला पुरती जाणीव झाली होती. मी मानेनेच नकार दिला आणि विचारांच्या भोवऱ्यात फिरत जिन्यावरून खाली उतरलो. बैठकीत सगळ्यांचे चेहरे खुलले होते. जणू काही सुपारी फोडायची तयारी झाली होती. मी अण्णांना नंतर आरामात निरोप कळवू, असे सांगून कोल्हापूरचा निरोप घेतला. जीप पंचगंगेचा पूल ओलांडून कोकरूडच्या रस्त्याला लागली. दोन्ही बाजूंनी घनदाट झाडी होती आणि उसाचे विस्तीर्ण मळे

होते. मध्येच तांबड्या रंगाचा नदीचा प्रवाह अधेमध्ये डोकावून जायचा. ‘काय भाऊसाहेब, घंटी वाजली का? पोरगी पसंद पडली रे पडली! आता बँड, बाजा, बारातची तयारी सुरू करायला हवी,’ अशा मित्रांच्या वल्गना सुरू झाल्या होत्या. मी शांत होतो. माझ्या मनात मात्र विचारांनी थैमान घातले होते. सुरुवातीला दोन्ही ठिकाणी असा नकारात्मक अनुभव आल्याने त्रागा आणि चिडचिड झाली होती; पण आता त्याची जागा प्रगल्भ मानसिकतेने घेतली होती. एका शेलमध्ये गोशा वातावरणात वाढलेली षोडशवयीन कन्या आणि दुसऱ्या शेलमध्ये समान संस्कृतीतील मात्र शिक्षणामुळे सक्षम झालेल्या स्वतंत्र विचाराची तरुणी! दोघींच्या अल्पकाळ झालेल्या भेटीने विवाहसंस्था आणि कुटुंबव्यवस्थेबाबत माझा दृष्टिकोन बदलला होता. स्त्रीची जीवनकहाणी आणि तिची भारतीय उतरंडीतील घुसमट मला जाणवत होती. महात्मा जोतिबा फुल्यांनी एकोणिसाव्या शतकात एक स्वप्न पाहिले. ‘विद्येविना मती गेली. मतीविना नीती गेली. नीतीविना गती गेली. गतीविना वित्त गेले. वित्ताविना शूद्र खचले. हे सगळे अनर्थ एका अविद्येने केले.’ मीही खरे तर शूद्रच. एका शेतकऱ्याच्या घरी जन्म घेऊन लोकशाही व्यवस्थेत समान न्यायाच्या तत्त्वाने शिक्षणाची कवाडे उघडी झाल्यामुळे इथपर्यंत पोहोचलो होतो. राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्था येनकेन प्रकारे महिलांना शिक्षण आणि सन्मान देऊन सक्षम आणि सबळ करण्यासाठी कटिबद्ध आहे; पण आमची प्रतिगामी मानसिकता आमच्या मुलींना अडगळीत टाकते आहे का? त्यांना स्वप्न पाहण्यापासून आणि त्यांच्या स्वप्नांना साकार करण्यापासून रोखते आहे का? त्यांना किचनपासून बेडरूमपर्यंतच्या विश्वातच मुक्त संचार करण्याचे बंधन घालते आहे का? अंधार दूर करण्याचे प्रयत्न सर्व स्तरांतून सुरू आहेत; पण प्रकाश का तेवढ्या झपाट्याने पसरत नाही?

ज्यांना स्वप्ने साकारता आली, चौकट मोडता आली, त्या महिला तेवढ्याच पोटतिडिकीने आपल्या भगिनींच्या उत्थानासाठी झटत आहेत का? मुळापासून याचा विचार होणे आवश्यक आहे. आपण कितीही शिकलो, तरी दुसऱ्या मुलीचे स्वागत मनापासून करतो का? आपण कितीही समानतेच्या बाता मारल्या, तरी ऐन घडीला मुलामुलींमध्ये द्वंद्व उभे ठाकले की नकळत मुलाच्या पारड्यात थोडे अधिक वजन टाकतो. मुलामुलींमध्ये उच्च दर्जाचे शिक्षण कोणाला द्यायचे, असा प्रश्न उभा राहतो, त्या वेळी वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी असे बिरुद असणाऱ्या लेकालाच प्राथमिकता मिळते. अजूनही ग्रामीण भारतात अगदी बाराव्या-तेराव्या वर्षीच मुलगी वयात आली असे अनुमान काढले जाते आणि ती लग्नासाठी व प्रजननासाठी योग्य झाली आहे, असे समजले जाते. असन्तसं तिचे लग्नच करायचे आहे, तर कशाला तिच्या शिक्षणावर पैका खर्च करायचा, या मानसिकतेचा पगडा असतो. मुले मात्र या वयात बालपणीची मौज करत असतात, बैलाच्या खोंडासारखी उधळत असतात. घरात आणि समाजात मुलींच्या मूलभूत अधिकारांना मात्र नाकारले जाते. तिच्यावर अनेक अमानवी बंधने लादली जातात. अगदी आरोग्याच्या साध्या सुविधांपासून त्यांना वंचित ठेवले जाते. ‘टॉयलेट’ किंवा ‘पॅडमॅन’ यांसारखे सामाजिक चित्रपट सद्य:स्थितीतील महिलांच्या मानसिक आणि भावनिक कोंडमाऱ्याचे वास्तव चित्रण करतात. प्रातःकाळी उघड्यावर प्रातर्विधीला गेलेल्या मुलींना कितीतरी लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये भक्ष्य व्हावे लागते.

*‘जिच्या हाती पाळण्याची दोरी । ती जगाते उद्धारी ॥’*
*जगातील सगळ्यात सुंदर निर्मिती म्हणजे स्त्री!*

आणि दुर्दैवाने आज तिलाच तिच्या गर्भरूपात, बालरूपात जीवघेण्या संकटांना सामोरे जावे लागते. मुलींमध्ये जग बदलण्याची शक्ती आहे; कारण त्या आदिशक्तीचेच रूप आहेत. गेल्या दोन शतकांत एवढी प्रगती होऊनही आज तिला शाळेत पाऊल ठेवताना शेकडो अडचणींचा सामना करावा लागत आहे. आपल्या देशातील दीड कोटी मुलींना साध्या लिहिण्यावाचण्याची किंवा अक्षरओळख होण्याची संधीसुद्धा मिळत नाही. बालविवाह, शरीर व्यापार, लैंगिक अत्याचारातील पीडित मुलींचे प्रश्न तर हृदय पिळवटून टाकणारे आहेत. या भीषण सामाजिक समस्येवर उपाय शोधण्यासाठी, क्रांतिकारी बदल होण्यासाठी वणवा भडकवण्याची गरज आहे. त्यासाठी मानसिकता आणि दृष्टिकोन बदलण्यासाठी घराघरांतून, शाळामहाविद्यालयांतून, शासकीय व्यवस्थेतून संततधार इंधन मिळाले पाहिजे; तरच सावित्रीच्या लेकी निर्भय आणि निष्पक्ष भारतात मोकळा श्वास घेऊ शकतील. मुलीचे शिक्षण हे फक्त कुटुंबालाच नव्हे; तर समाजाला, अर्थव्यवस्थेला सक्षम करीत असते. ज्याला आवाज नाही, त्याला आवाज देणे ही आपली प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. पंचगंगेच्या आणि वारणेच्या काठाने दौडणाऱ्या रस्त्यावर माझे मनही हेलकावे खात प्रवास करत होते. प्रवासात लागणाऱ्या ठेचांनीच तर शहाणपण येत असते.

आणि हो, दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे माझ्या दिसण्याच्या आणि वागण्याबाबतच्या भ्रामक कल्पना! वर्षानुवर्षे असणारा, खोल अंतर्मनात लपलेला पुरुषी अहंकार आणि त्याला जिरवण्यात व हरवण्यात मला आलेले अपयश! तो आज त्या युवतीला कसा बरे स्पष्टपणे जाणवला आणि तिच्या स्पष्ट बोलण्याने मात्र आत-बाहेर सुरुंग लागले होते. माझ्या एवढ्या शिक्षण आणि प्रशिक्षणानंतरही तो अहंभाव गोठला कसा नाही? मी अजूनही मास्लोच्या गरजांच्या पहिल्या टप्प्यातच तर नाही ना? मी शरीराची गरज म्हणून विवाह करण्याच्या मानसिकतेत तर नाही ना? असे स्वतःविषयी अनेक प्रश्न घोंगावू लागले. नागरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये आपले सामाजिक भान आणि वागणूक अधिकाधिक सुसंस्कृत आणि प्रगल्भ होत असते. आपल्या अभ्यासाच्या आणि वाचनाच्या प्रक्रियेनेही हेच शहाणपण येत असते. साधनेमुळे प्रेम आणि वासना यांतला फरक कळायला लागतो. कोणत्या ठिकाणी बोलावे, कुठे काय बोलावे आणि काय बोलू नये, हे कळायला लागते. गरिबाच्या आणि भिकाऱ्याच्या रूपात ईश्वर दिसू लागतो. गरजूंना मदत करायला मिळणे, ही ईश्वराने त्याच्या जवळ यायची संधी दिली आहे, असे वाटते. गुन्हेगार गुन्हा का करतो त्याचे कारण शोधणे, हे त्याला शिक्षा देण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे वाटते. धारदार चाकूसुऱ्यांपेक्षा शब्द अधिक तीक्ष्ण असतात, हे समजते. समोरच्याच्या चुकीसाठी क्षमा करण्याची प्रवृत्ती निर्माण होते. वडीलधाऱ्यांच्या सन्मानास पात्र राहावे, हा नियम बनतो. मुक्या प्राण्यांबद्दल दयाभाव आपसूक येतो. सोशल मीडियावरचे जीवन, हसू आणि स्माइली बेगडी आहेत हे जाणवते आणि त्या खोट्या विश्वात जीव

रमत नाही. प्रेमभंग, घटस्फोट, जवळच्याचा मृत्यू असे मोठमोठाले शॉक स्वीकारायची आणि त्यामुळे सगळे काही संपत नाही, अशी मानसिकता तयार होते. या गोष्टी जीवनाच्या इतर गोष्टींप्रमाणे अविभाज्य भाग आहेत, हे जाणवते. इतरांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या यशात समाधान सापडायला लागते. हरल्यावर हाराकिरीचा विचार शिवत पण नाही. जगण्याचे नवे नियम सापडतात, जे जीवनाची उमेद वाढवतात. आयुष्य सुंदर आणि परिपूर्ण व्हायला लागते. नव्या अनुभूती आणि अनुभवांनी ते सजायला सुरुवात होते. थोडक्यात काय, जीवन हे रचनात्मक सेलिब्रेशन बनून जाते.

तर मग हे असे परिवर्तन आणण्यासाठी काय करावे लागेल. असा नानाचा वेष, गॉगल, गळ्यात सोन्याची चेन आणि कराकरा वाजणाऱ्या कोल्हापुरी चपला घालून तो सुसंस्कृतपणा येणार का? बाह्य पेहरावावर सगळेच अवलंबून आहे का? नाही साहेब, त्यासाठी गोऱ्या साहेबानी आणलेले बाह्य संस्कार आणि भारतीय संस्कृतीतील बालवयापासून केल्या जाणाऱ्या सोळा संस्कारांची मन आणि शरीरावर योग्य पखरण केली पाहिजे. सोप्या शब्दांत मॅनर्स आणि एटीकेट्स शिकले पाहिजेत आणि रोजच्या जीवनात सवय लावून त्यांचा अवलंब केला पाहिजे. सूटबूट घालून चांगले शिष्टाचार कमवता येत नाहीत. अब्राहम लिंकनचे प्रसिद्ध वाक्य आहे, 'तुम्ही सर्व लोकांना काही काळासाठी मूर्ख बनवू शकता, काही लोकांना सर्व काळ मूर्ख बनवू शकता; पण तुम्ही सर्व लोकांना सर्व काळ मूर्ख बनवू शकत नाही.' तुम्ही कितीही लाजवाब वेषभूषा केली, तरी तुमचे खरे रूप योग्य वेळी बाहेर येते. या ब्रेकच्या आठवड्यात योगायोगाने घरात दोन मंगलकार्ये होती. शिराळ्याला आत्तेभाऊ विजयकुमारच्या आणि पुण्याला चुलतभाऊ मेजर परागच्या विवाहसमारंभास मला उपस्थिती लावायची होती. या वेळी मी निश्चय केला, अगदी व्यवस्थितपणे सगळे शिष्टाचार सांभाळायचे. अतिशय सभ्य आणि स्मार्ट पेहराव परिधान करायचा, शुद्ध बोली बोलायची आणि मस्त इम्प्रेशन पाडायचे.

विजयकुमारचे लग्न शिराळ्याला पंचायत समितीच्या बहुउद्देशीय कार्यालयात सर्व सोयऱ्यांच्या साक्षीने संपन्न होणार होते. मसुरीला थंडी असल्याने रोज ब्लेझर परिधान करूनच क्लासला हजेरी लावावी लागे. मग शर्टवरती कधी टाय तर शर्टच्या आत मानेभोवती क्रॅवाट स्कार्फही परिधान करायचो. खरेतर पूर्वी कधीही हा गळ्याभोवतीचा स्कार्फ घातला नव्हता. यू.पी.एस.सी. मुलाखतीवेळी पहिल्यांदा टाय घालण्याचा प्रयत्न केला. महत्प्रयासाने हेमंत निंबाळकरने मला स्कार्फची समोसा नॉट बांधायला शिकवले होते; पण तरीही टाय बांधताना गोंधळ उडायचाच. कधी नॉट जमली तर लांबी जास्त व्हायची आणि लांबी जमली की गाठ नीट नसायची. क्रॅवाट स्कार्फ बांधणे तर त्यापेक्षा किचकट होते. क्रॅवाट बांधताना शर्ट आणि मान दोघांची वाट लागायची. त्यामुळे सरळ वेलक्रोने सहज मानेभोवती फिट करता येईल, असे क्रॅवाट खरेदी केले होते. शर्टच्या आत हा स्कार्फ घातला की रुबाबदारपणा यायचा. मानेभोवती ऊब देण्यासोबत चेहऱ्यावरचा कॉन्फिडन्स वाढायचा. विजयकुमार आणि मी शिराळ्याला एकाच वर्गात शिकलो. आमच्या शाळेतल्या मैत्रिणी लग्नात भेटणार, याची उत्सुकता होती. शिवाय आता साहेब झालो होतो, त्यामुळे सगळ्या जणींच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू मी असणार, याची उत्सुकता जास्त होती. म्हणून माझा आवडता फिकट निळ्या रंगाचा शर्ट, त्यावर नेव्ही ब्ल्यू रंगाची पॅन्ट आणि शर्टच्या आत क्रॅवाट म्हणजे तो वेलक्रोचा स्कार्फ असा स्मार्ट ड्रेस घालून जीपमधून विवाहस्थळी पोहोचलो. उंची थोडी अधिक दिसावी म्हणून पायांत नवेकोरे, उंच हिल असणारे बूट घातले. मंगलाष्टका सुरू होणारच होत्या.

मला आलेले पाहताच माईकवरून सूत्रसंचालकाने उद्घोषणा केली आणि स्टेजवर पाचारण करण्यात आले. मी ऐटीत स्टेजवर निघालो; पण घात झाला. गुळगुळीत फरशीवर नवा बूट घसरला. सोबतच्या मित्राने सावरल्याने पडता पडता वाचलो; पण उजवा पाय बेकार मुरगळला होता. सुदैवाने माझी ही फजिती गर्दीमुळे कोणाच्या लक्षात आली नव्हती. मित्राचा हात धरून लंगडत लंगडत स्टेजवर पोहोचलो. स्टेजवर येणाऱ्या प्रत्येकाची माईकवर ओळख करून स्वागत केले जात होते. माझ्या आगमनानंतर सूत्रसंचालकाने घोषणा केली, 'आपले एस.पी.साहेब ट्रेनिंगवरून आले आहेत. त्यांना मानेचा त्रास होत असल्याने यायला थोडा उशीर झाला असावा. मी नगराध्यक्ष साहेबांना त्यांचे स्वागत करण्याची विनंती करतो.'' मी सूत्रसंचालकाला शोधत होतो. मी स्कार्फ गळ्याला बांधला आहे स्टाईल म्हणून, मला मानेचा त्रास नाही. आणि लंगडतो आहे; कारण माझा पाय नुकताच मुरगळला आहे. तेवढ्यात माझा सत्कार करायला नगराध्यक्ष साहेब स्टेजवर आले. त्यांनी मला हार घातला. त्यांना वधू-वरांना शुभेच्छा देण्यासाठी आणि माझ्या निवडीबद्दल कौतुक करण्यासाठी चार शब्द बोलायची विनंती केली गेली होती. त्यांनी सुरुवात केली, ''आमचे नांगरे साहेब हे त्यांची मान दुखत असल्याने तीन महिन्यांतच मध्येच ट्रेनिंग सोडून आलेले दिसत आहेत. ते लंगडत आहेत आणि मानेला पट्टा पण लावला आहे. त्यांना मोठी इजा झालेली दिसते; पण साहेब, तुम्ही कायबी काळजी करू नका. तुम्ही जरी मान मोडल्यानं अधू झाला असला, तरी मी मुख्यमंत्रीच काय, पंतप्रधानांना भेटेन आणि तुमचं ट्रेनिंग वाया जाऊ देणार नाही. आपल्या तालुक्यातील एवढ्या मोठ्या अधिकाऱ्याचं नुकसान होऊ देणार नाही. तुम्ही तुमच्या मानेची काळजी घ्या. आपण बेस्टमधल्या बेस्ट डॉक्टरला सांगून तुमची ट्रीटमेंट करू.'' मी त्यांना सांगण्याचा प्रयत्न करत होतो, 'अहो, मला काहीही झालेलं नाही. मी धडधाकट आहे आणि दहा दिवस सुट्टीवर आलो आहे!' पण बँडबाजाच्या आवाजात त्यांना काही कळत नव्हते. उलटपक्षी ते माझे अजून सांत्वन करण्याचा प्रयत्न करू लागले. मी वैतागून मानेचा स्कार्फ काढून टाकला. माझ्याकडे सगळे सहानुभूतीच्या नजरेने पाहत होते. माझा पोपट झाला होता. तेवढ्यात शुभमंगल सावधान झाले, फटाके वाजले. मी सगळ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यापेक्षा तिथून काढता पाय घेतला. माझ्या मित्रांनी मात्र परतीच्या प्रवासात माझी पुरती टर उडवली.

दोन दिवस गेले आणि असाच दुसरा किस्सा अनुभवायला मिळाला. पुण्याला परागदादाचे लग्न. आर्मीमधल्या अधिकाऱ्यांची मांदियाळी असणार म्हणून अकादमीत नवा शिवलेला, बंद गळ्याचा जोधपुरी सूट चढवला. लग्न पुण्यातील उच्चभ्रू वस्तीतील मंगल कार्यालयात होते. कार्यालयात पाहुणेमंडळी जमली होती. आईने जवळ बोलवून घेतले आणि एक उंच, स्मार्ट, देखणी मुलगी दाखवली. ''ही मुलगी बघ, माझ्या माहेरकडची आहे. चांगली शिकली आहे. तुला पसंत असेल, तर तिच्या वडलांशी बोलते.'' मी नव्या नवरीसारखा लाजून गेलो. आईने माझ्या

नजरेतून पसंती हेरली. काही वेळाने पाहिले, तर आई त्या मुलीशी आणि तिच्या सोबतच्या बाईशी गप्पा मारत होती. मला खात्री होती, ती माझ्याबाबतच बोलत असणार. तेवढ्यात आईने मला बोलवून घेतले. मीपण लगबगीने गेलो. आईने माझी ओळख करून दिली, "हा माझा मुलगा विश्वास. मोठा पोलीस अधिकारी झाला आहे. त्याच्यासाठी मुलगी पाहतोय आम्ही." मी चोरून त्या मुलीकडे पाहिले; पण तिचे लक्ष तिसरीकडेच होते. ती तिच्या आईला म्हणाली, "आई, मला भूक लागली. मी माझ्या मैत्रिणीसोबत जेवायला चालले आहे." आईला नमस्कार करून ती तिथून सटकली. तिने मला कवडीचाही भाव दिला नव्हता. सरळ सरळ दुर्लक्ष केले होते.


मी शिराळ्याच्या अनुभवामुळे थोडा सांभाळूनच होतो. मीही तिथून हळूच तिच्या मागेमागे जेवणाच्या पंगती बसल्या होत्या, त्या हॉलमध्ये गेलो. माझी नजर भिरभिरत त्या मुलीला शोधत होती. पाहतो तर काय, माझा आणि जेवण वाढणाऱ्या वाढप्यांचा पेहराव सारखाच होता. तेही सर्व जण काळ्या जोधपुरी सुटात होते. माझा गुलाबी रंगाचा फेटाही त्यांच्या फेट्याशी मिळताजुळता होता. मला कापरे भरले, आता माझी परत फजिती होणार की काय? तेवढ्यात आमच्या डॉलीचा आवाज आला! ही माझी भाची माझी टर खेचायला तयारच असते. पाहतो तर काय, पंगतीत डॉली मी शोधत असलेल्या मुलीच्या शेजारीच बसली होती. ती मला बघून मोठ्याने ओरडली, "मामा, इकडे इकडे, थोडा मसाले भात आणा की, या जोधपुरीत तुम्ही बेस्ट अगदी त्या वाढप्यांसारखेच डिट्टो दिसताय बरं!" हे ऐकून ती मुलगी पण मान खाली घालून फिदीफिदी हसली. मी गुमान गेलो. भाताची बादली आणली आणि डॉलीला ताटभर मसालेभात वाढला. तेवढ्यात त्या मुलीनेही आवाज दिला, "अहो मामा, माझ्यासाठी पण थोडी कोशिंबीर आणि बटाट्याची भाजी आणता का?" झाले, आमच्या सगळ्या स्वप्नांचा चक्काचूर झाला. एकतर आज वाढपी झालो ठीक आहे; पण माझ्यापेक्षा तीन-चार वर्षे कमी वयाच्या आणि मला पहिल्या नजरेत आवडलेल्या मुलीने मला 'मामा' करून टाकले. सगळा दोष त्या जोधपुरी सुटाचा आणि गुलाबी फेट्याचा होता, का माझ्या शिष्टाचाराबद्दलच्या चुकीच्या निकषांचा? याचा विचार मी सुरू केला.

खरे तर, शिष्टाचार हे सहज श्वासाप्रमाणे, नैसर्गिकपणे तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग झाले पाहिजेत. आधुनिक जीवनपद्धतीमध्ये चांगली नाती, वातावरण, यशस्वी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी या शिष्टाचारांचा निश्चित फायदा होतो. प्रशिक्षणादरम्यान आणि सेवेत आल्यावर माझ्यात जे बदल मी जाणीवपूर्वक घडवून आणले, त्याने माझ्या व्यक्तित्वाची परिभाषा आणि जाणीव अंतर्बाह्य बदलली. त्यासाठी आवश्यक आहे, ते म्हणजे बारकाईने निरीक्षण करणे; आणि चांगल्या गुण आणि सवयींचे अनुकरण करण्याची सवय!

★

**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'कर हर मैदान फ़तेह' या विश्वास नांगरे पाटील लिखित पुस्तकातून)**


नवं कोरं




यशप्राप्तीच्या संगतवार
पायऱ्या सांगणारा आणि
'द मॅजिक ऑफ थिंकिंग बिग'
या लोकप्रिय पुस्तकाचे लेखक
डॉ. डेव्हिड श्वार्ट्झ
यांनी सांगितलेला
खात्रीशीर मार्गदर्शक..

मूळ लेखक -
डॉ.डेव्हिड जे. श्वार्ट्झ
अनुवाद - प्रशांत तळणीकर

पृष्ठसंख्या : २२४
किंमत : ₹२९५

Book Available




पायरी दर पायरी
होईल प्रगती,
यशाची वाट
गवसेल अशी..
डॉ. श्वार्ट्झचं मॅजिक
देईल नवी उर्मी...


मूळ लेखक -
डॉ.डेव्हिड जे. श्वार्ट्झ
अनुवाद - स्नेहलता जोशी

पृष्ठसंख्या : २४८
किंमत : ₹२९५

Book Available

# फॅक्टरी गर्ल्स

**मूळ लेखक : लेस्ली टी छांग**
**अनुवाद : गौरी देशपांडे**



रनिंग शू तयार करण्यासाठी दोनशे जणांचे हात राबलेले असतात. शू बनवण्याच्या प्रक्रियेची सुरुवात 'कटर' या व्यक्तीपासून होते. जिगसॉ पझलप्रमाणे कटर मेश फॅब्रिक शीटवर आखणी करून त्याचे तुकडे कापतो. त्यानंतर स्टिचरचं काम असतं. स्टिचर हे तुकडे ठरल्याप्रमाणे एकत्र करून शूचा वरचा भाग शिवतात. त्यावर प्लॅस्टिक लोगो, शूलेस आयलेट्स लावतात. नंतर सोल-वर्कर सोलचे तुकडे गरम करण्यासाठी आणि एकत्र चिकटवण्यासाठी इन्फ्रारेड ओव्हन्सचा वापर करतात. असेम्बलर वरचा भाग माणसाच्या पायाप्रमाणे दिसणाऱ्या प्लास्टिक मोल्डवर खेचून घेतात. या कामासाठी मोठी ताकद पणाला लावावी लागत असल्याने साधरणतः असेम्बलर पुरुष असतात. बुटाच्या वरचा भाग ते घट्ट बांधतात, तळव्याकडच्या भागावर गोंद लावतात. वरचा आणि तळव्याचा भाग एकत्र घट्ट दाबतात. प्रत्येक शूवर यंत्राद्वारा नव्वद पाउंड दाब टाकला जातो. फिनिशर उरलासुरला कचरा काढून टाकतात आणि काही चुका राहिल्या नाहीत ना हे पाहण्यासाठी प्रत्येक शू तपासतात. योग्य असलेले बुटांचे जोड पुठ्ठ्याच्या खोक्यांमध्ये ठेवतात. ही खोकी एका क्रेटमध्ये ठेवली जातात. एका क्रेटमध्ये दहा खोकी मावतात. तीन दिवसांच्या आत हे क्रेट जगभर पाठवले जातात. प्रत्येक बुटावर 'मेड इन चायना' हा शिक्का असतो.

तुम्ही खेळांसाठीचे शूज वापरत असाल तर ते तोंगकुआनमधल्या युए युएन कारखान्यात तयार केलेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तैवानींच्या मालकीचा हा कारखाना नाइके, अदिदास, रीबॉक या अत्यंत लोकप्रिय आणि प्युमा, ॲसिक्स या लहान ब्रॅंडसाठी उत्पादन करणारा सर्वांत मोठा उत्पादक आहे. या सगळ्या ब्रॅंडनी काही वर्षांपूर्वीच स्वतः उत्पादन करणं बंद केलं आणि अतिशय स्वस्तात निर्मिती करणाऱ्या कारखान्यांकडे उत्पादनाची जबाबदारी सोपवली. युए युएनचं रहस्य होतं ते म्हणजे एकात्मीकरण : कारखान्यात उत्पादन प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याचं नियंत्रण केलं जातं- सुरुवातीच्या डिझाइनपासून गोंद, तळवे, साचे बनवण्यापर्यंत, तसंच कटिंग, स्टीचिंग, तयार उत्पादनावर शेवटचा हात फिरवण्यापर्यंत. जगभरातल्या एक तृतीयांश शूजचे उत्पादन कुआंगतोंग प्रांतात होते. त्यामध्ये युए युएन उत्पादन प्रकल्पाचं योगदान लक्षणीय आहे.

तोंगकुआनमधल्या कारखान्यात सत्तर हजार जण काम करतात. म्हणजे, सॅंटा फे, न्यू मेक्सिकोमधली तीस वर्षांखालची संपूर्ण लोकसंख्या विचारात घ्या आणि ती ॲथलेटिक शूज बनवण्यात गुंतलीय, अशी कल्पना करा. कुंपणाच्या विटांच्या बांधाच्या आतमध्ये कामगार कारखान्याच्या डॉर्ममध्ये झोपायचे, कारखान्याच्या कॅफेटेरियामध्ये खायचे आणि कारखान्यातल्याच दुकानात खरेदी करायचे. कर्मचाऱ्यांच्या लहान मुलांसाठी युए युएनमध्ये किंडरगार्टन चालवलं जातं. तिथे १५० कर्मचारी वर्ग असलेलं रुग्णालय, परफॉर्मन्स थिएटर आणि परफॉर्मन्स ट्रूप आहे, इंग्रजीचे वर्ग आहेत. कारखान्याचा स्वतःचा ऊर्जाप्रकल्प आहे. अग्निशमन विभागही आहे. या कारखान्याकडे अग्निशमनाकरिता वापरली जाणारी सर्वांत उंच शिडी असल्यानं काही वेळा तोंगकुआन शहरात आग विझवण्यासाठी युए युएनकडून शिडी नेली जाते. युए युएन पाण्याच्या बाटल्याही तयार करते. स्थानिक लोक सांगतील, कारखाना स्वतःसाठी अन्नधान्याचंही उत्पादन घेतो; पण त्यात तथ्य नाही. अन्नधान्यासाठी कंपनीनं एकदा त्या परिसरातल्या शेतकऱ्यांशी करार केला होता, इतकंच.

युए युएन कारखाना तरुण स्थलांतरितांना स्थिरता देतो. असेम्ब्ली लाइनमधली नोकरी किरकोळ पगाराची असते. शहरातला किमान पगार म्हणजे सगळ्या कपाती वजा करून महिन्याला साधारण बहात्तर डॉलर. कमी असला तरी दर महिन्याला वेळेवर पगार व्हायचा. रोजच्या कामाची मर्यादा अकरा तास होती, आठवड्याला साठ तास आणि रविवारी सुट्टी. तिथल्या कारखान्यांच्या जगतात हे जरा वेगळंच होतं. काही कारखान्यांमध्ये तर रात्रीच्या वेळीही काम केलं जायचं. युए युएनमधले कामगार खोलीतल्या बंकमध्ये एका खोलीत दहा असे झोपायचे. कारखान्यांतल्या सरासरी संख्येपेक्षाही ही संख्या तुलनेनं बरी होती. इथे नोकरी मिळवून देण्यासाठी तरुणी, उमेदवार मध्यस्थाला शंभर युआन द्यायच्या. तरुणांना त्यापेक्षा कितीतरी पट अधिक रक्कम मोजावी लागायची. युए युएन कारखान्यातल्या कामगारांमध्ये महिलांचं प्रमाण अंदाजे ऐंशी टक्के आहे. त्यातल्या बहुतांश महिला अठरा ते पंचवीस या वयोगटातल्या आहेत.

युए युएन कारखान्यात काम केलेल्या स्थलांतरित कामगारांना त्यानंतर अन्य कारखान्यांतलं काम कदाचित कधीच रुचणार नाही. कालांतरानं एखादी कामगार, आजारी नातेवाइकाला पाहणे, साखरपुड्याचा विषय आटपणे, आराम करणे किंवा बाळाचा जन्म यासाठी नोकरी सोडू शकते आणि नंतर पुन्हा युए युएनमध्ये परतू शकते. एखादा कामगार आपलं सख्खं किंवा चुलत भावंडं, गावातले अन्य ओळखीचे यांना कारखान्यात नोकरीसाठी घेऊन येऊ शकतो आणि ही कंपनीही त्यासाठी प्रोत्साहन देते. एक उदाहरण म्हणजे, या कारखान्यात एकदा एकाच कुटुंबातले दहा जण काम करत होते. कामगारांनी नोकरी सोडण्याचं आणि नवे कामगार येण्याचं प्रमाण इथे प्रचंड आहे. महिन्याला पाच टक्के असेल साधारण! म्हणजे, वर्षाला जवळजवळ निम्मे कामगार बदललेले असतात. पुन्हा याच कारखान्यात परत येण्यासाठी इथली नोकरी तात्पुरती सोडलेले कामगार यामध्ये गृहित धरलेले नाहीत. चौ यिनफंग सन १९९१ मध्ये, वयाच्या सतराव्या वर्षी युए युएनमध्ये दाखल झाली. तिची आणि तिच्या नवऱ्याची ओळख याच कारखान्यात झाली. नंतर तिनं बाळंतपणासाठी कारखान्यात मोठी सुट्टी घेतली. त्यानंतर तिची पुढची वाटचाल बढतीनं झाली. आता ती कारखान्याची प्रमुख म्हणून पंधराशे कामगारांना हाताळते. मला म्हणाली, ''मी निवृत्त होईपर्यंत मला इथेच राहायला आवडेल.'' तिचं वय तीस वर्षं होतं, पण तिचा आवाज एखाद्या प्रौढ स्त्रीच्या कठोर आवाजासारखा होता. वर्षानुवर्षं यंत्रांच्या घरघराटामध्ये ओरडून बोलून युए युएनमधल्या सगळ्या बॉसचा आवाज कर्कश झाला होता, असं तिथले कामगार सांगायचे.

कारखान्यामध्ये नोकरीच्या शिड्या चढत जाणं शक्य होतं. या कारखान्याकडे उत्पादनाची मागणीच इतकी अफाट होती की तिथल्या कामगारांनाच बढती देऊन अधिक जबाबदारी देणं सोयीचं होतं. कंपनीतले जवळजवळ सगळेच व्यवस्थापक, म्हणजे सिंगल लाइनच्या पर्यवेक्षकांपासून ते संपूर्ण कारखान्याच्या प्रमुखांपर्यंत, ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतरित झालेले होते आणि त्यांनी असेम्ब्ली लाइनपासून

सुरुवात केली होती. कारखान्यांच्या विश्वामध्ये अतिशय क्लिष्ट पदस्तर होता.

व्यवस्थापकांचं विभाजन प्रशिक्षणार्थीपासून व्यवस्थापकीय संचालकांपर्यंत एकूण तेरा स्तरांमध्ये केलेलं होतं. ते एकमेकांना नावानं हाक न मारता पदानं हाक मारायचे. एक कॅफेटेरिया केवळ प्रॉडक्शन लाइनच्या प्रमुखांसाठी राखीव असायचा, तर दुसरा पर्यवेक्षकांसाठी असायचा. मूल हा प्रतिष्ठेचा विषय होता : केवळ लाइन लीडर आणि त्यावरच्या पदाच्या लोकांना कारखान्यात विवाहित जोडपं आणि सोबत मूल असं राहता यायचं. सर्वसामान्य कामगार मात्र आपल्या मुलांना गावीच ठेवायचे. त्यांचे आजी-आजोबा त्यांना सांभाळायचे.

कारखान्यातला समाज प्रांतांनुसार विभागला जातो. एकाच प्रांतातले कामगार एकमेकाला धरून असतात. त्यांच्या गावच्या बोलीभाषेत बोलतात. बाहेरच्यांना ही भाषा समजणार नाही. मोठ्या संख्येने स्थलांतरित लोकसंख्या असलेल्या प्रांतांमधल्या कामगारांमध्ये त्यांच्या काउंटीनुसार आणखी गट पडतात. आनहुई, हनान, शानश्यी आणि शानतोंग अशा लगतच्या प्रांतांतून आलेले कामगार एकमेकांशी आपल्या बोलीभाषेत बोलू शकतात. ते एकमेकाला 'हाफ-फेलो प्रोव्हिन्शिअल' म्हणतात. यातून त्यांच्यामध्ये एक प्रकारची आपलेपणाची भावना निर्माण होते. कंपनीही या प्रादेशिक प्रेमाच्या आड येत नाही. म्हणूनच कॅफेटेरियामध्ये कामगारांना त्यांच्या आवडीनुसार हुनान, सछुआन किंवा कँटोनीज पदार्थांचे पर्याय दिले जातात. व्यक्तिमत्त्वातलं ठरावीक वैशिष्ट्य एकाच मातीतल्या कोट्यवधी लोकांमध्ये असू शकतं, असं एखाद्या बॉसला वाटलं तर तो त्या प्रांतातल्या कामगारांवर कायमची फुली मारू शकतो. जसं की, हनानमधले लोक भांडखोर असतात. आनहुईमधले लोक परिश्रमी असतात, पण विश्वासू नसतात, वगैरे!

सुरक्षारक्षकांचा पहारा असलेल्या कारखान्याच्या प्रवेशद्वाराबाहेर पाऊलही न ठेवता इथले कामगार असंख्य दिवस काढू शकतात आणि त्यांच्यातले बरेच जण असं करतातही. बाहेरचं जग लुआन म्हणजे भयानक, कलकलाटाचं आहे, असं त्यांना वाटत असतं. पण युए युएनमधलं अंतर्गत आयुष्यही त्रासदायक असू शकतं. कामगारांकडचे पैसे चोरीला जाणं तर सर्रास घडतं. हे प्रकार रोखण्यासाठीच कामगारांना काम सुरू असताना मध्येच डॉर्ममध्ये जायला मनाई होती. कारखान्याच्या कार्यक्षमतेच्या सोयीसाठी प्रॉडक्शन लाइनमधल्या कामगारांनी एका खोलीत राहणं गरजेचं असायचं. त्यामुळे कारखान्यात काम करताना झालेली भांडणं पुढे डॉर्ममध्येही सुरू ठेवली जायची. युए युएनमध्ये कामगारांच्या टोळ्या होत्या. काही जण पगाराच्या दिवशी कामगारांच्या पैशांवर डल्ला मारायचे, तर काही जण कारखान्यात तयार होणाऱ्या शूजचे भाग चोरायचे. या टोळ्यांची स्वतःची कार्यपद्धती होती. एखादी टोळी कदाचित कारखान्यातल्या शूलेस बाहेर विकायची, तर एखादी टोळी सोलची तस्करी करायची. हे भाग एकत्र करून शूज बनवले जायचे आणि शहरातल्या दुसऱ्या भागातून विकले जायचे. चीनमधल्या बनावटगिरीच्या विश्वाची एक खासीयत आहे- अस्सल भाग बेकायदा जुळवणे. या टोळ्याही प्रांतांच्या पायावर तयार झालेल्या असायच्या. हुनानमधल्या कामगारांची टोळी सर्वांत भीतिदायक होती.

विवाहाशिवाय दिवस राहणं आणि गर्भपात करणं यांइतकेच प्रेमत्रिकोण आणि विवाहबाह्य संबंध हे प्रकारही बोकाळलेले होते. प्रेमात अपयश आल्यामुळे काही वर्षांपूर्वी एका महिलेनं आत्महत्या केली. एकीनं डॉर्ममधल्या बाथरूममध्ये बाळाला जन्म दिला आणि ते बाळ टॉयलेटमध्ये फेकून दिलं. ते बाळ मरण पावलं. बाळाच्या आईला घरी पाठवून देण्यात आलं. 'आमच्या कारखान्यात सत्तर हजार जण आहेत. हे शहरच आहे जणू. कोणत्याही शहरात जे प्रश्न असतात तेच आम्ही कारखान्यातही अनुभवतो', असं युए युएनमध्ये कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षा अधिकारी यांची जबाबदारी असलेल्या ल्युक ली यांनी सांगितलं.

* * *

वीकेण्डला प्रॉडक्शन लाइन बंद असतात. त्यामुळे युए युएनच्या परिसरात वेगळंच वातावरण असतं. आठवडाभर जबाबदारीनं वागणाऱ्या आणि निर्विकार चेहरा घेऊन वावरणाऱ्या तरुणी काहीशा ढिल्या आणि निवांत होतात. एकमेकींच्या हातात हात गुंफून, कारखान्यातल्या ओळखपत्राचा पट्टा गळ्यात अडकवून किंवा बेल्टला जोडलेल्या चेनवर टाकून त्या भटकत असतात. त्यांच्या गावच्या बोलीभाषेत मोठमोठ्यानं गप्पा मारत असतात. अंगप्रदर्शन करत असतात. टँक टॉप किंवा पार्टीसारखा काळा ड्रेस आणि उंच टाचांच्या सँडल हा त्यांचा साधारण पोशाख असतो. काही वेळा मैत्रिणींचा घोळका एकसारखे कपडे घालवून मिरवत असतो. सगळ्या जणी आइस्क्रीम कोनवर ताव मारतात. गवतामध्ये दोघी-तिघींच्या गटानं अनवाणी, बसून मासिकं वाचतात किंवा एकमेकींचा विश्वास संपादन करतात, एकमेकींसोबत उत्तम प्रकारे वेळ घालवतात. काही वेळा एखादी मुलगी शून्यात नजर लावून दिवास्वप्न बघत एकटीच बसलेली असते.

डॉर्ममध्ये खासगी असं काहीच नसतं. शाम्पू लावून धुतलेले केस मुली डॉर्मच्या दारात उभं राहून हातातल्या आरशात बघून विंचरत. वरच्या मजल्यांवर राहणाऱ्या तरुणी बाल्कनीच्या कठ्ठ्यावर रेलून तळमजल्यावर काय-काय चाललंय ते बघायच्या आणि तिथल्या मैत्रिणींना इतक्या वरून आवाज द्यायच्या. उन्हाळ्यातल्या दमट सकाळी मोठ्या आवाजात गाणी सुरू असायची. मुलींनी धुतलेल्या कपड्यांचा वास तिथे दरवळत राहायचा. ब्लीच, साबण, ओलावा असे वास युए युएन कारखान्यातून नेहमीच येत.

जून २००४ मधल्या एका रविवारी सकाळी अनेक तरुणी 'जे' बिल्डिंगमधल्या ८०५ क्रमांकाच्या खोलीत गप्पा मारत पहुडल्या होत्या. खोली पिंजारलेल्या केसांसारखी अस्ताव्यस्त झालेली होती. सकाळी अकरा वाजले तरी मुली निवांत लोळत होत्या.

एका मुलीनं सांगितलं, ''गावाबाहेरच्या एखाद्या पुरुषाशी बोलायचं म्हणजे त्याचं नेमकं वागणं आपल्याला माहीत नसतं. त्याच्या कुटुंबाचीही माहिती नसते.''

गावातून बाहेर पडल्यावर मुलीनं बॉयफ्रेंड निवडला तर गावात तिच्या आई-वडिलांना याचे परिणाम भोगावे लागायचे.

कुणाशी मैत्री केली तर गावी परत गेल्यावर मित्रमंडळींशी संपर्क राहत नाही.

गावी गेल्यानंतर, तिथल्या लोकांना तुमच्याविषयी सगळ्या प्रकारची माहिती असल्याचं लक्षात येईल.

‘जे’८०५ मध्ये दहा मुली एकत्र राहायच्या. आठव्या मजल्यावरची ही खोली जेमतेम दोनशे चौरस फुटांची होती. त्यामध्ये धातूच्या बंक बेडच्या दोन रांगा होत्या. युए युएनमध्ये अन्यत्र यायचा तसा या खोलीतही कपडे धुतल्याचा वास यायचा. प्रत्येक मुलीला एक भिंतीतलं कपाट दिलेलं होतं. त्यामध्ये कपडे, खाऊ, मेक-अप साहित्य, दागिने ठेवलेले असायचे. अमेरिकेतल्या हायस्कूलमधल्या मुलींच्या लॉकरसारखा, या मुलींनी कपाटाचा आतला भाग मासिकात छापून आलेल्या सिनेतारकांच्या फोटोंनी सजवला होता. बंकच्या खालची जागा म्हणजे चपलांचं भांडार होतं. उंच टाचांच्या, स्नीकर, हॅलो किट्टी, फ्लिप-फ्लॉप असे असंख्य प्रकार तिथे असायचे. ‘जे’८०५ खोली एकसारख्या असलेल्या खोल्यांच्या लांबलचक मार्गिकेवर होती. दोन्ही टोकांना बाथरूम आणि शॉवर होते. त्या इमारतीत २००० कामगार राहत होते.

गावी शेतीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा काळ सुरू होता. उन्हाळी पिकं काढण्याची आणि उन्हाळी लागवड करण्याची वेळ आली होती. शू उत्पादनाचं जगभरातलं चक्र मंदावत होतं. ‘जे’८०५ मध्ये राहणाऱ्या मुली युए युएनच्या ८व्या  क्रमांकाच्या कारखान्यात काम करायच्या. हा कारखाना आदिदास आणि सोलोमन यांसाठी शूज बनवायचा. आता त्या दररोज केवळ साडेदहा तास आणि शनिवारी अर्धा किंवा पूर्ण दिवस काम करायच्या. तोंगकुआनमधल्या उत्पादन जगतात हा मंदीचा काळ समजला जायचा. काही मुलींनी सुट्टी घेऊन घरी जाण्याचा विचार केला होता, पण त्या बुटाचा कोणता भाग तयार करण्यासाठी काम करायच्या यावर त्यांचे मार्ग ठरलेले होते. शू सोलसाठी काम करणाऱ्या मुलींना सुट्टी घेणं शक्य होतं. कटर आणि स्टिचरना मात्र कामातून मुभा मिळणारी नव्हती.

सोल विभागात काम करणारी आणि मूळची हनान प्रांतातली च्यीआ च्यीमे खरेदी करून परतली. आल्या आल्या उत्साहानं तिनं सगळी खरेदी दाखवायला सुरुवात केली. ट्रेनमधल्या प्रवासात खायला खाऊ आणि घरच्यांसाठी कॅसेट प्लेअर आणला होता तिनं! तिला एक महिना घरी जाऊन येण्यासाठी नुकतीच सुट्टी मिळाली होती. म्हणाली, ‘‘गेल्या दोन रात्री मी झोपू शकले नाहीये. एकदा घरी जायचं असलं की बाकी काहीही सुचत नाही.’’ तिच्या गोल चेहऱ्यावर नकटं नाक आणि रुंद डोळे उठून दिसायचे. तिच्या बंक बेडवर बसून, पांडाशी खेळत ती बोलत होती.

आनहुइ प्रांतातून आलेली चांग छ्यीएनछ्यीएन ही सर्व तयारी पाहत होती. अंगापिंडानं ती मजबूत होती. रुंद बांधा आणि जराही हास्य नसलेला शिष्ट चेहरा. तिनं जीन्स घातली होती. मनगटावरच्या काळ्या स्पोर्ट्स वॉचमुळे ती आणखी मजबूत दिसत होती. छ्यीएनछ्यीएन म्हणाली, ‘‘घरी गेले की मला टोकाचा कंटाळा येतो. घरात टीव्हीही नाही आणि कॅसेट प्लेअरही नाही. घरातला जवळजवळ प्रत्येक जण ज्याच्या त्याच्या कामासाठी बाहेर गेलेला असतो. दिवसभर मी एकटीच असते.’’

ती पुढे म्हणाली, ‘‘माझी आजी नाश्ता बनवण्यासाठी पहाटेच उठते. खाण्यासाठी मलाही उठवते. अनेकदा तोपर्यंत माझी झोपच उडलेली नसते. मी झोपूनच राहते. मग यावर माझे वडील म्हणतात, ‘तू अजून अंथरुणातच घोरत पडलीयेस? तुझ्या आजीनं केलेला नाश्ता खायलाही तू आलेली नाहीस.’ घरी जो तो नुसता टोमणे मारत असतो.’’

‘‘एकदा घरी गेलो ना की तिथे राहवत नाही.’’ हुनानमधून आलेल्या तिच्या रूममेटला, लि श्यावयानलाही छ्यीएनछ्यीएनचं म्हणणं पटलं. ती ‘कटर’ म्हणून काम करायची. या  मुलींची गावातल्या घरच्यांसोबतची नाती अतिशय गुंतागुंतीची होती. गावातून शहरात आल्यावर त्या एकाकी असायच्या, थकलेल्या असायच्या आणि सतत घरी जायचा विषय काढायच्या. घरी गेल्यावर मात्र लगेचच त्यांना कंटाळा यायचा. कधी एकदा तिथून बाहेर पडतोय, असं व्हायचं. एखाद्या मुलीनं कारखाना सोडायचं ठरवलं तर तिच्याभोवती असलेल्या सगळ्यांना जोरदार धक्का बसायचा. अनिश्चिती वाटायची. स्थलांतरित असणं म्हणजे अगदी जवळच्या माणसांनी असं सोडून देण्यासारखं होतं. घरी जाणं आणि परत येणं या बाबतीत छ्यीएनछ्यीएनला मोठा अनुभव होता. ती तीन वर्षांपूर्वी गाव सोडून शहरात आली होती. वर्षभर तिनं युए युएनमध्ये काम केलं आणि काही काळासाठी ती घरी परत गेली. तोंगकुआनला परत आल्यावर तिनं छोट्याशा इलेक्ट्रॉनिक कंपनीत नोकरी पत्करली. तिथली परिस्थिती युए युएनपेक्षा भयानक होती. तिनं ती नोकरी सोडली आणि तिच्या आजीच्या ऐंशीव्या वाढदिवसानिमित्त गावी परत गेली. चारच महिन्यांपूर्वी ती युए युएनमध्ये परत आली होती. म्हणाली, ‘‘मी इकडे-तिकडे बरीच फिरले; पण दर वेळी याच कारखान्यात परत आले.’’

च्यीआ च्यीमेला पुरेशी शाश्वती नव्हती. ती म्हणाली, ‘‘मी कदाचित युए युएनमध्ये परत येईनही. पण मला अजूनही त्याबद्दल खात्री नाही.’’ आठवडाभरानं, परत येणार आहे की नाही, हे रूममेटना न सांगताच ती घरी निघून गेली.

* * *

मानवी इतिहासातलं सर्वांत मोठं स्थलांतर चीनमध्ये गेली पंचवीस वर्षं सुरू आहे. स्थलांतरित होणाऱ्या लोकांमध्ये कमालीचे बदल होत आहेत. ८०च्या दशकात आणि ९०च्या दशकाच्या सुरुवातीला ग्रामीण भागातून बाहेर पडलेली मंडळी दिशाहीन भरकटली होती. कुटुंबाच्या रोख पैशांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि गावी घर बांधण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी हे लोक गावांतून बाहेर पडले होते. एकट्या बाईनं गावाबाहेर पडणं जोखमीचं, शरमेचं समजलं जाई. सुरुवातीच्या काळातल्या या स्थलांतरितांना सहसा हंगामी काम मिळत असे. हे हंगाम शेतीप्रमाणे होते. पेरणीच्या काळात आणि नंतर पिकं तयार झाल्यानंतर मदत करण्यासाठी या स्थलांतरितांची पावलं गावाकडे वळायची. बाहेर पुरेसे पैसे गाठीशी जमले की ते गावामध्ये परत यायचे.

नवी पिढी मोठी होईपर्यंत, स्थलांतर हा पर्याय अधिक चांगल्या आयुष्यासाठी गवसलेला आणि स्वीकारला गेलेला होता. ही तरुण आणि आधीच्या पिढीपेक्षा जास्त शिकलेली पिढी ग्रामीण भागातल्या गरिबीपेक्षा शहरात उपलब्ध असलेल्या मुबलक संधींमुळे स्थलांतरासाठी अधिक प्रेरित झाली. स्थलांतर करणं लज्जास्पद उरलं नव्हतं. किंबहुना तोपर्यंत तर स्थलांतर न करणं कमी दर्जाचं मानलं जाऊ लागलं होतं.

नव्यानं स्थलांतर होणाऱ्यांचे गावाशी असलेले बंध विरळ झाले होते. गावी येण्या-जाण्याच्या त्यांच्या फेऱ्या शेतीच्या कामांशी संबंधित उरलेल्या नव्हत्या, की ल्युनार नववर्षासारख्या पारंपरिक सुट्यांशी जोडलेल्या नव्हत्या. स्थलांतरित तरुण, नोकऱ्या बदलणं किंवा कामातून सुट्या मिळणं अशा आपल्या सोयीनुसार शहरातून गावात फेऱ्या मारायचे. आणि हे सगळं अनेकदा उत्पादनचक्रावर अवलंबून असायचं. त्यामुळे स्थलांतरितांचं आयुष्य आता शेतीतल्या हंगामानुसार नाही, तर


कारखान्यातल्या हंगामानुसार ठरतं.

स्थलांतरित शहरातल्या माणसांप्रमाणे दिसतात आणि वागतात. नव्वदच्या दशकात सुरू झालेली स्थलांतरितांविषयीची मासिकं बंद पडू लागली आहेत किंवा तग धरून ठेवण्यासाठी धडपडत आहेत. त्यांना वाचकांचीच वानवा आहे. स्थलांतरितांच्या अनुभवासंबंधीची गाणीही आता दक्षिणेकडच्या शहरांतल्या कारखान्यांतून कानावर येत नाहीत. असेम्ब्ली लाइनवरचे कामगारही आता शहरांतल्या तरुणांप्रमाणे पॉप गाण्यांवर माना डोलावतात. आज, स्थलांतरित तरुणाई अत्यंत निकड असेल तरच गावी घरी पैसे पाठवते; अन्यथा, त्यांच्याकडचा पैसा मोबाइल, केशरचना, कपडे अशा शहरी चोचल्यांवर उडवला जातो. नव्यानं स्थलांतरित झालेले तर जुन्या मंडळींपेक्षा जास्त महत्त्वाकांक्षी आहेत. नव्वदच्या दशकात शहरांकडे स्थलांतरित झालेल्या लोकसंख्येपैकी केवळ १२ टक्के लोक त्यांच्या एकंदर जीवनाविषयी समाधानी होते, असं एका पाहणीत आढळलं आहे. त्यापूर्वीच्या दशकात मात्र समाधानी लोकांचं प्रमाण २७ टक्के होतं. याचा अर्थ असा नाही की नव्या स्थलांतरितांना गावाला परत जायची इच्छा होती. पण ते तुलना करण्यासाठी शहर हा पाया गृहीत धरायचे, हे मात्र यातून दिसून येतं. कदाचित, या मोठ्या अपेक्षांमुळे यशाची मोठी शक्यता निर्माण व्हायची. किंबहुना, नव्या पिढीच्या नशिबी केवळ निराश होणं होतं, असाही अर्थ काढता येऊ शकतो.

★

**('मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित 'फॅक्टरी गर्ल्स' या लेस्ली टी छांग लिखित आणि गौरी देशपांडे अनुवादित पुस्तकातून)**







वैवाहिक जीवनाबद्दलच्या चुकीच्या समजुतींना जोरदार धक्का देणारं समर्पक स्पष्टीकरण. वैवाहिक सौख्याची गुपितं स्पष्ट करणारी आणि शुभमंगलला अधिक 'शुभ' करणारी हमखास मात्रा... 'शुभ शुभमंगल'

लेखक : तारा पार्कर-पोप
अनुवाद : उषा महाजन

## शुभ शुभमंगल

पृष्ठसंख्या : ३१६
किंमत : ₹ ३९५

---





मनमोकळं जगणं शिकवणाऱ्या डॉक्टरनं दिलेलं सुखी जीवनाचं प्रिस्क्रिप्शन..
सुखी, सर्जनक्षम आयुष्याचा मागोवा घेणाऱ्या लोकांना अंतर्दृष्टी बहाल करणारं, 'Love, Medicine & Miracles' व 'Peace, Love & Healing' या लोकप्रिय पुस्तकांच्या लेखकाचं नवं पुस्तक..

लेखक : बर्नी सिगल
अनुवाद : डॉ.अस्मी अच्युते

## प्रिस्क्रिप्शन्स फॉर लिव्हिंग

पृष्ठसंख्या : २२८
किंमत : ₹ २९५

---




मानसिक आरोग्य, अस्वास्थ्याची लाज, लांच्छनाची भीती आणि मौनाचे कुंपण यांच्यावर मात करून केलेले संक्रमण

लेखक : शैलजा सेन
अनुवाद : सरिता आठवले


## आयुष्याचा नवा डाव

पृष्ठसंख्या : २३२
किंमत : ₹ २९५

Book Available

# मी भारतीय

मूळ लेखक : के.के. मुहम्मद
अनुवाद : डॉ. सुलभा कोरे



## डाकू कोण आहे, वटेश्वराचा प्रश्न

माझ्या नोकरीच्या कालावधीत मला शंभराहून जास्त मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याचं सौभाग्य लाभलं. या सर्वांत जास्त सुखकारक अनुभव मला मध्य प्रदेशातील वटेश्वर मंदिर समूहाचा जीर्णोद्धार करताना आला. २००४ला भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या छत्तीसगढ परिमंडळातून दोन्ही राज्यांचा प्रभारी बनून माझी भोपाळला बदली झाली. त्यानंतरच वटेश्वरचं काम सुरू झालं. कुठल्याही अनोळखी प्रदेशात पोहोचण्याआधी त्या प्रदेशाची सगळी माहिती करून घेणं गरजेचं असतंच; नव्हे, ती एक साधी गोष्ट आहे. मी या नोकरीत आहे म्हणून नव्हे तर कुठलाही माणूस हेच करेल. चंबळेचे खोरे डाकूंच्या राबत्यामुळे ओळखले जाते. वटेश्वर हा त्याच चंबळ खोऱ्याचा एक भाग आहे. इथे, या परिसरात भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या अंतर्गत अनेक मंदिरांचे समूह अन् अनेक स्मारके येतात; पण या डाकूंच्या भीतीने त्यांचं संरक्षण करण्यासाठी कुठलाही अधिकारी तिथे अजूनही गेलेला नाही. हे सारं काही ऐकताना खरंतर मीही घाबरून गेलो होतो.

भोपाळला जाऊन मी कार्यभार ग्रहण केला. एक आठवडा उलटला. मी चंबळच्या खोऱ्यात जाऊन वटेश्वर मंदिर पाहण्याचा निश्चय केला. जीर्णोद्धाराचं काम सुरू करायचं असल्याने जाणं जरुरीचं होतं. कंबोडियाच्या प्रसिद्ध अंकोरवाट मंदिराचं रूप म्हणजे वटेश्वर. यात अनेक शिवमंदिरं आहेत. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या अधीन इथे अनेक मंदिरे येतात. मध्यकाळात आलेल्या त्या भूकंपाने जवळजवळ सारंच कोलमडलं अन् क्षतिग्रस्त झालं होतं; परंतु डाकूंचं क्षेत्र असल्याने कुणीच तिथे जाऊन त्यांचा जीर्णोद्धार करायला तयार नव्हतं. तिथली स्थितीही अतिशय खराब व नाजूक होती; परंतु माझा आत्मा किंवा माझा आतला आवाज मात्र मला कुठल्याही परिस्थितीत हा जीर्णोद्धार करायचाच, असं वारंवार सांगत होता. मधल्या काळात या डाकूंशी बोलण्यासाठी एक मध्यस्थही मिळाला. त्या मध्यस्थाच्या माध्यमातून माझं डाकूंशी बोलणंही झालं. डाकूंनी माझ्याशी बोलताना दोनच मुद्द्यांवर जोर दिला होता. एकतर नष्ट झालेल्या मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याची काय गरज आहे अन् दुसरा मुद्दा म्हणजे मंदिर बांधण्याच्या बाबतीत एका मुसलमानाचं काय काम? आता या दोन्ही बाबतीत त्यांच्याशी चर्चा करण्यात काहीच हशील नव्हते. मी त्यांना फक्त या बाबतीतलं गांभीर्य दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या शंकाकुशंका दूर करून त्यांची परवानगी मिळविण्यात चार महिने गेले. मध्यस्थाला मध्ये घेऊन ठरलेल्या वेळेत मी वटेश्वरचा प्रवास करायला सुरुवात केली. भोपाळहून ग्वाल्हेरपर्यंत रेल्वे प्रवास अन् त्यानंतर अनेक गावांना ओलांडून मी शेवटी वटेश्वरला पोहोचलो. वटेश्वरपर्यंत आम्हाला पोहोचविण्याचं धैर्य दाखविलं ते ग्वाल्हेर रेंजचे अधिकारी डॉ. अच्युतानंद झा यांनी. त्यांच्याबरोबर होते, डॉ. एस. एस. गुप्ता, डॉ. ए. के. पांडेय, के. एम. सक्सेना अन् शशिकांत राठोड. आम्ही सगळ्यांनी तिथे पोहोचताच जागेचं निरीक्षण करायला सुरुवात केली. मंदिरांचे अवशेष, दगड इत्यादी इतस्ततः पसरले होते. उंचवट्यांवर, दगडांवर, ढिगांवर चढून तिथे पसरलेल्या दगडांचं आमच्या टीमने सूक्ष्म निरीक्षण केलं. त्यानंतर डाकूंची परवानगी घेऊन आम्ही चार मंदिरे व प्रवेशद्वाराच्या पुनर्निर्माणाचं कार्य सुरू केलं. सर्वत्र पसरलेले दगड एकत्र करून काम सुरू झाल्याची बातमी डाकूंना कळली असावी. त्यांच्या मदतीनेच मग पुढचं काम तसंच सुरू ठेवण्यात आलं.

मधल्या काळात डाकूंचा सरदार निर्भय गुज्जरने माझ्याशी प्रत्यक्ष बोलण्याचा आग्रह धरला. त्याच्यावर अजिबात विश्वास नसल्याने मी त्याच्याशी बोलण्याचं टाळलं. ही माहिती त्याला कदाचित कळली असावी. एकदा मी नष्ट झालेल्या मंदिराच्या अवशेषांचं निरीक्षण करीत असताना त्या अवशेषांच्या मध्ये उभा राहून एका माणसाला विडी पिताना मी पाहिलं.

त्या माणसाच्या त्या उद्दामपणाचा मला रागच आला. मी त्याला म्हटलं, ''इथे विडी ओढताना तुम्हाला लाज नाही वाटत? तुम्हाला माहीत नाही, हे पवित्र स्थान आहे?''

त्याने माझ्याकडे अजिबात लक्ष दिलं नाही. ज्या जागी तो उभा होता ती जागा तिथल्या सर्वांत प्रमुख मंदिराची होती. मला रागच आला होता. मी जोराने ओरडून तेच वाक्य परत बोललो. माझा आवाज ऐकून आमचे मध्यस्थ रामगोपाल वर्मा धावतपळत तिथे आले अन् माझा हात पकडून मला म्हणाले, ''सर, त्यांना काही बोलू नका.'' त्या वेळी माझ्याबरोबर वरिष्ठ संरक्षण सहायक के. एम. सक्सेना, सहायक पुरातत्त्ववेत्ता शशिकांत राठोड, राम गोपाल, ओमप्रकाश नरवरिया, जसवंत सिंह गुर्जर, हुकूम चंद अन् सुंदरलाल हे लोकदेखील होते.

एकंदरीत स्थिती पाहता, माझ्यासमोर उभा असलेला हा माणूस कोण आहे, हे माझ्या लक्षात आलं. तो माणूस दुसरातिसरा कुणी नसून चंबळला पडलेलं भयंकर स्वप्न, डाकूंचा सरदार निर्भय गुज्जर होता. 'आज तक' चॅनलवर त्यांची एक मुलाखत पाहिल्याचं मला आठवलं. ५ फूट ८ इंच उंची, दाढी अन् मिश्या, पॅन्ट अन् शर्ट अशा वेषभूषेत तो तिथं उभा होता. माझी आता खैर नव्हती. पळून पळून मी कुठपर्यंत पळणार होतो? आता काय करायचं? मला काहीच सुचत नव्हतं; पण काहीतरी करणं भाग होतं. मी तसाच पुढे सरकलो. त्यांच्या पायाजवळ जाऊन बसलो अन् सावधपणे म्हटलं, ''इथे तुम्ही असल्यामुळेच मंदिरातील विष्णू अन् महेशाच्या मूर्ती सुरक्षित राहतात. तुम्ही इथे नसलात तर लोक याच मूर्ती परदेशी नेऊन विकून लाखो रुपये कमावतील. या मूर्तींचं संरक्षण करण्याचं फार महत्त्वाचं काम तुम्ही करताय. तुमचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.'' माझं बोलणं ऐकून गुज्जरच्या चेहऱ्यावरचे आतापर्यंत दिसणारे उग्र भाव कमी होऊ लागले होते. मी माझं बोलणं पुढे रेटलं, ''खरं सांगायचं तर तुम्हाला इथे पाठविण्यात ईश्वराचाच काहीतरी हेतू दिसतोय. हे मंदिर इसवी सनाच्या आठव्या व दहाव्या शतकाच्या दरम्यान बांधण्यात आलं आहे. त्या वेळी उत्तर भारतावर गुज्जर प्रतिहार राजवंशाचं राज्य होतं. त्यांनीच अतिशय प्रेमाने व परिश्रमाने हे मंदिर बांधलं आहे. तुमच्याही नावात गुज्जर आहे. त्यामुळे कदाचित तुम्हीदेखील या राजवंशाचे वारस असू शकता. तुम्ही राजकुमार असणार अन् म्हणूनच ईश्वराने या मंदिराचं संरक्षण करण्यासाठी तुम्हला इकडे पाठविलं असावं. या मंदिराचं पुनर्निर्माण करण्याची जबाबदारी आता तुमचीच आहे. तुम्हाला ही संधी अनायासे मिळाली आहे, तिचा फायदा घ्या. पुढे ही संधी मिळणं शक्य नाही.''

निर्भय गुज्जर त्या वेळी सरकारचा 'मोस्ट वॉन्टेड' गुन्हेगार होता. त्याची दहशत एवढी होती की त्याच्यासमोर उभं राहण्याची कुठल्याही

अधिकाऱ्याची हिंमत नसायची; पण हा दस्यू सरदार कदाचित माझ्या गोड बोलण्यावर भाळला असावा किंवा महर्षी वाल्मीकींप्रमाणे त्याला उपरती झाली असावी.

''मंदिराच्या पुनर्निर्माणासाठीची नुसती परवानगी नव्हे तर इथे हव्या असलेल्या सर्व प्रकारच्या संरक्षणाची जबाबदारीही आता आपलीच असेल. आपल्याकडूनच आम्हाला संरक्षण मिळायला हवं.'' मी माझं घोडं जरा अधिकच पुढे दामटलं.

त्यांनी शांतपणे सर्व काही ऐकून घेतलं अन् शेवटी एक अट घातली. दरोडा घालायला जाण्यापूर्वी डाकू लोक इथल्या हनुमान मंदिरात एकत्र येतात अन् पूजा-प्रार्थना करूनच ते इथून बाहेर पडतात. या पूजा-प्रार्थनेमुळेच त्यांना दरोडा घालण्यात यश मिळतं हा त्यांचा विश्वास आहे. खरंतर ही त्यांच्या विश्वासाची गोष्ट सोडा; पण फक्त डाकू लोकच नव्हे तर इतरही असली कामं करणारे लोक दरोडा घालण्यासाठी किंवा हत्या करण्यासाठीही देवालाच वेठीला धरतात. त्यांना वाटतं की त्यांनी जर असं केलं नाही तर त्यांना दरोडा घालण्यात यश मिळणार नाही. त्यामुळेच दरोडा घालून मिळणाऱ्या धनाचा काही भाग ते ईश्वरालाच अर्पण करतात. इथे निर्भय गुज्जरने देखील हीच अट घातली होती, की दरोडा घालायला जाण्यापूर्वी हनुमान मंदिरात पूजा-प्रार्थना करण्याची त्यांची प्रथा पूर्वीप्रमाणेच चालू राहावी.

''सकाळपासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आम्ही इथे काम करत राहू अन् त्यानंतर आम्ही इथून जाऊ अन् ही जागा तुमचीच असेल,'' मी त्यांना सांगितलं. निर्भय गुज्जरने आमची ही विनंती मान्य केली अन् त्यानंतर आमचं पुनर्निर्माणाचं काम रीतसर सुरू झालं. हे काम अतिशय अवघड होतं. दगडांचे ढीगच ढीग आणि सगळीकडे पसरलेले दगडच दगड अन् आश्चर्याची गोष्ट ही की ते दगड एकत्र करायला डाकू लोकही आम्हाला मदत करायचे. सगळ्यात कठीण काम होतं, ते तुटलेले दगड जोडून एकत्र करण्याचं! तुटलेले दगड लोखंडाचा दांडा अन् ॲरेल्डेट यांच्या मदतीने सांधणं, सगळ्यात मोठं काम असायचं. चार वर्षांच्या सततच्या कष्टांनी अन् प्रयत्नाने मंदिरांच्या पुनरुत्थानाचं काम पूर्ण झालं. हे काम पूर्ण झालं, अन् मला या कामाने कृतार्थता दिली. माझं काम जेव्हा पूर्ण होतं, सफल होतं तेव्हा ते काम करताना आलेल्या अडचणी मी विसरून जातो.

दरम्यानच्या काळात एक घटना घडली. गुज्जरची माणसे अन् पोलिसांच्यात संघर्ष घडला अन् त्यात गुज्जरची अनेक माणसं मारली गेली. ही बातमी फोटोसहित सगळ्या वर्तमानपत्रांतून झळकली; पण चार महिन्यांनंतर लोकांनी या जागेवर त्यांचा असलेला विश्वास दाखवून दिला. हे क्षेत्र हळूहळू डाकूंच्या पकडीतून मोकळं होऊ लागलं; पण नंतर मात्र जंगलातील डाकूंची जागा सज्जनपणाचे मुखवटे घातलेल्या डाकूंनी घेतली अन् ते समोर येऊ लागले.

वटेश्वरमध्ये असलेलं डाकूंचं साम्राज्य संपलं अन् त्यांची जागा खनन (खोदकाम) माफियांनी घेतली. त्यांनी या जागेवर कबजा केला. वटेश्वरच्या डोंगरातील मोठमोठ्या शिळा अतिशय गुणकारी व उपयोगी आहेत. त्या शिळा ब्रिटन व अमेरिकेसारख्या देशांना निर्यात करून पैसा कमावता येऊ शकतो. म्हणजे काहीही गुंतवणूक न करता फक्त कमाईच कमाई. या खनन उद्योगाशी अनेक राजकीय पक्षांची माणसे जोडलेली होती. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने या मोठमोठ्या शिळा तोडण्याच्या कामात ही सर्व मंडळी सक्रिय झाली; पण त्यामुळे खननाच्या कंपनांनी अन् स्फोटांच्या आवाजांनी पुनर्निर्मित केलेल्या मंदिरांना हादरे बसू लागले. नुकसान होऊ लागलं; पण या बाबतीत कुणीच काही बोलायला तयार होईना. शेवटी हे सारे त्रासदायक प्रकार थांबविण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणालाच पुढे येणं भाग पडलं. राज्याचे तत्कालीन सांस्कृतिक मंत्री लक्ष्मीकांत शर्मा इत्यादींना भेटून आम्ही एक तक्रारपत्र दिलं; पण काहीच कारवाई करण्यात आली नाही. फायदा काहीच होत नव्हता; पण मी मात्र तक्रार करणं थांबविलं नाही. लक्ष्मीकांत शर्मांनी (कुख्यात व्यापम केसमध्ये हे महाशय काही दिवस जेलमध्येच होते.) सांगून टाकलं की त्यांना तक्रारीचं पत्र मिळालंच नाही. हा सगळा राजकारण्यांचा खेळ होता, राजकीय पक्षांचा खेळ होता. राजकारणातही या खनन माफियांची खूप चर्चा होती; पण मीही सहजासहजी हार मानणारा नव्हतो. त्या वेळी मध्य प्रदेशात भाजपाचे सरकार होतं, त्यामुळे हा सगळा मामला अगदी सविस्तरपणे स्पष्ट लिहून एक पत्र तत्कालीन आर.एस.एस. सरसंघसंचालक सुदर्शन यांनाच लिहून पाठविलं. मी त्यांना लिहिलं- 'ही समस्या घेऊन मी खालच्या स्तरापासून उच्चस्तरीय सर्व अधिकाऱ्यांना भेटलो; पण कुठूनही काहीच कारवाई करण्यात आली नाही. खनन माफियांचा राजकीय प्रभाव किती मजबूत आहे, हेच यावरून दिसून येतं. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे भाजपाचे सरकार असलेल्या मध्य प्रदेशातच हे सारं काही घडतंय. त्याहून दुःखद बाब ही आहे की मेहमूद गझनी अन् औरंगजेबाच्या काळात मंदिरं तोडण्याचं जे काम चालायचं ते काम आता भाजपाच्या कारकिर्दीतही राजरोस व निर्विघ्नपणे चाललं आहे.'

सुदर्शनजींना माझं पत्र मिळालं आणि २४ तासांतच कारवाई करण्यात आली. पोलीस आयुक्तांबरोबर स्वत: जिल्हाधिकारी वटेश्वरला आले. खनन माफिया अन् पोलिसांत गोळीबार झाला अन् हा गोळीबार बराच वेळ चालला. शेवटी या लढाईत खनन माफियांनी माघार घेतली. वर्तमानपत्रांनी या सर्व लढाईला भरपूर प्रसिद्धी दिली अन् या साऱ्या बातम्या वाचून तत्कालीन केंद्रीय सांस्कृतिक मंत्री श्रीमती अंबिका सोनी यांनी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या अडचणी, समस्यांच्या बाबतीत अन् त्यांचं संरक्षण व त्यांना सुरक्षा देण्याच्या बाबतीत मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांना पत्र लिहिलं. चौहान यांनी त्या पत्राचं उत्तर देताना लिहिलं, 'वटेश्वरमध्ये सुरू असलेले अनियंत्रित अन् अनधिकृत उत्खनन आता पोलिसांनी थांबविले आहे.' पत्राच्या शेवटच्या पॅरेग्राफमध्ये त्यांनी हेही लिहिले होतं, 'सुदर्शनजींना तक्रार करणारं पत्र लिहिणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करायचा निर्णय तुमच्यावर सोडीत आहे.' या घटनेला मीडियाने प्रचंड प्रसिद्धी दिली. सीएनएन, सहारा, इंडिया टी.व्ही., एन.डी.टी.व्ही. इत्यादी अनेक चॅनल्सनी विशेष कव्हरेजसह या बातमीचं प्रसारण केलं. दैनिक भास्कर, दैनिक जागरण, नवभारत टाइम्स, नयी दुनिया, टाइम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्स्प्रेस, हिंदुस्तान टाइम्स इत्यादी अनेक महत्त्वाच्या वर्तमानपत्रांनी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या कामाच्या बाबतीत रिपोर्ट प्रकाशित केले. सी.एन.एन. आयबीएनवरून मनोज शर्मा, एनडीटीव्हीवरून कुमार शक्ती शेखर यांनी यावर विशेष कार्यक्रम चालविले.

खनन माफियांच्या वाढलेल्या राजकीय प्रभावामुळे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या अधिकाऱ्यांना फोनवरून धमक्या मिळू लागल्या. आमच्या काही माणसांवर हल्लाही करण्यात आला. माझ्याबरोबर वाद घालण्यात आला; पण माझ्यावर शारीरिक हल्ला करण्यात आला नाही. कदाचित वटेश्वरच्या डाकूंबरोबर असलेले माझे संबंध त्यांना अगोदरच कळले असावेत. या सर्व घटनाक्रमात काही पोलीस अधिकाऱ्यांनाही आपला जीव गमवावा लागला.

सन २०१२ला माझ्या मुलाचं लग्न करण्यासाठी मी माझ्या गावी म्हणजे केरळात आलो होतो. या खनन माफियांचं क्रूर अन् निर्घृण कृत्य मला तेव्हा कळलं. या खनन माफियांनी आयपीएस अधिकारी नरेंद्र कुमार यांची निर्घृण हत्या केली होती. ट्रॅक्टरखाली चिरडून त्यांना ठार मारण्यात आलं. या निर्घृण हत्येला त्यांनी दुर्घटनेचं स्वरूप देण्याचे निर्वाणीचे प्रयत्न केले; पण मृताची पत्नीदेखील एक आयएएस अधिकारी असल्याने त्यांचे ते सर्व प्रयत्न फोल ठरले. ज्यांची हत्या करण्यात आली त्या नरेंद्र कुमारांना मी कधी पाहिलं नव्हतं; पण माझं कार्य त्यांनी पुढे चालू ठेवले होतं, एवढं मात्र नक्की. वटेश्वरच्या त्या मंदिरातील ईश्वराचा मी लाडका असल्याने अन् त्या मंदिरांना पवित्र तीर्थस्थान मानणाऱ्या सर्व भक्तजनांच्या प्रार्थनेमुळे लवकरच माझी तिथून बदली झाली. नेमक्या त्याच वेळी केंद्र सरकार सन २०१०ला दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रमंडळ खेळांच्या आयोजनांच्या अनुषंगाने तिथल्या ऐतिहासिक स्मारकांचा जीर्णोद्धार करून त्यांना सुंदर बनविण्याच्या कामासाठी एका अधिकाऱ्याच्या शोधात होते. त्यांना माझ्या नावाचा विचार करण्याच्या बाबतीत सूचना मिळाली अन् सन २००८ला माझी दिल्लीला बदली करण्यात आली. त्या वेळी जर माझी ही बदली झाली नसती तर ही सगळी कहाणी या पुस्तकातून तुमच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी मी जिवंतच राहिलो नसतो.

वटेश्वरच्या बाबतीत जर तुम्हाला अधिक माहिती हवी असेल तर यू ट्यूब वर असलेल्या ‘Rebirth of a forgotten temple complex Bateshwar’ ही डॉक्युमेंट्री नक्कीच बघा.

दि. ३० सप्टेंबर, २०१७ ला मी वटेश्वरला गेलो होतो. खाणींच्या जोरदार स्फोटांनी पूर्ण परिसर हादरत होता. तिथल्या शासनकर्त्या भाजपा सरकारकडून काही अपेक्षा करणं व्यर्थ होतं. तिथं सुरू असलेलं दुरुस्ती अन् पुनर्निर्माणाचं कामदेखील गेली अनेक वर्षं बंदच पडलंय. खरंतर सगळीकडेच किट्ट काळोख पसरलाय; पण या काळोखातच अखिल भारतीय वीर गुज्जर महासभा अन् त्याचे राष्ट्रीय अध्यक्ष अनुराग गुज्जर यांच्या रूपाने एक आशेचा अन् उजेडाचा किरण या अंधाराला भेदण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांच्याशी झालेल्या बोलण्यानुसार त्यांनी वटेश्वरासाठी आंदोलन करण्याचा संकल्प केलाय. अखिल भारतीय वीर गुज्जर महासभा अन् त्याचे राष्ट्रीय अध्यक्ष अनुराग गुज्जर यांच्या प्रयत्नांनी मंदिरांच्या पुनर्निर्माणाचं कार्य नक्कीच पुढे सरकेल.

★

**(‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ प्रकाशित ‘मी भारतीय’ या के.के. मुहम्मद लिखित आणि डॉ. सुलभा कोरे अनुवादित पुस्तकातून)**


नवं कोरं




महाराष्ट्रातील राजकीय महानाट्य पुस्तकरूपात...

मूळ लेखक - जीतेंद्र दीक्षित
अनुवाद - पराग पोतदार

पृष्ठसंख्या : २१२
किंमत : ₹३३०

३५ दिवस

Book Available



भारत-चीन संबंधांबाबतच्या भारताच्या बोटचेप्या, विस्कळीत धोरणांवरचं अरुण शौरी यांचं अभ्यासपूर्ण, परखड भाष्य...

मूळ लेखक - अरुण शौरी
अनुवाद - अशोक पाथरकर


पृष्ठसंख्या : ३४०
किंमत : ₹४५०

आत्मवंचना

Book Available

# विटामिन ज़िन्दगी

**मूळ लेखक : ललित कुमार**
**अनुवाद : मंजिरी धामणकर**



## ‘वेगळा’ पासून ‘विशेष’ पर्यंत

चौथीत गेल्यावर आणखी एक आव्हान आ वासून पुढे आलं. चौथीचा वर्ग शाळेच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर होता. तिसरीत असताना वर्षभर मी पहिला मजला चढलो होतो, पण त्या संपूर्ण वर्षात दुसऱ्या मजल्याच्या पायरीला शिवलोही नव्हतो. दुसऱ्या मजल्यावर जावं असं मला खूप वाटायचं, कारण वरून दूरवरचं दृश्य खूप छान दिसतं, भूलभुलैया आणि कुतुबमिनार सुद्धा दिसतो, असं मुलं म्हणायची. ते सगळं बघायची बालसुलभ इच्छा मी वर्षभर दाबून ठेवली होती. कारण जिना चढणं हे माझ्या दृष्टीने अत्यंत कठीण, भीतिदायक आणि धोकादायक होतं. चौथीचा वर्ग दुसऱ्या मजल्यावर आहे हे मला ठाऊक होतं, त्यामुळे तिसरीची वार्षिक परीक्षा जवळ आल्यावरच मला काळजी लागली, की मी दुसऱ्या मजल्यावर कसा जाऊ शकणार.

कित्येक वेळा तर, मुद्दाम नापास व्हावं, असाही विचार माझ्या मनात डोकावला.

चौथीच्या वर्षाच्या पहिल्या दिवशी मी शाळेत पोचल्यावर, इतरांची नजर चुकवून रोजच्यासारखा मी पहिल्या मजल्यावर तर पोचलो; पण तसंच सरकत दुसऱ्या मजल्याच्या पायऱ्या चढायला लागलो आणि लक्षात आलं, की हे माझ्याच्याने होणार नाही. दुसऱ्या मजल्याच्या पायऱ्या जास्तच खड्या, उंच आणि अरुंद होत्या. हातांची सगळी शक्ती लावून देखील मी स्वतःला तिथपर्यंत उचलू शकत नव्हतो. त्या ओढाताणीत माझा तोल जात होता आणि मी खाली गडगडत जायचा धोका होता. तरीही मी जिद्दीने चढतच राहिलो. किशोर माझ्या कुबड्या घेऊन बरोबर येत होता.

दुसऱ्या मजल्यावर पोचेपर्यंत मी प्रचंड थकलो आणि घाबरलो होतो. रोज काही हे शक्य नाही हे मला समजून चुकले. दमणूक किंवा शारीरिक वेदनांची मला पर्वा नव्हती, किंवा खाली गडगडत पडेन, मला लागेल याचीही काळजी नव्हती. भीती होती ती एकच – मी पडलो तर सगळे माझी टर उडवतील, मला हसतील. मला चिडवायला मुलांना आणखी एक कारण मिळेल.

चौथीच्या पहिल्या दिवशी कसाबसा जिना चढून मी वर्गात जाऊन बसलो. थोड्या वेळाने मैदानातली प्रार्थना संपली आणि माझे सहाध्यायी वर्गात आले. संपूर्ण वर्षभर असं चढावं लागणार या विचाराने माझी बोबडी वळली होती. त्या पायऱ्यांवर रोज सरकत चढणं शक्य नव्हतं. त्यामुळे अखेर मधल्या सुट्टीत मी चाचरत चाचरत मास्तरांना सांगितलं की, मी उद्यापासून शाळेत येणार नाही, कारण मला जिने चढता येत नाहीत. मास्तर या बाबतीत मुख्याध्यापकांशी बोलले आणि मुख्याध्यापकांनी निर्णय घेतला की, चौथीचा वर्ग पहिल्या मजल्यावरच्या पाचवीच्या वर्गात आणायचा आणि पाचवीचा वर्ग दुसऱ्या मजल्यावर न्यायचा म्हणजे मला दोन मजले चढावे लागणार नाहीत.

मुख्याध्यापक पहिल्यापासून माझ्या अडचणी बघत आले होते. सुरुवातीला त्यांनीच मला घरी राहून अभ्यास करण्याची सवलत दिली होती. वर्गाची अदलाबदल करण्याच्या त्यांच्या त्या निर्णयामुळे मला खूप आनंद झाला.

***

मी आधीपासूनच माझ्या कित्येक सहाध्यायींच्या चेष्टेचा विषय होतोच, त्यातून पहिल्या दिवशी मी कॅलिपर घालून शाळेत गेल्यावर तर त्यांना आणखीनच चेव चढला. मी एकाच पायात कॅलिपर घालून गेलो होतो. तो मला पॅन्टच्या वरून बांधायला लागायचा. कॅलिपरमध्ये बांधलेला माझा पाय मुलांना रोबोच्या पायासारखा वाटत होता. कॅलिपरमुळे माझा गुडघा वाकायचा नाही, त्यामुळे मला पाय बराच वळवून टाकायला लागायचा. साहजिकच माझी चाल खूपच बदलली होती. आता मुलं माझ्या चालण्याचीही चेष्टा करू लागली. अनेक वेळा मुलं माझ्या चालण्याची नक्कल करताना आढळायची. ते बघून मला रडू फुटायचं. बहुधा मला रडवण्यासाठीच मुलांचा हा उद्योग चालायचा.

***

अडचणी आणि आव्हानं माझ्यासमोर रोज नव्या रूपात उभी ठाकायची. शाळेत मुलांना जेव्हा टॉयलेटला जायला लागायचं, तेव्हा ती कशीतरी शाळेच्या भयानक घाणेरड्या टॉयलेटमध्ये जायची, पण मला जेव्हा जावं लागायचं, तेव्हा मात्र मला त्या घाणीतून वाट काढत जाणं शक्य नव्हतं. त्यामुळे होता होईतो मी शाळा सुटेपर्यंत माझी ही नैसर्गिक गरज रोखून धरायचो. पण निसर्गावर नेहमीच मात करता येते असं नाही. कधीकधी जायची गरज इतकी तीव्र असायची, की घरी जाण्याखेरीज मला पर्यायच नसायचा. अशा वेळी मी कुबड्या टेकत जितकं भरभर जाता येईल तितकं भरभर चालायचो. असं चालताना मी बऱ्याचदा पडायचो. नैसर्गिक गरजेचा दबाव आणि माझे पाय यांच्यातली ती स्पर्धाच असायची. अनेकदा त्या स्पर्धेत मी हरलो देखील. जेव्हा हरलो तेव्हा स्वतःचीच विलक्षण लाज वाटली. पण मी तरी काय करणार! पोलिओने मला अशा प्रसंगाशी दोन हात करण्यास असमर्थ बनवलं होतं.

जे काम इतर मुलं सहज करून जायची, तेच काम माझ्यासाठी मोठं आव्हान असायचं. आव्हानांशी मला लढावंच लागायचं. मी तेच करत होतो.

***

नवकुमार चक्रवर्तीला प्रथम मी बहुधा चौथीच्या वर्गातच भेटलो. जाड भिंगाचा चश्मा घालणाऱ्या नवची देखील मुलं चेष्टा करायची. घशाच्या आणि स्वरयंत्राच्या समस्येमुळे त्याचा आवाज स्पष्ट नव्हता, त्याचं बोलणं पटकन समजायचं नाही. त्यामुळे मुलं तर त्याला चिडवायचीच, पण शिक्षकदेखील प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्याला टोमणे मारायचे. मुलं तर काय – मुलंच होती, पण शिक्षकांनासुद्धा नवचं नाव नीट उच्चारता यायचं नाही. त्यामुळे सगळे त्याला नेवा म्हणायचे. चिडवताना मुलं मला जशी ‘अरे ए लंगड्या’ म्हणून हाक मारायची, तशी त्याला ‘अरे गेंगल्या’ म्हणायची. गेंगला शब्दाला काही अर्थ नाही. नवच्या आवाजाची नक्कल करायला मुलांनी तो शब्द निर्माण केला होता.

आमच्या शाळेतल्या मुलांच्या जगावर कसलाही अंकुश नव्हता आणि त्या जगात चारचौघांपेक्षा जराही ‘वेगळा’ असण्याची फार मोठी किंमत चुकवावी लागायची. ती किंमत नवने आणि मी चुकवली. नवचं व्यंग तरी तो बोलेपर्यंत उघड व्हायचं नाही. त्याला गल्ली, रस्ता, बाजारातून यायला जायला काही अडचण नव्हती; पण मला मात्र मी ‘वेगळा’ असल्याची किंमत पदोपदी चुकवावी लागायची. मी कुठेच लपू शकत नव्हतो. चहूबाजूंनी रोखलेल्या नजरा आणि उपहास झेलत होतो.

मी ‘वेगळा’ होतो, आणि मला ‘विशेष’ बनायचं होतं. हा प्रवास कल्पनेच्या पलीकडे खडतर असतो. माझा फक्त मार्गच कठीण होता असं नाही, तर एक अडचण अशीही होती की, समाजाने ‘वेगळा’ असण्याची व्याख्या अगदी सहज केली होती – जो इतरांसारखा नाही तो वेगळा; पण ‘विशेष’ शब्दाची काही ठरावीक व्याख्या नाही. त्यामुळे माझा मार्ग कठीण होता एवढंच नाही, तर नक्की कुठे पोचायचंय त्या मुक्कामाचाही धड पत्ता नव्हता.

मी माझ्या मनाशी एवढाच संकल्प दृढ केला होता की, एक ना एक दिवस मला समाजात बरोबरीचं स्थान मिळवायचंच आहे. मला अशा ठिकाणी पोचायचं आहे, जिथे आज मला चिडवणाऱ्या मुलांची बोलती बंद होईल. माझ्या दृष्टीने ‘विशेष’ शब्दाची हीच व्याख्या होती.

ही अशा एका संकल्पाची सुरुवात होती, ज्याचं मी मंत्राप्रमाणे रोज पठण केलं. असा मंत्र – जो माझं जीवन, माझं लक्ष्य आणि माझ्या अस्तित्वाचं प्रयोजन बनला.

*मी ‘वेगळा’ होतो, मला ‘विशेष’ बनायचं होतं.*
*‘घायाळ मन, विकृत शरीर, अस्तित्व म्हणजे वेदना*
*तरी होणार मी विजेता, बघच जगा तू,*
*देह निसर्गदत्त, विधिलिखितही काय मी लिहिलं?*
*का उपहास करतोस, जरा विचार कर तू.’*

*ललित कुमार*

**सगळे प्राणिसंग्रहालयात गेले – मी सोडून...**

एके दिवशी शाळेत जाहीर केलं की, पुढच्या आठवड्यात सगळ्या मुलांना बसमधून लाल किल्ला, प्राणिसंग्रहालय आणि राजघाट बघायला घेऊन जाणार. शाळेच्या माझ्या बारा वर्षांत शाळेने मुलांना सहलीला नेण्याचा हा एकमेव प्रसंग, पण या एकुलत्या एका प्रसंगीदेखील मी मात्र सहलीला जाऊ शकलो नाही.

घोषणा झाल्याबरोबर मुलं एकदम खूश झाली आणि सहलीच्या दिवसाची आतुरतेने वाट पाहू लागली. मला प्राणिसंग्रहालय बघायला जाता येईल अशी अंधूक आशा माझ्या मनात होती, पण मनाच्या एका कोपऱ्यात हेही ठाऊक होतं की मास्तर मला बरोबर नेणार नाहीत. माझ्या वर्गातल्या मुलांनीही सांगितलं की मला नेणार नाहीत.

मला नेणार की नाही हे मी कोणत्याही मास्तरांना थेट विचारलं नाही. माझ्या वर्गमित्रांशीही त्या बाबतीत काही बोललो नाही.

जेव्हा बाकीची मुलं भावी सहलीबद्दल गप्पा मारायची, तेव्हा मीही त्यांत सामील व्हायचो. त्यांच्याइतकाच मीही खूश असल्याचा आव आणायचो, पण शेवटी जे उत्तर मला मास्तर देणार याची मला खात्री होती ते मनातल्या मनात टाळायचा प्रयत्न करायचो. मला नेणार नाहीत हे मला चांगलं ठाऊक होतं, पण मला आधीच त्यावर कोणी शिक्कामोर्तब करायला नको होतं. बाहेर फिरायला जाणं हे माझ्या लेखी एक सुंदर स्वप्न होतं आणि ते प्रत्यक्ष भंगेपर्यंत मला त्यात रमायचं होतं.

ज्या दिवशी सहलीला जायचं होतं त्या दिवशी सगळ्या मुलांना वेळेवर शाळेत यायला सांगितलं होतं. नऊ वाजता शाळेच्या बाहेर एक बस येणार होती. त्यातूनच सगळे विद्यार्थी आणि शिक्षक सहलीला जाणार होते. मी रोजच्याप्रमाणे वेळेवर चौथी ‘ब’च्या वर्गात गेलो. प्रार्थनेनंतर सगळी मुलं आणि आमचे वर्गशिक्षक वर्गात आले.

‘‘आज आम्ही तुम्हा सगळ्यांना लाल किल्ला, प्राणिसंग्रहालय आणि राजघाट बघायला नेणार आहोत. शाळेच्या बाहेर एक बस उभी आहे. त्यात बसून आपण सगळे जाणार आहोत. सगळ्या ठिकाणी नीट ओळीत चालायचं आहे. गोंधळ, गडबड करायची नाही. राजघाट ही गांधीजींची समाधी आहे’’— मास्तर मुलांना सहलीची माहिती देऊ लागले. काय करायचं, काय नाही याच्या सूचना देऊ लागले.

‘चला, आता एक ओळ करून खाली जा आणि बसपाशी जा. ओळ मोडून इकडेतिकडे धावायचं नाही, समजलं?’ मास्तरांनी ताकीद दिली. सगळी मुलं उठली, पण मी उठलो नाही. मास्तर अद्याप मला काही म्हणाले नव्हते; पण का कोण जाणे, मला जाणवत होतं, की खाली जाऊन बसमध्ये बसण्याची सूचना माझ्यासाठी नाही. जवळजवळ सगळी मुलं वर्गाबाहेर गेली, तेव्हा अखेर मी माझं नशीब अजमावायचं ठरवलं. कदाचित- मास्तर मलाही जाऊ देतील. मी कुबड्या भिंतीला टेकवून उठायचा प्रयत्न केला, तोच मास्तरांचा आवाज आला – ‘‘तू नाही, तू नाही. तू चालू शकणार नाहीस,’’ मास्तर म्हणाले.

माझ्या हृदयाचा ठोका चुकला. गेला आठवडाभर मी जे शब्द कानावर पडू नयेत अशी आशा आणि प्रार्थना करत होतो, नेमके तेच शब्द कानावर पडले.

‘‘ठीक आहे मास्तर,’’ मी हळू आवाजात म्हटलं आणि भिंतीच्या आधाराने बसलो. मास्तर काही बोलले नाहीत. माझ्याकडे बघितलंसुद्धा नाही. तडक वर्गाबाहेर पडून खाली बसकडे गेले. वर्गात मीच उरलो – अगदी एकटा.

त्या दिवशी ते सगळे मला एकट्याला सोडून सहलीला गेले. त्या दिवशी मी शाळेत रडलो – हमसून हमसून रडलो. मन दुखावलं जाणं आणि रडणं हा माझ्या आयुष्याचा अविभाज्य भागच बनला होता.

मला नीट चालता येत नव्हतं म्हणून मला मागे ठेवलं होतं. त्या क्षणी मी मनाशी ठाम निश्चय केला की, एक दिवस मी इतकं जग बघेन की आमच्या सबंध शाळेतल्या कोणीही तितकं बघितलेलं नसेल – ना कोणी विद्यार्थ्याने, ना कोणी शिक्षकाने, ना मुख्याध्यापकांनी.

मी निश्चय केला की, जिथवर इतरांचे चांगले पायदेखील त्यांना घेऊन जाऊ शकणार नाहीत, तिथवर माझ्या कुबड्या मला घेऊन जातील,


कठीण ध्येय ठरवणं हादेखील माझ्या आयुष्याचा भाग बनला होता. ती ध्येयं मी कशी गाठणार आहे हे मला माहीत नव्हतं. मी निश्चित केलेल्या मुक्कामापर्यंत कोणता मार्ग मला नेणार आहे, याचीही मला सुतराम कल्पना नव्हती.

कोणत्याही शस्त्राशिवाय मी युद्धाला निघालो होतो.

★

**(‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ प्रकाशित**
**‘विटामिन ज़िन्दगी’ या ललित कुमार लिखित आणि**
**मंजिरी धामणकर अनुवादित पुस्तकातून)**

## नवं कोरं




आई, वडील हे नातं फुलवण्याचं भान देणारी आणि भावनिक बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, प्रेरणा, सकारात्मकता, यशस्वी नेतृत्व या संकल्पनांचं महत्त्व अधोरेखित करत त्यांचा विविधांगी वेध घेणारी पुस्तकमालिका

लेखक: अँड्र्यू वॉटसन
अनुवाद: सुनीति काणे

पृष्ठसंख्या : ३४४
किंमत : ₹ ३९५

Book Available

# असा असावा 'बाप'

---




आई, वडील हे नातं फुलवण्याचं भान देणारी आणि भावनिक बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, प्रेरणा, सकारात्मकता, यशस्वी नेतृत्व या संकल्पनांचं महत्त्व अधोरेखित करत त्यांचा विविधांगी वेध घेणारी पुस्तकमालिका


लेखक : जुडी रेथ
अनुवाद : मुग्धा शुक्रे

पृष्ठसंख्या : ३३२
किंमत : ₹ ३९५

Book Available

# असं असावं 'आई'पण

---




आई, वडील हे नातं फुलवण्याचं भान देणारी आणि भावनिक बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, प्रेरणा, सकारात्मकता, यशस्वी नेतृत्व या संकल्पनांचं महत्त्व अधोरेखित करत त्यांचा विविधांगी वेध घेणारी पुस्तकमालिका

लेखक : ख्रिस्तिन विल्डिंग
अनुवाद : डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

पृष्ठसंख्या : २६०
किंमत : ₹ ३२०

Book Available


# इमोशनल इन्टेलिजन्स

आगामी

# खाकी फाइल्स

**मूळ लेखक : नीरज कुमार**

**अनुवाद : रोहन टिल्लू**



## डॉक्टर, तुम्हीसुद्धा?

आधुनिक भारताच्या इतिहासात ६ डिसेंबर १९९२ हा दिवस एक काळा दिवस होता. १६व्या शतकात मुघलांचा सरदार मीर बाकी याने बांधलेली बाबरी मशीद या दिवशी कारसेवक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काही स्वयंसेवकांनी जमीनदोस्त केली. हे कारसेवक म्हणजे काही कट्टर हिंदू विचारसरणीचे लोक होते. त्यांच्या मते ही मशीद उभारण्यासाठी एक मंदिर पाडण्यात आलं होतं. आतापर्यंतच्या कोणत्याही घटनेमुळे न उसवलेली हिंदू-मुसलमान समाजातील नाजूक वीण चार-पाच शतकं जुन्या असलेल्या या मशिदीच्या पतनामुळे कायमची उसवली. या दुर्घटनेनंतर घडलेल्या अनेक गोष्टींचा उल्लेख करणं अत्यावश्यक आहे.

उत्तर भारतातल्या उत्तर प्रदेशात असलेलं अयोध्या हे शहर हिंदू परंपरेनुसार प्रभू श्रीरामाचं जन्मस्थान मानलं जातं. प्रभू श्रीराम हे भगवान विष्णूचे सातवे अवतार आहेत, असं हिंदू धर्मग्रंथांमध्ये लिहिलं आहे. मीर बाकी याने ज्या ठिकाणी मशीद बांधली, तिथेच प्रभू रामचंद्राचा जन्म झाला होता, अशी हिंदूंची श्रद्धा आहे. या श्रद्धेला बळ देणारा एकही ऐतिहासिक पुरावा मात्र उपलब्ध नाही. गेली चार शतकं हिंदू आणि मुसलमान हे दोन्ही समाज ही जागा आपले धार्मिक विधी करण्यासाठी वापरत होते. १८२२मध्ये फैजाबादच्या स्थानिक न्यायालयातील एका अधिकाऱ्याने असा दावा केला की, ही मशीद मंदिर पाडून बांधण्यात आली आहे. तेव्हापासून ही जमीन कोणाच्या मालकीची आहे, याबाबत हिंदू आणि मुसलमान या दोन्ही समाजांमध्ये वादंग सुरू आहे.

१९८०च्या दशकात विश्व हिंदू परिषद (विहिंप) या कट्टरतावादी हिंदू संघटनेने या मशिदीच्या जागी श्रीरामाचं मंदिर बांधण्याच्या दृष्टीने मोहीम सुरू केली आणि या वादाने उग्र रूप धारण केलं. ६ डिसेंबर १९९२ रोजी विहिंपने जवळपास दीड लाख कारसेवकांचा मोर्चा आयोजित केला होता. या मोर्चाने हिंस्र रूप धारण केलं आणि कारसेवकांनी सुरक्षारक्षकांना न जुमानता मशीद जमीनदोस्त केली. बाबरी मशिदीच्या पतनानंतर देशभर दंगे उसळले. हे दंगे अनेक महिने सुरू होते आणि त्यात दोन हजारांपेक्षा जास्त लोकांचे बळी गेले. या घटनेचे पडसाद देशाच्याच नाही, तर जगाच्या कानाकोपऱ्यात उमटले. जगभरातील मुसलमान समाज संतापला. एवढंच नाही, तर या घटनेने एक धर्मनिरपेक्ष आणि सहिष्णु राष्ट्र ही भारताची प्रतिमा धुळीला मिळवली. पाकिस्तान, बांगलादेश आणि आखाती देश अशा मुसलमानबहूल देशांमध्ये हिंदू समाजावर हल्ले होण्याच्या आणि हिंदूंची प्रार्थनास्थळं उद्ध्वस्त करण्याच्या घटनाही प्रत्युत्तरादाखल घडल्या.

भारतात तर या घटनेचे पडसाद दूरगामी होते. जातीय दंगे, हिंसाचार यांच्या बरोबरीनेच दहशतवादी घटनांमध्येही वाढ झाली. यातील सर्वांत मोठी घटना म्हणजे १२ मार्च १९९३ रोजी मुंबईत झालेले साखळी बॉम्बस्फोट. या स्फोटांमध्ये २७९ जण ठार झाले, ७०० पेक्षा जास्त लोक गंभीर जखमी झाले, खासगी आणि सार्वजनिक मालमत्तेचं कोट्यवधी रुपयांचं नुकसानही झालं. या घटनेनंतर देशात पेरली गेलेली फुटीरतेची बीजं आणि मशीद पडल्याचा व दंग्यांमध्ये रोजीरोटी गमावल्याचा मुस्लिमांच्या मनात खदखदत असलेला असंतोष याचा फायदा उठवत पाकिस्तानच्या ISIने भारतात दहशतवादी कृत्यं घडवून आणली नसती, तरच नवल होतं. या प्रकरणात आपण यापैकीच एका कृत्याचा मागोवा घेणार आहोत. हा दहशतवादी हल्ला अत्यंत सुनियोजित होता आणि या हल्ल्याची बीजं बाबरी मशिदीच्या पतनातच रोवली गेली होती.

***

६ डिसेंबर १९९३! बाबरी मशिदीच्या पतनाला बरोबर एक वर्ष उलटत होतं. सकाळी सकाळी देशभरातल्या पाच वेगवेगळ्या ठिकाणी रेल्वेगाड्यांमध्ये बॉम्बस्फोट झाल्याची बातमी आली आणि देश हादरला. या पाच बॉम्बस्फोटांमध्ये दोन प्रवासी ठार झाले होते आणि २२ जण जखमी झाले. रेल्वेच्या लाखो रुपयांच्या मालमत्तेचंही नुकसान झालं. या स्फोटांनंतर रेल्वेचे कर्मचारी आणि प्रवासी या दोघांमध्येही अनेक महिने भीतीचं वातावरण होतं. परिणामी देशाच्या रेल्वे वाहतुकीला त्यानंतरचा बराच काळ मोठा फटका बसला. या बॉम्बस्फोटांचा तपशील खालीलप्रमाणे:

६ डिसेंबर १९९३ रोजी सकाळी ५.१५ वाजता नवी दिल्लीवरून मुंबईला येणाऱ्या राजधानी एक्सप्रेसच्या सी-७ या डब्यातील चौथ्या क्रमांकाच्या आसनाखाली ठेवलेला बॉम्ब पश्चिम रेल्वेच्या कोटा विभागातील इंदरगढ आणि अमली या दोन स्थानकांदरम्यान फुटला. या स्फोटात पाच प्रवासी गंभीररीत्या जखमी झाले, पण सुदैवाने त्यापैकी एकही प्रवासी दगावला नाही.

त्याच दिवशी सकाळी सहा वाजता सुरतवरून मुंबईच्या दिशेने निघालेल्या फ्लाइंग क्वीन एक्सप्रेसच्या डी-१ डब्यातील १३५ क्रमांकाच्या आसनाखाली ठेवलेल्या बॉम्बचा स्फोट झाला. या स्फोटात एक प्रवासी जखमी झाला आणि डब्याचं खूप नुकसान झालं. परिणामी, रेल्वेच्या मालमत्तेची हानी झाली.

नवी दिल्ली ते कोलकाता यादरम्यान धावणाऱ्या राजधानी एक्सप्रेसच्या पेंट्री कारच्या शौचकूपात ठेवलेला बॉम्ब त्याच दिवशी सकाळी साडेदहाच्या सुमारास फुटला. त्या वेळी ही गाडी उत्तर रेल्वे विभागाच्या अलाहाबाद विभागातील प्रेमपूर आणि करबीगवान या स्थानकांदरम्यान होती. पेंट्री कारमध्ये काम करणारे दोन खानसामे गंभीर जखमी झाले आणि डब्याचंही नुकसान झालं.

याचप्रमाणे कोलकात्याहून नवी दिल्लीकडे रवाना झालेल्या राजधानी एक्सप्रेसमध्येही दोन बॉम्ब ठेवले होते. हे दोन्ही बॉम्ब सी-२ आणि सी-६ या डब्यांच्या शौचकूपांमध्ये ठेवले होते. त्यापैकी एका बॉम्बचा स्फोट पहाटे पाचच्या सुमारास झाला. पण दुसरा बॉम्ब उत्तर रेल्वेच्या कानपूर विभागातील भाऊपूर रेल्वे स्थानकात तपासणी करत असताना सापडला आणि तो निकामी करण्यात यश आलं.

देशातील आणखी एक खास ट्रेन समजली जाणाऱ्या आंध्र प्रदेश एक्सप्रेसच्या ४८९५ क्रमांकाच्या डब्यात ३८ क्रमांकाच्या आसनाखालीही एक बॉम्ब ठेवला होता. या बॉम्बचा स्फोटही त्याच दिवशी सकाळी सव्वा सातच्या सुमारास झाला. या स्फोटात अहमद माजिद इस्माईल आणि जीवन ज्योती असे दोन प्रवासी दगावले. दहशतवाद्यांनी ठेवलेल्या बॉम्बचा स्फोट होतो किंवा त्यांच्या बंदुकीतून जेव्हा गोळी सुटते, तेव्हा त्यावर ती कोणाला लागणार त्याचा जात, धर्म, लिंग काही लिहिलेलं नसतं. दहशतवादी हल्ल्यांमध्ये जसे हिंदू मारले जातात, तसेच मुस्लीम लोकही प्राणास मुकतात, हेच या स्फोटावरून

पुन्हा एकदा सिद्ध झालं. या दोघांबरोबरच १५ प्रवासी गंभीर जखमी झाले. तसंच रेल्वेच्या डब्याचंही खूप नुकसान झालं.

मुंबई कुर्ला एक्सप्रेसमध्येही त्याच दिवशी एक बॉम्ब ठेवला होता. पण सुदैवाने तो शोधून निकामी करण्यात यश आलं. राजस्थानमधील कोटा, उत्तर प्रदेशातील कानपूर (दोन गुन्हे), गुजरातमधील वलसाड आणि आंध्र प्रदेशातील मल्काजगिरी या रेल्वे पोलिसांच्या विविध पोलीस ठाण्यांमध्ये पाच गुन्हे नोंदवण्यात आले. त्या त्या राज्यातील पोलिसांनी त्यांच्या गुन्हे अन्वेषण विभागांच्या मदतीने या बॉम्बस्फोटांचा तपास करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना त्यात यश आलं नाही. हे गुन्हे वेगवेगळ्या राज्यांमध्ये घडले असले, तरी ते एकाच स्वरूपाचे होते. तसंच या गुन्ह्यांचा तपास ही राष्ट्रहिताची बाब होती. या गोष्टी लक्षात घेऊन तपास सुलभ आणि झटपट व्हावा, यासाठी भारत सरकारने २१ आणि २८ डिसेंबर १९९३ या दोन दिवशी वेगवेगळ्या सूचना काढून हा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे म्हणजेच सीबीआयकडे सोपवला. सीबीआयचे तत्कालीन महासंचालक के. विजय रामा राव यांनी या पाचही गुन्ह्यांचा तपास नुकत्याच स्थापन केलेल्या विशेष कृती दलाकडे सोपवला. या विशेष कृती दलाची स्थापना होऊन सहा महिनेही उलटले नव्हते.

***

१२ मार्च १९९३ रोजी मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांचा तपास करण्यासाठी मे १९९३मध्ये सीबीआयच्या या विशेष कृती दलाची स्थापना करण्यात आली होती. या स्फोटांच्या आणि त्यानंतर मुंबईत उसळलेल्या दंग्यांच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने केलेल्या तपासाबद्दल अनेक उलटसुलट चर्चा आणि वाद सुरू झाले होते. खरंतर पोलिसांनी या प्रकरणाची उकल केली होती आणि काही दोषींना अटकही केली होती. पण या हल्ल्याचे काही सूत्रधार आणि राज्यातील काही बड्या नेत्यांचे लागेबांधे असल्याचे आणि मुंबई पोलिसांनीही तपास करताना जरा ढिलाई केल्याचे आरोप होत होते. त्याशिवाय या गुन्ह्याचं राष्ट्रीयच नाही, तर आंतरराष्ट्रीय स्वरूपही लक्षात घेऊन या बॉम्बस्फोटांचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवला जावा, अशी मागणी देशात जोर धरत होती.

शेवटी १९ नोव्हेंबर १९९३ रोजी ही केस सीबीआयकडे सोपवण्यात आली. आमच्या विशेष कृती दलाकडे या खटल्याशी संबंधित सगळ्या फायली यायला लागल्या. या फायलींची आणि कागदपत्रांची संख्या एवढी होती की, आम्ही त्यात व्यग्र झालो. ही कागदपत्रं वाचून त्यानंतरच आम्हाला आमच्या तपासाची दिशा ठरवायची होती. आम्ही जसजशी ही कागदपत्रं वाचत होतो, तसं आम्हाला काही कच्चे दुवे आढळत होते. ते पक्के करायचे होते आणि पुढे तपास करून या बॉम्बस्फोटांमध्ये हात असलेल्या फरारी आरोपींना पकडायचं होतं. मी त्या वेळी पोलीस उपमहासंचालक होतो आणि विशेष कृती दलात या खटल्याची जबाबदारी माझ्याकडे होती. आता सरकारी कार्यालयांमध्ये कोणताही नवीन विभाग किंवा खातं तयार करताना हाताशी असलेले मनुष्यबळ आणि साधनसंपत्ती यांच्या जोरावरच सुरू करतात. त्यासाठी मग इतर खात्यांमधून किंवा विभागांमधून या दोन्ही गोष्टी आणल्या जातात. तुमच्या दिमतीला असलेल्या माणसांची संख्या तर कमी असतेच, पण त्याचबरोबर या नव्या विभागासाठी कार्यालयाची जागा, प्रवासाची साधनं यांचीही वानवा असते. आम्ही या प्रसववेदनांमधून जात होतो, १९९३च्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणाची कागदपत्रं वाचत होतो आणि त्याच सुमारास या पाच बॉम्बस्फोटांचा तपास आमच्याकडे सोपवल्याचे आदेश आले. हे पाचही बॉम्बस्फोट देशातील विविध राज्यांमध्ये विविध ठिकाणी झाले होते. त्यामुळे या प्रकरणाचा तपास करण्यासाठी प्रचंड पायपीट आणि भिरभिर करावी लागणार होती.

या नव्या प्रकरणाचा तपास करताना आम्हाला आमच्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणावरून आमचं लक्ष हटू द्यायचं नव्हतं. त्यामुळे त्याही प्रकरणाकडे लक्ष केंद्रित करत आम्ही सर्वांत आधी उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, राजस्थान आणि गुजरात या चारही राज्यांमधील लोहमार्ग पोलिसांकडून या प्रकरणाच्या फायली आणि कागदपत्रं मागवून घेतली. त्यानंतर स्फोट झालेल्या प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक डब्याला भेटी देऊन आम्ही पाहणी केली.

आमचा हा तपास चालू असताना १३ जानेवारी १९९४ रोजी महासंचालक के. विजय रामा राव यांनी मला नॉर्थ ब्लॉकमधील त्यांच्या कार्यालयात बोलावून घेतलं. मी हैदराबादला जाण्यासाठी निघावं, अशी सूचना त्यांनी केली. हैदराबाद पोलीस दलातील एका साहाय्यक पोलीस आयुक्ताच्या एका खबऱ्याकडे ट्रेनमध्ये झालेल्या या साखळी बॉम्बस्फोटांबद्दल काहीतरी माहिती होती. ती माहिती या खबऱ्याला सीबीआयला द्यायची होती. या माहितीच्या आधारे मुंबईत एक धडक कारवाई करावी लागण्याची शक्यताही होती. अशी जुजबी माहिती महासंचालकांनी मला दिली. माझे वरिष्ठ अतिरिक्त संचालक एस. सेन तातडीने मुंबईला रवाना होणार होते आणि मला त्या खबऱ्याला भेटायला हैदराबादला जायचं होतं.

मी त्याच दिवशी तातडीने निघालो आणि रात्री आठच्या सुमारास हैदराबादला पोहोचलो. माझी सोय तिथल्या स्थानिक पोलिसांच्या अतिथीगृहात केली होती. पण मी विमानतळावरून थेट त्या साहाय्यक पोलीस आयुक्ताचं कार्यालय गाठलं. हा साहाय्यक पोलीस आयुक्त हैदराबाद पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकातील एक प्रमुख अधिकारी होता. या अधिकाऱ्याचं खरं नाव मला आठवत नाही, पण त्याच्या सहकाऱ्यांमध्ये तो गब्बर सिंग या नावाने प्रसिद्ध होता, एवढं मला नक्की आठवतं. तो चांगला उंचापुरा, धिप्पाड आणि काहीसा खलनायकी चेहऱ्याचा अधिकारी होता आणि म्हणूनच त्याला हे नाव पडलं असावं. प्रत्यक्षात मात्र तो खूपच सज्जन होता. त्याला भेटून मला खरंच खूप बरं वाटलं. आम्ही दोघांनी आमच्या कामाचं स्वरूप, आमचे विभाग हाताळत असलेल्या केसेस अशा गप्पा मारायला सुरुवात केली आणि अगदी अल्पावधीतच आमची मैत्री झाली.

त्या अधिकाऱ्याने तातडीने त्या खबऱ्याला बोलावून घेतलं आणि साधारण तिशीतला, बुटकासा आणि अशक्त वाटणारा एक माणूस माझ्यासमोर उभा राहिला. त्याचे केस विस्कटलेले होते आणि त्याने बहुधा बरेच दिवस अंघोळही केली नसावी. कारण त्याच्या दिशेने एक उग्र दर्प येत होता. गब्बर सिंगने त्याच्याशी माझी ओळख करून दिली आणि त्याला सांगितलं की, त्याच्याकडे असलेली माहिती जाणून घेण्यासाठी दिल्लीहून सीबीआयने मला पाठवलं आहे. सुरुवातीला मी त्या खबऱ्याला इकडचे तिकडचे प्रश्न विचारून त्याच्या मनातील भीती दूर केली. मग हळूहळू तो त्याच्या हैदराबादी लहेजाच्या हिंदीत बोलायला लागला.

त्याच्याबरोबर झालेलं संभाषण अजूनही माझ्या मनात पक्कं बसलं आहे. ते काहीसं असं होतं : 'साहिब, आपने कुछ जानते जो तुमको बताना क्या?' (साहेब, तुमच्या फायद्याचं काही मी तुम्हाला सांगू का?) मी त्याला होकार दिला. त्यावर त्याने विचारलं, 'क्या आप एपी एक्सप्रेस का बॉम्ब धमाका केस देखते?' (तुम्ही एपी एक्सप्रेस बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास करत आहात का?) मी होकार दिल्यावर तो म्हणाला, 'बॉम्बे में एक जगह हैं मोमिनपुरा. वहाँ एक डॉक्टर हैं जिसका नाम अपुन को नहीं मालूम. पर उसका खैरात का एक हॉस्पिटल हैं मोमिनपुरा में. वो मास्टरमाइंड हैं. उसको ढूंढो, वो आपको सब बता सकता हैं.' (मुंबईत मोमीनपुरा नावाची एक जागा आहे. तिथे एक मुस्लीम डॉक्टर राहतो. त्याचं नाव माहीत नाही, पण तो त्या भागात एक सेवाभावी हॉस्पिटल चालवतो. तो या हल्ल्यामागचा सूत्रधार आहे. त्याला शोधा, तो तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं देईल.)

ही माहिती त्रोटक होती, पण मला त्यातून हवं ते काढावं लागणार होतं. प्राप्त परिस्थितीत सगळ्यात महत्त्वाचं होतं ते म्हणजे मिळालेली माहिती माझ्या मुंबईतील सहकाऱ्यांच्या कानी घालणं! त्यासाठी माझा कनिष्ठ सहकारी सतीश झा जो मुंबईत पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत होता, त्याच्याबरोबर सातत्याने संपर्कात राहणं आवश्यक होतं. तोपर्यंत भारतात मोबाइल टेलिफोन नेटवर्क पोहोचलं नव्हतं. माझ्या दुर्दैवाने गब्बर सिंगच्या कार्यालयात STD फोनची सुविधाही नव्हती. (त्या काळात STD सुविधा असलेले फोन फक्त ज्यांना गरजेचे आहेत अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या घरी किंवा कार्यालयातच उपलब्ध होते. मला अजूनही आठवतं, या सुविधेचा गैरवापर होऊ नये, म्हणून अनेकदा हे फोन एखाद्या बॉक्समध्ये ठेवून त्याला टाळं लावलं जायचं किंवा सांकेतिक क्रमांक वापरून त्या फोनचा वापर रोखला जायचा. हा सांकेतिक क्रमांक फक्त त्या अधिकाऱ्यांनाच माहीत असायचा.)

ही तांत्रिक अडचण लक्षात घेऊन मी ट्रंक कॉल करून मला हैदराबादमध्ये मिळालेली माहिती मुंबईत सतीश यांना दिली. सतीश मला पाच वर्षांनी कनिष्ठ होता. उत्तम तपासासाठी आणि धडक कारवायांसाठी ओळखले जाणारे धडाडीचे अधिकारी याआधीही अनेक कारवायांमध्ये माझ्याबरोबर सहभागी झाले होते. त्याने तातडीने त्याच्या हाताखालच्या काही निवडक अधिकाऱ्यांची एक टीम तयार केली. तसंच मुंबई पोलिसांनाही विश्वासात घेतलं. ही गोष्ट आमच्यासाठी नक्कीच फायद्याची ठरणार होती. हे संशयित जिथे राहत होते, तो मोमीनपुरा हा भाग झोपडपट्टीचा भाग होता. इथे राहणारे बहुतांश लोक मुस्लीम समाजाचे आहेत आणि ते एकमेकांना एवढे घट्ट धरून असतात की, सरकारी यंत्रणांना इथे शिरकाव करणं शक्यच नव्हतं. त्यामुळे पोलीस या भागात जाऊन कारवाई करणं काहीसं अशक्यच होतं.

पोलीस उपअधीक्षक प्रमोद मुडभटकळ आणि निरीक्षक रमण त्यागी या दोघांनी मोमीनपुरा परिसरात जाऊन त्या सेवाभावी रुग्णालयाचा पत्ता शोधण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना अजिबात यश मिळालं नाही. सीबीआयचं विशेष कृती दल आणि मुंबई पोलीस यांच्या एकत्रित टीमचं नेतृत्व सतीश करत होता. त्याला त्या भागात जाऊन संशयित डॉक्टरबद्दल चौकशी करायला सुरुवात करणं पसंत नव्हतं. त्यामुळे तिथले लोक सावध झाले असते, एकत्र आले असते आणि त्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असता. परिणामी आमच्या तपासात अडथळे आले असते. त्याने मला मोमीनपुऱ्यातील एका STD बूथवरून गब्बर सिंगच्या कार्यालयात फोन केला. आमच्या खबऱ्याने आणखी काही माहिती दिली आहे का, असं त्याला विचारायचं होतं. खबऱ्याने काही खाणाखुणा सांगितल्या होत्या. त्या मी सतीशला सांगितल्या. सतीश आणि त्याच्या सहकाऱ्यांनी त्या खाणाखुणांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. पण ना त्यांना ते सेवाभागी रुग्णालय सापडलं, ना डॉक्टरचा पत्ता!

हे सगळं होईपर्यंत मध्यरात्र उलटून गेली होती आणि मोमीनपुरा सुनसान झाला होता. काही चहाचे आणि पानाचे ठेले वगळले, तर सगळी दुकानं बंद झाली होती. रस्ते सामसूम होते. मोमीनपुऱ्यातल्या गल्ल्यांमध्ये शोधक नजरेने भटकणाऱ्या पोलिसांवर गल्लीतले कुत्रे भुंकायला लागले होते. आमची शोधमोहीम सुरू होऊन अनेक तास उलटून गेले होते. आजूबाजूने जाणारे लोक आता सीबीआयच्या आमच्या लोकांकडे संशयाने बघायला लागले होते. वेळ आमच्या हातातून निसटून जायला लागला होता. सतीशचा संयमही आता सुटत चालला होता. तणाव त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. तेवढ्यात एका गल्लीच्या कोपऱ्यावर एक टॅक्सी उभी असलेली त्याला दिसली. त्या टॅक्सीचा चालक आतच बसला होता. कदाचित दिवसाच्या शेवटच्या भाड्याची वाट बघत असावा. सतीशला काय वाटलं कोणास ठाऊक, पण त्याने त्या टॅक्सीचालकाकडे आपला मोर्चा वळवला. चेहऱ्यावर अजिजी आणत त्याने त्या चालकाला त्या परिसरात एखादा सेवाभावी दवाखाना आहे का, याबद्दल विचारलं. त्याच्या कोणा नातेवाइकाला तातडीने उपचारांची गरज असल्याची लोणकढी थापली त्याने मारली. त्यावर त्या टॅक्सीचालकाने सतीशला विचारलं की, ते डॉ. जलीस अन्सारी यांच्या खैराती रुग्णालयाबद्दल विचारत आहेत का? सतीशला त्या डॉक्टरचं नाव माहीत नव्हतं. पण त्याने एक प्रयत्न म्हणून होकार दिला. त्या टॅक्सी चालकाने सतीशला रुग्णालयाचाच नाही, तर डॉक्टर ज्या चाळवजा झोपडपट्टीत राहायचा, त्या चाळीचा तपशीलवार पत्ता सांगितला. डॉक्टर त्या रुग्णालयाच्या वरच्या भागातच राहत होता. सुदैवाने त्या टॅक्सीचालकाने सतीशबरोबर येत त्यांना पत्ता दाखवण्याची तयारीही दाखवली.

तो टॅक्सीचालक टॅक्सीचे सगळे दरवाजे बंद करत असताना सतीशने जवळच उभ्या असलेल्या प्रमोद आणि रमण यांना त्यांच्या मागे येण्यास खुणावलं. दिवसभराच्या अथक परिश्रमानंतर शेवटी पोलिसांच्या हाती काहीतरी लागण्याची शक्यता होती. एक वेगळीच संवेदना त्यांच्या शरीरात वाहू लागली आणि त्यांचं हृदय धडधडू लागलं. पुढे काय घडणार, याची कल्पना कोणालाच नव्हती. आपलं लक्ष्य अक्षरशः काही पावलांवर आहे, याची कल्पना त्यांना आली होती. एखाद्या निष्णात शिकाऱ्याला शिकारीचा वास लागावा, तशीच!

सतीश आणि तो टॅक्सीचालक अगदी काही मिनिटांमध्येच त्या स्थळी पोहोचले. प्रमोद आणि रमण त्यांच्या मागेच होते. ते धर्मादाय रुग्णालय त्यांच्या अगदी समोरच होतं. रुग्णालयाचं नाव असलेला भलामोठा फलक लावला होता. त्या रुग्णालयाच्या वर आणि आसपास काही चाळी होत्या. रस्त्यावरच्या म्युनिसिपालिटीच्या दिव्यांच्या मिणमिणत्या प्रकाशात त्या सगळ्या चाळी सारख्याच दिसत होत्या. सतीशने त्या टॅक्सीचालकाला विचारलं की, तो त्याच्यावर आणखी थोडे उपकार करून त्याला डॉक्टरांची चाळ आणि खोली दाखवू शकेल का?

त्या भल्या टॅक्सीचालकाने अजिबात खळखळ न करता सतीशची विनंती मान्य केली आणि एका चाळीच्या लाकडी जिन्यांवरून तो वर जायला लागला. त्यानंतर एका अरूंद सज्जातून चालत जाऊन तो त्या डॉक्टरांच्या खोलीबाहेर थांबला. त्या टॅक्सीचालकाने डॉक्टरांच्या खोलीच्या दरवाज्यावर थाप मारली आणि ओरडूनच सांगितलं की, कोणाला तरी मदतीची गरज आहे.

साधारण १४-१५ वर्षांच्या एका मुलाने त्या खोलीचा खिळखिळा दरवाजा उघडला. 'डॉक्टर अन्सारी घरात आहेत का?' असं सतीशने विचारलं. तोपर्यंत साधारण चाळिशीचा, दाढी राखलेला एक माणूस म्हणजेच डॉक्टर अन्सारी दरवाज्यापर्यंत आला आणि त्याने 'सतीशला काय हवंय?' असं विचारलं. सतीशने त्याला अस्तित्वात नसलेल्या एका रुग्णाच्या आजाराबद्दल माहिती देत गुंतवून ठेवलं आणि तोपर्यंत प्रमोद व रमण चाळीत शिरले. डॉक्टरला काही कळायच्या आत किंवा त्याने काही प्रतिकार करायच्या आत ते दोघंही घरात घुसले होते. घरात घुसल्या घुसल्या त्यांनी खोलीत पसरलेल्या जुनाट फर्निचरची उलथापालथ करायला सुरुवात केली. बाजूला पडलेले लोखंडी पेटारेही त्यांनी उघडले. संतापलेल्या डॉक्टरने सतीश आणि त्याच्या अधिकाऱ्यांवर आरडाओरडा करायला सुरुवात केली आणि ताबडतोब घराबाहेर जायला सांगितलं. नेमकं त्याच वेळी त्या खोलीतल्या माळ्यावर ठेवलेली एक ट्रंक एका अधिकाऱ्याने उघडली आणि त्यात शस्त्रास्त्रं, स्फोटकं आणि बॉम्ब बनवण्याचं साहित्य सापडलं. हे सामान सापडल्यानंतर त्या डॉक्टरची बोलती बंद झाली आणि त्याचा विरोधही मावळला.

डॉ. अन्सारीच्या खोलीत चाललेल्या या गोंधळामुळे आजूबाजूचे लोक जागे झाले. पोलिसांची धाड पडल्याची बातमी त्या वस्तीत वणव्यासारखी पसरली आणि लोक गोळा व्हायला सुरुवात झाली. काही जण तर डॉक्टर अन्सारीच्या घराखालच्या रस्त्यावरच जमले होते. क्षणाक्षणाला ही गर्दी वाढत होती. ही गर्दी आपल्याला घेरणार आणि गोंधळ घालणार, याची कल्पना पोलिसांना आली. सतीशसोबत असलेल्या स्थानिक पोलिसांच्या वायरलेस यंत्रणेचा वापर करून त्याने मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधला आणि जादा कुमक मागवून घेतली. अगदी थोड्याच वेळात सशस्त्र पोलिसांची एक तुकडीच तिथे पोहोचली. त्या भागात डॉक्टर अन्सारी हा चांगलाच प्रसिद्ध होता. तसंच तो सेवाभावी रुग्णालय चालवत असल्याने लोकांना त्याच्याबद्दल सहानुभूतीही होती. त्यामुळे त्याला अटक होणार असल्याची बातमी पसरताच लोक संतापले होते. पोलिसांनी डॉक्टर अन्सारीला घेऊन त्याच्या चाळीबाहेर पाऊल टाकलं आणि जमावाने पोलिसांविरोधी घोषणा द्यायला सुरुवात केली. महत्प्रयासाने पोलिसांच्या या तुकडीने डॉक्टर अन्सारीला सीबीआयच्या मुंबईच्या विशेष कृती दलाच्या सचिवालयाजवळच्या कार्यालयात आणलं.

पहाटे तीन वाजता या गोष्टीची माहिती देण्यासाठी मला सतीशचा फोन आला. माहिती मिळाल्यानंतर अगदी काही तासांच्या आत या खटल्यातील एका महत्त्वाच्या संशयिताला अटक करण्यात आणि बॉम्ब बनवण्याच्या साहित्याबरोबर शस्त्रास्त्रं ताब्यात घेण्यात आमच्या टीमला यश आलं होतं. मुंबई आणि हैदराबाद यादरम्यान अनेक फोन सुरू होते. गब्बर सिंगच्या खबऱ्यालाही या अटकेची माहिती दिली. आपण दिलेली माहिती अचूक होती आणि त्या माहितीबरहुकूम पोलिसांनी झटपट कारवाई केली, हे ऐकून त्या खबऱ्याच्या चेहऱ्यावरही समाधान झळकलं होतं.

पहाटे चारच्या सुमारास मी पोलिसांच्या अतिथीगृहात पोहोचलो. दिवसभर दगदग करूनही मला मिळालेल्या यशाची धुंदी होती. अगदी आत्ताआत्तापर्यंत ज्या प्रकरणात आरोपींचा सुगावाही लागत नव्हता, त्या प्रकरणातील प्रमुख संशयित आरोपीला आम्ही अटक केली होती. हे खरंच खूप मोठं यश होतं. या समाधानातच मला कधी झोप लागली, ते कळलंच नाही.

मला झोप लागून साधारण दोन तासच झाले असतील आणि माझ्या दरवाज्याची कडी वाजली. हैदराबाद पोलिसांचा एक अधिकारी मला पोलीस आयुक्तांचं निमंत्रण द्यायला आला होता. पोलीस आयुक्त एच. जे. डोरा यांनी मला त्यांच्या घरी नाश्त्यासाठी बोलावलं होतं. त्यांना बहुतेक गब्बर सिंगकडून डॉ. अन्सारीच्या अटकेची बातमी मिळाली होती. त्यामुळे ते मला भेटण्यासाठी उत्सुक होते.

माझी झोप झाली नव्हती, पण मी तसाच झोपाळलेले डोळे घेऊन पोलीस आयुक्त डोरा यांच्या घरी गेलो. त्यांनी खूप आत्मीयतेने माझं स्वागत केलं. डॉक्टर अन्सारीला पकडण्यासाठी आम्ही जे काम केलं, त्याचं कौतुक म्हणून त्यांनी हे आमंत्रण दिलं होतं. त्यांनी मला हे सांगितलं, तेव्हा खरंच मला भरून आलं. या खटल्याचा सोक्षमोक्ष लावण्याचा माझा निर्धार आणखी पक्का झाला. मी याआधी डोरांबद्दल खूप काही ऐकलं होतं. त्यांना भेटणं म्हणजे माझ्यासाठी एक स्वप्न सत्यात उतरल्यासारखं होतं. राजकारण्यांसमोर कोणत्याही परिणामांची पर्वा न करता जे बरोबर असेल, त्याला बरोबर म्हणण्याची धमक डोरा यांनी आतापर्यंत अनेकदा दाखवली होती. आपल्या हाताखालच्या माणसांनाही अत्यंत प्रेमाने वागवणारे, डोरा यांच्यासारखे मृदू व्यक्तिमत्त्वाचे अधिकारी आता असणं कठीण आहे.

***

डोरा यांच्या घरून मी थेट विमानतळावर गेलो आणि तिथून मुंबईसाठी रवाना होणारं पहिलं विमान पकडलं. हैदराबादहून मुंबईला पोहोचायला मला जेवढा वेळ लागला नाही, त्यापेक्षा जास्त वेळ मला मुंबईच्या वाहतूक कोंडीतून रस्ता काढून विमानतळावरून दक्षिण मुंबईतील विशेष कृती दलाच्या कार्यालयात पोहोचायला लागला. मी तिथे पोहोचेपर्यंत माझ्या सहकाऱ्यांनी न्यायालयीन प्रक्रिया पार करून डॉ. अन्सारीला चौकशीसाठी पोलीस कोठडीत ठेवण्याची परवानगी मिळवली होती.

मी सतीशच्या ऑफिसमध्ये शिरलो आणि मला डॉ. अन्सारी एका खुर्चीवर बसलेला दिसला. सीबीआयचे तीन अधिकारी त्याला घेराव घालून बसले होते आणि त्याची झाडाझडती घेत होते. मी आत शिरलो, तसे ते मला सलाम करायला उभे राहिले. सलाम झाल्यानंतर अत्यंत हताशपणे त्यापैकी एक अधिकारी मला म्हणाला, ''साहेब, सकाळपासून खोदून खोदून चौकशी सुरू आहे, पण या माणसाने तोंडातून एक शब्दही काढलेला नाही. एवढंच कशाला शस्त्रास्त्रं आणि स्फोटकं त्याच्या घरातून सापडल्याचंही तो फेटाळून लावतोय.''

हे ऐकल्यावर दुसरं काही करण्याआधीच मी डॉ. अन्सारीची चौकशी करण्याचं ठरवलं. इतरांना तो बधला नाही, मला तरी बधतो का, हा प्रश्न मला पडला होता. चौकशीचे अनेक मार्ग वापरूनही त्याच्यावर त्यांचा

काहीच ढिम्म परिणाम होत नव्हता. त्याच्या चेहऱ्यावरची सुरकुतीही हलत नव्हती. आता पुढे काय करायचं, हा माझ्यासमोरचा मोठा प्रश्न होता. त्या डॉक्टरच्या समोर बसून माझ्या डोक्यातलं विचारचक्र सुरूच होतं. त्याला लवकरात लवकर बोलतं करणं आवश्यक होतं. जिथे कोणालाच काहीच यश मिळत नव्हतं, तिथे आम्ही इथपर्यंत पोहोचलो होतो. आम्ही सूत्रधाराला अटक केली होती, त्याच्या घरातून शस्त्रास्त्रं आणि स्फोटकंही जप्त केली होती. पण आम्हाला आणखी पुढे जाणं भाग होतं. डॉक्टर अन्सारीच्या या कटात त्याच्यासह कोण कोण सहभागी होतं, ही माहिती मिळवून त्या सगळ्यांच्या मुसक्या आम्हाला आवळायच्या होत्या. आणि त्यासाठी आधी डॉक्टरने तोंड उघडणं अत्यावश्यक होतं. पण डॉक्टर मात्र त्याच्या मौनावर ठाम होता.

मी डॉक्टरच्या समोर बसलो होतो खरा, पण माझ्या मनात अनेक विचारचक्रं फिरत होती. अनेक भावना दाटून आल्या होत्या. माझ्या चेहऱ्यावरून माझ्या मनातल्या भावना त्या डॉक्टरला कळत होत्या की नाही, कोणास ठाऊक; पण त्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या मनाचा थांग काही लागत नव्हता. अचानक माझ्या मनात काय आलं काय माहीत, पण मी त्या डॉक्टरला विचारलं, ''डॉक्टर, समजा मी इथे कुराण घेऊन आलो, तर त्या कुराणाची शपथ घेऊन तू कबूल करशील का की, तुला या बॉम्बस्फोटांबद्दल काहीच माहीत नाही?'' तो प्रश्न ऐकून डॉक्टर अन्सारी जागच्या जागी थिजला आणि असहाय्यपणे माझ्याकडे बघायला लागला. त्याचा चेहरा आक्रसला आणि काही क्षणांमध्येच तो हमसून हमसून रडायला लागला. त्याच्या मनात दडवलेली माहिती त्याला अजिबात सांगायची नव्हती, पण कुराणेशरीफचा उल्लेख झाल्यानंतर मात्र त्याच्या भावनांचा बांध फुटला होता. तो एक धार्मिक किंबहुना प्रचंड कट्टर होता, यात वादच नाही. पोलिसांच्या चौकशीचा मानसिक तणाव झेलायला तो तयार होता. एका मोठ्या जमावासमोर त्याला अटक करून त्याची अब्रू वेशीला टांगली गेली होती. लोकांच्या समोर आणखी अब्रू गेली असती, तरी ते त्याला मान्य होतं. एवढंच काय, त्याच्या कुटुंबापासून अनिश्चित काळासाठी दूर राहायचीही त्याची तयारी होती. पण त्याच्या पवित्र धर्मग्रंथाशी प्रतारणा करून खोटी शपथ घ्यायच्या कल्पनेनेच तो समूळ हादरला होता. रडत रडतच तो अस्पष्ट असं काहीतरी पुटपुटायला लागला. त्याला थांबवून काही प्रश्न विचारावेत, असा विचार माझ्या डोक्यात आला होता. पण मी स्वत:ला आवर घातला. थोड्या वेळाने तो भानावर आला. हळूहळू त्याने स्वत:ला सावरलं आणि तो स्वत:बद्दल, तो कट्टरतावादाकडे कसा झुकला त्याबद्दल, जिहादच्या नाऱ्याने एकत्र आलेल्या लोकांबद्दल बोलायला लागला. तो अक्षरश: बांध फुटल्यासारखा बोलत होता. जणूकाही इतके दिवस त्याच्या मनात या गोष्टी साठल्या होत्या आणि बाहेर पडण्यासाठी मार्ग शोधत होत्या. तो इतका बिनधास्त आणि पटापट बोलत होता की, त्याचा तो कबुलीजबाब कागदावर नोंदवताना आमची कसरत होत होती. गुन्हेगारांचं हे असं पोपटासारखं कबुलीजबाब देणं आमच्यासाठी काही नवीन नव्हतं. चौकशी सुरू असताना अनेकदा एखादा गुन्हेगार जेव्हा मानसिक ताणाला बळी पडतो, तेव्हा एकदा बोलायला सुरुवात केल्यावर त्याला काहीच मनात ठेवायचं नसतं. आतापर्यंत मनात दडवून ठेवलेली सगळी गुपितं बाहेर काढून त्याला शांत व्हायचं असतं. आपण कबुली दिल्याचे परिणाम काय होतील, याची त्याला काहीच काळजी नसते. उत्तर भारतातील पोलिसांच्या भाषेत आम्ही याचं वर्णन 'वो खुल गया' असं करतो. डॉक्टर अन्सारीने जणूकाही त्याचं हृदयच आमच्यासमोर उघडं केलं. त्याचं आयुष्य, एक निष्णात डॉक्टरपासून कट्टरतावादी आणि आता एक दहशतवादी इथपर्यंत कसं झालं, हेदेखील त्याने अगदी खुलेपणाने सांगितलं.

***

उत्तर प्रदेशातील बस्ती जिल्ह्यात जलीस अन्सारीचा जन्म झाला आणि तिथेच तो लहानाचा मोठा झाला. अभ्यासात तो जात्याच हुशार होता. डॉक्टर होण्याचं स्वप्न उराशी बाळगून तो वैद्यकीय शिक्षणासाठी मुंबईत आला. प्रचंड मेहनतीने त्याने सायनच्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवला आणि तिथूनच MBBSची पदवीही प्राप्त केली. १९८३मध्ये तो मुंबई महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागात नोकरीला लागला. लवकरच त्याचं लग्न झालं आणि मुंबईतल्या मोमीनपुरा या मुस्लीमबहुल लोकवस्तीतील एका चाळीत त्याने संसार थाटला. जलीस लहानपणापासूनच धार्मिक होता. याच धार्मिकतेपोटी तो अहल-ए-हादीस या चळवळीशी जोडला गेला. अहल-ए-हादीस ही चळवळ १९व्या शतकात उत्तर भारतात सुरू झाली. मुस्लीम धर्माचं पालन त्याच्या मूळ आणि शुद्ध स्वरूपातच झालं पाहिजे, हा या पंथाचा आग्रह होता. जलीस फक्त या पंथाच्या मशिदींमध्येच जायचा. अनेकदा देशाच्या कानाकोपऱ्यातून मौलवी या मशिदीत यायचे आणि देशात आणि खासकरून काश्मिरमध्ये मुस्लिमांवर कसे अन्याय होत आहेत, हे सांगणारी अत्यंत भडक व चिथावणीखोर भाषणं करायचे. आंध्र प्रदेशातल्या करीमनगर इथे राहणारा आझम घौरी हा अशा मौलवींपैकीच एक होता. हा आझम घौरी उत्तम वक्ता होता. लष्कर-ए-तोयबा आणि नक्षलवादी यांच्याशी त्याचे जवळचे संबंध होते. पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये जाऊन त्याने अनेक घातक कारवायांचं प्रशिक्षणही घेतलं होतं. तसंच आंध्र प्रदेशातील अनेक गंभीर गुन्ह्यांसाठी पोलिस त्याचा शोध घेत होते. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या खुनाचा आरोपही त्याच्यावर होता.

डॉक्टर अन्सारी आणि घौरी यांची मैत्री जुळायला फार वेळ लागला नाही. लवकरच घौरीच्या अत्यंत कट्टर विचारांनी अन्सारीला भुरळ पाडली. भारत सरकार आणि या देशात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांचा बदला घेण्याच्या घौरीच्या कल्पनेशी अन्सारीही सहमत व्हायला लागला. १९८६-८७च्या सुमारास मोमीनपुऱ्यातील मशिदीला दिलेल्या एका भेटीत घौरीबरोबर अब्दुल करीम ऊर्फ टुंडा नावाचा एक माणूसही होता. उत्तर भारतात एकच हात असलेल्या माणसाला टुंडा म्हणतात. टुंडाला दहशतवादी कारवायांचा चांगलाच अनुभव होता. पाकिस्तानच्या ISIचा एक हेर म्हणूनही तो काम करत होता. मुंबई आणि आसपासच्या भागांमध्ये दहशतवादी हल्ले घडवून आणण्याचा कट टुंडाच्या डोक्यात शिजत होता. हा कट प्रत्यक्षात उतरवण्यासाठी डॉक्टर अन्सारी ही योग्य व्यक्ती आहे, हे कळायला टुंडाला फार वेळ लागला नाही.

टुंडा आणि अन्सारी या जोडगोळीचे कारनामे बघण्याआधी या टुंडाबद्दल थोडंसं जाणून घेऊ या. टुंडाचा जन्म १९४३मध्ये दिल्लीत झाला त्याचे आईवडील अत्यंत गरीब होते. टुंडाच्या जन्मानंतर लवकरच हे कुटुंब उत्तर प्रदेशच्या गाझियाबाद जिल्ह्यातल्या पिलाखुवा या त्यांच्या गावी गेले. तिथे त्याने स्थानिक मदरश्यात धार्मिक शिक्षण घ्यायला

सुरुवात केली. लहानपणापासूनच त्याचा ओढा धार्मिक कट्टरतेकडे होता. देशात रामजन्मभूमी आंदोलनाने जोर पकडला होता. याच काळात टुंडा एका प्रश्नाचं उत्तर शोधत होता. भारतात बहुसंख्य समाजाकडून नेहमी मुस्लिम समाजाला लक्ष्य करून त्यांना का दाबलं जातं? १९८५मध्ये त्याच्या गावात झालेले जातीय दंगे त्याने स्वत:च्या डोळ्यांनी बघितले. त्याच्या काही नातेवाइकांना जमावाने जिवंत जाळल्याचं त्याने पाहिलं. या जमावाने मुस्लिमांची काही दुकानं आणि मशीदही उद्ध्वस्त केली. या घटनेनंतर टुंडा आणखीनच कट्टर झाला. ISIसाठी तर टुंडा म्हणजे आपोआप झोळीत पडणारा पिकलेला आंबा होता.

१९९३मध्ये टुंडा पहिल्यांदा पाकिस्तानात गेला. तिथे लष्कर ए तोयबाच्या एका प्रशिक्षण केंद्रात त्याला घातपाती कारवायांचं प्रशिक्षण देण्यात आलं. तो परतल्यानंतर भारतात झालेल्या जवळपास ४०पेक्षा जास्त बॉम्बस्फोटांमध्ये आणि दहशतवादी हल्ल्यांमध्ये टुंडाचा नुसता सहभागच नव्हता, तर तोच त्या हल्ल्यांना जबाबदार होता. देशातल्या मुस्लिमांच्या समस्यांबद्दल फक्त चर्चा करून आणि ठराव मांडून मुस्लिम समाजाचं काहीही भलं होणार नाही. त्यासाठी थेट आणि निर्णायक कृती केली पाहिजे, हे डॉक्टर जलीस अन्सारीला पटवून देण्यात तो यशस्वी ठरला. शस्त्रं कशी वापरायची, बॉम्ब कसा तयार करायचा, याचं प्रशिक्षण घेण्यासाठी टुंडाने डॉक्टर अन्सारीला पटवलं. हे सगळं प्रशिक्षण कुठे मिळतं, याची माहिती अन्सारीला हवी होती. टुंडा तर त्याला तिथल्या तिथे बॉम्ब बनवण्याचं आणि इतर प्रशिक्षण द्यायला तयार होता. स्फोटकं, टायमर वगैरे गोष्टी बरोबर घेऊनच तो मुंबईत आला होता. आजारी रुग्णांवर उपचार करून त्यांना बरं करणारा डॉक्टर अन्सारी अगदी काही दिवसांमध्येच बॉम्ब बनवायला शिकला. वैद्यकीय शिक्षण घेताना डॉक्टरने लोकांचे जीव वाचवण्याची शपथ घेतली होती, पण इथे मात्र या नव्या विद्येच्या आधारे शेकडो निरपराध लोकांचे जीव घ्यायला डॉक्टर तयार झाला होता. आपल्यात झालेला हा बदल खुद्द जलीस अन्सारीलाही थक्क करणारा होता. एका वाल्मिकीचा वाल्या झाला होता.

अत्यंत खुनशी डोक्याचे आझम घौरी, डॉ. जलीस अन्सारी आणि अब्दुल करीम टुंडा हे त्रिकूट एकत्र येणं हे कमी धोक्याचं नव्हतं. अन्सारी आणि टुंडा सतत एकमेकांच्या संपर्कात असायचे. टुंडा नेहमी अन्सारीला स्फोटकं पाठवत राहायचा. या दरम्यान डॉक्टर अन्सारीने मुंबईत त्याची विश्वासू माणसं गोळा करायला सुरुवात केली. हे सगळे लोक अन्सारी आणि टुंडा यांच्यासारखेच कट्टरतावादी आणि अन्सारीसाठी काहीही करायला तयार होते. टुंडा मुंबईत आला आणि त्याने डॉक्टर अन्सारीच्या घरी बॉम्ब तयार केले. हे बॉम्ब डॉक्टर आणि सलीम, बच्चू आणि रईस या त्याच्या तीन साथीदारांनी मिळून मुंबईतील अंधेरी, सायन, खार, हलीवाडा आणि मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनसजवळ अशा पाच गुरुद्वारांमध्ये ठेवले. शीख धर्मीय आणि अन्य धर्मीय यांच्या दरम्यान दंगल भडकावी, हा त्यामागचा हेतू होता. डॉक्टरचा प्रत्यक्ष सहभाग असलेला हा पहिला गंभीर गुन्हा होता. त्यानंतर त्याने मागे वळून बघितलंच नाही. तो आणि त्याचे सहकारी बॉम्ब बनवण्याच्या आणि ते योग्य ठिकाणी ठेवण्याच्या कलेत पारंगत झाले. साल होतं १९८९!

***

डिसेंबर १९९२मध्ये बाबरी मशीद पाडली आणि त्यानंतर बहुसंख्य समाजाविरोधातली डॉक्टर अन्सारीची मोहीम अधिक तीव्र आणि जहाल झाली. देशातील बहुतांश मुस्लिमांच्या मनात हिंदूंबद्दल राग खदखदत होता. नेमकी हीच संधी साधून अहल-ए-हादीस या गटाने अधिकाधिक शस्त्रास्त्रं आणि स्फोटकं वाटायला सुरुवात केली. त्यांना लोकांच्या मनातल्या या संतापाचा फायदा त्यांच्या चळवळीसाठी करून घ्यायचा होता.

गुरुद्वारांवरील हल्ला यशस्वी झाल्यानंतर अन्सारीने मुंबईतील काही पोलीस ठाणी, शिवसेनेची शाखा आणि कामगार नेते डॉ. दत्ता सामंत यांचं निवडणूक कार्यालय यांना लक्ष्य केलं. यापैकी काही स्फोटांमध्ये नागरिकांना जीव गमावावा लागला, तरीही हा छोटा गट कोणाच्याही नजरेत आला नाही. पोलीस असो किंवा गुप्तचर यंत्रणा, सगळ्यांच्या नजरेपासून लांब राहण्यात डॉक्टर आणि त्याचे साथीदार यशस्वी ठरले. डॉक्टरच्या गटाचं हे 'यश' बघून मुस्लीम समाजातील काही सधन लोक पुढे आले आणि त्यांनी या सगळ्या गुन्हेगारी कारवायांसाठी डॉक्टरला भरघोस मदत देऊ केली.

याच काळात अन्सारी त्याच्या एका नातेवाइकांच्या ऑफिसमध्ये कोण्या अश्फाक खान नावाच्या माणसाला भेटला. अश्फाक राजस्थानमधल्या दौसा इथे खाण कंत्राटदार होता. अन्सारी आणि अश्फाक यांचे सूर लवकरच जुळले. खाणकामासाठी सरकारकडून मिळणाऱ्या स्फोटकांच्या साठ्यापैकी मोठा वाटा अन्सारीच्या कारवायांसाठी देण्याची जबाबदारी अश्फाकने आपल्याकडे घेतली. डॉक्टर अश्फाकसह दौसाला गेला आणि त्याने बराच काळ कारवाया करण्यासाठी पुरेल, एवढा स्फोटकांचा साठा अश्फाककडून मिळवला.

१९९३च्या मध्यापर्यंत अन्सारी आणि त्याच्या सहकाऱ्यांची ताकद दिवसेंदिवस वाढतच चालली होती. त्यांच्या दहशतवादी कारवायांचं जाळं आता मुंबईबाहेरही पसरायला लागलं होतं. हैदराबाद, कर्नाटकमधील गुलबर्गा इथेही अन्सारीने स्फोट घडवून आणले होते. टुंडाच्या मदतीने डॉक्टर अन्सारीच्या सहकाऱ्यांचं जाळं भारतभर पसरायला लागलं होतं. टुंडाने अन्सारीची ओळख अहल-ए-हादीसमधल्या अनेक वरिष्ठांशी करून दिली होती. रायबरेलीचे डॉ. हबीब आणि लखनऊचे डॉ. जमाल अल्वी हे त्यापैकीच दोन नेते होते.

१९९३च्या ऑगस्ट महिन्यात अहल-ए-हादीसमधील काही प्रमुख डॉ. अल्वीच्या लखनऊमधील घरी भेटले. या गटाच्या कारवाया वाढवण्याचा निर्णय या बैठकीत झाला. त्याला 'भारत की तबाही' असं नाव देण्यात आलं. पुढल्याच महिन्यात म्हणजे सप्टेंबर १९९३मध्ये आणखी एक बैठक लखनऊमध्येच झाली. बाबरी मशीद पाडल्याच्या घटनेला डिसेंबर महिन्यात एक वर्ष पूर्ण होणार होतं. त्या पार्श्वभूमीवर काहीतरी कारवाई करण्याचा कट या बैठकीतच शिजला. राजधानी एक्सप्रेस किंवा आंध्र प्रदेश एक्सप्रेस अशा महत्त्वाच्या गाड्यांमध्ये स्फोट घडवून आणण्याची कल्पना डॉ. अन्सारीचीच होती. या गाड्यांमधून देशातील श्रीमंत आणि महत्त्वाच्या व्यक्ती प्रवास करतात. त्यांना लक्ष्य केलं, तर त्याची धग सरकारला जाणवणार होती.

या कटाचा पुढला भाग म्हणून सहा स्फोट घडवण्यासाठी वेगवेगळ्या योजना आखण्यात आल्या. हे सहा स्फोट दिल्ली-कोलकाता राजधानी, कोलकाता-दिल्ली राजधानी, हैदराबाद-नवी दिल्ली आंध्र प्रदेश एक्सप्रेस, मुंबई-कुर्ला एक्सप्रेस, सुरत-मुंबई फ्लाइंग राणी एक्सप्रेस आणि दिल्ली-मुंबई राजधानी एक्सप्रेस या गाड्यांमध्ये

घडवण्यात येणार होते. हे सहाही स्फोट ६ डिसेंबर १९९३ रोजी म्हणजेच बाबरी मशीद पाडण्याच्या घटनेला एक वर्ष पूर्ण होण्याच्या दिवशी सकाळी करण्याचं नियोजन होतं. हे सगळे बॉम्ब डॉ. अन्सारीच्या घरी तयार करण्यात आले. त्यानंतर ते निवडक लोकांमार्फत त्या-त्या ठिकाणी पोहोचवण्यात आले. बॉम्बस्फोट घडवून आणणारे विविध शहरांमध्ये अत्यंत साध्या हॉटेलांमध्ये खोट्या नावाने राहत होते. खोट्या नावाने त्यांनी त्या-त्या गाड्यांमध्ये आरक्षणही केलं होतं. गाडीत बसल्यानंतर त्यांनी बॉम्ब ठेवले होते आणि ठरल्याप्रमाणे ते सगळे एक स्टेशन आधी उतरले होते. या बॉम्बस्फोटाची वेळ पहाटे पाच ते सकाळी साडेदहा अशी ठेवण्यात आली होती.

सहापैकी पाच बॉम्बचा स्फोट झाला. सहावा, मुंबई-कुर्ला एक्सप्रेसमध्ये ठेवलेला बॉम्ब शोधण्यात तपासयंत्रणांना यश आलं. हा बॉम्ब निकामी करण्यात आला आणि आणखी हानी टळली.

एका दिवसात रेल्वेगाड्यांमध्ये वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या ठिकाणी पाच बॉम्बस्फोट झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि रेल्वे प्रवाशांमध्ये आणि रेल्वे अधिकाऱ्यांमध्येही एकच घबराट उडाली. देशातील प्रत्येक गाडी जवळच्या कोणत्याही छोट्यामोठ्या, दुर्गम स्थानकावर थांबवण्यात आली. रेल्वे पोलिसांनी सगळ्या गाड्यांची तपासणी केली. काही प्रवासी गाडीतून उतरले आणि सुरक्षेसाठी पळून गेले. रेल्वे वाहतूक आणि वेळापत्रक यांचा बोजवारा उडाला. या साखळी स्फोटांनंतर अनेक दिवस परिस्थिती पूर्ववत झाली नव्हती. हळूहळू देशातल्या दुर्गम रेल्वे स्थानकांमध्ये असलेल्या पोलीस ठाण्यांमधून पोलिसांच्या वायरलेस नेटवर्कच्या माध्यमातून माहिती मिळत गेली. या माहितीमुळे राज्य सरकार, केंद्र सरकार, पोलीस यंत्रणा आणि गुप्तचर यंत्रणा यांना जणू धोक्याचा इशाराच मिळाला. अधिकाराच्या पदावर असलेल्या अनेकांना या अपयशाचं स्पष्टीकरण मागणाऱ्या काही गैरसोयीच्या प्रश्नांना तोंड द्यावं लागलं. दहशतवाद्यांच्या देशभर पसरलेल्या जाळ्याने एकाच वेळी देशातील अनेक ठिकाणी अगदी नियोजित पद्धतीने हल्ला घडवून आणला होता आणि याची साधी कुणकुण किंवा हल्ला घडवून आणणाऱ्यांची ओळखही कोणाला पटली नव्हती. केंद्र आणि राज्य सरकार यांच्या अखत्यारीत असलेल्या विविध गुप्तचर यंत्रणांच्या अधिकाऱ्यांना स्पष्टीकरण देणं भाग होतं.

मार्च १९९३मध्ये झालेल्या मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणाचा छडा आपण लावला आहे, या दाव्याला या संघटनेने घडवलेल्या या रेल्वे बॉम्बस्फोटाने आणि याआधीच्या हल्ल्यांनी सुरुंग लावला. त्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली. मुंबईत साखळी बॉम्बस्फोट घडवणाऱ्या आरोपींना मुंबई पोलिसांनी अटक केली असेल, तर मुंबई आणि देशाच्या इतर भागांमध्ये अशाच प्रकारचे बॉम्बस्फोट कोण घडवून आणतंय, असे प्रश्न मुंबई पोलिसांवर सातत्याने टीका करणाऱ्यांनी उपस्थित करायला सुरुवात केली. खासकरून हे साखळी रेल्वे बॉम्बस्फोट ज्या दिवशी घडले, तो दिवस तर अविस्मरणीय होता. आणि त्यामुळेच प्रश्नांना धुमारे फुटले.

***

डॉक्टर अन्सारीच्या अटकेनंतर आणि त्याने दिलेल्या कबुलीनंतर आमच्या विशेष कृती दलाने एकाच वेळी देशाच्या विविध भागांमध्ये धाडी टाकल्या. या कारवाईत अन्सारीच्या इतर १५ सहकाऱ्यांना अटक करण्यात आली. या कारवाईसाठी उत्तर प्रदेशातील लखनऊ आणि रायबरेली, राजस्थानमधील दौसा, कर्नाटकातील गुलबर्गा येथील स्थानिक पोलिसांचीही मदत घेण्यात आली. या प्रकरणाच्या तपासात रेल्वे आरक्षणाचे फॉर्म, हॉटेलच्या नोंदवहीतील सह्या, प्रत्यक्षदर्शींचे जबाब, आणि या आरोपींचे कबुलीजबाब दहशतवादी आणि फुटीरतावादी कारवाया प्रतिबंध कायद्याअंतर्गत (Terrorist and Disruptive Activites (Prohibition) Act म्हणजेच TADA) नोंदवण्यात आले. तसंच आरोपींकडून स्फोटकं आणि शस्त्रास्त्रंही जप्त करण्यात आली. ऑगस्ट १९९४मध्ये या सगळ्या आरोपींविरोधात अजमेर येथील टाडा कोर्टात आरोपपत्र दाखल करण्यात आलं. त्याआधी, या गटाने घडवलेल्या सगळ्या बॉम्बस्फोटांचे खटले एकत्र करून आम्ही त्या सगळ्यांची एकच केस बनवली. या खटल्याची सुनावणी जवळपास दहा वर्षं सुरू होती आणि अखेर २८ फेब्रुवारी २००४ रोजी न्यायालयाने सगळ्या आरोपींना दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा दिली.* दिल्लीतील माझा सहकारी पोलीस अधीक्षक ओ. पी. चटवाल याने पुरावे गोळा करणं, ते न्यायालयात सादर करणं आदी खटपटींची आघाडी यशस्वीपणे सांभाळली. एखाद्या खटल्यातील सगळेच्या सगळे म्हणजे १५ आरोपी एकाच वेळी दोषी सिद्ध होणं आणि सगळ्यांना आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावली जाणं, ही घटना भारतीय पोलिसांच्या इतिहासात खूपच दुर्मिळ आहे.

डॉ. अन्सारी आणि या कटातले त्याचे सहकारी सध्या अजमेरच्या तुरुंगात त्यांची जन्मठेपेची शिक्षा भोगत आहेत. ६ एप्रिल २००० रोजी या खटल्यातील आणखी एक सूत्रधार आझम घौरी हैदराबाद पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत तेलंगणातल्या म्हणजे त्या वेळच्या आंध्र प्रदेशातल्या जागतियाल येथे मारला गेला. या घटनेनंतर तब्बल १७ वर्षांनी दिल्ली पोलिसांनी या कटाच्या तिसऱ्या सूत्रधाराला म्हणजे अब्दुल करीम टुंडा याला १६ ऑगस्ट २०१७ रोजी भारत-नेपाळ सीमेवरून अटक केली. तो सध्या अजमेर तुरुंगात असून त्याच्या विरोधात ६ डिसेंबर १९९३ रोजी झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांचा खटला अजून चालू आहे.

सीबीआयच्या माझ्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीत मी हाताळलेल्या अनेक प्रकरणांपैकी हे एक महत्त्वाचं प्रकरण होतं. देशभर सक्रिय असलेल्या आणि कोणत्याही राज्याच्या पोलिसांना किंवा केंद्रीय गुप्तचर संघटनांना कानोकान खबर नसलेल्या एका दहशतवादी संघटनेची पाळंमुळं खणून काढणं हे माझ्यासाठी खूप समाधान देणारं होतं. रेल्वेमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाच्या प्रकरणाबरोबरच मुंबई आणि आसपास झालेल्या जवळपास ४० छोट्यामोठ्या बॉम्बस्फोटांचा उलगडाही या प्रकरणामुळे झाला. यात मुंबईतील पोलीस ठाण्यांमध्ये झालेले बॉम्बस्फोट आणि गुरुद्वारांमध्ये झालेले बॉम्बस्फोट या प्रकरणांचाही समावेश आहे. आम्ही एका खतरनाक दहशतवादी संघटनेचा बीमोड केला होता आणि भविष्यातील अनेक हल्ले टाळून हजारो लोकांचा जीव वाचवण्यात पुन्हा एकदा आम्हाला यश आलं होतं.


★

**('मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या आगामी 'खाकी फाइल्स' या नीरज कुमार लिखित आणि रोहन टिल्लू अनुवादित पुस्तकातून)**

आगामी

# कशीर

मूळ लेखक : सहना विजयकुमार
अनुवाद : उमा कुलकर्णी



नरेंद्रला मध्यरात्री दोन वाजताच जाग आली. फोन पाहिला, कुठलाही मेसेज नव्हता.

काल दुपारीच सलीमनं सांगितलं होतं, ''कितीही वेळ झाला तरी मुश्ताक भेटला की लगेच तुम्हाला कळवतो. तो कधीच अशाप्रकारे फोन बंद ठेवत नाही. सकाळपर्यंत काही समजलं नाही तर काहीतरी अघटित घडलंय, असंच समजावं लागेल. मी सरळ पोलीस-कंप्लेंट देईन! तुम्ही गावाला निघा, सर!''

सलीमचं हे बोलणं त्याच्या मस्तकात भिरभिरत होतं. काल संध्याकाळी घरी आल्यावरही मुश्ताकविषयीचे विचार मनात घोळत होते. चर्चा सुरू व्हायच्या वेळीही मनातला तो विचार मागं हटायला तयार नव्हता. कधी नव्हे ते त्याचं डोकं दुखायला सुरुवात झाली होती. शेवटी-शेवटी तर मस्तकशूळानं डोकं फुटेल की काय असं झालं होतं. परिणामी सतत असणारा संयम कोलमडून पडला आणि त्या बाईवर संतापत असतानाही सलीमचं ''तुम्ही तुमचे निघा!''च आठवत होतं.

पण आशाचा आवाज फोनवर ऐकला आणि मन काही प्रमाणात का होईना, शांत झालं! माझी मन:स्थिती जाणून किती योग्य वेळी फोन केला तिनं! दुसऱ्याच्या मनाचा चुकलेला ताल समजून घेऊन त्याला साजेशी प्रतिक्रिया देण्याची कला केवळ ग्रंथांच्या अभ्यासानं येत नाही. रोजचा पेपरही नियमितपणे न वाचणारी आशा ही साजेशी सहचारिणी असल्याचा अनुभव याआधीही असंख्य वेळा आल्याचं आठवून त्याचं मन भरून आलं.

आशाच्या पाठोपाठ मैत्रेयीचीही आठवण गाढ झाली. काही क्षण का होईना, त्याचं मन शांत झालं; तेवढंच!

वरकरणी ओबडधोबड भासणाऱ्या मुश्ताकची नजर आठवली आणि वाटलं, आणखी दोन दिवस राहून त्याच्याविषयी जाणून घेतल्यानंतर परतावं. पण काहीच समजलं नाही तर किती दिवस असंच राहायचं? त्याला काही ठरवता येईन. मन गोंधळून गेलं. आपण घाई करून निघून गेलो तर नंतर तो एकटा येणं अशक्य आहे, हेही त्याला समजत होतं. नाहीतरी इतके दिवस गेलेच आहेत. आणखी दोन दिवसांनी काय होणाराय? हेच ठीक होईल. सकाळी हेच संजीवजींना सांगायचं ठरवल्यावर त्याला समाधान वाटलं.

तरीही एकदा जाग आल्यावर पुन्हा झोप लागलीच नाही.

पाच वाजायची तो वाटच बघत होता. पाच वाजताच तो उठून कैलाशजींच्या घराकडे निघाला.

***

जाइनिमाज अंथरून बशीर अहमद वाट पाहत होते. अजान विरून गेल्यानंतरही कैलाशांच्या घंटेचा आवाज आला नाही. चाहूलही नव्हती. इतक्या वर्षांत निमाज केला नाही ही पहिलीच वेळ होती. कालच्या दिवसभरात जमलं नव्हतं. त्यामुळे आजही जमणार नाही हे त्यांनाही उमजलं होतं. कैलाशांची भेट होण्याआधी मनाला थोडीतरी शांतता मिळायची ती निमाजाच्या वेळी. तो यायला सुरुवात झाली आणि ती शांतता काहीशी डहुळून निघाली होती. ते विचारत असलेले प्रश्न, त्याला माझ्या मनानं देत असलेली प्रतिक्रिया ही तर दैनंदिन क्रिया होऊन गेली होती. परिणामी माझी रोजची सकाळ नव्या द्वंद्वाबरोबर सुरू होत असली तरी त्यात अन्याय नव्हता. ते सरळ घरातच घुसले तर काय करायचं, ते बाहेर कुठे भेटले तर त्यांना कसं सामोरं जायचं, ते इथून परतत असताना वाटेत त्यांना काही कमी-जास्त झालं तर काय करायचं, त्याला कोण जबाबदार, अशा प्रश्नावर विचार करणाऱ्या मनाला हे त्यांचं न येणं अगदीच अनपेक्षित होतं.

वेळ चालला होता. बशीरांची अस्वस्थता वाढत चालली होती. पिंजऱ्यातल्या बंदी श्वापदाप्रमाणे ते घरातच काही वेळ फेऱ्या मारत राहिले. अखेर न राहवून त्यांनी दरवाजा उघडला आणि बाहेर पडले. दाराबाहेर रस्त्यावर येऊन पाहिलं तेव्हा त्यांना घरासमोरच्या खांबावर लटकवलेली घंटा, आणि तिच्या जिभेला बांधलेला दोर दिसला. वाजवणारा नसल्यामुळे ती घंटा निश्चल होती. तिच्याकडे काही क्षण पाहत उभे राहिल्यावर बशीरांच्या मनात तीव्रपणे आलं, न्याय मागायचा हक्क... नाही, आवश्यकता आपल्यालाही आहे!

नकळत ते त्या घंटेच्या दिशेनं पुढे झाले. दोर हातात घेऊन जोरात ओढला. घंटेनं कुठलाही पक्षपात केला नाही. तो आवाज विरून जायच्या आधी बशीर जोरात किंचाळले, ''मेगच्छ इन्साफ!''

आवाज विरला. आता त्यांना थोडं शांत वाटू लागलं. त्यांनी दोनदा पुन्हा घंटा वाजवून तेच म्हटलं, ''मेगच्छ इन्साफ! मेगच्छ इन्साफ!''

आणखी बरं वाटलं. घंटा वाजवताना प्रत्येक वेळी मनाला ग्रासून टाकणारी बधिरता कणाकणानं मागं सरतेय असं त्यांना वाटत होतं. तो घंटानाद मनाच्या जवळजवळ येत चालला होता. ''आणखी... आणखी जोरात वाजव!...'' असं बाबा सांगत असल्यासारखं वाटून बशीर आणखी आणखी जोरात घंटा वाजवत न्यायाची मागणी करत राहिले. कुणाकडे?

अखेर हात दुखायला लागला तेव्हा त्यांनी हात आवरता घेतला.

आता त्यांना वाटू लागलं, इतके दिवस कैलाशना घाबरून मी घरातच का बसून राहिलो? काही गरज नव्हती. उलट आपणही त्यांच्याबरोबर सहभागी झालो असतो... अंहं... त्यांच्यासोबत वाजवायला पाहिजे होतं. खरंय! माझं काही न्याय देणाऱ्या जहांगिराचं स्थान नाही! माझ्यावरही अन्याय झालाय! त्यामुळे मीही त्यांच्यासारखा न्याय मागणाराच! बंधनात गुरफटून टाकणाऱ्या न्यायाच्या एकेक कड्या ढिल्या होत जाऊन आपण बंधमुक्त होत असल्याचं वाटलं. कितीतरी एकरात पसरलेल्या हजारो नरकांना ओलांडून वेगळ्याच जगतात जाऊन पाहिल्यावर जाणवलं, तिथं माझ्या पाप-पुण्याचा हिशेब करणारा मीच असल्याचं जाणवलं. मन हलकं-हलकं होत होतं. उंच... उंच... आणखी आणखी उंचच उंच... अत्युच्च जागी जाऊन... अवकाशात उड्डाण करायची इच्छा तीव्र झाली होती. अशीच निरंतर घंटा वाजवतच राहावं असं वाटत होतं. घसा फाटेपर्यंत न्याय मागत राहिलं पाहिजे...

हा नवा विचार सुचून सगळं हलकं-हलकं झालं तसा त्यांचा घंटा वाजवायचा उत्साह कमी कमी होत गेला. ते शांत-शांत होत गेले. क्लांत होऊन ते त्याच खांबाला टेकून उभे राहिले.

बऱ्याच उशिरानं ते घरात गेले तेव्हा त्यांनी पाहिलं; त्यांचीच वाट पाहत असलेल्या रीफतजाननं डोळे पुसले आणि ती चहा करायला स्वयंपाकघरात वळली.

अंघोळ करताना बशीरांच्या मनात त्या मुलाशी बोललंच पाहिजे, असा निश्चय जन्मला. पण बाहेर आल्यावर मनात वेगळाच विचार आला. त्याच्याकडे जाण्याआधी त्यानं सांगितलेले कुर्ानमधले आयत

शोधून काढून त्यांचा संपूर्ण अर्थ समजून घ्यायला पाहिजे. ते समजून घेतल्यानंतर त्याला भेटायचं. नंतर कैलाशनाही भेटणं सोपं जाईल. पण... काय बोलायचं त्यांच्याशी? काय बोलू? ते नंतर ठरेल आपोआप. पण भेटून बोललं पाहिजे. नजरेला नजर भिडवून. नजर न चुकवता! कैलाशांची प्रतिक्रिया काय होईल?

याच विचारात त्यांनी कपाटातलं कुर्रान ए मजीद बाहेर काढलं. त्यांच्या हातांना सूक्ष्म कंप सुटला होता. त्यांनी त्यावर मस्तक टेकवलं, चुंबन घेतलं आणि आदरानं छातीशी कवटाळून ते बसले. त्यांच्या मनात एक अनामिक भाव दाटून आला होता. त्यानंतर मन स्थिर व्हायला बराच वेळ लागला.

त्यांना तीव्रपणे जाणवलं, हा पवित्र ग्रंथ आपण कधीच संपूर्ण वाचला नाही. नमाज करताना आवश्यक असलेल्या चार-पाच सुरह वगळता आपल्याला याविषयी फारशी माहिती नाही. आता यावर नजर फिरवायची परिस्थिती अल्लाहूनंच आणली आहे! कुर्रानची पानं चाळत असताना त्यांना जाणवलं यात एकूण एकशे चौदा सुरह... त्यातल्या पहिल्या पाच ठाऊक होत्या. अल-फातिह. न्याय-साक्षीचा प्रस्ताप त्यात येत नाही. दुसरी अल-बकरह... एकापाठोपाठ एक पानं ओलांडून पाहत असताना त्यांनी पाहिलं; त्यात एकूण दोनशे शहाऐंशी अयात... बाकीच्या सुरहमध्ये किती किती अयात आहेत, ठाऊक नाही. हे सगळं वाचून त्यातलं आपल्याला हवं असलेलं शोधायला कितीतरी दिवस लागतील! हे पटू लागलं तसे बशीर हताश होऊ लागले. त्या मुलालाच विचारता येईल; पण आमच्या धर्माविषयीचा त्याचा अभ्यास कितपत असेल? त्याहीपेक्षा मीच वाचलेलं नाही, हा माझा निर्लज्जपणाच नाही का, या विचारानं ते खजिल झाले.

हताश मनानं ते उद्गारले, ''या अल्लाह! तूच यातून काहीतरी मार्ग दाखव!'' आणि भिंतीवरच्या काबाच्या चित्रावर नजर खिळवून बसून राहिले. अचानक काहीतरी सुचलं आणि ते उठून पायात चप्पल घालू लागले. रीफतनं विचारलं, ''हे काय? काही न खाता दुकानाला निघालात?...''

तिला फटकारत ते उद्गारले, ''प्रत्येक बाबीत तोंड घालायचं कारण नाही!..'' आणि ते चालू लागले. ते दिसेनासे होईपर्यंत ती त्या दिशेला पाहत राहिली, नंतर बाहेर येऊन तिनंही त्या घंटेकडे निरखून पाहिलं. नंतर दोर खेचून नवऱ्याप्रमाणेच ''मेगच्छ इन्साफ...!'' म्हणून ओरडायचा तिनं प्रयत्न केला. जोर लावल्यामुळे घंटा वाजली, पण आतून आवश्यक असलेलं दडपण नसल्यामुळे गळ्यातून आवाज उमटला नाही. मग तिला सगळंच काहीतरी खोटं असल्यासारखं वाटून ती तरातरा घरात शिरली.

***

मशीद जवळ येऊ लागली तसा बशीरांचा चालायचा वेग आणखी वाढला. ही मशीद मुख्य रस्त्यालगतच होती. दुकानाला जायच्या रस्त्यावरच असल्यामुळे ही त्यांना ठाऊक होती. पण ते कधीच आत गेले नव्हते. त्यामुळे इमामांचा परिचय नव्हता. नसेना का! आता होईल ओळख, असं म्हणत त्यांनी आत असलेल्यांशी संवाद साधला.

''अत सलामू आलेकुम!''

''व आकेकुम अत सलाम!'' त्यांनीही प्रतिक्रिया दिली. हा लहान तरुण मुलगाच होता.

''मला तुमच्याकडून एक मदत हवी होती! पवित्र कुर्रानमध्ये असलेल्या न्याय आणि साक्षीच्या संदर्भातल्या आयत कुठलं? मला समजून, शिकून घ्यायचं आहे.''

''कितीतरी आहेत ना! तुम्हाला कुठलं पाहिजे?'' म्हणत त्या तरुणानं आपल्याजवळचं कुर्रान उघडून दाखवलं. नंतर सांगू लागले, ''लोकांना न्यायाच्या बाजूनं उभं राहायचं असेल तर ग्रंथ आणि तागडी...''

''अंहं! ते नव्हे...''

''मग... हे?...'' म्हणत त्यांनी आणखी एक आयत वाचायला सुरुवात केली, ''न्यायाबरोबर योग्य रीतीनं तोलून...''

''नाही. हेही नाही.''

आता त्या तरुणानं बशीरांकडे बघत सांगितलं, ''मला इतकं काटेकोरपणे सांगायला जमणार नाही. तुम्ही आणखी कुणाकडे तरी जावं हे चांगलं!'' नंतर म्हणाले, ''तुम्ही असं करा... मुख्य रस्त्याच्या पलीकडे जा. उजवीकडे पंडितांची वस्ती आहे. तसेच दहा मिनिटं चालत राहिलात तर डावीकडे एक मोठी मशीद दिसेल. तिथल्या मुफ्तींना विचारा. ते नक्की इन्शाअल्ला, तुमच्या प्रश्नाचं व्यवस्थित उत्तर देतील.''

''खुदा हाफीज...'' म्हणत बशीर तिथून बाहेर निघालेले बशीर थबकले आणि त्यांनी इमामांना विचारलं, ''एकूण किती आयात आहेत कुर्रान-इ-मजीदमध्ये?''

''सहा हजार दोनशे तीस.'' इमाम हसत उत्तरले. त्यांना ''शुक्रिया'' सांगून घाईघाईनं तिथून बाहेर पडलेल्या बशीरना वाटेत पंडितांची कॉलनी लागली आणि त्यांचं मन तिकडे वळलं. त्यांनी खिशात हात घातला आणि त्या तरुणानं दिलेलं व्हिजिटिंग कार्ड बाहेर काढलं. पण स्वत:लाच ''आधी हे काम करायला पाहिजे...'' असं बजावत त्यांनी आणखी वेग वाढवला. अलीकडे कितीतरी दिवसांत ते कधीच इतक्या वेगानं चालले नव्हते. पण आज मात्र त्यांना प्रत्येक क्षण अतिशय महत्त्वाचा वाटत होता. त्यामुळे शरीरात असलेली सगळी शक्ती एकवटून ते पावलं टाकत होते.

सुमारे दहा मिनिटं चालल्यानंतर डावीकडे मशीद दिसली. बरीच मोठी मशीद. तिच्यासमोर काही क्षण उभं राहून त्यांनी थोडा दम खाल्ला. आजूबाजूला कुणीच नव्हतं. रस्त्यावरही माणसांची फारशी वर्दळ नव्हती. मशिदीचा मोठा दरवाजा बंद असला तरी लहान दरवाजा थोडासा उघडला होता. त्यातून आत जायचा विचार करून बशीर तिकडे गेले.

ते दारापाशी उभे असताना त्यांना आतलं बोलणं ऐकू येत होतं ते पवित्र कुर्रानाचं पठण असेल असं वाटून ते थोडे पुढे होऊन दोन्ही हातांनी दुवा मागू लागले. तेव्हा त्यांना आतलं बोलणं अधिक स्पष्टपणे ऐकू येऊ लागलं. ते जागीच थांबून ते ऐकू लागले.

***

संजीवजी म्हणाले, ''काहीच बातमी समजलेली नाही! सलीमनं पोलीस स्टेशनवरूनच फोन केला होता. आणखी अर्ध्या तासात येतोय तो. त्याच्याबरोबर बाहेर फेरफटका मारून या. मी ऑफिसला जातोय.''

''ठीकाय! मी परवाचं तिकीट बुक करतोय. म्हणजे मुश्ताकचा ठावठिकाणा समजल्यावर पुढचं ठरवू या. होय की नाही?''

यावर काही न बोलता केवळ मान हलवून ते निघाले. नरेंद्रनं लगेच तिकीट बुक केलं. सकाळच्या साडेदहाच्या फ्लाइटमध्ये सीट मिळाली. नंतर लगेच त्यानं आशा आणि विक्रमला मेसेज टाकला. त्यांच्या प्रतिक्रिया वाचत असतानाच पंडितजींचा फोन आला.

''नमस्ते नरेंद्रजी! आज वेळ आहे का भेटायला?''

''नमस्ते! इथं मी मोकळाच असतो. काय म्हणताय?''

''तुम्हाला आता दल सरोवरापाशी यायला जमेल काय?''

''आता म्हणजे... आणखी तासभर तरी लागेल. ड्रायव्हर बाहेर गेलाय. काय बरं विशेष?''

''काही नाही, तुम्हाला माझी शाळा दाखवायची होती.''

''हो का? फारच छान! तुम्हालाही एक बातमी सांगायची आहे. तुमचे मित्र कैलाशजींची शाळाही इथे या कॉलनीतच सुरू होतेय!''

''तर मग एक करू या. तुमचा ड्रायव्हर आला की इथं या. इथून तिथंही जाऊ या. चालेल?''

''नक्कीच!'' नरेंद्र म्हणाला.

सलीम आला. तो बराच काळजीत दिसत होता. म्हणाला, ''मुश्ताकची काहीच बातमी समजत नाही. त्याच्या अम्माला कुठल्या शद्बात समजवायचं ते कळेनासं झालंय. बातमी समजल्यावर त्याचे नातेवाईकही गावाहून आलेत.''

हे ऐकून घेण्याव्यतिरिक्त दुसरी कुठलीच प्रतिक्रिया नरेंद्रला सुचली नाही. दोघंही बाहेर निघाले. सलीम स्वत:शीच बोलल्यासारखा म्हणत होता, ''काहीही झालं तरी एक-दोन दिवसांत काहीना काहीतरी समजायला पाहिजे. मी कधीपासून त्याला सांगत होतो तुझा विचार कर आणि शांत राहा म्हणून!''

नरेंद्रनं सांगितलं, ''सलीम, परवाचं माझं तिकीट बुक केलंय. मी पुढं निघतो.''

''होय सर! तुम्ही निघावं हेच बरं.  तो भेटल्यावर त्याला पटवून पाठवून द्यायची जबाबदारी माझी.'' सलीम आपल्यात गुंतला होता, त्याच्या बोलण्यानं भानावर येऊन तो सवयीच्या आत्मविश्वासानं म्हणाला.

पाच विद्यार्थी असलेली पंडितजींची शाळा एका खोलीत होती. खोलीपेक्षा शेड म्हणावं अशी ती जागा होती. नरेंद्रनं हे का सांगितलं हे त्यांनाही आता उमजलं होतं. त्यामुळे जागेविषयीही ते समाधानी होते. ते परतताना सांगत होते, ''पुढच्या आठवड्यात मुलांना माझ्या डोंगरावर घेऊन जाईन. तिथून श्रीनगर दिसतं, हे त्यांनीही पाहायलाच पाहिजे.'' नरेंद्रला पदोपदी त्यांच्या बदललेल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय येत होता. येणारा प्रत्येक क्षण कसा कारणी लावता येईल याचा ते सतत विचार करत असल्याचं तो पाहत होता. ते विषय-जागा-कार्यक्रम यांच्याविषयीच काही काही सांगत होते. त्यांचं ऐकत असतानाच नरेंद्रला फोन आला, नवा नंबर...

''हॅलो!...''

''आदाब! मी बशीर अहमद! आठवलं का? त्या दिवशी तुम्ही आमच्या घरी आला होतात...''

नरेंद्रच्या लक्षात आलं ते कुठल्याशा दडपणाखाली असावेत. तो म्हणाला, ''हो हो! आठवतं तर! बोला! काय म्हणताय?'' त्यानं थोड्या सलगीनंच विचारलं.

''तुम्हाला तातडीनं भेटायला पाहिजे. कॉलनीसमोरच्या आडव्या रस्त्यावर उभा आहे. तुम्ही कुठं आहात? काश्मीरहून बाहेर निघाला नाही ना?'' त्यांच्या आवाजात उत्सुकता होती.

''नाही. बाहेर पडलोय. पंधरा मिनिटांत येणार आहे. कॉलनीच्या गेटपाशी आल्यावर फोन करू?'' त्यानंही उत्साहित स्वरात सांगितलं.

''होय, करा करा!''

त्यांचं बोलणं झाल्यावर नरेंद्रच्या मनात काहीशी चलबिचल सुरू झाली. हे भेटायला फारच उत्सुक दिसताहेत. काय बरं कारण असेल या घाईचं?

गेटजवळ येत असतानाच सलीमला सांगितलं, ''मला इथंच उतरव. आणि तुम्ही आत जा. मी येतोच पाच मिनिटात.'' कारमधून उतरून त्यानं बशीरना फोन केला. कार आत निघून गेली. तो समोरच्या लहान रस्त्याच्या दिशेनं निघाला.

काही क्षणातच त्या रस्त्यावर त्याला बशीर दिसले. याला पाहताच ते जवळ-जवळ धावत त्याच्याकडे आले. अगदी जवळ येताच ते हलक्या आवाजात म्हणाले, ''एक महत्त्वाचं बोलायचंय! इथं बोलणं शक्य नाही. आणखी कुठंतरी जायचं काय?''

नरेंद्रनं त्यांच्याकडे पाहिलं. सुमारे दहा मिनिटं ते वेळ काढण्यासाठी येरझाऱ्या घालत असावेत हे त्याच्या लक्षात आलं. त्यांचा गोरापान चेहरा लाल झाला होता. काही केसांच्या बटा घामामुळे कपाळावर चिकटल्या होत्या. चेहऱ्यावरचे भाव? दमणुकीमुळे की दुखावल्यामुळे? की?... जे काही असेल ते बोलायला ते उत्सुक दिसत होते.

''चला...'' म्हणत तो त्यांना संजीवजींच्या घरालगतच्या रिकाम्या घरी घेऊन गेला. तिथंपर्यंत जाताना बशीर आजूबाजूला नजर फिरवत होते. कैलाशही इथंच राहतात हे आठवून ते विव्हळ झाले. मोठा सुस्कारा सोडून ते घरात शिरले. नरेंद्रनं खुर्ची पुढे केली. त्यावर बसायच्या आधीच त्यांनी दबलेल्या आवाजात बोलायला सुरुवात केली.

''लक्ष देऊन ऐका! आज संध्याकाळी असर-नमाज संपल्यावर या कॉलनीवर हल्ला केला जाणार आहे. सैन्याला इथे पोचायला उशीर व्हावा म्हणून नेमक्या त्याच वेळी इथून काही किलोमीटर अंतरावर मोठ्या प्रमाणात दगडफेक केली जाणार आहे. हल्ला नेमक्या कशा प्रकारचा असणार आहे, त्याचा तपशील मला ठाऊक नाही. एका व्हॅनमधून सात-आठ माणसं आत घुसणार आहेत हे मात्र नक्की! तुम्ही लगेच सैन्याशी संपर्क साधून ही बातमी सांगा. पण तुम्हाला ही बातमी कुठून समजली हे हल्लेखोरांना समजता कामा नये! आपल्याला ही एकमेव संधी आहे. यात कुठेही चूक होता कामा नये! समजलं ना मी काय म्हणतो ते?''

नरेंद्रनं मान हलवून हो म्हटलं. त्याला परिस्थितीच्या गांभीर्याची कल्पना आली होती. त्यानं सगळं लक्ष देऊन ऐकल्याची खात्री होताच बशीर खाली मान घालून बसून राहिले. काही क्षण तळमळीत गेल्यावर त्यांनी स्वत:ला पुन्हा काबूत आणलं आणि त्यांनी सावकाश विचारलं, ''त्या दिवशी तुम्ही एक आयत सांगितली होती. ती पुन्हा सांगाल का?''

''तुमचा न्याय आणि साक्षी तुमच्या स्वत:च्या, तुमच्या माता-पित्याच्या विरुद्ध जाणारं असलं तरी तुम्ही न्यायमार्गावरून दूर जाऊ नका!... सुरह चार, आयत एकशे पस्तीस.'' नरेंद्रनं सांगितलं. तरीही त्यांच्या मनात काहीतरी चलबिचल चालल्याचं नरेंद्रला जाणवत होतं.

''अशाच प्रकारचे विचार सांगणारे आणखीही काही आयत आहेत का पवित्र कुर्आन ई मजीदमध्ये?''

त्यांच्या मनाच्या खोल गर्देतून हा प्रश्न आल्याचं त्याला जाणवत होतं. त्यानं त्यांच्याकडे पाहत उत्तर दिलं, ''होय.''

पुन्हा बशीर खाली मान घालून बसले. काही क्षण शांततेत गेले. नंतर

त्यांनी मान वर करून त्याच्याकडे पाहत सांगितलं, ''मी निघतो. सगळ्यांचं रक्षण करा!... मास्टरजींचंही...'' बोलता बोलता त्यांच्या आवाजाला कंप सुटला आणि ते बोलायचे थांबले. पुन्हा ''खुदा हाफिज...'' म्हणत ते उठले आणि शांतपणे चालू लागले.

त्यांना थांबवावं असं खूप आतून वाटलं तर ''का?'' याचं उत्तर न सुचल्यामुळे आणि त्यांना जाताना पाहणंही शक्य न होऊन नरेंद्र खिडकीबाहेर पाहत उभा राहिला.

***

सगळं सांगून झाल्यावर त्यानं सलीमला विचारलं, ''आता काय करायचं?''

''आधी संजीवजींना सांगू या. त्यांना ऑफिसमधून बोलवून घेऊ या...'' हे पटून नरेंद्रनं फोन करून संजीवजींना सगळं सांगितलं. काही क्षणातच संजीवजी ऑफिसमधून बाहेर पडले आणि त्यांनी त्यांच्या परिचयाच्या कमांडरच्या कानांवर ही गोष्ट घातली. तिथून ते घरी येऊन पोचले तेव्हा दुपारचे तीन वाजले होते. सगळेजण दिवसभर बाहेर असतात, त्यामुळे त्यांनी ही जागा निवडली असेल असं कमांडरांनीही बोलून दाखवलं होतं. संजीवजींचं बोलणं दोघंही ऐकत होते. ते सांगत होते, ''आपण कुणीही घराबाहेर यायचं नाही, दोन तुकड्या बिगरगणवेशात येतील, त्यातले काही सहजच फिरत असल्यासारखे दाखवतील, काही लपून राहतील. आणखी काही तुकड्या जवळपासच तयारीत असतील. दगडफेकीचा बंदोबस्त करण्यासाठी इथून दहा किलोमीटर परिसरातल्या सगळ्या संवेदनशील प्रदेशात तुकड्या सज्ज आहेत. सगळं गुप्तपणे चाललंय!''

हे ऐकताच सगळ्यांचे चेहरे आणखी गंभीर झाले.

''सर! कुणाला जी काही काळजी घ्यायची ती घेऊ दे, आपणही आपली काळजी घ्यायला पाहिजे. कॉलनीतल्या सगळ्यांनीच घरात राहायला नको. बाहेर पाठवून देणं सोपं आहे. पण तसं केलं तर शंका येईल. तरीही वाटतंय, वयस्कर आणि मुलांना बाहेर धाडून देऊ या. मी करतो त्याची व्यवस्था! तुम्ही इतरांच्या घरी जाऊन अंदाज द्या.'' एवढं बोलून सलीम कुणाच्या संमतीची वाट न पाहता कुणा-कुणाला फोन करू लागला. संजीवजी कॉलनीत फिरून एकेकाला बातमी सांगू लागले. काय ठरलंय ते कमांडरलाही त्यांनी सांगितलं. पुढच्या तासाभरात दूध आणि भाजी पुरवणाऱ्या व्हॅन फेरी मारून गेल्या. तिथल्या पहारेकऱ्यानं काहीही न विचारता त्यांच्यासाठी गेट उघडलं होतं. त्या जागोजागी उभ्या राहिल्या आणि त्यात वयस्कर आणि मुलांना चढवण्यात आलं. सगळ्यात सलीम आघाडीवर होता. कैलाशजी जरा नाराज होते. ''आजपासून शाळा सुरू करायची होती ना!...'' म्हणत राहिले.

''उद्यापासून सुरू करायचीय. इथं आता स्वच्छता अभियानाचा काहीतरी कार्यक्रम आहे. आधीच तुमची प्रकृती बरी नसते ना! तुम्ही आधीच निघा!'' असं सांगत नरेंद्रनं त्यांचा दंड पकडून त्यांना व्हॅनमध्ये बसवलं. मग तेही आणखी काही न बोलता मुकाट्यानं जागेवर बसले.

पण, ''मी कुठेही जाणार नाही!...'' असा हट्ट करत संजीवजींच्या घरीच थांबलेल्या हृदयनाथ पंडितांनी मात्र आपलाच हट्ट खरा केला. त्यांच्यावर कुणीच बळजबरी केली नाही. त्यांना सगळं तपशीलानं सांगितलं. सगळं ऐकल्यावर एक दीर्घ श्वास घेऊन ते माजघरातल्या कोपऱ्यात पद्मासन घालून बसले. त्यांनी ''सत्यमेव जयते नानृतम, सत्येन पंथा विततो देवयाना:'' म्हणायला सुरुवात केली. सत्याचाच विजय होईल, ते कधीही नष्ट होणार नाही, सत्याचा पंथ नेहमीच रुंद असतो... हा त्याचा अर्थ त्यांच्या मनात पुन:पुन्हा घोळत राहिला आणि त्याचे प्रतिध्वनी कानात गुंजत राहिले. हेच सत्याच्या नित्यस्वरूपाचं दर्शन जाणवू लागलं. सत्याला मरण नाही. सगळ्या सत्याचे आपण साक्षीदार असूच असं नाही. किंवा आपण ज्याचे साक्षीदार आहोत त्या सत्याचा कदाचित आपल्याशी काही संबंधही नसेल. पण सत्य कधीही कुठंही जात नाही. ते शाश्वत स्वरूपात राहिलंच पाहिजे. अखेर त्याचाच विजय झाला पाहिजे. आता मी माझ्या वाट्याच्या सत्याला साक्षी होत आहे, हा प्रसन्न भाव त्यांच्या मनाला व्यापून राहिला असला तरी, पाठोपाठ, हे केवळ माझ्या एकट्याचं सत्य नाही; साऱ्या काश्मीरचं सत्य आहे असं वाटून त्यांचा चेहरा गंभीर झाला. आजची दुपार रोजच्यापेक्षा मोठी आहे... पृथ्वीही ध्यानमग्न आहे... अंतरिक्षही ध्यानमग्न आहे... भूलोकही ध्यानमग्न आहे... पाणी आणि पर्वतही ध्यानमग्न आहेत... सगळं निश्चळ आहे... कुठेही हालचाल नाही... असं म्हणत हृदयनाथ पंडितांनी डोळे मिटून घेतले.

''आरती! कसलाही आवाज झाला तरी तू बाहेर यायचं नाही. आम्ही येईपर्यंत दरवाजाही उघडायचा नाही. असं कर, त्या पलंगाच्या खाली बसून राहा. समजलं?'' डबडबलेल्या डोळ्यांनी पाहत असलेल्या बायकोला हे सांगून तिच्या उत्तराची वाट न बघता संजीवजी दरवाजा बंद करून बाहेर पडले.

सगळी व्यवस्था ठरल्याप्रमाणे झालीय की नाही हे बघून नरेंद्र स्तब्ध झाला. कुठल्याही क्षणी अजान कानावर पडू शकेल अशा अपेक्षेनं तो उभा होता. कॉलनीच्या रस्त्यांवरून काही अपरिचित चेहरे निवांतपणे फिरू लागले होते. तेही बाहेर दिसणाऱ्यांना घराच राहून सहकार्य करण्याची सूचना देत होते. देवळाच्या आवारात चौघं बसले होते आणि त्यांच्यापैकी एकानं देवळातल्या घंटेला बांधलेला दोर हातानं घट्ट धरला होता.

''सगळीकडे सैन्याचा बंदोबस्त आहे सर! पहारेकऱ्याच्या चौकीत तीन-चार जणं लपून बसलेत. गेटापाशी जुनी व्हॅन दिसतेय ना; तिच्या मागंही आहेत. काळजी करायचं कारण नाही. सात-आठ हल्लेखोरच काय वीस-पंचवीस जणं आले तरी क्षणार्धात खातमा होईल. काळजी करायची गरज नाही.''

शेजारी उभं राहून सांगणाऱ्या सलीमकडे नरेंद्रचं लक्ष गेलं. बातमी समजल्यापासून यानं क्षणभरही विश्रांती घेतलेली नाही, हे नरेंद्र पाहतच होता. त्यानं आपल्या मित्रांनाही निरोप दिले होते. तेही गेटपाशीच कुठे-कुठे वावरत होते. गरज भासली तर असे दे, म्हणून त्यानं कुठल्याशा हॉस्पिटलच्या डॉक्टरांनाही फोन करून कळवून ठेवलं होतं. तेव्हाही तो संजीवजींना म्हणाला होता, 'सैन्य तर आहेच! आपणही आपल्याला शक्य असेल तेवढं करायला पाहिजे ना!'' शिवाय हट्टानं 'सगळं संपेपर्यंत मीही तुमच्यासोबतच राहतो...'' म्हणत इथेच राहिला होता. नरेंद्रच्या मनात त्याच्याविषयी अभिमान दाटून आला. त्याच्या खांद्यावर हात ठेवताना 'धन्यवाद सलीम!'' त्याच्या तोंडून सहजच उद्‌गार बाहेर पडला.

तो नरेंद्रकडे वळला आणि म्हणाला, ''सर! एकच उपकार करा! सगळे मुस्लीम सारखेच ना? हा प्रश्न यानंतर कुणालाही कधीच विचारू नका! वेळ येताच सगळे आपल्याआपणच ते दाखवून देतात!''

हे बोलताना सलीमच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाचं मंद हसू असलं

तरी त्याच्या हृदयातली भावना नरेंद्रच्या हृदयाला भिडली. त्याच्याही चेहऱ्यावर आश्वासक हास्य उमटलं.

एक सैनिक त्यांच्याच दिशेनं येत होता. त्यांना म्हणाला, ''अरेच्चा! आता जा म्हटलं तरी इथं का उभे राहिलात?'' त्याला पाहताच नरेंद्रला काहीशी ओळख पटल्यासारखं वाटलं, पण नीट आठवेना. तेव्हा तोच म्हणाला, ''अरे, सर! तुम्ही? मेजर अर्जुनचे भाऊ ना? त्या दिवशी गणेश देवालयापाशी आपली भेट झाली होती!''

आता ओळख पटून नरेंद्रही उत्साहानं हसत म्हणाला, ''ओह! लक्ष्मण संधू! आता आठवलं!''

''होय-होय! काही क्षणातच नमाज सुरू होईल! तुम्ही आधी आत व्हा! तुम्ही बाहेर राहिलात तर आम्हाला त्यांना पळवून लावण्यापेक्षा तुम्हाला वाचवायचंच मोठं काम लागतं! मग कुठलीही रणनीती वापरूनही काहीच उपयोग होत नाही!'' असं म्हणत त्यानं नरेंद्रचा दंड पकडून त्याला घरात ढकललं. घरात शिरण्याआधी नरेंद्रनंही आंगठ्याची खूण करून ''ऑल द बेस्ट'' म्हटलं.

त्यानंही अंगठा वर करत म्हटलं, ''थँक यू! काही काळजी करू नका! आम्ही आहोत!''

संजीवजींनाही घेऊन जाण्यासाठी ते पायऱ्या चढत असताना तेच वरून उतरताना दिसले. तिघंही ठरल्याप्रमाणे रिकाम्या घरात शिरले आणि दार बंद केलं. खिडकी किलकिली करून त्यातून दिसणाऱ्या कॉलनीच्या गेटवर नजर रोखून बसले.

***

''हात तिच्या! श्रीनगर-श्रीनगर म्हणतात ते एवढंसंच आहे काय? याच्यासाठी कशाला सगळे एवढे भांडतात, कोणजाणे!'' सभोवताली नजर फिरवत मीरादेवी म्हणाल्या. इंद्रजित गोंधळून त्यांच्याकडे पाहत राहिले.

''क्षमा करा! त्यांना हिंदी येत नाही.'' रामनाथ त्यांना सांगू लागले तेव्हा मीरादेवींनाही हे लक्षात येऊन त्यांचा चेहरा पडला. हिंदी-आक्रमणाविरुद्धच्या लढ्याच्या वेळी टाउनहॉलवर जाऊन दिलेल्या घोषणा आठवल्या. त्या प्रसंगानंतर येत असलेलं थोडंफार हिंदीही त्यांनी जबरदस्तीनं मागं टाकलं होतं. त्यामुळे अलीकडे तर हिंदीशी कसलाच संपर्क राहिला नव्हता. परिणामी आता त्यांच्यावर प्रत्येक बाबतीत रामनाथांवरच अवलंबून राहायची पाळी आली होती. हे लक्षात येऊन त्यांना सोबत आणलंय, हा केवढा शहाणपणा झाला! या विचारानं त्यांनी स्वत:चीच पाठ मनोमन थोपटून घेतली. या विचारात असतानाच हॉटेल आलं.

''मॅडम, जेवण झाल्यावर थोडी विश्रांती घेताय ना?'' रामनाथांनी विचारलं.

''नको नको! लगेच निघू या. आज जितकं बघता येईल तेवढं बघून घेऊ या.'' त्या म्हणाल्या. काहीतरी करून नरेंद्रला मागं टाकून आपण पुढं जायला पाहिजे! एवढंच नव्हे, त्यानं आपल्याला इथे बघायला पाहिजे, अशीही त्यांच्या मनात आशा निर्माण झाली. आपल्याला बघून त्याच्या चेहऱ्यावर गोंधळ उमटेल, तेव्हा त्याच्याकडे उपेक्षेनं बघत मान वळवून कसं निघून जायचं, याचीही त्यांनी मनातल्या मनात रंगीत तालीम केली होती! त्या कल्पनेनंच त्यांना आनंदाच्या उकळ्या फुटल्या होत्या.

त्याचं चर्चेच्या वेळचं बोलणं आठवून त्यांनी सांगितलं, ''आधी काश्मीरी हिंदूंच्या घरी जाऊ या.''

''त्यांची कॉलनी थोड्या लांब आहे म्हणे, मॅडम!'' चौकशी करून रामनाथ म्हणाले.

''असू दे! आधी तिथंच जायचं!'' मीरादेवींनी निक्षून सांगितलं.

विजयाचा वास त्यांच्या नाकाला जाणवत होता. कारमध्ये असल्यामुळे त्या निवांत मागच्या सीटला रेलून बसल्या होत्या. ''पोहोचलीस की नाही?'' मंत्रिमहोदयांचा मेसेज होता. पण उत्तर द्यायची इच्छा नव्हती. मनातल्या मनात, ''वाटू दे थोडी काळजी! म्हणजे माझी किंमत कळेल!'' असं म्हणून त्यांनी फोन ठेवून दिला. पुन्हा फोन घेऊन त्यांनी सुंदरकृष्णना ''पोचले...'' असा निरोप टाकला. पाच मिनिटं झाली तरी त्यांची काहीच प्रतिक्रिया आली नाही. सतत हातात फोन असतो त्यांचा! मेसेज बघितला असेल की नाही? की कुठल्या मीटिंगमध्ये असतील?

या विचारात मीरादेवींनी खिडकीबाहेर नजर टाकली. त्यांना काही लहान मुलं हातात काहीतरी घेऊन उभी असलेली दिसली. त्या एकदम ओरडल्या, ''थांबा! कार थांबवा!''

ड्रायव्हरला भाषा समजली नसली तरी त्यांच्या अविर्भावामुळे दचकून त्यानं गाडी थांबवली.

''मॅडम! ती मुलं दगडफेक करायच्या तयारीत आहेत! आपल्या रिंगलीडरच्या सूचनेची वाट पाहताहेत! इथं थांबता कामा नये, धोका आहे म्हणताहेत ड्रायव्हर!'' मॅडमचा उत्साह बघून घाबरलेल्या रामनाथनी सांगितलं.

''ए! काही बोलू नका! मला समजत नाही काय! ती दोन छोटी छोटी मुलं काय करणारायत?'' हे म्हणता-म्हणता इतरांना काही समजायच्या आत त्यांनी कारचा दरवाजा उघडला आणि तरातरा रस्ता ओलांडू लागल्या. त्याच वेळी त्यांच्या मनात एक विचार आला आणि त्यांनी सुंदरकृष्णांना फोन करून कन्नड टीव्हीला आपल्याशी स्काइपमधून संपर्क साधून आपला इंटरव्ह्यू घ्यायला सांगितलं. काही क्षणातच चॅनेलनं त्यांच्याशी संपर्क साधला. मोठ्या आनंदानं त्यांनी मीरादेवींचा लाइव्ह इंटरव्ह्यू प्रक्षेपित करायची तयारी केली. रस्ता ओलांडल्यावर फोन मुलांकडे वळवला. इकडे टीव्हीवर ब्रेकिंग न्यूज म्हणत सांगायला सुरुवात केली, ''आमच्या प्रेषक मीरादेवी या स्वत: काश्मीर येथील श्रीनगरहून आपल्याशी संपर्क साधत आहेत...''

चार-पाचवेळा हॉर्न वाजवला तरी मीरादेवी मागे वळल्या नाहीत तेव्हा घाबरलेले इंद्रजित रामनाथांकडे वळून घाबऱ्या-घाबऱ्या ओरडले, ''सर! हे बेंगळुरू नाही! त्यांना लगेच मागे बोलवा! लवकर! घाई करा!''

कारच्या मागं सुमारे वीस पावलांवर हळूहळू माणसांचा समूह गोळा होत असल्याचं त्यांना आरशात दिसत होतं. याची कसलीही जाणीव नसलेल्या मीरादेवी त्या दोन मुलांकडे घाईनं पावलं टाकत होत्या. त्यांचं सगळं लक्ष फोनमधून होत असलेल्या थेट प्रसरणाकडेच केंद्रित झालं होतं. आपल्या आधी इथं येऊनही अशा दृश्याकडे दुर्लक्ष करून कुठेतरी दडून बसलेल्या मूर्खपणाची त्यांना कीव येत होती. तिकडे इंद्रजित आणि ड्रायव्हर घसा फोडून ओरडत होते. रामनाथांनाही गांभीर्य कळलं असलं आणि तेही कन्नडमध्ये ओरडत असले तरी या दोघांच्या आवाजात त्यांचा आवाज ऐकूच येत नव्हता. ते हात करून मीरादेवींचं त्या गर्दीकडे लक्ष वेधू पाहत होते, पण मीरादेवी आपल्याच नादात असल्यामुळे त्यांच्या ते

लक्षात येत नव्हतं. लक्ष गेलं तेव्हा पंधरा-वीस तरुणांचा प्रक्षुब्ध घोळका आपल्या दिशेनं येत असलेला बघून त्या घाबरल्या. वळून त्यांनी पळायला सुरुवात केली, त्याच वेळी समोरच्या त्या छोट्या मुलांनी फेकलेला एक धोंडा त्यांच्या कपाळावर जोरात बसला आणि रक्ताची चिळकांडी उसळली. त्यांचा तोल गेला. पायातल्या उंच टाचांच्या चपलांनी असहकार पुकारला. त्यांच्या तोंडून ''अम्मा...'' अशी किंकाळी बाहेर पडली.

त्या किंकाळीचंही थेट प्रसारण झालं.

***

''थांबवा! तुमचं ते थेट प्रसारण थांबवा म्हणतो ना!'' हातात फोन घेऊन सुंदरकृष्ण चॅनेलवर संतापत होते. त्यांचा चेहरा लालबुंद झाला होता. नजरेत संतापानं रक्त उतरलं होतं.

त्यांना ''होय सर! करतो...'' म्हणणाऱ्या चॅनेलवाल्यांना प्रसारण थांबवण्यात रस नव्हता असं दिसत होतं. एवढी मसालेदार बातमी हातची कोण सोडणार?

***

अजानची वाट पाहणाऱ्या बशीरनी मशिदीत पाऊल ठेवलं. त्यांना मशिदीत येऊन नमाज करून कितीतरी काळ लोटला होता. त्यामुळे त्यांना तिथलं सगळंच विचित्र वाटत होतं. निमाज सुरू व्हायला आणखी दहा मिनिटं असली तरी काही माणसं त्याआधीच जमली होती. आणखी काही माणसंही घाईघाईनं येत होती. सगळे वजु करून आत येऊन तिथे अंथरलेल्या मोठ्या जायनिमाजवर रांगेत उभे राहू लागले तेव्हा बशीर पहिल्या रांगेतल्या जागेवर उभे राहून मुफ्ती लतीफना निरखून पाहू लागले. इथून मुफ्ती लतीफ स्पष्टपणे दिसत होते. इतकंच नव्हे, माइक नसतानाही त्यांचा आवाज स्पष्टपणे ऐकू येत होता. त्यांनी पाहिलं, मुफ्ती मोठ्या उत्साहानं सगळ्यांमध्ये मिसळून बोलत होते. जवळ येऊन प्रश्न विचारणाऱ्यांना त्यांच्या खांद्यावर हात ठेवून, काही जणांचा हात हातात घेऊन सावधपणे उत्तर देत होते.

कुणीतरी काहीतरी विचारलं तेव्हा मुफ्ती सांगू लागले, ''आज शुक्रवार नसला तरीही आपल्या दृष्टीनं शुभ दिवस आहे! शैतानांना, काफिरांना नष्ट करायचे सगळे दिवस आपल्या दृष्टीनं शुभदिनच असतात हे लक्षात ठेवा. अल्ला सुभानवु व तालाची कृपा असणं महत्त्वाचं आहे!'' आणि ते खदखदून हसू लागले.

ते हसणं ऐकताना बशीरना सगळं आठवू लागलं. जन्मले तेव्हा आपल्या दोन्ही डोळ्यांसारखे असलेले अन्वर आणि आसिफ! त्यातला एक फुलं देणारा वृक्ष बनला होता तर दुसरा विषवृक्ष होऊन वाढला होता! ते विष कैलाशांच्या संपूर्ण कुटुंबालाच मारक ठरलं! यात माझी काय चूक झाली?

त्यांचं लक्ष त्या विषवृक्षाचं बीज पेरणाऱ्याकडे वळलं. बीज पेरून न थांबता त्याला नियमितपणे खतपाणी घालण्यातही काही कसूर केली नाही यांनी!

या विचारासरशी त्यांच्या मनातली आपणच विषवृक्ष वाढल्याची, अक्षम्य पाप केल्याची भावना विरून गेली! केवळ माझीच नव्हे, सगळ्यांचीच मानसिकता अशी व्हायला कारणीभूत व्हायची जबाबदारी कशी टाळता येईल?

मनात हे विचार सुरू असतानाच मुफ्ती लतीफनी नमाजाला प्रारंभ केला.

सुरह वाचत, रकात करताना, मध्ये मध्ये मान वर करून बशीर लतीफांची पाठ पाहत होते. एवढे जीव गेले! तरी मी मुस्लीम की काफीर हे ठरवण्यासाठी किती कष्ट घेतले मी! सतीशचा मृत्यू अन्यायानं झाला, सवितेचे तुकडे-तुकडे झाले! त्या क्षणी मी सगळ्यांना मुस्लीमच दिसलो होतो! पण माझ्या बाबांच्या आणि माझ्या दृष्टीनं तर मी काफीरच होतो ना! आता मी नरेंद्रला भेटून जे काही केलं, ते या सगळ्यांच्या मते काफीरचं काम! पण माझ्या अल्लाहूच्या आणि माझ्या दृष्टीनं मी आज कट्टर मुस्लीम आहे! आज बाबा हवे होते! त्यांना आनंद झाला असता! पण मनात हा विश्वास निर्माण होईतो सगळं आयुष्यच संपून गेलं ना! मन या विचारासरशी खिन्न होऊन गेलं.

सगळी चूक... अंहं, पहिली चूक आमची नाही! आम्हाला बाहुल्यांप्रमाणे खेळवणाऱ्यांचीच आहे. जोवर आम्ही खेळत राहू तोवर ते आम्हाला खेळवायचं थांबवणार नाहीत. आपण खेळवलो जातोय हे समजल्यावरही आम्ही खेळत राहिलो तर मात्र ती चूक आमचीच.

त्यांच्या डोळ्यांसमोर अन्वरचा काळा ठिक्कर पडलेला देह तरळून गेला. उन्मळून येणारं दु:ख डोळ्यांवाटे पाझरलं. डोळे पुसतच त्यांनी सज्द केलं. तरी डोळे वाहायचे थांबले नाहीत. हा कितवा रकात, हे मोजायचंही भान राहिलं नव्हतं. देह दमून गेला होता, मन जड झालं होतं.

नि:श्वास सोडताना त्यांनी पुन्हा मुफ्ती लतीफांकडे पाहिलं. आता त्यांच्या डोळ्यातलं पाणी आटलं होतं.

''तुमचा न्याय आणि साक्षी स्वत: तुमच्या अथवा तुमच्या माता-पित्याच्या आणि नातेवाइकांच्या विरोधात जाणार असली तरी हरकत नाही! न्यायपालनापासून ढळू नका!...'' सुरह चार, आयत एकशे पस्तीस!...'' त्यांनी स्वत:लाच बजावलं.

नमाज संपला होता. सगळे एकेक करून बाहेर पडू लागले. बशीर मात्र आपल्या जागेवर बसूनच होते. सुमारे दहा मिनिटं लागली सगळ्यांना तिथून बाहेर पडायला.

मुफ्ती लतीफांचं त्यांच्याकडे लक्ष गेलं. त्यांनी विचारलं, ''अरे! तुम्ही अजून निघाला नाही!... काही विचारायचं होतं काय?''

आपल्या मशिदीत याआधी कधीच यांना पाहिलं नाही, हे आठवलं तरी त्यांच्या चेहऱ्यावरचं ते हास्य तसंच होतं.

''होय! तुमच्याशी एकांतात बोलायचं होतं... म्हणून आलो होतो...'' म्हणत बशीर सावकाश उठले आणि मशिदीचा दरवाजा बंद करून आतली कडी घातली.


ती घट्ट बसल्याची खात्री करून घेऊन ते आत वळले.

★

**('मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या आगामी 'कशीर' या सहना विजयकुमार लिखित आणि उमा कुलकर्णी अनुवादित पुस्तकातून)**

Find us on: facebook
https://www.facebook.com/mehta.publishinghouse

## नवं कोरं



आई, वडील हे नातं फुलवण्याचं भान देणारी आणि भावनिक बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, प्रेरणा, सकारात्मकता, यशस्वी नेतृत्व या संकल्पनांचं महत्त्व अधोरेखित करत त्यांचा विविधांगी वेध घेणारी पुस्तकमालिका

लेखक : मार्क शॅनन
अनुवाद : डॉ. ल. मा. शिवणेकर

पृष्ठसंख्या : २६४
किंमत : ₹ ३२०

### गुरुकिल्ली स्मरणशक्तीची

Book Available

---



आई, वडील हे नातं फुलवण्याचं भान देणारी आणि भावनिक बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, प्रेरणा, सकारात्मकता, यशस्वी नेतृत्व या संकल्पनांचं महत्त्व अधोरेखित करत त्यांचा विविधांगी वेध घेणारी पुस्तकमालिका

लेखक : फ्रान्सिस कूम्बस्
अनुवाद : डॉ. मिलिंद पराडकर

पृष्ठसंख्या : ३८८
किंमत : ₹ ४५०

### स्वयंप्रेरणेतून ध्येयपूर्तीकडे

Book Available

---



आई, वडील हे नातं फुलवण्याचं भान देणारी आणि भावनिक बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, प्रेरणा, सकारात्मकता, यशस्वी नेतृत्व या संकल्पनांचं महत्त्व अधोरेखित करत त्यांचा विविधांगी वेध घेणारी पुस्तकमालिका

लेखक : जेनी हेअर
अनुवाद : सचिन रायलवार

पृष्ठसंख्या : २७२
किंमत : ₹ ३२०

### सकारात्मक जगण्याचा सहज मार्ग

Book Available

---



आई, वडील हे नातं फुलवण्याचं भान देणारी आणि भावनिक बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, प्रेरणा, सकारात्मकता, यशस्वी नेतृत्व या संकल्पनांचं महत्त्व अधोरेखित करत त्यांचा विविधांगी वेध घेणारी पुस्तकमालिका

लेखक : डॉ. कॅरोल ओ'कॉनर
अनुवाद : विनिता पिंपळखरे

पृष्ठसंख्या : १२४
किंमत : ₹ १७०

### यशस्वी नेतृत्व


Book Available

आगामी

# कास्ट मॅटर्स

**मूळ लेखक : सूरज येंगडे**

**अनुवाद : प्रियांका तुपे । प्रणाली येंगडे**



## जातीनं घडवलेल्या आत्मतत्त्वाची एकविसाव्या शतकातील रूपं

माझी आई ( आजी- वडिलांची आई) मला तिच्या मऊशार कुशीत घेऊन, म्हणत असे, 'म्हवं लेकरू, किती नादर हाये. अशे इतके सुंदर डोळे कुणाचे तरी हायेत का? मज्या बाळा, तुज्यात इतके गुणं हायेत की मज्यासारख्या येडीला कुठं मोजता यायलंय?' रात्रीच्या वेळी माझ्याशी बोलताना, घरातल्या झिरो बल्बच्या जवळपास नसलेल्या उजेडातही तिचा काळवंडलेला चेहरा आणि रापलेली त्वचा चमकायची. मी आजीचा जीव की प्राण होतो, याची ती सतत जाणीव करून द्यायची.

अंधूक अंधूक प्रकाश असणारा स्वस्तात मिळणारा झिरो बल्बच आमच्या घरातला उजेडाचा एकमेव स्रोत. बल्ब बंद झाला. आजी मला धीर देत होती, समजावत होती. आमचं घर टोयोटाच्या मिनीबसएवढं. त्या एवढ्याशा घरात आजी, माझे आई-वडील, बहीण- भाऊ असे आम्ही सगळे राहात होतो. घरातल्या खाटेखालच्या जागेत माझे आजारी वडील, मी आणि भाऊ झोपायचो. आई आणि बहीण खाटेला लागूनच काटकोनात एका नायलॉनच्या चटईवर झोपत.

आजी माझ्या गालावरून हात फिरवत होती. आता ती डोक्याला मालीश करू लागली. तिच्या त्या मऊ हातांनी सारं काही सोसलं होतं. अस्पृश्यता, न्यूनगंड लादणाऱ्या परंपरा, तिच्या कुटुंबाचं पोट भरण्यासाठी शेतात, खाणीत भूमिहीन मजूर म्हणून राबण्याचा तिचा निग्रह किंवा एखाद्याच्या घरी नाही तर मिलमध्ये नोकर म्हणून राबणं. तिच्यासारख्याच चेहरा नसलेल्या, कसलीही ओळख निर्माण करू न शकलेल्या; पण तरीही खूप महत्त्वाच्या लोकांचं ती प्रतिनिधित्व करते. हिंदू धार्मिक संरचनेने काही लोकांना गावगाड्याबाहेर ढकललं. या लोकांची निर्भर्त्सना केली जाते, द्वेष केला जातो. कसलीही मानवी प्रतिष्ठा, मोल नसलेलं जगणं यांच्या वाट्याला येतं. सार्वजनिक अवकाशात दलितांनी इतरांकडे साधा कटाक्ष टाकला तरी संपूर्ण समाजावर त्याचा राग काढला जातो, त्यांच्यावर हिंसेची बरसातच केली जाते. त्यांच्या जिवाला कसलीही किंमत नाही, माझी आजी अशा लोकांचं प्रतिनिधित्व करते.

कोट्यवधी लोक हे असं आयुष्य जगतात. भारतात जातीप्रश्नाचा संबंध १३५ कोटी लोकांशी आहे. १०० कोटी लोकांच्या आयुष्यावर जातीव्यवस्थेचा परिणाम होतो. त्यापैकी ८० कोटी लोकांवर जातीचा वाईट परिणाम होतो. ५० कोटी लोकांची मानवी प्रतिष्ठा हिरावून घेतली जाते आणि त्यांच्यावर गुलामीचं जगणं लादलं जातं. ३० कोटी अस्पृश्यांचं भयंकर शोषण केलं जातं. माणसाला करावीशी वाटणार नाहीत, अशी कामं त्यांच्याकडून करून घेतली जातात. दलित वस्त्या उद्ध्वस्त करणं, त्यांच्यावर गुलामी- दास्यत्व लादणं, सक्तमजुरी, बलात्कार, हत्याकांड, जाळपोळ, लुटालूट, तुरुंगवास, पोलिसी अत्याचार, जातीय शिवीगाळ- शेरेबाजी, अपमान, अवहेलना, त्यांचं नैतिक खच्चीकरण हे ३० कोटी भारतीय अस्पृश्यांचं जगणं आहे.

लहानपणी शाळेची फी वेळेवर भरता न आल्याने मला अवहेलना सहन करावी लागायची. शाळेचा कारकून टोनी - दर तीन महिन्यांनी वर्गामध्ये फेरी मारायचा आणि माझं नाव पुकारुन मला उभं राहायला सांगायचा. मी उभा राहिलो की तो माझी किती महिन्यांची फी भरायची बाकी आहे, हेही वाचून दाखवायचा. फीचा आकडा जेवढा जास्त तेवढं जास्त अपमानित वाटायचं. त्यात माझे वर्गमित्र थंडपणे माझ्याकडे पाहत एक तुच्छ कटाक्ष टाकायचे. त्या शरमेने मेल्याहून मेल्यासारखं वाटायचं. हे नेहमीचंच होतं. जेव्हा जेव्हा टोनी वर्गात यायचा तेव्हा मला शाळा सोडून पळून जावंसं वाटायचं. आमच्या वस्तीतल्या रोजंदारीवर खपणाऱ्या मजूर लोकांसोबत काम करावं, असं वाटायचं. समोर दिसेल त्या मार्गाने पोट भरणारे आणि जगण्याची भ्रांत नसलेले हे लोक त्यांच्या मर्जीने जगत. जगण्यासाठी त्यांना कुणाकडून अपमानित तरी व्हावं लागत नव्हतं.

सहाव्या इयत्तेत जाईपर्यंत मी त्यामानाने अतिशय गरिबीत जगलो. त्याच दरम्यान सरकारदरबारी दारिद्र्यरेषेखालील गरिबांमध्ये आमचा समावेश झाला. दारिद्र्यरेषा हे वंचिततेचं मोजमाप करण्याचं राज्यानं ठरवलेलं एक परिमाण आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेनुसार त्याचे सात निकष ठरवलेले आहेत. केरळमध्ये अशा प्रकारचे ९ तर हरयाणामध्ये ५ निकष आहेत. कुटुंबांच्या मालकीची शेतजमीन, रोजगार, शैक्षणिक स्तर, मुलांची परिस्थिती, स्वच्छता, घरावरचं छप्पर, जमीन, पिण्यायोग्य पाणी, वाहतूक व्यवस्था, अन्न, घरात रंगीत टीव्ही, फ्रिज असणं...अशा प्रकारचे हे निकष आहेत. यामध्ये कुटुंबाचं उत्पन्न हा एक निकष असा होता, की जो एखाद्याकडे वरील सर्व घटक उपलब्ध आहेत की नाही, त्यावरून ठरत असे आणि राज्याराज्यात त्याबाबत भिन्नता होती. महाराष्ट्रात दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या १३ निकषांवर आधारित आहे. असे ४६ लाख लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. (ही संख्या १९९० मधल्या दारिद्र्यरेषेखालील एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के आणि २००० सालातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येच्या प्रमाणात ३९ टक्के इतकी आहे.) २०१२ मध्ये जागतिक बँकेच्या अहवालात एकूण लोकसंख्येच्या १७ टक्के लोकांची गणना दारिद्र्यरेषेखालील लोकांमध्ये केली होती. या अहवालात महाराष्ट्राच्या उत्तर पूर्व भागातील जिल्ह्यांमध्ये गरिबीचं प्रमाण वाढलेलं आहे, या तथ्यावर भर देण्यात आला होता. नांदेड जिल्ह्यात १८ ते २४ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जगत होती. त्यातही अनुसूचित जातींतील कुटुंबं आणि इतर जातींतील कुटुंबं अशी वर्गवारी केलेली नव्हती. शहराच्या काठावर असलेलं माझं कुटुंब 'दारिद्र्यरेषेखाली' या प्रवर्गात चपखल बसलं होतं.

जातीचा प्रश्न एखाद्या लोलकाच्या विविध मितींमधून पाहिला जातो. त्यामुळेच खरं तर भारतात अधिक चर्चा - संवाद करण्याची आवश्यकता असलेला 'जात' हा विषय अनेक गैरसमजुती आणि चुकीच्या धारणांनी वेढलेला आहे. 'जात' हा एक असा शब्द आहे, जो आरक्षण, दलित, आदिवासी, मानवी मैला, दलित भांडवलशाही, रोजंदारीने काम करणारे मजूर, क्रूर हिंसा, गुन्हेगारी, तुरुंगवास, राजपूत, ब्राह्मण, वाणी - बनिया , कायस्थ, ओबीसी अशा विविध शब्दांसाठी समानार्थी म्हणून विचारात घेतला जातो. जातीच्या नग्नतेच्या अशा अनेक रूपांना आपल्याला रोज सामोरं जावं लागतं. तरीही या सगळ्यामध्ये, 'जात तिचं पावित्र्य जपण्याचे अनेक मार्ग वापरत निरनिराळ्या स्वरूपांतून वावरत असते.' ही बाब दुर्लक्षितच राहते. त्यावर चर्चाच केली जात नाही. म्हणून जात भारतामध्ये मानवी जीवनाच्या प्रत्येक घटकांतून, स्वत:चा अजेंडा पुढे रेटत असते, ही बाब अदृश्यच राहते. सार्वजनिक आणि खासगी आयुष्याच्या विविध पैलू किंवा घटकांमध्ये जात ज्याप्रकारे महत्त्वाची भूमिका निभावत असते, त्याची आपण कल्पनाही करू शकत नाही.

आमची शेतजमीन नव्हती आणि आमच्याकडे रंगीत टीव्ही, फ्रिजही

नव्हता. वडीलही नोकरी करत नव्हते. (आयुष्यातला बराच मोठा काळ आजारपणामुळे ते अंथरुणाला खिळून होते.) त्यामुळे आमचं उत्पन्नही कमीच होतं. वडिलांच्या मालकीचं घर नव्हतं. वारसाहक्काने त्यांना मिळालेल्या जमिनीवर आम्ही राहत होतो. ३० बाय ४० फुटांची बास्केटबॉल कोर्टपेक्षाही निम्म्या आकाराची जमीन. या जमिनीची ३ कुटुंबांत समसमान वाटणी झाली होती. तिन्ही कुटुंबांची मिळून सोळा माणसं राहत होतो, त्यामुळे घरात स्वच्छतेच्या सोयी-सुविधांच्या नावानं बोंबच होती. एकच मोरी आणि संडास होता. सकाळच्या वेळेला आम्हा भावंडांची, चुलत भावा - बहिणींची शाळा साधारण एकाच वेळेला असायची, त्यामुळे संडासला, आंघोळीला जाण्यासाठी प्रत्येक जण रांगेत असायचा. घरात दहावीच्या पुढे कोणी शिकलेलं नव्हतं. आमचं छप्पर म्हणजे कच्च्या विटांवर तोलून धरलेले, गंजलेले, घळ्यांचे लोखंडी पत्रे. ते उडू नयेत म्हणून त्यावर दहा-वीस किलो वजनाचे मोठे दगड ठेवले जात. लोखंडी पत्र्यांतून वीज वाहते आणि पावसाळ्यात छपरावरचे दगड घसरून पडण्याचीही मोठी भीती होती. लोखंडी पत्र्यांमुळे हवामानात बदल होण्याचा अवकाश की, आम्हाला आधी चाहूल लागत असे. हे पत्रे आमच्यासाठी हवामानाचा अंदाज सांगणारे जिवंत स्रोत होते. बारीक थेंबांचा शिडकावा पाऊस येण्याची वर्दी द्यायचा. पत्र्यांमुळे त्या थेंबांचा जोरदार आवाज आम्हाला आधी कळायचा. उन्हाळ्याच्या दिवसांत कडक उन्हामुळे पत्रे असे तापायचे की खाली बसलेला माणूस गुदमरायचा, श्वास घेणंही मुश्कील व्हायचं. मजबूत आणि जाडजूड छपराअभावी थंडीच्या दिवसांतही त्रास व्हायचाच. तशा परिस्थितीत निर्दयी हवामानाचा सामना करत आम्ही त्या घरात झोपलो. लोखंडी पत्र्यांपासून कशी तरी आपली सुटका व्हावी, यासाठी आम्ही रोज प्रार्थना करायचो, चोवीस तास तोच विचार मनात असायचा. दुर्दैवानं ती प्रार्थना कधी फळाला आलीच नाही. आजोळी गेल्यावर मात्र सकाळी उठल्यावर, काल रात्रभर पाऊस पडून गेलाय हे कळायचंसुद्धा नाही. याचं मला आश्चर्य वाटायचं. आजोळच्या घराचं छप्पर जाडजूड आणि सिमेंटचं होतं, त्यामुळे पाऊस पडण्याचा आवाज ऐकू येत नसायचा. आमच्या घरी मात्र मुसळधार पावसाच्या आवाजाने रात्रभर झोप लागत नसे, अशी परिस्थिती होती.

त्यावेळी जगण्यासाठी मी मिळेल ते काम करत होतो. आई - वडिलांनी विरोध केला तरी त्या परिस्थितीतून मार्ग काढण्याकरता मी अधीर झालो होतो. एकदा मी बुटांच्या कारखान्यात कामाला जाण्याचा विचार केला. आमच्या वस्तीतला एक मित्र तिथे मजूर म्हणून काम करत होता. तसेच एकदा  माझ्या आजोळच्या नातेवाइकांसोबत विदर्भातल्या एका बागायती पट्ट्यात भुईमुगाच्या शेतावर कामाला गेलो होतो. वडिलांच्या वर्तमानपत्रासाठीही मी व्यवस्थापक म्हणून काम केलं. ट्रक चालकासोबत क्लीनर म्हणून काम केलं. वखारीत काम केलं. हातातोंडाची गाठ पडावी, याकरता हे सगळे प्रयत्न केले होते. मिसरुड फुटायच्या आतच मी मिळतील ती जोखमीची सगळी कामं केली होती.

आजही माझं कुटुंब एकत्र राहतं, त्याच वन रुम किचनच्या घरात. अगदी आता आता पत्रा तुटलेल्या छपराचा त्रास असह्य झाल्यानं आई तात्पुरती आमच्या काकांकडे राहायला गेली. दारिद्र्यरेषेखालील लोकांना सरकारी योजनेतून मिळतं तसं घर आपल्यालाही मिळेल, अशी तिला आशा आहे. सहा वर्षांपूर्वी सरकारनं दिलेल्या 'घरकुल योजने'च्या आश्वासनामुळे ती अजूनही 'सरकारी घरकुल' मंजूर होण्याची वाट बघतेय. दरवर्षी सरकारी माणसं दारावर सर्व्हे करायला आली की तिला आनंद होतो आणि त्याच नेमाने दरवर्षी तिची आशा धुळीला मिळते. तिला सरकारी घराची अपेक्षा आहे कारण तिचा सरकारवर विश्वास आहे असं नाही, तर वारंवार सरकारनं दिलेल्या अपेक्षाभंगाच्या नैराश्यातून पुन्हा पुन्हा तिची आस जन्म घेते.

मी एका दलित वस्तीत वाढलो. भारतातल्या प्रत्येक दलित वस्तीप्रमाणे माझीही वस्ती अतिशय दुर्लक्षित आणि सत्ता संरचनेच्या एकदम परिघावर असलेली आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने, सरकारने आमच्याकडे, आमच्या प्रश्नांकडे पाठ फिरवली होती. ते आमच्या वस्तीकडे शक्य तितक्या घृणेने बघत. त्यामुळे वस्तीत शासकीय जबाबदारीची स्वच्छतेची कामंही क्वचित कधीतरी केली जात. प्रत्येक घराबाहेर एक घाणेरडं गटार होतं. त्यातून उघड्यावरच मैला वाहत असे. बऱ्याचदा त्या घाणीवर घोंगावणाऱ्या माश्या आमच्या घरात आणि किचनमध्येही येत. गटार उघडं आणि उथळ असल्यामुळे त्यातल्या माश्या उडून अन्नावरही बसायच्या. तेच आम्हाला खावं लागायचं. वस्तीतली बाकी बाया-माणसं कामाला गेल्यावर त्यांची पोरं रस्त्यावर खेळायची. बारकी पोरं रांगायची. त्यांच्या तोंडावर माश्या बसायच्या.

मच्छरांमुळे होणारा मलेरिया, टायफॉईड तर आमची पाठ सोडतच नव्हता. या दुखण्यांनी बेजार करून टाकलं होतं. आमच्या अस्तित्वाकडेच दुर्लक्ष, आरोग्याबाबतीत शासनाचा निष्काळजीपणा ही आम्हाला मिळालेली देणगीच होती. त्याचा थेट परिणाम म्हणून या विषाणूंशी आमचा संबंध यायचा. आठवड्यातून एकदा नगरपालिकेचा सफाई कर्मचारी यायचा. तो एकतर महार, मेहतर किंवा मांग जातीचा असायचा. नगरपालिकेत ब्राह्मण, बनिया उपकंत्राटदारांच्या हाताखाली नेमणूक केलेले हे कर्मचारी. ते सगळे हातानं गटारं साफ करायचे. लोकांनी फेकलेलं खरकटं, मैला, सांडपाणी, सगळ्या प्रकारची माणसांची आणि प्राण्यांची घाण गटारात सडत पडलेली असायची. या सगळ्याचा एक बुळबुळीत शेवाळलेला थर कर्मचारी हाताने वर काढून ठेवायचे. तो कधी दोन दिवस तर कधी आठवडाभर उघड्यावरच असायचा. ही सगळी घाण एवढी कडक व्हायची, की तिला हलवणं  मुश्कील व्हायचं आणि अशा बाहेर काढून ठेवलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांशी रांगणारी पोरं खेळायची.

अनेकदा क्रिकेट खेळताना आमचा बॉल गटारात जायचा. गटारात हात घालून तो काढायला लागत असे. आम्ही त्या घाण आणि काळ्याकुट्ट, घट्ट रेंद्यात उघडेवाघडे हात घालून बॉल शोधत तसंच गटाराच्या आडव्या दिशेने पुढे पुढे जायचो. अनेकदा हाताला भलतंच घाण काही तरी लागायचं. कधी मानवी मैला, कधी केस तर कधी नखं. ते सगळं बघून उलटी यायची.

आमच्या वस्तीशेजारी ज्या वस्त्या होत्या, त्याही आमच्यासारख्याच बदनाम होत्या. पश्चिमेला 'आंबेडकरनगर' आणि 'पूर्वेला जयभीमनगर' होतं. या वस्त्यांची काही चांगली ख्याती नव्हती. मी या अशा प्रकारच्या वस्तीत राहतो, अशी जराशीही शंका बाहेर कुणाला आली तरी लोक सावध होत. त्यांच्या डोक्यातली घंटी वाजू लागे. माझ्याप्रमाणेच या वस्तीत राहणाऱ्या लोकांवर, आमच्याबाबतच्या अनेक चुकीच्या धारणा आणि पूर्वग्रहांचा भडिमार केला जायचा. मला जेव्हा आमच्या

एरियाबद्दल (किंवा मी कुठे राहतो याबद्दल) शाळा-कॉलेजात विचारलं जायचं, तेव्हा मी वस्तीत राहतो ही गोष्ट लपवून शेजारच्या ब्राह्मणबहुल भागात राहतो, असं मुद्दाम सांगायचो. पण माझी लबाडी पकडली जायची आणि लोक माझ्याकडे तुच्छतेने बघायचे. त्यामुळे मला जास्तच लाजिरवाणं वाटायचं; कारण आमच्या वस्तीत राहणारे लोक म्हणजे केवळ 'माणसं' नव्हती, तर त्यांना त्यांच्या कामावरून ओळखलं जायचं...उदा. मोलकरीण, नोकर, मजूर, कारखान्यातले कामगार, हॉटेलमधल्या बश्या धुणारी पोरं इ.

आधुनिक कामगारवर्गाच्या व्याख्येत ही वस्ती आणि आसपासचा परिसर बसतच नव्हता. वस्तीत कुशल, अर्धकुशल आणि किती तरी कौशल्यं अंगी असलेले लोक बहुसंख्येने राहत होते तरीही. नोकरी म्हणावी, असं काहीही त्यांच्या आयुष्यात कधीच नव्हतं. जे काही होतं ते फक्त दास्य...योग्य मोबदला मिळण्याच्या शाश्वतीशिवाय पत्करलेलं. ते सतत कोणत्या तरी समस्यांमध्ये गुरफटलेले असायचे, या समस्या त्यांनी निर्माण केल्याच नव्हत्या. सुरक्षित कामगारवर्गाचा दर्जा त्यांनी कधी अनुभवलाच नाही. हे लोक म्हणजे जातीबाहेर फेकलेला एक वर्ग होता; ज्याच्याकडे फक्त दोन वेळचं पोट भरता येईल एवढीच मालमत्ता होती. क्वचित कधीतरी त्यातल्या कुणाकडे स्थिर नोकरी होती किंवा ज्याला 'आयुष्य' म्हणता येईल, अशी स्थिती होती. पैशाची प्रचंड चणचण असल्यामुळे, ड्रग्ज विकणं ही अनेकांना पैसे कमावण्याची एकमेव संधी वाटायची. बाकी भांडणं, मारामारी, वेश्याव्यवसाय, लैंगिक अत्याचार, दारू, ड्रग्ज घेणं हे सगळं खूप सामान्य आणि सहज होतं तिथे. या अशा परिस्थितीत मी वाढलो.

एकदा जात आणि वर्ण या विषयावरच्या 'येल विद्यापीठ'येथील आफ्रिकन आणि भारतीय कॅम्पसमध्ये माझ्या व्याख्यानाच्या दरम्यान, पदवीला शिकणाऱ्या एका इंडो-आफ्रिकन विद्यार्थ्यानं प्रश्न विचारला. तो प्रश्न असा होता, तुम्ही एखाद्याची जात कशी ओळखता? हे विचारून तो एक क्षणभर थांबला, शांत राहिला आणि त्याच्या वर्गमित्रांनी त्याच्याकडे टाकलेल्या नजरेने त्याला अपराधी वाटलं. तो खजील झाला; त्यानं क्षणार्धात माझ्याकडे पाहिलं, त्याच्या नजरेत अपराधभाव होता.

जोहान्सबर्गमध्ये झालेल्या दुसऱ्या एका कार्यक्रमात माझं व्याख्यान होतं. 'वर्ण-एक मध्यमवर्गीय विशेषाधिकार', या विषयावरील त्या व्याख्यानानंतर मला माझ्या एका भारतीय मैत्रिणीने, शेनीने (ती भारतीय आणि दक्षिण आफ्रिकन समूहाची होती) विचारलं, 'तुम्ही एखाद्याची जात कशी ओळखता?' त्यावर तिच्या आजूबाजूला असणारे सगळेच म्हणजे भारतीय मुस्लीम, हिंदू थबकले, त्यांनी तिच्या प्रश्नावर सहमतीदर्शक मान डोलावली...त्यांनाही माझ्याकडून उत्तर जाणून घ्यायचं होतं.

हार्वर्ड विद्यापीठात एकदा जातीव्यवस्थेवर चर्चा करताना एका आफ्रिकन अमेरिकन प्राध्यापिकेनं मला यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी तिच्या कार्यालयात बोलावलं होतं. ती कायद्याची प्राध्यापिका होती. ''अरेरे...आम्हाला हे माहीतच नव्हतं, ही खूप महत्त्वाची माहिती आहे आणि मी खूप महत्त्वाचं काही तरी शिकलेय.'' विद्यापीठातल्या त्या प्रसिद्ध व्यक्तीनं जाहीरपणे हे मला सांगितलं.

जात सामाजिक संरचना म्हणून एक फसवा घटक आहे, जो त्याच्या मूळ अस्तित्वाच्या मुद्द्यापासून भरकटून दूर जाण्याची मूलभूत क्षमता राखून असतो. जुन्या काळापासून चालत आलेली शोषण व्यवस्था, माणसाला दिलेलं हीनत्व आणि त्याचं अवमूल्यन जातीच्या अस्तित्वावर नियंत्रण ठेवतं. मूलतः ही रचना हिंदू सामाजिक उतरंडीचा भाग असली तरी आता ती भारतीय उपखंडातील सर्व धर्मांमध्ये भिनली आहे. मानवी क्षमता, सृजनशीलता आणि श्रम नियंत्रित करण्याची संकल्पना सिंधुसंस्कृतीइतकीच पुरातन असून तिच्या वैचारिक गाभ्याशी कठोर कायद्यानं (तत्कालीन नीतीनियम) जोडलेली आहे. भारतात जात म्हणजे वर्चस्ववादी वर्गाला, दबल्या गेलेल्यांवर राज्य करण्यासाठी मिळालेली अधिमान्यता आहे. पाच श्रेणींमध्ये झालेलं त्याचं विभाजन पाहिलं तर आढळतं की अधिकृत शोषकांच्या आकृतीमध्ये हे पाच विभाग आडव्या ओळीत दिसतात. भारतात जात पाहायची झाली तर ती वरील पाच भागांतल्या एखाद्याच्या स्थानावरुन पाहता येते. जातीवरील संवाद संबंधित व्यक्तीच्या, व्यवस्थेतील सहभागाच्या दिशेनं जातो.

माझं आयुष्य माझ्या भवतालाने नियंत्रित केलं होतं आणि त्याचा माझ्यावर लक्षणीय परिणाम झाला होता. माझं स्वतःचं माणूस म्हणून समान असणं हे अधोरेखित करण्याचं सामर्थ्यच माझ्याकडे नव्हतं. हिंसा, कठोरता, या दोनच गोष्टींनी मी माझं अस्तित्व जाणवून देऊ शकत होतो. याव्यतिरिक्त कोणत्याही गोष्टीला माझ्या वस्तीतल्या इतरांची, दलितांचीही मान्यता नव्हती.

अन्याय आणि गैरवर्तणूक यांनी माझं आयुष्य भरलेलं होतं. अनेक अत्याचारांचे प्रसंग माझ्यासोबत घडत गेल्यावर मी कडवट होत गेलो. जसजसा मोठा होत गेलो, तसा मी अधिक संवेदनशील झालो. मग मी अन्याय-अत्याचार किंवा मला कुणी चिडवतंय, हिणवतंय का, याकडे सतत लक्ष देऊ लागलो. मला कुणी अन्यायीपणे वागवल्याचं लक्षात येताच मी दुःखी होत असे. मला अन्यायाविरोधात तीव्र संताप येत असे, त्याला विरोध करावासा वाटे. असं काही झालं की त्याआधी घडून गेलेले अन्यायी प्रसंग वीज चमकावी तसे माझ्या डोक्यात गर्दी करत. त्यामुळे डोक्यात तिडीक जायची आणि अन्याय झुगारुन द्यावा, बंड करावं असं वाटत असे. अभ्यासात, अभ्यासेतर बाबींत माझी कामगिरी खूप चांगली राहिली. तशी ती कायमच राहील हे मी काळजीपूर्वक पाहत होतो, तरीही मला वस्तीतल्या एखाद्या अशिक्षित मजुरासारखं वागवलं जायचं. हतबल, हताश आणि असुरक्षित वाटायचं. एक सुशिक्षित व्यक्ती म्हणून मला जो किमान आदर आणि मान्यता/ ओळख मिळणं अपेक्षित होतं, तोसुद्धा लोकांनी नाकारला. मी कोणीही नव्हतो पण माझ्या गुणवत्तेला आणि महत्त्वाकांक्षेला, इच्छेलाही तिथं मान नव्हता. दलितांची एक साचेबद्ध प्रतिमा आहे, त्यातच मला जबरदस्तीनं कोंबलं जायचं. दलित म्हणजे हिंसक, अकार्यक्षम, कोणतीही गुणवत्ता नसलेले, गुन्हेगारी वृत्तीचे अशीच ती साचेबद्ध प्रतिमा होती. जात आणि धर्माच्या आधारावर झालेलं विभाजन या घटकांचं संपूर्ण पावित्र्य टिकवून ठेवतं. हा पावित्र्याचा खेळ 'खालच्या' म्हणवल्या गेलेल्या, बाटलेल्या किंवा गुणवत्ताहीन दलितांचं 'माणूस' असणं, त्यांची मानवीयता समजून घ्यायला वावच देत नाही. त्यामुळे दलित सतत आपली मानुषताच धिक्कारली जाईल, या भीतीच्या छायेत जगत असतात. वर्चस्ववादी जातींमधील मुलांचे पालक सतत त्यांच्या मुलांच्या मनात दलितांच्या गुन्हेगारी वृत्तीबद्दल काहीबाही भरवत असतात. दलित गुन्हेगारी वृत्तीचे असतात, या दलितांबद्दल सर्वदूर

पसरलेल्या धारणेचाच उत्तम वापर ते त्यांच्या जातीभेदाच्या वर्तणुकीचं समर्थन करण्यासाठी करतात.

यामुळे दलित व्यक्तीला एका विशिष्ट वर्तुळात (जवळपास बंदिवासातच) राहावं लागतं किंवा आपली ओळख लपवून जगावं लागतं. शहरात राहणाऱ्या आणि आवडत्या उद्योग व्यवसायात स्थिरावलेल्या दलितांना आपल्या जातीची ओळख लपवूनच राहावं लागतं. एकदा मुंबईतला एक प्रथितयश जाहिरात कंपनीचा मालक मला, काही मोठ्या जाहिरात कंपन्यांची नावं सांगत होता. त्यानं सांगितलं, ''या क्षेत्रातील सर्वात यशस्वी ठरलेल्यांपैकी पहिल्या तीन क्रमांकांवर असलेल्या व्यक्ती दलित आहेत, पण त्यांना आपण दलित म्हणून ओळखलं जावं, असं वाटत नाही. लोकांना हे माहीत आहे, तरीही ते आपली जात लपवतात.'' एकदा मॅनेजमेंट क्षेत्रातल्या एका प्रस्थापित व्यक्तीनं सांगितलं..की तो मूळचा हरयाणाचा असून आदिवासी आहे. खरं तर त्यानं मोठ्या मुश्किलीनं भारतीय जातीव्यवस्थेतलं त्याचं स्थान सांगितलं होतं. त्यानं हेही सांगितलं की आदिवासी असूनही त्यानं कधीही आरक्षणाचा लाभ घेतला नाही; कारण त्यामुळे आपण अनुसूचित जमातीचे आहोत, ही त्याची ओळख उघड झाली असती.

तर माझी मैत्रीण, सहकारी आणि प्राध्यापिका यांनी विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर - जे जाहीरपणे जातीव्यवस्थेचं समर्थन करतात किंवा बचावात्मक पवित्रा घेऊन त्याला मान्यता देतात ते या भयंकर स्वरूपाच्या दमनाला अगदी भाबडेपणाने, ऐतिहासिक संदर्भ देऊन, वर जातीव्यवस्था टिकली पाहिजे, असं म्हणणं मांडतात/ पुस्ती जोडतात. जातीव्यवस्थेतून मिळणाऱ्या विशेषाधिकारांचा लाभ घेणारे या घृणास्पद व्यवस्थेवर कधीच कोरडे ओढत नाहीत/ हल्ला बोल करत नाहीत/ आसूड ओढत नाहीत, कारण तसं केलं तर त्यांचं सत्तास्थान डळमळीत होण्याची भीती असते. कोणत्याही कामाशिवाय/ योगदानाशिवाय त्यांना केवळ जातीनं मिळणाऱ्या विशेषाधिकारांचा सामना करण्याची त्यांची इच्छा नसते. असे लोक आपल्या या दृष्टिकोनाचं समर्थन करण्यासाठी गुणवत्तेचा मुद्दा पुढे करतात. गुणवत्तेच्या मुद्द्याविषयी बोलतानाही, त्यांच्या अंगी असलेली गुणवत्ता, त्यांच्याकडे असलेल्या विशेषाधिकारांमुळे / विशेष लाभांमुळे तयार झालेली आहे, ही बाब ते सोयीस्करपणे विसरतात. आणि याच गुणवत्तेकडे मग निष्पक्षपातीपणे किंवा तटस्थपणे पाहिलं जातं. त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक भांडवलानेच गुणवत्ता तयार होते आणि या सगळ्याचा अभाव असलेल्यांवर, विशेषाधिकार असलेल्या व्यक्तींच्या तुलनेत आणि त्यांनीच आधी ठरवून ठेवलेल्या निकषांच्या कसोटीवर इतर जण गुणवत्ताहीन असल्याचा ठपका ठेवतात.

आजच्या स्पर्धेच्या जगात, असमानता असलेल्या जगात गुणवत्ता हे कारण पुढे करून पिढ्यान्‌पिढ्या विशेषाधिकार उपभोगणारे वर्चस्ववादी समूह, वर्षानुवर्ष समाजात रुजलेल्या सामाजिक असमानता कमी करणाऱ्या कल्याणकारी उपाययोजनांना विरोध करतात. विषमताधिष्ठित व्यवस्थेत बदल करायचा असेल तर भौतिक परिस्थिती बदलण्यासाठी आवश्यक उपाययोजना या मूलभूत गरजा आहेत. शोषित आणि अभावग्रस्ततेत जगणाऱ्या समूहाचं जीवनमान कसं आणि किती सुधारतं यावर ती भौतिक परिस्थिती अवलंबून आहे. हल्ली एखाद्या व्यक्तीला अधिकाधिक शिक्षण घ्यायचं असेल तर, त्याच्या गुणांच्या आकड्यांकडे, त्याची क्षमता म्हणून पाहिलं जातं. म्हणजे त्याची क्षमता काही आकड्यांमध्ये मोजली जाते; आणि हे करताना गुणवत्ता ही बाब कशाचा तरी साध्य परिणाम आहे, एखाद्या व्यक्तीच्या क्षमतेचं प्रतिनिधित्व नव्हे, हे मांडलं जात नाही. एखाद्या व्यक्तीचा कुटुंबानं केलेला सांभाळ, घेतलेली काळजी, शिक्षणाकडे दिलेलं लक्ष, विविध कलागुणांना दिलेलं प्रोत्साहन, अभ्यासेतर उपक्रम, सभोवतालचा परिसर, आर्थिक पाठबळ, गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याची सुविधा आणि शिक्षक उपलब्ध असणे या सोयीसुविधांची परिणती गुणवत्तेत म्हणजेच ज्याला आपण व्यक्तीचं मेरिट असं म्हणतो, त्यात होते. आपल्याकडे अनेक प्रवेशपरीक्षांची रचनाच, वरील सर्व किंवा त्यातील बहुतांश सोयीसुविधा ज्यांच्याकडे उपलब्ध आहेत, त्या समूहातील लोकांना डोळ्यासमोर ठेवून केलेली असते. त्यामुळे अशा पार्श्वभूमीतून येणारे लोक या 'गुणवत्ताधारी' जगात अगदी सहज मिसळून जातात.

भांडवली समाजातील विविध समूहांची एक सामायिक भाषा हे दुसरंतिसरं काही नसून ते जातीआधारित लागेबांधे आहेत, जिथे एखाद्या विशिष्ट जातीचा माणूस आपल्याच जातभाईंना / जातबांधवांना विविध संधी कशा मिळतील, हे पाहतो. शिक्षण आणि नोकऱ्यांच्या क्षेत्रात असे कंपू महत्त्वाची भूमिका पार पाडतात. मार्गदर्शन, प्रशिक्षण हा या कंपूंच्या कार्यपद्धतीचा एक महत्त्वाचा भाग. विद्यार्थ्यांना भविष्यात त्यांच्या वाटचालीची दिशा काय असावी, यासाठीच तर असं मार्गदर्शन, प्रशिक्षण महत्त्वाचं ठरतं. व्यवसाय आणि नोकरीधंद्याच्या क्षेत्रांतही अनेक जातींचे कंपू खूप महत्त्वाची भूमिका निभावतात. असे कंपू आडवळणाने त्या त्या क्षेत्रात जातीय घराणेशाहीच चालवत असतात. अनेक लोकांनी काही वेळा असा अनुभव घेतलेला असतो पण त्यांना या समस्येशी काही देणंघेणंच नसतं. वर्चस्ववादी जाती अशा गोष्टींवर मूक राहणंच पसंत करतात आणि त्यामुळेच जातीय समस्यांवर आपलं तोंड बंद ठेवून, एक धूसर पडदा असलेला जातीय दहशतवादच ते पोसत असतात.

★

**('मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या आगामी 'कास्ट मॅटर्स' या सूरज येंगडे लिखित आणि प्रियांका तुपे आणि प्रणाली येंगडे अनुवादित पुस्तकातून)**


आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

**सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती**

कृपया आपला संपूर्ण पत्ता (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

जिद्द आणि चिकाटीने आलेल्या संकटांवर मात करणाऱ्या छोट्या चुटकीचं अनोखं जग...

# चुटकीचं जग




लेखक
**फारूक एस. काझी**




पृष्ठसंख्या : ९६
किंमत : ₹१९५

संपूर्ण सचित्र

परमपूज्य दलाई लामा यांचे जीवन आणि त्यांच्या शिकवणीतून मिळणारे धडे

# करुणेचं बीज





लेखक
**परमपूज्य दलाई लामा**
चित्रकार
**बाओ लु**
अनुवाद
**योजना यादव**
पृष्ठसंख्या : ३२
किंमत : ₹८०

संपूर्ण सचित्र



अकबर बिरबल मालिका

सच्चेपणा, बुद्धिचातुर्य व हजरजबाबीपणाचा दिलखुलास नजराणा






# अशी जिरवली सरदारांची । अकबराचा जप
# चिलखताची पारख । दयाळू बिरबल

लेखक : **मंजूषा आमडेकर**

संपूर्ण सचित्र

पृष्ठसंख्या प्रत्येकी : ९६ । किंमत प्रत्येकी : ₹१९५

# दिनविशेष

## १६ ऑक्टोबर ते १५ डिसेंबर२०२१ दरम्यानचा दिनविशेष

## दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

### खालील संचांवर १६ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान खास सवलत

**१६ ऑक्टोबर - ऑस्कर वाईल्ड यांचा जन्मदिन**
'द पिक्चर ऑफ डोरियन ग्रे' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-

**२० ऑक्टोबर - चेतन जोशी यांचा जन्मदिन**
'कॉकटेल कार्निवल' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-

**२१ ऑक्टोबर - सर आल्फ्रेड नोबेल यांचा जन्मदिन**
'नोबेल ललना भाग १', 'नोबेल ललना भाग २'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३१५/- । सवलत किंमत १९९/-

**२१ ऑक्टोबर - पॉल विल्सन यांचा जन्मदिन**
'शांततेनं काम करा!' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-

**२३ ऑक्टोबर - मायकेल क्रायटन यांचा जन्मदिन**
'नेक्स्ट', 'पायरेट लॅटिट्यूड्स', 'प्रे (सावज)',
'स्टेट ऑफ फिअर', 'मायक्रो', 'डिस्क्लोजर'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २३३०/- । सवलत किंमत १४१७/-

**२३ ऑक्टोबर - अरविंद अडिगा यांचा जन्मदिन**
'द व्हाइट टायगर' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-

**२४ ऑक्टोबर - रोशन दलाल यांचा जन्मदिन**
'सत्तरीतला भारत' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

**२४ ऑक्टोबर - आर. के. लक्ष्मण यांचा जन्मदिन**
'कसं बोललात!' - भाग १ ते ७
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ६६५/- । सवलत किंमत ३९९/-

**२६ ऑक्टोबर - हिलरी क्लिंटन यांचा जन्मदिन**
'लिव्हिंग हिस्ट्री', 'हिलरी क्लिंटन'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ७६५/- । सवलत किंमत ५१९/-

**२७ ऑक्टोबर - ॲरन राल्स्टन यांचा जन्मदिन**
'ते १२७ तास!' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-

**२९ ऑक्टोबर - ली चाइल्ड यांचा जन्मदिन**
'नथिंग टू लूज', 'वन शॉट'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ६९०/- । सवलत किंमत ३९९/-

**३० ऑक्टोबर - डेव्हिड बेनब्रिज यांचा जन्मदिन**
'टीनएजर्स' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २२९/-

### खालील संचांवर १ ते १५ नोव्हेंबर दरम्यान खास सवलत

**२ नोव्हेंबर - जयश्री कुलकर्णी यांचा जन्मदिन**
'मांजराची सावली', 'विषवल्ली'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-

**२ नोव्हेंबर - कविता भालेराव यांचा जन्मदिन**
'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग - १', 'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग - २'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-

**२ नोव्हेंबर - अरुण शौरी यांचा जन्मदिन**
'गव्हर्नन्स', 'हे सर्व आपल्याला कोठे नेणार?', 'कळेल का 'त्याला' आईचं मन?', 'मागील पानावरून... मागेच'!, 'आत्मवंचना', 'वाळवीग्रस्त वृक्षाला पोलादी कुंपण वाचवेल का?', 'ख्यातनाम इतिहासकार', 'अनिताला जामीन मिळतो'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३७००/- । सवलत किंमत २४९९/-

**२ नोव्हेंबर - ल्यूसी हॉकिंग यांचा जन्मदिन**
'जॉर्ज अॅन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट',
'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १४८५/- । सवलत किंमत ९९९/-

**३ नोव्हेंबर - लीला गोविलकर यांचा जन्मदिन**
'मराठीचे व्याकरण' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २९९/-

**३ नोव्हेंबर - रिचर्ड होम्स यांचा जन्मदिन**
'चर्चिलच्या पाऊलखुणा' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३९९/-

**५ नोव्हेंबर - डॉ. अतुल गवांदे यांचा जन्मदिन**
'बीइंग मॉर्टल', 'बेटर', 'जीव जिथे गुंतलेला...',
'यशप्राप्तीचा जाहीरनामा!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १०९०/- । सवलत किंमत ७४९/-

**६ नोव्हेंबर - श्याम भुर्के यांचा जन्मदिन**
'आनंदाचं पासबुक', 'गोष्टींचं एटीएम', 'खुमासदार अत्रे',
'मंत्र श्रीमंतीचा', 'पु.ल. : एक आनंदयात्रा', 'पुणं एक साठवण',
'सभेत कसे बोलावे', 'द माइंड जिम', 'द स्टार प्रिन्सिपल',
'द माइंड जिम रिलेशनशिप्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २०००/- । सवलत किंमत १२९९/-

**६ नोव्हेंबर - संजय ढोले यांचा जन्मदिन**
'अंतराळातील मृत्यू', 'अश्मजीव', 'डिंभक', 'प्रेमाचा रेणू',
संकरित' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १०२५/- । सवलत किंमत ५९९/-

**७ नोव्हेंबर - रत्नावली दातार यांचा जन्मदिन**
'सुखद बालसंगोपन', 'सुखद मातृत्व', 'सुखद वृद्धत्व'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३२५/- । सवलत किंमत १९९/-

**७ नोव्हेंबर - हेलन गार्नर यांचा जन्मदिन**
'एक विश्रांती स्थळ' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-

**७ नोव्हेंबर - जागतिक कर्करोग जागरूकता दिन**
'कॅन्सर रोखू या एका सजग जीवनशैलीसह',
'इट्स नॉट अबाउट द बाइक', 'द जॉय ऑफ कॅन्सर',
'आयुष्याचा अंतिम संस्कार' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५६९/-

**११ नोव्हेंबर - सुरेखा शहा यांचा जन्मदिन**
'थेंबभर पाणी अनंत आकाश' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-

**१२ नोव्हेंबर - ख्रिस्तोफर रिच यांचा जन्मदिन**
'रुल्स ऑफ डिसेप्शन्स' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४८०/- । सवलत किंमत २९९/-

**१३ नोव्हेंबर - ना. रा. वडनप यांचा जन्मदिन**
'बुद्धिबळाचा ओनामा', 'सुसंघटित मारा',
'चतुरंग (बुद्धिबळातील) सापळे,' 'बुद्धिबळाचा श्रीगणेशा',
'बुद्धिबळ शिका' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ४९९/-

**१४ नोव्हेंबर - बालदिन**
**संच १ -** बंटू बसला ढगात (२ पुस्तकांचा संच),
चित्रमय रंगतदार कथा भाग १ ते १३
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २९००/- । सवलत किंमत १४१५/-

**संच २** - ससोबा हसोबा मालिका भाग २, दोस्ती, खुलदाबादचा खजिना, जंगल जंमत मालिका भाग १ व २, चित्रमय बोधकथा भाग १, एल्मर मालिका, कांगारू देशीच्या गोष्टी, जादूमंतर छू, मर्कटराजा, हनुमान, शिकारी बनला शिकार, समादचा वाळवंटातील व रानातील फेरफटका, जादूचं रबर आणि इतर गोष्टी, गोष्टी देशोदेशीच्या, चित्रमय रंगतदार कथा भाग १४ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३०८०/- । सवलत किंमत १५४०/-

**संच ३** - ससोबा हसोबा मालिका भाग १, ग्रेटाची गोष्ट, मोठ्यांच्या छोट्या गोष्टी, पंचतंत्रातील गोष्टी (५ पुस्तकांचा संच), जातक कथा, हितोपदेश, निसर्ग आणि इतर गोष्टी, गोष्ट डॉट कॉम १,२,३ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २२५५/- । सवलत किंमत ११२८/-

**संच ४** - फ्रँकलिन मालिका भाग १- (४ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग २-(३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ३ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ४ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ५ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ६ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ७ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ८ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ९ (४ पुस्तकांचा संच), बब्बड भाग १, गम्मत कोडी या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १९४५/- । सवलत किंमत ९७३/-

**संच ५ -** आपली सृष्टी संच, शेवडे गुरुजी संच
या पुस्तकांच्या संचांवर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३१८०/- । सवलत किंमत १५९०/-

**संच ६ -** विक्रम वेताळ मालिका भाग १ ते ३,
अकबर बिरबल मालिका (अजब आज्ञापालन),
अकबर बिरबल मालिका (बोलकी थाळी), विज्ञान नवलाई संच
या पुस्तकांच्या संचांवर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २२१०/- । सवलत किंमत ११०५/-

**संच ७ -** विल्यम शेक्सपिअर संच, अस्थी, घरटे, सूर्यास्त,
मध्यरात्र, यज्ञकुंड, सैनिकहो तुमच्यासाठी...
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १८३०/- । सवलत किंमत ९१५/-

**१४ नोव्हेंबर - जागतिक मधुमेह दिन**
'चला जाणून घेऊ या ! मधुमेह', 'मधुमेह एक आव्हान'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-

**१४ नोव्हेंबर - जोसेफ तुस्कानो यांचा जन्मदिवस**
'ग्रेटाची गोष्ट', 'सत्तरीतला भारत'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ५२०/- । सवलत किंमत ३५९/-

**१५ नोव्हेंबर - संजय राऊत यांचा जन्मदिन**
'एकवचनी भाग १ आणि २'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५९९/-

**खालील संचांवर १६ ते ३० नोव्हेंबर दरम्यान खास सवलत**

**१७ नोव्हेंबर - रत्नाकर मतकरी यांचा जन्मदिन**
रत्नाकर मतकरी लिखित १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २२९५/- । सवलत किंमत १५९९/-

**१७ नोव्हेंबर - मोहना जोगळेकर यांचा जन्मदिन**
'रिक्त' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-

**१९ नोव्हेंबर - जॅक शॅफिर यांचा जन्मदिन**
'भल्या दिलाचा माणूस' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३९/-

**२१ नोव्हेंबर - मंजुश्री गोखले यांचा जन्मदिन**
मंजुश्री गोखले लिखित ७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २०८०/- । सवलत किंमत १५१९/-

**२४ नोव्हेंबर - डेल कार्नेगी यांचा जन्मदिन**
डेल कार्नेगी लिखित ६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १२००/- । सवलत किंमत ७९९/-

**२४ नोव्हेंबर - अरुंधती रॉय यांचा जन्मदिन**
'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज', 'द मिनिस्ट्री ऑफ अटमोस्ट हॅपिनेस'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
मूळ किंमत ९४५/- । सवलत किंमत ५९९/-

**२४ नोव्हेंबर - सुधीर गाडगीळ यांचा जन्मदिन**
'लाइफ-स्टाइल' पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-

**२६ नोव्हेंबर - वीणा देव यांचा जन्मदिन**
'स्वान्सीतील दिवस' पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

**२६ नोव्हेंबर - मुंबई अॅटॅक दिन**
'२६/११ मुंबईवरील हल्ला' पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-

**२६ नोव्हेंबर - अनंत भोयर यांचा जन्मदिन**
'आभाळझुंज', 'हराळी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३२९/-

**२८ नोव्हेंबर - विश्वास पाटील यांचा जन्मदिन** 'बंदा रुपाया',
'क्रांतिसूर्य', 'नागकेशर', 'नॉट गॉन विथ द विंड', 'संभाजी',
'गाभुळलेल्या चंद्रबनात' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २३६५/- । सवलत किंमत १७९९/-

**३० नोव्हेंबर - आनंद यादव यांचा जन्मदिन**
आनंद यादव लिखित ३३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ६१२५/- । सवलत किंमत ४४३०/-

**३० नोव्हेंबर - मार्क ट्वेन यांचा जन्मदिन**
'हकलबेरी फिनची साहसं', 'टॉम सॉयरची साहसं'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ४७९/-

**३० नोव्हेंबर - योजना यादव यांचा जन्मदिन**
'मरी मरी जाय सरीर' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ९९/-

**३० नोव्हेंबर - संजीव परळीकर यांचा जन्मदिन**
'चार जबरदस्त फंडे', 'चार शब्द द्यावे-घ्यावे', 'केल्याने होत आहे रे...', 'पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र', 'पुढाकार घ्या', 'विक्रीकौशल्य शिका', 'याला जीवन ऐसे नाव', 'झटपट व्यक्तिमत्त्व विकास' पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८६०/- । सवलत किंमत ५६९/-

**३० नोव्हेंबर - हॅरिएट लर्नर यांचा जन्मदिन**
'द डान्स ऑफ अँगर', 'द डान्स ऑफ डिसेप्शन', 'द डान्स ऑफ इन्टिमसी', 'द मदर डान्स'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १०२०/- । सवलत किंमत ६९९/-

**खालील संचांवर १ ते १५ डिसेंबर दरम्यान खास सवलत**

**१ डिसेंबर - अर्न्स्ट टोलर यांचा जन्मदिन**
'तुरुंगातील पत्रे' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत १०९/-

**१ डिसेंबर - हिमसागर ठाकूर यांचा जन्मदिन**
'महागाई एक चक्रव्यूह' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-

**३ डिसेंबर - जागतिक अपंग दिन**
'दिव्यगुणी', 'लाइफ विदाउट लिमिट्स'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
मूळ किंमत ५७५/- । सवलत किंमत ३४९/-

**४ डिसेंबर - निक व्होयचिच यांचा जन्मदिन**
'लाइफ विदाउट लिमिट्स' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-

**६ डिसेंबर - मिनेक शिप्पर यांचा जन्मदिन**
'नेव्हर मॅरी अ वुमन विथ बिग फीट' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४२९/-

**७ डिसेंबर - विला कॅथर यांचा जन्मदिन**
'देवाची माणसे' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-

**९ डिसेंबर - सोनिया गांधी यांचा जन्मदिन**
'निमित्ता निमित्ताने...' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-

**११ डिसेंबर - ओशो यांचा जन्मदिन**
ओशो लिखित ३० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ५०७०/- । सवलत किंमत ३३४९/-

**१३ डिसेंबर - मेरी ॲन शाफर यांचा जन्मदिन**
'गर्नसी वाचक मंडळ' या पुस्तकावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-

**१५ डिसेंबर - गीता फोगाट यांचा जन्मदिन**
'आखाडा' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-

**१५ डिसेंबर - सुरेश पाटील यांचा जन्मदिन**
'दाह' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-

**१५ डिसेंबर - ग्रेचेन रुबिन यांचा जन्मदिन**
'आनंदतरंग' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-

★


आमच्या लेखकांच्या जन्मदिनानिमित्त
तसेच दिनविशेषावर
आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२
**Whats App No. ९४२०५९४६६५**
**website : www.mehtapublishinghouse.com**

नवं कोरं

बंदिस्त रंगमंचाच्या सुरक्षित अवकाशपल्याड रानामाळांत,
उरसा-जत्रांत अभिनयाच्या श्रेष्ठ पताका झळकावणाऱ्या
गावकुसाबाहेरील कलावंतांची श्रेष्ठ परंपरा मायमराठीत होती.
त्या फिरत्या चाकावरच्या रंगफडात फुललेली
**बेमिसाल प्रेमकहाणी!**




# गाभुळलेल्या चंद्रबनात


## विश्वास पाटील



पृष्ठसंख्या : ३१२ । किंमत : ₹३९५

Book Available

**विश्वास पाटील यांची 'मेहता पब्लिशिंग हाऊस'द्वारे प्रकाशित इतर पुस्तके**





पृष्ठसंख्या : ८६४
किंमत : ₹५४०

Book Available



पृष्ठसंख्या : २४०
किंमत : ₹२९५

Book Available




पृष्ठसंख्या : १६८
किंमत : ₹१९०

Book Available




पृष्ठसंख्या : २६२
किंमत : ₹४९५

Book Available



पृष्ठसंख्या : ४०४
किंमत : ₹४५०

Book Available

हम लड़ेंगे साथी, उदास मौसम के लिए
हम लड़ेंगे साथी, ग़ुलाम इच्छाओं के लिए
हम चुनेंगे साथी, ज़िन्दगी के टुकड़े

हथौड़ा अब भी चलता है, उदास निहाई पर
हल अब भी चलता हैं, चीख़ती धरती पर
यह काम हमारा नहीं बनता है,
सवाल नाचता है
सवाल के कन्धों पर चढ़कर
हम लड़ेंगे साथी

क़त्ल हुए जज़्बों की क़सम खाकर
बुझी हुई नज़रों की क़सम खाकर
हाथों पर पड़े गाँठों की क़सम खाकर
हम लड़ेंगे साथी

हम लड़ेंगे जब तक
दुनिया में लड़नें कीं ज़रूरत बाक़ी है
जब बन्दूक न हुई, तब तलवार होगी
जब तलवार न हुई, लड़ने की लगन होगी
लड़ने का ढंग न हुआ, लड़ने की ज़रूरत होगी

और हम लड़ेंगे साथी
हम लड़ेंगे
कि लड़े बग़ैर कुछ नहीं मिलता
हम लड़ेंगे
कि अब तक लड़े क्यों नहीं
हम लड़ेंगे
अपनी सज़ा कबूलने के लिए
लड़ते हुए मर जाने वाले की
याद ज़िन्दा रखने के लिए
हम लड़ेंगे...

**- पाश**

मेहता
पब्लिशिंग
हाउस

१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर,
माडीवाले कॉलनी, पुणे ३०
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२,
२४४६०३१३, २९५२४०४८
Email: mmgj@mehtapublishinghouse.com
customercare@mehtapublishinghouse.com
Website: www.mehtapublishinghouse.com